TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

# निबंधलेखन

## आणि

# अनुवाद.

लेखक—विद्याधर वामन भिडे, बी. ए.

मुद्रक व प्रकाशक,

जोशी, "चित्रशाळा प्रेस" १०२६ सदाशिव पेठ

पुणें शहर

आवृत्ति चवथी.

किंमत ८ आणे.

UNIVERSAL LIBRARY

OU_192621

UNIVERSAL LIBRARY

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

अलीकडे मुंबई युनिव्हर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेत मराठी भाषा हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे. ह्या परीक्षेच्या विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं आम्ही हे लहानसे पुस्तक तयार केले आहे. तथापि इतर परीक्षाना बसणाऱ्या उमेदवारासही याचा उपयोग व्हावा, अशी यात आम्ही योजना केली आहे.

१

निबंधलेखन—हा भाग आम्ही मोठ्या माणसाच्या करमणुकीसाठीं किंवा त्याना उपयुक्त ज्ञान देण्यासाठी रचिलेला नाहीं तर विद्यार्थ्यांना जी माहिती असेल किंवा मिळू शकेल, ती त्यानीं स्पष्ट, शुद्ध व व्यवस्थित रीतीने निबंधाच्या रूपाने कशी मांडावी हे समजावून देण्याच्या उद्देशाने निबंधलेखन हा भाग आम्हीं रचिलेला आहे. हा उद्देश सफल होईल. अशी आमची उमेद आहे.

२

अनुवाद—ह्या विषयावर आजपर्यंत मराठी भाषेत पुस्तके झालेलीं नाहींत. आम्ही अनुवादाच्या संबंधाने ज्या सूचना विद्यार्थ्यांस दिल्या आहेत त्या त्रोटक आहेत तथापि त्या करवतील तितक्या व्यवस्थित करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. ह्या पुस्तकाला द्वितीयावृत्तीचा योग आल्यास अनुवाद ह्या विषयाचे जास्ती तपशीलवारपणे निरूपण करण्याचा आमचा संकल्प आहे, परंतु आज आम्हीं हा विषय ज्या रूपाने रचिला आहे त्या रूपाने तो अंशतः तरी विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडेल अशी आम्हाला उमेद आहे.

सदाशिव पेठ गायआळी. पुणे
ता १ जून १९१०

विद्याधर वामन भिडे.

प्रकाशक -

**जोशी ब्रदर्स,**

बुकसेलर्स ॲंड पब्लिशर्स

**गौळीगुडा, हैद्राबाद दक्षिण.**

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

Post Graduate Library
College of Arts & Commerce

मुद्रक -

**श्री कृपा मुद्रणालय,**

बी १०१९६३ गौळीगुडा,

**हैद्राबाद दक्षिण.**

# निबंधलेखन आणि अनुवाद.

## १. निबंधलेखन.

१. विद्यार्थ्यांना एकाद्या पदार्थाचे वर्णन, किंवा एकाद्या हकीगतीचें निवेदन, किंवा एकाद्या विषयासंबंधानें स्वताच्या मताचे निरूपण, करावें लागते. ह्या रचनेला निबंधरचना, किंवा निबंलेखन. असे म्हणतात.

२. विद्यार्थ्यांनीं रचावयाचे निबंध तीन प्रकारचे असतात. ( १ ) वर्णनात्मक, ( २ ) वृत्तातात्मक आणि ( ३ ) विमर्शात्मक.

३. वर्णनात्मक निबंधात एकाद्या शहराचे किंवा स्थलाचे, एकाद्या उत्सवाचे किंवा जत्रेचें, एकाद्या इमारतीचे, एकाद्या नदीचे, एकाद्या बागेचें, वगैरे वर्णन द्यावयाचे असते. अशा प्रकारच्या निबंधात कालाचा अनुक्रम पाहण्याचें फारसे प्रयोजन नसते, परंतु जर घडलेल्या काही गोष्टींचे वर्णन करण्याचा प्रसंग आला, तर त्या गोष्टी कालाच्या अनुक्रमाने दिल्या पाहिजेत.

४. वृत्तातात्मक निबधांत एकाद्या ऐतिहासिक विषयाचा किंवा एकाद्या थोर पुरुषाच्या चरित्रातील ठळक गोष्टींचा, किंवा विद्यार्थ्यानें केलेल्या एकाद्या प्रवासाचा, किंवा एकाद्या गावी प्रसंगविशेषीं घालविलेल्या दिवसाच्या हकीगतीचा, गोषवारा द्यावयाचा असतो. असल्या प्रकारच्या निबंधात घडलेल्या गोष्टी कालाच्या अनुक्रमाने द्यावयाच्या असतात.

५. विमर्शात्मक निबंधात एकादा सद्गुण, दुर्गुण, चालरीत, उपदेशवाक्य, बोधवचन, म्हण, वाद, इत्यादिकांसबंधाने आपले विचार साधकबाधक प्रमाणे देऊन नमूद करावयाचे असतात. स्त्रीशिक्षण, प्रामाणिकपणा, आळस, प्रयत्नाअतीं परमेश्वर, धैर्य, काटकसरीपणा, इत्यादि विषयावरील जे निबंध, ते विमर्शात्मक होत.

६. कधीं कधीं एकाच निबंधाच्या विषयात वृत्तात आणि वर्णन हें दोन्ही प्रकार समाविष्ट झालेले असतात, व कधीं कधीं वृत्तात आणि वर्णन

ह्या दोन्हींचीही योजना विमर्शात्मक निबंधात करावयाची असते. उदाहरणार्थ, " तुम्हीं केलेल्या एकाद्या प्रवासाचे वर्णन करा. " असा जर निबंधाचा विषय असला, तर त्यात प्रवासाची हकीगत कालानुक्रमाने द्यावयाची असते, ह्यासंबंधाने तो निबंध वृत्तातात्मक होतो, आणि प्रवासात पाहिलेल्या वस्तूंचे वर्णन करावयाचे असतें, म्हणून तो निबंध वर्णनात्मकही होतो.

७. किंवा असें समजा कीं, " **कादंबरी** " हा निबंधाचा विषय आहे, ह्या निबंधात कादंबऱ्याचे स्वरूप काय असते, कादंबऱ्याचे प्रकार किती आहेत, वगैरे मजकूर आला, तर तेवढ्यापुरता तो निबंध वर्णनात्मक होईल. कादंबरीचे पूर्वीचे स्वरूप काय होते, व कोणच्या क्रमाने व कोणत्या पायऱ्यानीं कादंबरीला हल्लींचे स्वरूप प्राप्त झाले आहे, हा मजकूर निबंधात आला, तर तेवढ्यापुरता तो निबंध वृत्तातात्मक होईल, व कादंबऱ्याचे वाचन हें ज्ञान, नीति, वगैरेंच्या वर्धनास व वाचणाऱ्याची करमणूक करण्यास कितपत उपयोगी आहे, यासंबंधाने लेखकाने आपले मत दिले, तर तेवढ्या-पुरता तो निबंध विमर्शात्मक होईल.

८. वर्णनात्मक निबंधात विद्यार्थ्याची अवलोकनशक्ति कशी काय आहे, हे समजते. वृत्तातात्मक निबंधात विद्यार्थ्यास सगतवार रीतीने कथन करता येतें किंवा नाही, हे समजते, आणि विमर्शात्मक निबंधात त्याची विचार-सरणी शुद्ध, ( म्हणजे तर्कशास्त्राच्या नियमाना अनुसरून ), आहे किंवा नाहीं, हें समजते.

९. आम्ही वर जे तीन प्रकारचे निबंध सांगितले, त्यांपैकीं प्रत्येक प्रकारचे विशेष स्वरूप, व ते निबंध लिहिताना त्याचे विभाग वगैरे कसे पाडावे, ह्यासंबंधाच्या सूचना आता आम्ही देतो त्या विद्यार्थ्यानें लक्षात बाळगाव्या.

१०. वर्णनात्मक निबंधात वर्णन करताना दिलेल्या विषयाचे विद्यार्थ्यानें कांहीं तरी तत्त्वावर विभाग पाडून, मग पहिल्या विभागात येणाऱ्या वस्तूंचे वर्णन करावयास हातीं घ्यावें, तें संपल्यावर पुढच्या विभागात येणाऱ्या वस्तूंचे वर्णन एका विभागात येणाऱ्या काही वस्तूंचे वर्णन एकदा करून नंतर दुसऱ्या एकाद्या विभागात येणाऱ्या कांहीं वस्तूंचे वर्णन करावयाचे, मग पुन्हा पहिल्या विभागाकडे वळावयाचें, मग दुसऱ्या कोणत्या तरी विभागाकडे वळावयाचें, हें काळजीपूर्वक टाळलें पाहिजे.

११. एकाद्या शहराचे वर्णन करावयाचे असल्यास त्याची पुढे दिल्याप्रमाणे सदरे पाडावी.

(१) त्या शहराचा नामनिर्देश करावा, व हे नाव पडण्याचे काहीं कारण असल्यास ते थोडक्यात द्यावे.

(२) त्या शहराचे अक्षाश आणि रेखाश देऊन, किंवा ते शहर कोणत्या इलाख्यात, जिल्ह्यात, किंवा तालुक्यात आहे, किंवा कोणत्या नदीच्या काठीं, किंवा कोणत्या डोंगराच्या शेजारीं, वसले आहे, वगैरे सागून त्याच्या स्थलाचा निर्देश करावा.

(३) तेथील हवा, पाणी, वगैरेंचे वर्णन करावे.

(४) त्या शहराचा विस्तार लाबीरूंदी देऊन सागावा. चौकोनी वाटोळा, अस्ताव्यस्त, वगैरे अनुरूप शब्द योजून त्याची आकृति सांगावी.

(५) त्या शहराची माडणी वर्णावी, म्हणजे तेथील मोहल्ले, पेठा, रस्ते, वगैरे कसे पाडलेले किंवा वसलेले आहेत, हे सागावे. कोणत्या भागात कोण कोण लोक राहतात, व त्याच्या सख्या किती किती आहेत, हे सागावे.

(६) त्या शहरातील घरे, इमारती, देवळे, शाळागृहे, सरकारी कचेऱ्या, वगैरेंचे वर्णन करावे.

(७) तेथील लोकाचे उद्योगधदे, भाषा, धर्म, इत्यादिकासबधाची माहिती द्यावी.

(८) लोकाची विद्येमध्ये प्रगति किती आहे हे सागावे.

(९) हे शहर इतिहासात प्रसिद्ध असल्यास तो इतिहास सक्षेपाने द्यावा. तेथे कोणी नामांकित पुरुष अलीकडच्या काळात जन्मलेला असल्यास किंवा वैभवास चढलेला असल्यास त्याचा नामनिर्देश करून त्याचे सक्षिप्त वर्णन करावे.

(१०) वरील सदरात न आलेले काही विचार असल्यास ते द्यावे. आसपास जी प्रेक्षणीय स्थळे असतील त्याचे वर्णन ह्या सदरात करावे.

**टीपः**—वरील दहा सदरापैकीं ज्या सदरासबधाची माहिती विद्यार्थ्यास नसेल, तीं सदरे त्याने वगळावीं. जी माहिती दोन सदरात येण्याजोगीं असेल, ती कोणच्या तरी एका सदरात द्यावी, दोन्ही सदरांत दिल्यास पुनरुक्तीचा दोष होईल.

१२. एकाद्या पशूचें किंवा जनावराचें वर्णन करावयाचें असल्यास त्याच्यासंबंधानें पुढें दिल्याप्रमाणें माहिती द्यावी.

(१) तो कोणत्या प्राणिवर्गांत येतो, हें प्रथम सांगून नंतर त्याचें स्वरूप वर्णावें. म्हणजे त्याचा आकार, बांधा, वेगवेगळे अवयव, इत्यादिकांचें वर्णन करावें.

(२) तो पशु घरगुतीपैकीं आहे किंवा निसर्गनिर्मित स्थितींत राहणारा आहे, हें सांगून, तो दुसऱ्या प्रकारचा असल्यास तो कोणच्या देशांत सांपडतो, व त्याला कोणत्या उपायांनीं माणसाळवितां येतें, हें सांगावें.

(३) क्रूर, रागीट, खुनशी, उद्योगी, आळशी, मायाळू, इमानी, कष्टाळू, इ. योग्य शब्द योजून त्याच्या स्वभावाचें वर्णन करावें.

(४) त्या पशूच्या चालीरीति, राहणी, इत्यादिकांसंबंधानें माहिती द्यावी.

(५) तो पशु जिवंत असतां व मेल्यावर त्याचा मनुष्यास काय उपयोग होतो, हें सांगावें.

(६) त्या पशुसंबंधाच्या कांहीं गमतीच्या गोष्टी आपणास ठाऊक असल्यास त्यांपैकीं एकादी द्यावी.

(७) त्या पशूपासून आपणांला शिकावयाजोग्या कांहीं गोष्टी असल्यास त्या सांगाव्या.

टीपः—वरील सदरांपैकीं सारींच सदरें प्रत्येक पशूच्या वर्णनांत येऊं शकतील, असें नाहीं. यासाठीं जीं सदरें एकाद्या विशिष्ट पशूला लागू पडण्याजोगीं नसतील, तीं वगळावीं.

१३. एकाद्या इमारतीविषयीं निबंध लिहावयाचा असल्यास तिची पुढें दिल्याप्रमाणें माहिती द्यावी.

(१) तिचा स्थलनिर्देश करावा, म्हणजे ती इमारत कोणत्या शहराच्या कोणत्या भागांत आहे, हें सांगावें.

(२) ती कोणत्या राजाच्या कारकीर्दींत, कोणत्या उद्देशानें, कोणाच्या हस्तें बांधविण्यांत आली, कधीं बांधिली, तिला खर्च किती आला, इ. माहिती द्यावी.

(३) तिच्या सभोंवतालचा देखावा वर्णावा, म्हणजे शेजारीं आवार, बाग, मोकळे मैदान, हौद, कारंजे, वगैरे असल्यास त्यांचें वर्णन करावें.

(४) त्या इमारतींतील वेगवेगळ्या खोल्याची, दालनाची, वगैरे माडणी; व रचनेंतील सोयी किंवा गैरसोयी, वगैरेंचे वर्णन करावे,

(५) ती इमारत हल्लीं कोणच्या स्थितींत आहे हे सागावे,

(६) ज्या उद्देशानें ती बांधली, तो कितपत सफल झाला व होत आहे, हे सांगावें.

(७) ती इमारत पाहून मनावर परिणाम काय काय होतात, हें सागावें.

(८) वरील सदरात न आलेले असे कांही विचार असल्यास ते येथें दाखल करावे.

**टीपः**—ज्या सदराबद्दल विद्यार्थ्याला माहिती नाही, तीं त्याने वगळावी प्रसगविशेषीं हा सदराचा अनुक्रम बदलणें इष्ट वाटल्यास तो बदलावा.

**१४.** एकाद्या प्रवासाचे वर्णन करावयाचे असल्यास त्याचीं पुढे दिल्या-प्रमाणे सदरे पाडावीं.

(१) प्रवासाचे प्रयोजन.

(२) त्यासबधाची तयारी.

(३) बरोबर कोण माणसे होतीं.

(४) प्रत्यक्ष प्रवासाचे वर्णन.

**क.** वाहनः—आगगाडी, आगबोट, होडी किंवा पायाने.

**ख.** मार्गांतील देखावा.

**ग.** सोबत्याबरोबर सभाषण झालें असल्यास त्याचा विषय व त्याची मनोरजकता.

**घ.** मार्गांतील मुक्काम व तेथील देखावे, व्यवस्था वगैरे.

**ङ.** प्रवासाची समाप्तिः—प्रवास किती मैल लाब, किती कालाव-धीचा होता, इत्यादि.

(५) उपसंहारः—

**क.** एकदर प्रवासाने प्रकृतीवर किंवा मनावर काय परिणाम झाला, वाटलेला आनद किवा थकवा, इ.

**ख.** प्रवास ज्या उद्देशाने केला तो कसा काय फलद्रूप झाला.

टीपः—प्रवास परमुलुखात किंवा परदेशात केलेला असल्यास आणखी एक स्वतत्र सदर पाडावें. ठिकठिकाणच्या लोकाच्या कांहीं विशिष्ट व ठळक सामाजिक रीति, धार्मिक आचार, वगैरेंचें वर्णन करून त्याची आपल्या चालीरीतींशीं, आचाराशी, व राहाणीशी तुलना करावी.

१५. एखाद्या यत्राचे वर्णन करणे असल्यास ते पुढील धोरणावर करावे.

( १ ) यत्राचा उद्देश

( २ ) यत्राचे वर्णन

क. त्याचे वेगळे वेगळे भाग.

ख. त्याची जुळणी, रचना, वगैरे.

( ३ ) त्याचा उपयोग, लोकाच्या सोयी कशा झाल्या आहेत.

( ४ ) त्यापासून काही अनर्थ, अपघात तोटे होत असल्यास त्याचे वर्णन.

( ५ ) त्या यत्राची उपयुक्तता वाढाविता येण्याजोगी आहे किवा नाहीं, वाढविता येण्याजोगी असल्यास त्यात काय काय फेरफार केले पाहिजेत.

( ६ ) त्यासबधाने तुमचे सामान्य विचार काही असल्यास ते येथे द्यावे.

१६. एखाद्या कलेविषयीं निबध लिहिणे असल्यास त्याची पुढे दिल्याप्रमाणे सदरें पाडावीं.

( १ ) ती कला प्रथम कोणच्या देशात, केव्हा व कशी निघाली

( २ ) ती कला शोधून काढण्याचे श्रेय कोणाकडे आहे.

( ३ ) पुढे त्या कलेची प्रगति कशी झाली, व प्रगतीचे श्रेय कोणाकडे आहे.

( ४ ) त्या कलेपासून सोयी किवा फायदे कोणते झाले आहेत.

( ५ ) सध्या ती कला कोणत्या स्थितींत आहे. हल्ली तिच्यात कोणत्या उणीवा आहेत. त्या भरून काढण्यासबधाने तुमचे काय विचार आहेत.

( ६ ) तिच्यापासून कांहीं गैरसोयी किंवा तोटे होत असल्यास ते सागावे.

( ७ ) वरील सदरात न आलेले काही विचार असल्यास ते येथे द्यावे.

१७. एकाद्या सृष्ट पदार्थाचें किंवा सृष्टींतील चमत्काराचें वर्णन करावयाचें असल्यास त्याचीं मुख्य सदरे पुढे दिल्याप्रमाणे पडतील. प्रत्येक पदार्थाला किंवा प्रत्येक चमत्काराला ही सारी सदरे, आणि ह्याच अनुक्रमाने लागू पडतील असे विद्यार्थ्यांने समजू नये. सदरे व सदराचा अनुक्रम विषयावर अवलंबून राहील, हे उघड आहे तथापि पुढील सदरे बऱ्याच विषयाना लागू पडतील अशी आहेत.

( १ ) त्या पदार्थाचे प्रथम सामान्य वर्णन देऊन त्यावरून त्याचे लक्षण किंवा स्वरूप ठरवावे किंवा त्याची व्याख्या द्यावी.

( २ ) तो पदार्थ कोठे आढळतो.

( ३ ) त्याची उत्पत्ति.

( ४ ) त्याचे नेहमीचे स्वरूप कसें असते, व प्रसंगविशेषीं ते कोणत्या कारणानी, आणि कसें बदलते.

( ५ ) त्याचे उपयोग.

( ६ ) त्याच्यापासून काही तोटे असल्यास ते.

( ७ ) त्याच्या संबंधाने लोकाच्या समजुती.

( ८ ) वर न आलेले काही विचार असल्यास ते येथे द्यावे.

१५. नदी हा निबंधाचा विषय असल्यास त्याचीं पुढे दिल्याप्रमाणे सदरे पडतील.

( १ ) नदीच्या व्याख्या. नदीची उत्पत्ति.

( २ ) उपयोग.

क. मानवी वस्तीतील मैला नदी वाहून नेते, आणि प्राण्याच्या आरोग्याला कारणीभूत होते.

ख. जमिनीवरील जादा पाणी वाहून जाण्याला नदीने वाट होते, तेणेकरून मानवी वस्तीच्या आसपास दलदली, डबकीं, वगैरे होऊ शकत नाहींत. आणि तेथील हवा दूषित होत नाही.

ग. प्राण्यास प्यावयास नदीचे पाणी मिळते.

घ. पाटाच्या योगाने नदीचे पाणी शेतास पुरविता येते.

ङ. आसपासच्या प्रदेशाची हवा नदीच्या योगाने शीतल आणि सुखकर होते.

ख. प्रवासाला आणि मालाच्या नेआणीला मोठी नदी उपयोगी पडते. नदी हें सुधारणेचे साधन आहे.

( ३ ) शोभा.

क. नदी स्वता शोभिवत असते. तुम्ही शरदृतूत पाहिलेल्या एकाद्या नदीचा देखावा थोडक्यात वर्णावा.

ख. नदीच्या शेजारच्या प्रदेश लतावृक्षादिकानीं शोभिवत होतो.

( ४ ) नदीमुळे होणारी नासाडी.

पावसाळ्यात नदी फुगून गावें आणि शेतें वाहून नेते. तुम्ही पाहिलेल्या एकाद्या पुराचें वर्णन द्यावें.

( ५ ) उपसहार, सामान्य विचार—

आजपर्यंत कोणच्या नद्याच्या काठच्या कोणच्या शहराचा कसकसा अभ्युदय झाला. नील नदी आणि गगा नदी ह्या उदाहरणार्थ घ्याव्या.

१९. वृत्तातात्मक निबधात हकीगत सगतवार रीतीने देण्याकडे लक्ष ठेवावे. प्रथम नतरची, मग अगोदरची, मग पुन्हा पुढची, मग पुन्हा त्याच्या अगोदरची हकीगत देणे, हे बरोबर नाहीं. कालाच्या अनुरोधाने गोष्टी जशा घडल्या असतील तशाच त्या नमूद कराव्या. काहीं विशेष कारण असल्याशिवाय क्रमाचें उल्लघन करू नये.

२०. वृत्तातात्मक निबध ज्या मानानें आपणांस मोठा किंवा लहान लिहावयाचा असेल, त्या मानानें त्या वृत्तातातील कोणकोणच्या बाबींचा उल्लेख करावयाचा, हे आपण नीट ठरविलें पाहिजे. ज्या बाबी आपण घेणार आहो त्याच्यापेक्षा उरलेल्या बाबी जास्ती महत्त्वाच्या नसाव्या. म्हणजे कमी महत्त्वाच्या बाबींवर निबध लिहिला जाऊन,जास्ती महत्त्वाच्या बाबी राहून गेल्या, असें होणार नाहीं. जितक्या विस्ताराचा निबध आपणांस लिहावयाचा असेल, तितक्या विस्ताराला पुरतील इतक्या बाबी अगोदर निवडून काढून नतर निबध लिहावयास सुरवात करावी.

२१. वृत्तातात्मक निबधात एकाद्या पुरुषाचें चरित्र द्यावयाचे असल्यास त्याचीं पुढें दिल्याप्रमाणे सदरें पडतील. त्यांपैकीं जितक्या सदराबद्दल आपणास माहिती असेल, तितक्याचेच निवारण करावे. ज्या सदराबद्दल आपणांस माहिती नाहीं, किंवा पक्की माहिती नाहीं, किंवा ज्यांचा फारसा उपयोग नाहीं, तीं वगळावीं.

( १ ) त्याच्या जन्माचा सन किंवा शक, महिना आणि तारीख, किंवा महिना, पक्ष आणि तिथि.

( २ ) जन्माचें ठिकाण=देश, प्रांत, जिल्हा, गाव, वगैरे.

( ३ ) बापाचें नाव, धंदा, इ. त्या कुळांत कोणी मोठे पुरुष झाले असल्यास त्यांचा नामनिर्देश.

( ४ ) लहानपणीं विद्या कोणच्या प्रकारची, कोणाच्या देखरेखीखालीं झाली, कोणच्या पैशानें झाली, वगैरे.

( ५ ) ही विद्या होत असतांना त्या पुरुषाचें वर्तन, चालीरीती, वगैरे.

( ६ ) तो प्रौढ दशेंत आल्यावर त्याचीं चरितार्थाचीं साधनें, त्याचे व्यवसाय त्याच्या करमणुकी, वगैरे.

( ७ ) त्याचें लग्न, संसार, कुटुंबियांशीं त्याचें वर्तन, वगैरे.

( ८ ) त्यानें समाजावर जे उपकार केले असतील त्यांचें निवेदन.

( ९ ) मृत्यु.

(१०) त्याचा स्वभाव आणि त्याच्या चरित्रापासून काय बोध घ्यावयाचा.

२२. एकाद्या ऐतिहासिक विषयावर निबंध लिहावयाचा असला तर त्याचीं पुढील सरणीप्रमाणें सदरें पाडावीं.

( १ ) ती गोष्ट किंवा तो वृत्तांत घडावयाच्या पूर्वीची देशाची किंवा समाजाची स्थिति संक्षेपानें सांगावी.

( २ ) ह्या स्थितीचा त्या गोष्टीशीं किंवा वृत्तांताशीं काय संबंध जोडतां येतो तो सांगावा.

( ३ ) त्या गोष्टींतील किंवा त्या वृत्तांतांतील विविध बाबी कालाच्या क्रमानें व सन वगैरे घेऊन सांगाव्या.

( ४ ) ती गोष्ट किंवा तो वृत्तांत घडत असतां कोणकोणत्या प्रख्यात पुरुषांनीं कर्तबगारी केली, त्यांचा निर्देश करून त्यांचा एकमेकांशीं जो संबंध असेल तो सांगावा.

( ५ ) त्या गोष्टीचें किंवा वृत्तांताचें पर्यवसान कोणत्या रीतीनें झालें, तें सांगावें.

( ६ ) त्या गोष्टीचा किंवा वृत्तांताचा समाजावर ( क ) तात्कालिक परिणाम, ( ख ) कायम टिकणारा परिणाम, काय झाला तो सांगावा.

(७) त्या विषयाच्या संबंधानें तुमचे विचार सांगावे.

(८) तुमच्या विचाराशी जुळणारे दुसऱ्या कोणाचे विचार असल्यास त्याचा निर्देश करावा.

(९) न जुळणारे कोणाचे विचार असल्यास त्याचाही निर्देश करून त्याच्या मताचें थोडक्यात खण्डन करावे.

(१०) घ्यावयाजोगा बोध असेल तो नमूद करावा.

२३. वर्णनात्मक आणि वृत्तान्तात्मक निबधरचनेपेक्षा विमर्शात्मक निबधरचना करणे अधिक कठिण असते. कारण एक तर असे कीं, विमर्शाचे विषय शेकडो प्रकारचे असतात, आणि ह्या सर्व विषयाची एकाच तत्त्वावर सदरवारी पडता येणे शक्य नाही. भिन्न भिन्न विषयाची सदरवारी भिन्न भिन्न तत्त्वावर पाडावी लागते. आणि दुसरे असे कीं, साधकबाधक प्रमाणाची तुलना करून त्याचा ओघ आणि रोख आपणाला इष्ट असा जो सिद्धान्त असेल त्याकडे वळविण्यास बरेच चातुर्य लागते ह्या दोन्ही कारणामुळे विमर्शात्मक निबध बहुधा प्रौढ विद्यार्थ्यांस मात्र लिहावयास सागतात.

२४. विमर्शात्मक निबधाची अगे तीन असतात. ( १ ) उपोद्घात, ह्यात दिलेल्या विषयाची व्याख्या द्यावयाची असते, किंवा दिलेल्या सिद्धान्ताचा अर्थ आपल्या शब्दानी विशद करून दाखवावयाचा असतो. (२) निरूपण, ह्यामध्ये दिलेल्या विषयाचे साधकबाधक प्रमाणे देऊन निरूपण करावयाचे असते, निबधाचा महत्त्वाचा जो भाग तो हाच. ( ३ ) उपसहार ह्यामध्यें आपल्या निरूपणावरून काय निष्पन्न झाले ते दाखववयाचे असते.

२५. विमर्शात्मक निबधाचा उपोद्घात समग्र निबधाच्या अष्टमाशाहून ज्यास्ती असू नये. आणि उपसहार दशाशाहून अधिक असू नये. म्हणजे समग्र निबध ४० ओळीचा असला, तर उपोद्घात ५-६ ओळीचा, आणि उपसहार ४-५ ओळीचा असावा.

२६. विमर्शात्मक निबधाची सदरवारी पाडावयाच्या मार्गाची दिशा दाखवून देण्यासाठीं आम्ही असल्या निबधाचें चार वर्ग पाडतो.

(१) समाजातील एकादा विशिष्ट आचार किंवा व्यवहार, समाजाची एकादी विशिष्ट सरणी किवा सस्था, समाजाच्या सुस्थितीचे किंवा प्रगतीचे एकादे विशिष्ट साधन, समाजासमाजाचा परस्पराशीं सबध, इत्यादि. उदाहरणार्थ, हिंदु लोकाची, विवाहपद्धति, शिक्षणाची परिपाठी, इत्यादि.

( २ ) एकाद्या विधानाचे समर्थन किंवा खंडन. उ० पाचा मुखीं परमेश्वर.

( ३ ) एकाद्या वादग्रस्त विषयावर आपले मत देणे. उ० स्त्रीशिक्षण.

( ४ ) एकादा सद्गुण किंवा दुर्गुण. उ० धैर्य, उद्योगशीलता, खोटें बोलणें, इत्यादि.

२७. विमर्शात्मक निबंधाचे हे वर सांगितलेले जे चार वर्ग, त्यांच्या सदरवाऱ्या कशा पाडावयाच्या हे आतां दाखवितों.

२८. जेव्हां समाजांतील एकादी संस्था किंवा एकादा विधि, संस्कार, अथवा चालरीत, एकादा संबंध, व्यवहार किंवा व्यवस्था, इत्यादिकांवर निबंध लिहावयाचा असेल, तेव्हां पुढें दिल्याप्रमाणें त्याची सदरें पाडावीं.

( १ ) उपोद्घात–यांत त्या विषयाचें स्वरूप, व्याख्या किंवा वर्णन देऊन स्पष्ट करावें.

( २ ) त्या विषयाची उत्पत्ति होण्याचीं कारणें किंवा आवश्यकता, यांचे स्पष्टीकरण करावें.

( ३ ) या सदरांत त्या विषयाचें स्वरूप प्राचीन काळीं कसें होतें, व तें अर्वाचीन काळी कोणत्या कारणांनीं व कोणत्या क्रमानें व कसें बदललें, हें सांगावें.

( ४ ) या सदरांत त्या विषयाची व्याप्ति म्हणजे विस्तार सार्वत्रिक आहे किंवा स्थानिक आहे, हे सांगावें. कोणचे प्रकार कोठें रूढ किंवा प्रचलित आहेत, हे सांगावें.

( ५ ) या सदरांत त्या विषयाची कोणत्या दृष्टीनें उपयुक्तता आहे, हें द्यावें.

( ६ ) ह्यांत काय फेरफार केल्यानें तें अधिक उपयुक्त किंवा फायदेशीर होईल, हें द्यावें.

( ७ ) एकंदरीनें त्या विषयासंबंधानें तुमचे काय विचार आहेत,ते द्यावे.

२९. लेखांक २८ मध्यें दिलेल्या सदरवारीप्रमाणें "शिक्षण" ह्या विषयाचा आराखडा पुढें दिल्याप्रमाणें होईल.

( १ ) व्याख्या.

लहान मुलें आणि मुली ह्यांचीं मनें विविध प्रकारच्या ज्ञानानें सुसंपन्न करून त्यांचे बुद्धिसामर्थ्य वाढविणें, ह्याला शिक्षण असें म्हणतात.

( २ ) उत्पत्ति.

आपलीं मुलें नीतिमान् असावीं, आणि त्यांचे आयुष्य सुखानें जावें, अशी सर्व आईबापांची उत्कट इच्छा असल्यामुळे, त्या साध्याचें जें उत्कृष्ट साधन शिक्षण, तें देण्याकडे सर्व आईबापांची प्रवृत्ति होणें साहजिक आहे.

( ३ ) शिक्षणाची सार्वत्रिकता—शिक्षणाचें महत्त्व फार असल्या कारणानें, आणि मुलांवर आईबापाचें प्रेम असल्याकारणानें, सर्व काळीं आणि सर्व देशांत शिक्षणाच्या कांहींना कांहीं तरी तजविजी केल्या जातातच. अत्यंत सुधारलेल्या देशांतच नव्हे, तर अत्यंत रानटी समाजांत देखील शिक्षणाची व्यवस्था केलेली आपल्या पाहण्यांत येते.

( ४ ) प्राचीन काळची शिक्षणपद्धति—आईबापें आपल्या मुलांना गुरूच्या घरीं शिक्षणासाठीं पाठवीत असत. तेथें तीं मुलें गुरूची सेवा करून धर्म, नीति, शास्त्र, वगैरे विषय शिकून घरीं परत येत असत.

( ५ ) अर्वाचीन काळची शिक्षणपद्धति—मुलांना आणि मुलींना शिक्षण देण्यासाठीं हल्लीं सरकार शाळा स्थापन करतें, आणि इयत्तेच्या मानानें त्यांच्यापासून फी वसूल करतें. धुळाक्षरापासून सुरवात करून अगदीं वरच्या पायरीचें शिक्षण देण्याच्या शाळा स्थापन केलेल्या असतात.

( ६ ) शिक्षणाचे लाभ—व्यवस्थित रीतीनें शिक्षण दिल्यानें अनेक लाभ प्राप्त होतात.

( क ) मानसिक आणि शारीरिक सामर्थ्य आणि कर्तृत्व ह्यांची वाढ होते.

( ख ) स्वभावांतील दोष लुप्त होतात किंवा दाबांत राहतात.

( ग ) बंधुप्रेम वाढून सार्वजनिक सुखांत भर पडते.

( ७ ) उपसंहार—वर केलेल्या विवरणावरून शिक्षणाची योग्यता किती आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल, आणि सर्व लोक आपापल्या ऐपती-प्रमाणें आपल्या मुलांना सुशिक्षित करण्याला प्रवृत्त होतील अशी उमेद आहे.

**टीपः**— " शिक्षण " या विषयाच्या सदरवारींत ३ आणि ४ हीं सदरें व्युत्क्रम घेतलीं आहेत, हे विद्यार्थ्यांच्या लक्षांत आलेंच असेल. रच-नेच्या ओघामुळें सदरांचा क्रम बदलावयास कांहीं हरकत नाहीं. प्रसंगविशेषीं कांहीं सदरें गाळावयासही हरकत नाहीं.

३०. लेखांक २८ मधील सदरवारीप्रमाणे आणखी एका विषयाचा आराखडा दाखवितो.

### युद्ध.

( १ ) व्याख्या—शस्त्रास्त्राचा उपयोग करून राष्ट्राराष्ट्रांनी चालविलेलें भांडण. युद्ध हे मानवी जातीच्या नीचतम मनोवृत्तीचे प्रदर्शन होय.

( २ ) उत्पत्ति—लोभ, दरवडेखोरी, मत्सर, सूड घेण्याची प्रवृत्ति, इत्यादिकामुळे युद्धे उद्भवतात.

( ३ ) युद्धाची प्राचीनता—भारतादि ग्रथावरून असे स्पष्ट दिसते की, हल्लींप्रमाणे प्राचीन काळीं देखील युद्धे होत असत. मानवजातीच्या उत्पत्ती-बरोबरच युद्धप्रवृत्ति उत्पन्न झाली असे म्हणावयास हरकत नाहीं.

( ४ ) अर्वाचीन काळीं युद्धांची संख्या—हल्लीच्या काळी युद्धाची संख्या, युद्धातील प्राणनाशाची गणति, व पैशाची नासाडी, बिलकूल कमी झाली असल्याची दिसून येत नाहीं, ही शरमेची गोष्ट आहे. उलटपक्षीं असे म्हणावे लागते की, हल्लींच्या सुधारणेच्या काळात युद्धाला खोट्या सबबी हुडकून काढण्यात, व प्राणनाशाची हमखासशीर्ची यत्ने करण्यात, अप्रतिम चातुर्य पाहण्यात येते.

( ५ ) तोटे:—( क ) प्राणहानि, ( ख ) द्रव्यहानि, ( ग ) काल-हानि, ( घ ) समाजाच्या प्रगतिला विघ्ने, ( ङ ) बंधुप्रीतीचा लोप, इ० इ० इ०.

( ६ ) उपसंहार—युद्धे कशीं बंद करता येतील यासंबधाने तुमचे विचार.

टीप:—वरील सदरवारीत "युद्धाची व्याप्ति," हे सदर "प्राचीनता" ह्या सदरात गौणत्वाने समाविष्ट केले आहे, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आलेच असेल. तसेच युद्धाची युपयुक्तता किंवा फायदेशीरपणा हे सदर गाळले आहे. युद्धाच्या योगाने अन्यायाची दुरुस्ती करता येते ह्या दृष्टीने युद्धाची उपयुक्तता आहे, असा मुद्दा विद्यार्थ्यांने काढल्यास हरकत नाहीं.

३१. वर दिलेल्या सदरवारीप्रमाणे "ग्रंथ" ह्या विषयावर निबंध लिहिणे असल्यास तो पुढे दिल्याप्रमाणे होईल.

( १ ) व्याख्या— काहीं लोकांनीं संपादन केलेला अनुभव व संचित केलेलें ज्ञान इतर लोकाना प्राप्त करून देण्याचीं जीं साधने आहेत, त्यांपैकीं ग्रंथ हें अग्रगण्य साधन होय.

( २ ) उत्पत्ति—मनुष्य हा उपकारशील प्राणी आहे. लोकाचे कल्याण व्हावे, त्याना सुस्थिति प्राप्त व्हावी, त्याची प्रगति व्हावी त्याची दुःखे कमी व्हावी, त्याचा ससार सुखमय व्हावा, अशी त्याची इच्छा असते. म्हणून तो आपला अनुभव, आपले ज्ञान आपले विचार वगैरे ग्रथाच्या रूपाने नमूद करून ठेवण्यास प्रवृत्त होतो

( ३ ) प्राचीनता–मनुष्य प्राण्याच्या अगची ही उपकारशीलता सर्व काळीं सर्व समाजात सदैव वसत असल्याकारणाने ग्रथ लिहिण्याची प्रवृत्ति अत्यत प्राचीन काळापासून असल्यासारखे आपणास आढळून येते. ह्याच कारणामुळे आपल्या देशात हजारो वर्षांमागे भारतादि ग्रथ रचले गेले.

( ४ ) अर्वाचीन काळची स्थिति–प्राचीन काळी ग्रथ लिहिण्याची आणि ग्रथाचा फैलाव करण्याची साधने हल्लीच्या प्रमाणे नव्हती, तेणेकरून ग्रथाची सख्या लहान होती. परतु हल्लीच्या काळीं कागदाची स्वस्ताई आणि छापण्याची कला याच्या योगाने ग्रथाच्या सख्येत अतोनात भर पडत चालली आहे.

( ५ ) ग्रथाची सार्वत्रिकता–ग्रथरचनेची साधने हल्लीच्या काळी विपुल असल्याकारणाने जगातील सर्व देशात सर्व प्रकारचे ग्रथ निर्माण होत आहेत [ इग्लद, फ्रान्स, वगैरे देशात आणि हिदुस्थानात दर वर्षी कोणकोणच्या विषयात किती किती ग्रथ उत्पन्न होत आहेत, हे आकड्याच्या रूपाने आपणास ठाऊक असल्यास ते आकडे देऊन, व त्याची तुलना करून आपले विचार नमूद करावे, ]

( ६ ) ग्रथापासून होणारे लाभ,

( क ) प्राचीन काळच्या लोकाचा इतिहास, त्याची राहाणी, त्याचे विचार वगैरे आपणास समजून आपण त्या काळात त्याच्याच समजाचे घटक अवयव असल्याची भावना आपल्या मनात उत्पन्न होऊन त्याच्याविषयी प्रेम, बहुमान, अनुकपा वगैरे उत्पन्न होऊन आपले मित्रमडळ वाढल्याप्रमाणे होते,

( ख ) त्यानी सपादिलेले ज्ञान आपणास भाडवलाप्रमाणे उपयोगी पडून त्यात भर घालणे सुकर होते,

( ग ) “ दसकी लकडी एकका बोजा, ” ह्या न्यायाने एकाच्या मेहनतीचा फायदा सर्वांस मिळू शकतो.

(७) उपसहार—ग्रथ आणि ग्रथरचना ह्यासबधानें तुमचे सामान्य विचार.

**टीप:**—वाईट ग्रथापासून तोटे हे आणखी एक सदर विद्यार्थ्याने जरूर वाटल्यास पाडावे.

**३२.** विमर्शात्मक निबंधाचा विषय जेव्हा एकादे वचन, (म्हण, किंवा उपदेश, किंवा कवितेतील उतारा ) असेल, तेव्हा ( १ ) उपोद्घात, (२) विवरण, आणि ( ३ ) उपसहार, असे त्या विषयाचे तीन भाग पाडावे,

( १ ) उपोद्घात:—यात त्या वचनाचा अर्थ तुमच्या स्वताच्या शब्दानीं, म्हणजे अनुवादरूपाने द्यावा. जर त्या वचनात रूपक किंवा उत्प्रेक्षा हा अलकार समाविष्ट झालेला असेल, तर तो अलकार साध्या उपमेच्या रूपानें माडून त्या वचनाचा अर्थ द्यावा. उदाहरणार्थ "फजितीच्या पायीं घुगरू, " हा जर निबधाचा विषय असला, तर उपोद्घात पुढें दिल्याप्रमाणें करावा.

ज्या जनावराच्या किंवा मुलाच्या पायात घुगरू आहे, ते कोठे आहे, काय करीत आहे, वगैरे जसे जगजाहीर असते, तसेच फजिती पावलेल्या मनुष्यासबधी सर्व हकीकत सर्व लोकास ताबडतोब कळते, म्हणजे एखाद्याची फजिती झाली असता ती गुप्त राहत नाहीं.

( २ ) उपोद्घात झाल्यानतर निबधविषयक जे वचन, त्यातील विधानाच्या समर्थनार्थ जीं प्रमाणे तुम्हाला सुचतील, ती एकामागून एक द्यावीं. प्रत्येक प्रमाण स्पष्ट करण्यासाठीं अनुरूप असे एकादे ऐतिहासिक उदाहरण किंवा निसर्गातील दाखला, किंवा एकाद्या कवीचा उतारा, किंवा तुम्हाला स्वतःला आलेला एकादा अनुभव द्यावा. निबधविषयाच्या विधानाच्या समर्थनार्थ वर सागितल्याप्रमाणे जीं प्रमाणे द्यावयाचीं ती प्रमाणे एकमेकात न मिसळू देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. म्हणजे प्रथम एक प्रमाण देऊन त्याचे विवरण, उदाहरणे, दाखले, उतारे, वगैरेनी सर्वांगपूर्ण झाले, म्हणजे मग दुसरे प्रमाण हातीं घेऊन त्याचे विवरण पूर्ण करावे. नतर तिसऱ्या प्रमाणाचे विवरण करावे. अशा रीतीने जितकी प्रमाणे आपणास सुचतील तितक्याचे विवरण सागोपाग करीत जावे.

निबधाचा हाच म्हणजे विवरणात्मकच भाग महत्त्वाचा होय. विद्यार्थ्यांचे निबधलेखनाच्या कामातील चातुर्य याच भागावरून ठरते. यासाठीं हा भाग जपून लिहिला पाहिजे.

" फजितीच्या पायीं घुंगरू " ह्या विषयाच्या सिद्धतेचें एक प्रमाण पुढें दिल्याप्रमाणे निघेल.

जगात पुष्कळ माणसें दुष्ट आणि मत्सरी असतात, व एकाद्याची फजिती झाली, तर ती त्यास गोड वाटते, व त्या फजितीचा फैलाव करण्यास ते सदा तत्पर असतात. यावर ऐतिहासिक उदाहरण—दुसऱ्या बाजीरावाचा खडकी येथे पराभव झाल्याची बातमी सर्व महाराष्ट्रात तीन तासाच्या आत पसरली. निसर्गातील दाखला—पाण्यावर तेलाचा बिंदु जसा पसरतो तशी फजिती पसरते.

दुसरें प्रमाण पुढे दिल्याप्रमाणे देता येईल. एकाद्याची फजिती झाली म्हणजे रिकामटेकड्या माणसाना बोलावयाला तो नवीन विषय होतो. उपयुक्त किंवा बोधप्रद असा जो विषय, तो बोलणाराला व ऐकणाराला लवकरच कंटाळवाणा होतो. परंतु दुसऱ्याच्या फजितीचा विषय वक्त्याला व श्रोत्याला गोड वाटतो. तेणेंकरून फजितीचा हा हा म्हणतां फैलाव होतो. नेपोलियनाचा पराभव वाटर्लू येथे झाला, तेव्हा ज्यात त्याची थट्टा केली आहे अशीं चित्रे युरोप खंडातील सर्व वर्तमानपत्रात दोन महिनेपर्यंत येत असत, ह्या प्रमाणाचे विधान विशद करणारा निसर्गातील दाखला देणे असल्यास मिठाचा देता येईल, मिठानें जशी खाद्य पदार्थास रुचि येते, त्याप्रमाणे परनिंदेनें संभाषणास चटकदारी येते. येणेंप्रमाणे जितकीं प्रमाणे देता येतील तितकी द्यावीं,

टीपः—प्रत्येक प्रमाणाला एक एक ऐतिहासिक उदाहरण, एक एक निसर्गातील दाखला, व एक एक कवितेतून उतारा दिलाच पाहिजे असे नाहीं. या गोष्टी आपणास सुचल्यास द्याव्या. त्याच्यासाठीं अडून बसण्याचे कारण नाहीं. शिवाय त्या फार फारही देऊ नयेत. तशा दिल्यास निबंधास बोजडपणा येईल.

( ३ ) निबंधाचा विवरणात्मक भाग आटोपल्यावर त्याचा थोडक्यात उपसंहार करावा. वरील विषयाचा उपसंहार पुढे दिल्याप्रमाणे करता येईल. " वरील विवेचनावरून वाचकाची खात्री होईल, कीं आपण सदा सन्मार्गानें चालत असावें, म्हणजे आपणास एकाद्या कामीं अपयश आले; तरी आपली फजिती होणार नाहीं, किंवा झाली तरीं आपल्याला लाज वाटण्याचे कारण राहणार नाही. "

३३. जेव्हा निबंधाचा विषय वादाचा असतो, तेव्हा त्याची पुढे दिल्याप्रमाणे सदरें पाडावीं.

( १ ) उपोद्घात–ह्यात त्या विषयाचे स्वरूप स्पष्टपणे सांगावे, आणि नंतर आपले मत काय ते द्यावे.

( २ ) ( क ) आपल्या मताच्या समर्थनार्थ जीं प्रमाणे आठवतील, त्यापैकीं पहिले देऊन त्याचे विवरण सांगोपांग करावे. नंतर दुसरे प्रमाण देऊन त्याचेहि विवरण सांगोपांग करावें. अशा रीतीनें सर्व प्रमाणांचे निरूपण क्रमशः करावें.( ख ) प्रतिपक्षाचीं प्रमाणे एक एक घेऊन त्याचे खंडन करावे.

( ३ ) शेवटीं उपसंहार करावा, म्हणजे विषयाच्या निरूपणावरून कोणता सिद्धांत ठरतो तो द्यावा.

उदाहरणार्थ आपण " **स्त्रीशिक्षण** " हा विषय घेऊ. या विषयावरील निबंधाचा सांगाडा पुढें दिल्याप्रमाणे होईल—

उपोद्घात—स्त्रीशिक्षण म्हणजे स्त्रियांना शिक्षण देणे. माझे मत स्त्रियांना शिक्षण द्यावे असे आहे.

समर्थन—( १ ) पुरुषाच्या अंगीं जशी शिक्षण ग्रहण करण्याची पात्रता आहे, तशी स्त्रियांच्याही अंगीं आहे. ( २ ) शिक्षणाचे फायदे पुरुषानींच बळकावणे हा आपलपोटेपणा आहे तसाच क्रूरपणा आहे.( ३ ) स्त्रियांना शिक्षण दिल्याने त्या संसार हुषारीनें करतील. ( ४ ) बालसंगोपन सर्वथैव स्त्रियांच्या अंगावर पडते, त्या अडाणी आणि अशिक्षित असल्यास मुलांचे बालवयातील शिक्षण कच्चे होईल. लहानपणीं मुलांच्या मनांवर उपदेश ठसतो आणि जन्मभर टिकतो. मुले हे राष्ट्राचे आधारस्तंभ होत. यासाठीं त्यांच्या मनावर नीतितत्त्वाचा परिणाम चिरस्थायी होण्यास त्यांच्या आया सुशिक्षित असल्या पाहिजेत. ( ५ ) आपलपोटेपणाच्या दृष्टीने जरी पाहिले, तरी स्त्रियांना शिक्षण देणे जरूर आहे, कारण आपल्या बायका अशिक्षित आणि अडाणी असल्यास त्यांच्याशीं संभाषण करून आपली करमणूक होणार नाही, आणि आपला गृहसौख्याचा अंश कमी होईल, म्हणून निदान आपल्या सुखासाठीं तरी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे.

आक्षेप आणि त्यांचे खंडन ( १ ) आक्षेप–गृहकृत्ये करून स्त्रियांना लिहिण्यावाचण्यास वेळ मिळणार नाहीं. खंडन–मिळेल. कारण जसा पुरु-

२

षाना पोटाचा धदा करून वर्तमानपत्रे, कादबऱ्या, नाटकें, किंवा दुसरा कोणताही आवडीचा विषय, वैद्यकी, फलज्योतिष, गणित, इतिहास, वगैरे वाचावयास वेळ उरतो, तसाच स्त्रियाना गृहकृत्यें करून वाचनास वेळ उरेल. ( २ ) आक्षेप—स्त्रियाना वाचनाचा नाद लागला म्हणजे त्या गृहकृत्याकडे दुर्लक्ष करतील. खडन—पोटाचा उद्योग सोडून पुरुष जसे पुस्तके वाचीत बसत नाहींत, तशा स्त्रियाही आपलीं गृहकृत्ये टाकून पुस्तके वाचीत बसणार नाहींत. शिक्षणाच्या योगानें कर्तव्यजागृति होते, कर्तव्यविस्मृति होत नाहीं. ( ३ ), ( ४ ), ( ५ ) इ. आक्षेप व त्याचे खडन.

उपसहार—वरील विवेचनावरून वाचकाची खात्री होईल कीं, जसें पुरुषाना तसें स्त्रियानाहि शिक्षण आवश्यक आहे. यासाठीं सर्वांनीं आपल्या मुली, बायका, बहिणी, वगैरेस आपापल्या ऐपतीप्रमाणे देववेल तितकें शिक्षण देण्याची तजवीज करावी.

३४. निबधाचा विषय वादाचा असतो, तेव्हा कशीं सदरें पाडावीं हें आम्हीं मागें कलम ३३ मध्ये सांगितले आहे. त्यात प्रथम आपल्या मताचें समर्थन करून नतर प्रतिपक्षाच्या मताचे खडन करावे, असा क्रम दिला आहे, परतु तो क्रम फिरविला तरी हरकत नाहीं. म्हणजे असें कीं, प्रथम प्रतिपक्षाच्या मताचें खडन करून नतर आपले मत स्थापित केले, तरी चालण्याजोगे आहे. दोनही प्रकारचा क्रम नामाकित ग्रथकारानीं अनुसरलेला पाहण्यात येतो.

३५. जेव्हा निबधाचा विषय एकदा सद्गुण, ( वक्तशीरपणा, धैर्य, तत्परता, औदार्य, स्वावलबन, महत्त्वाकाक्षा, काटकसरीपणा, सत्यनिष्ठा, देशप्रीति, सहकार्यकारिता, इ. ) असतो, तेव्हा निबधाचीं सदरे पुढें दिल्याप्रमाणे पाडावीं—

( १ ) उपोद्घात—ह्यात त्या विषयाची व्याख्या देऊन त्याचे स्वरूप स्पष्टपणे दाखवावे.

( २ ) विवरण—( क ) ह्यात त्या सद्गुणापासून कोणकोणते फायदे (कीर्ति, द्रव्य, शांति, सोय, वगैरे),होतात, ते सांगून आपल्या विवरणाच्या स्पष्टीकरणासाठीं उदाहरणें, अवतरणें, वगैरे द्यावीं, परतु तीं फार असू नयेत. ( ख ) उलट वर्तनापासून होणारे तोटे देऊन त्याचें विवरण करावें.

( ३ ) उपसहार—वरील विवेचनावरून ह्या सद्गुणाचे महत्त्व वाचकास कळून येईल, इत्यादि.

३६. जेव्हा निबधाचा विषय एकादा दुर्गुण ( चोरी, चहाडी, परनिदा, खुशामत, लाळघोटेपणा, लबाडी, विश्वासघात, मत्सर, आळस, उन्मत्तपणा, वगैरे ), असतो, तेव्हा निबधाचीं सदरें पुढालप्रमाणे पाडावीं—

(१) उपोद्घात—ह्यात त्या विषयाची व्याख्या देऊन त्याचें स्वरूप स्पष्टपणें दाखवावे.

(२) विवरण—(क) ह्यात त्या दुर्गुणापासून कोणकोणते तोटे ( आजार बेअब्रु, पैशाचे नुकसान, सुखाची हानि, शातीची हानि, आपलचि गैरसोय, आपलीच अडचण, समाजाची अवकृपा, राजदडाची भीति, आप्तइष्टमित्र आणि सोयरेधायरे याची हानि इ० ), होतात ते सागून त्याच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरण दाखले, अवतरणे, वगैरे द्यावीं. (ख) तो दुर्गुण अगीं नसला तर जे फायदे होतात ते देऊन त्याचे विवरण करावे.

( ३ ) उपसहार—वरील विवेचनावरून हा दुर्गुण किती भयकर आहे हे वाचकास कळून येईल, इ०

३७. येथपर्यंत आम्हीं नानाप्रकारच्या विषयावर निबध लिहिण्याच्या तऱ्हा दाखविल्या आहेत. त्याचे अनुसरण विद्यार्थ्यांने केले असता त्याला कोणत्याही विषयावर कसा निबध लिहावा हे समजेल, आणि निबध हवा तितका विस्तृत करता येईल. परतु परीक्षकानें किती विस्तृत निबध लिहावयास सागितला आहे, आणि निबधाकडे आपणास किती वेळ लाविता येईल, हे धोरण विद्यार्थ्यांने राखिले पाहिजे, आणि ह्याच धोरणाला अनुसरून विद्यार्थ्यांनें आपली सदरवारी ठरवावी. तींत मोठमोठे मुद्दे सर्व येतलि इकडे लक्ष द्यावे.

३८. निबधाचा विषय विद्यार्थ्यास सागितला म्हणजे त्याला पहिली अडचण ही येऊन पडते कीं, यावर आपण काय लिहावें. परतु आम्हीं निर्दिष्ट केलेल्या तऱ्हांवरून निबधाच्या विषयांकडे कोणत्या दृष्टीने पाहिलें म्हणजे कोणते विचार नमूद करता येतील हे स्पष्टपणें समजून पुनः विचाराच्या माडणीस देखील व्यवस्थितपणाचे स्वरूप देता येईल. निबध झोकदार होणें हे विद्यार्थ्याच्या विचाराच्या प्रगल्भपणावर आणि वाचनाच्या व अनुभवाच्या विस्तृतपणावर अवलबून राहणार. परतु जोंपर्यंत विद्यार्थ्याला

विचार, वाचन व अनुभव, ह्याच्या योगाने लेखनसामर्थ्य आलेले नाहीं, तोपर्यंत आम्ही वर दाखविलेली तऱ्हाच त्याला अनुसरावी लागेल.

३९. पुढे लिहून दाखविलेल्या निबधात आम्हीं वरील तऱ्हाचें अनुकरण सर्वथैव केलें आहे असे नव्हे. कांहीं सदरे गाळलीं आहेत, व कांहीं सदरे पुढचीं मागे व मागचीं पुढें केलीं आहेत.

कोणतीं सदरें गाळावयाचीं, किंवा सदराचा अनुक्रम कोणता धरावयाचा, हे प्रौढ विद्यार्थ्याने आपल्या सोयीप्रमाणे ठरवावें. ह्या कामीं नवशिक्यानीं शिक्षकाची मदत घ्यावी, ही मदत मिळण्याजोगी नसेल, तर आम्ही दिलेल्या तऱ्हाचें सर्वथैव अनुसरण करावें, हे चांगले.

४०. दिलेल्या विषयासबधानें परीक्षकाचे विचार कशा प्रकारचे आहेत, व कोणकोणते विचार नमूद केले असता परीक्षक आपणास जास्ती गुण देतील, इकडे बिलकुल लक्ष न देता आपले स्वतःचे जे खरोखर विचार असतील, ते विद्यार्थ्यानें आपल्या निबधात नमूद करण्यास कचरू नये. मात्र ते विचार विद्यार्थ्यांच्या समाजाप्रमाणे खरे व साधकबाधक प्रमाणाचे नीट पर्यालोचन करून ठरण्याजोगे असले पाहिजेत.

४१. विद्यार्थ्याने रचावयाच्या निबधाची भाषा कशी असावी, ह्यासबंधाने कांहीं सूचना करणें जरूर आहे. सूचना करते वेळीं शब्दांची निवड आणि निवडलेल्या शब्दांची वाक्यामध्ये माडणी, ह्या दोन गोष्टींकडे आपण लक्ष पुरविलें पाहिजे. योजावयासाठीं शब्दाची निवड करताना त्याची शुद्धता, अर्थव्यजकता, आणि योग्यता नीट पाहिली पाहिजे.

४२. जो शब्द योजावयाचा तो भाषेमध्ये पूर्णपणे रूढ झालेला आणि आज प्रचलित असा असला पाहिजे. परभाषेंतील शब्द, किंवा मागे पडलेले शब्द, किंवा जे शब्द भाषेत नुकतेच आलेले असल्याकारणाने अद्यापि निश्चित अर्थाचे झालेले नाहींत, असे शब्द टाळले पाहिजेत—विद्वान लोकाच्या सभाषणात जे शब्द येतात, ते शुद्ध म्हणून मानण्यास हरकत नाहीं.

४३. आपणाला जो अर्थ अभिप्रेत आहे, तो दाखवावयाला पूर्णपणे समर्थ असे शब्द योजले पाहिजेत. ज्या शब्दांनीं आपल्या मनांतील अर्थ पूर्णपणें दाखविला जाणार नाहीं, किंवा आपल्या मनात असेल त्याहून

जास्त अर्थ दाखविला जाईल, असे शब्द योजतां कामा नये. ज्या शब्दांनीं आपल्या मनातील अर्थ ततोततपणें व्यक्त करता येईल, असेच शब्द योजावे.

४४. दुसरे हे की, आपण जे शब्द निवडू, ते जरी शुद्ध आणि प्रचलित असले, व पूर्णपणे अर्थव्यजक असले, तरी ते प्रसगाला योग्य असावे लागतात. सभ्य लोक सभ्य प्रसगीं जे शब्द योजतील, तेच आपण योजावे.

४५. शुद्धता, अर्थव्यजकता, आणि योग्यता, ह्या तत्त्वावर शब्दाची निवड करून मग ते शब्द वाक्याच्या रूपाने माडताना सदिग्धता न राहील, अशी खबरदारी घेतली पाहिजे

" सुईच्या नेढयातून हत्ती जाताना मी पाहिला " अशासारखी घोटाळ्यात पाडणारी रचना नसावी. ह्या गुणाला विशदता असें आपण नाव देऊ.

४६. शिवाय एका वाक्यामध्ये एकच मुख्य विषय ग्रथित केलेला असावा. गौण विचार ग्रथित करावयाचे त्याची सख्या मोठी नसावी. एक मुख्य विचार आणि अनेक गौण विचार एकाच वाक्यात ग्रथित केल्यानें वाक्य बोजड होते, व त्याचा अर्थ जाणण्याला वाचकाला खटपट करावी लागते.

४७. शिवाय अर्थ जोरदार रीतीने व्यक्त होईल अशा तऱ्हेची शब्दाची माडणी करावी " तो रागावला म्हणजे त्याच्यापुढे कोणी माणूस बोलावयास धजत नाही, " हे वाक्य जोरदार करावयाचे असल्यास पुढे दिल्याप्रमाणे करता येईल. " तो रागावला म्हणजे त्याच्यापुढें बोलावयास धजतो कोण ? "

४८. रचनेमध्ये वरील तिन्ही गुण असून शिवाय ती कर्णमधुर अशीहि असली पाहिजे. कठोर किवा लाबलचक शब्द जितके कमी आणता येतील, तितके कमी आणावे. उगीच मोठमोठे शब्द घुसडून दिल्याने भाषेला बोजडपणा येतो. तसेंच एक शब्द साधा व त्याच्या शेजारींच एकादा अवजड शब्द घातल्याने रचना बेडौल होते. योग्य कारण नसता सस्कृत शब्द किंवा परभाषेंतील शब्द योजल्यानें भाषेवर कृत्रिम डामडौलाची छटा मारते, व आपली अरसिकता प्रकट होऊन आपण उपहासाला पात्र होतों. यासाठीं

राजाचा मुळीच उल्लेख केला नाही तसेच शारगधर आणि जैत्र-पाल याचा परस्पर सबध काय होता हेहि सागितले नाही या दृष्टीने मेघचदाने यक्षदेववृद्धान्वयात दिलेली माहिती महत्त्वाची असून मुकुदराजाच्या कालनिर्णयाला उपयुक्त आहे डॉ तुळपुळे याच्या लेखासबधी या प्रमाणे विचार केल्यावर आता श्री गोगटे याच्या लेखाकडे वळू श्री गोगटे याचा 'आद्यकवि कोण? मुकुदराज की ज्ञानेश्वर ?', हा लेख चित्रमयजगत् मासिकाच्या जून १९५० या अकात प्रसिद्ध झाला. या लेखात श्री गोगटे यानी आद्य कवीचा मान मुकुदराजाला न देता ज्ञानेश्वराना दिला आहे. आणि त्या करिता त्यानी इतर साधनाचा विचार न करिना ज्ञानेश्वराचा अमृतानुभव आणि मुकुदराजाचा विवेक सिधु या दोन ग्रथातील ओव्याची परस्पर तुलना करून साम्यस्थळे दाखविली आहेत पण गमत अशी की, मी वर ज्या ओव्या दिल्या आहेत नेमक्या त्याच ओव्या श्री गोगटचानी तुलनेसाठी घेऊन त्याना पोषक म्हणून काही ओव्या दिल्या आहेत आणि ज्या साम्यस्थळाच्या आधारे मी मुकुदराजाला आदिकवि ठरवून ज्ञानेश्वराना नतरची जागा दिली आहे त्याच्या उलट गोगटचानी त्याच साम्य स्थळाच्या आधारा वर ज्ञानेश्वराना आदिकवीचा मान देऊन मुकुदराजानी त्याच्या कल्पनाची उसणवारी केली असे सागितले आहे. आणि ही उसणवारी सिद्धकरण्यासाठी त्या ओव्यातील कल्पना ज्ञानेश्वरी ठशाच्या आहेत असे त्याचे म्हणणे आहे परतु एकदर प्रकरणावरून विचार केल्यास श्री गोगटचाचे मतपटत नाही. कारण एक तर दहापाच ओव्यावरून अमक्याच्या ठशाच्या त्यातील कल्पना आहेत हे सागणे कठीण दुसरे असे की उसणवारी करण्यासाठी त्या ग्रथाला प्रथितयश यावे लागते आणि

# वर्णनात्मक निबंध.

## ५१. गंगानदीची उत्पत्ति आणि प्रवाह.

सिंधु, गंगा, आणि ब्रह्मपुत्रा, ह्या तिन्ही नद्यांचे उगम हिमालय पर्वतावर असून ते एकमेकांपासून सुमारे १०० मैलांपेक्षा कमी अंतरावर आहेत. सिंधुनदी (सतलज) ही हिमालयाच्या दक्षिणेस वाहत जाऊन शेवटीं आरबी समुद्रास मिळते. ब्रह्मपुत्रेचा बहुतेक मार्ग हिमालयाच्या उत्तर बाजूने असून तिचा अगदीं थोडा मार्ग हिंदुस्थानांत आहे, ती हिंदुस्थानांत आल्यावर तिचा गंगेशीं संगम झाला आहे. नंतर ह्या दोन्ही नद्यांचा एकवटलेला प्रवाह बंगालच्या उपसागरास जाऊन मिळाला आहे. सिंधु आणि ब्रह्मपुत्रा ह्या नद्यांची लांबी प्रत्येकीं सुमारे १९०० मैल आहे, व गंगेची लांबी सुमारे १७०० मैल आहे.

हिमालय पर्वतावर गंगोत्री म्हणून जे स्थल आहे, तेथे उगम पावून गंगानदी दक्षिणेकडे वाहात जाते. तिला हिमालय पर्वतावरच उगम पावलेली, व गरवाल संस्थानांतून वाहात आलेली, अलकनंदा ह्या नावाची नदी श्रीनगरच्या दक्षिणेस सुमारे १० मैलांवर देवप्रयाग ह्यां गावीं मिळते. अलकनंदा नदीच्या जलाने विस्तार पावलेली गंगानदी देवप्रयागच्या दक्षिणेस ३० मैलांवर हरिद्वारनामक जे ठिकाण आहे, तेथपर्यंत येऊन नंतर ती दक्षिणगामिनी होते. मग ती आग्रा आणि अयोध्या ह्या संयुक्त प्रांतांतून वाहात जाते, आणि पुढे ती पूर्वगामिनी होऊन बंगाल इलाख्यांत शिरते.

हिमालय पर्वतांत उगम पावलेल्या यमुना आणि गोग्रा ह्या मोठ्या नद्या, आणि रामगंगा, गोमती, गंडकी, कुशी वगैरे लहान नद्या गंगेला उत्तरेकडून भिन्न भिन्न ठिकाणी मिळतात, आणि शोण, तोनस, कर्मनाश, इत्यादि नद्या दक्षिणेकडून गंगेला मिळतात. हा प्रचण्ड जलसंचय घेऊन गंगानदी दक्षिणगामिनी होऊन भव्य स्वरूपाने बंगालच्या उपसागराला मिळते. मार्गामध्ये कित्येक ठिकाणीं ही नदी संथ चालते, कित्येक ठिकाणीं वेगाने चालते, कित्येक ठिकाणीं तिचा मार्ग सरळ आहे, आणि कित्येक ठिकाणीं नागमोडी आहे.

समुद्राला मिळावयाच्या पूर्वी सुमारे २०० मैलांवर मुरशिदाबादेजवळ गंगेचा

प्रवाह दुभागतो. पूर्वेकडील फाट्यास "पद्मा" नदी असे नाव आहे. ह्या पद्मेला पुढें गोलडो गावाजवळ कोनई व ब्रह्मपुत्रा ह्या नद्या मिळतात. पश्चिमेकडील जो गंगेचा फाटा, त्याला " भागीरथी " असें नाव असून पुढे त्यालाच " हुगळी " नदी असे नाव आहे. ह्या दोन फाट्याना पुढे आणखी दोन दोन, चार चार असे फाटे फुटतात, असे होता होता ही गगानदी शेवटीं शेंकडो मुखानीं समुद्रास मिळते. तेणेकरून ह्या ठिकाणीं सुमारे २५० मैल रुदींचें मुखजाल झाले आहे. येवढे विस्तीर्ण मुखजाल जगातील कोणत्याही नदीचे नाहीं. मुखजालामध्ये असलेला जमीनीचा प्रदेश अत्यत सुपीक आहे

पावसाळ्याच्या दिवसात गगानदीला पूर येऊन बगाल इलाख्याच्या सपाट प्रदेशावर तिचे पाणी दोहो बाजूस मिळून १०० मैल रुद पसरतें, आणि आगष्ट महिन्याच्या मध्याच्या सुमारास ते पाणी ओसरून गेल्यावर नेहेमींच्या पात्राने गगानदी वाहू लागते, परतु पावसाळ्यातील पाण्याबरोबर आलेली वस्त्रगाळ मृत्तिका मागे राहून शेताच्या जमिनीवर पसरून त्याना सुपीक करते.

गगानदीच्या काठचीं बहुतेक शहरे व गावे पुराणात किंवा इतिहासात प्रसिद्ध आहेत. त्या प्रत्येकांचे वर्णन करू गेल्यास एक स्वतत्र निबध होईल. यासाठीं येथें केवळ नामनिर्देश करतो. उगमाकडून मुखाकडे जाताना अनुक्रमे फरक्काबाद, कानपूर, अलाहाबाद, (प्रयाग), बनारस (काशी), पाटणा, मुर्शिदाबाद, व कलकत्ता, हीं मुख्य शहरे आहेत.

एरव्हीच्या पाण्यात रोगबीजाची वृद्धि होते तशी गगानदीच्या पाण्यात होत नाहीं, हा ह्या नदीचा विलक्षण गुण पाहून, आणि शिवाय ह्या नदीचे मानवजातीवर झालेले अनेक उपकार मनात आणून आपल्या लोकानीं तिला इतके वद्य मानिले आहे, आणि ह्याच कारणावरून तिच्यासबधाच्या इतक्या पौराणिक कथा उत्पन्न झालेल्या आहेत.

## ५२ सिह.

चतुष्पाद प्राण्यामध्ये माजर ज्या वर्गात येते, त्याच वर्गातील सिंह हा प्राणी आहे. सर्व हिंस्र पशूत सिंह हा अत्यत उग्र आहे. त्याचे शरीर भव्य, बांधा डौलदार आणि मजबूत असून त्याचा चेहेरा उग्र दिसतो. त्याच्या शरीराचा पुढचा भाग, (म्हणजे तोंड, खादे, व छाती), मोठा असून

त्याचे मानाने मागचा भाग लहान असतो. त्याची कबर तर इतकी बारीक असते कीं, बारीक कबरेचे वर्णन करावयाचे असता ' सिंहकटी ' हे उपमान योजण्याची रूढि पडून गेली आहे. मोठ्या सिहाची लाबी ८ किवा ९ फूट, आणि उर्ची ४ किवा ५ फूट असते. त्याची शेपटी पाच सहा फूट लाब असून तिच्या टोकाला केशाचा जाडी झुपका असतो. जाभई देताना सिंहानें आपला जबडा उघडला म्हणजे त्याचे दात व दाढा ह्याचा देखावा अतिशय भयकर असा वाटतो. त्याचा वर्ण काळा, तपकिरी किंवा पाढरा असतो. नर सिहाच्या डोक्यावर आणि मानेवर लाब लांब आणि दाट केश असतात, त्याना "आयाळ" असे म्हणतात. सिहाचे आयुर्मान सुमारे २५ वर्षांचे असते.

सिंहाच्या शरीराच्या सर्व भागाची, ( विशेषतः पुढच्या भागाची ), मजबूत घडण, विशाल डोके, विस्तवाप्रमाणे लखलखीत डोळे, दाट आणि लाब आयाळ, आणि उग्र देखावा, या त्याच्या गुणावरून सिहाला " वनराज, " " मृगाधिप " वगैरे नावे लोकानीं दिलीं आहेत

सिंही वर्षांतून एकदा विते, आणि एका खेपेस तिला दोन पासून चार-पर्यंत बच्चे होतात, ती आपल्या बच्चाना वर्षभर पोसते. सिहाची पूर्ण वाढ सहा सात वर्षांनीं होते. नर सिंहाला चवथ्या वर्षापासून आयाळ येऊं लागते.

आफ्रिका खडातील बार्बरी वगैरे देशात, अशिया खडाच्या मध्य आणि पश्चिम भागात, ( म्हणजे हिंदुस्थान, इराण,वगैरे देशात ), सिह आढ-ळतात. आफ्रिका खडातील सिह शरीरानें मोठा असतो, अशिया खडातील सिंह लहान असतो. गुजराथेतील सिहाला आयाळ नसते.

सिंह दिवसभर आपल्या जाळीत किंवा गुहेत राहून रात्रीस भक्ष्याच्या शोधार्थ अरण्यात भटकतो. तो जिवत प्राणी मारून खातो. भूक अतिशय लागलेली असली, आणि त्याला जिवत प्राणी मिळाला नाहीं, तर मात्र तो मेलेल्या प्राण्यावर आहार करतो. भक्ष्य मिळविण्याचा त्याचा प्रकार असा असतो. तो हळूच आणि पावलांचा आवाज न करता आपल्या भक्ष्याच्या जवळ चालत जातो, आणि ते भक्ष्य अवसानाच्या आटोक्यात येताच त्याच्यावर भयकर जोरानें आणि वेगानें झेप घालतो. नतर त्या

प्राण्याला मारून त्याला आपल्या तोंडात धरून तो आपल्या गुहेकडे किंवा जाळीकडे जाऊन तेथें ते भक्ष्य स्वस्थपणाने खातो.

सिंहाच्या अंगीं इतकी शक्ति असते कीं, तो भल्या भक्कम रेड्यास मारून आपल्या पाठीवर टाकून त्याला आपल्या गुहेकडे घेऊन जातो. तो जरी इतका शक्तिमान् आहे, तरी त्याची चलाखी शक्तीहूनही अधिक आहे, आणि म्हणूनच त्याला आपल्यापेक्षाही जास्ती शक्तिमान् अशा हत्तीचे गंडस्थळ सहज फोडता येते.

सिंह अल्प श्रमाने माणसाळतो, आणि तो एकदा माणसाळला म्हणजे एकाद्या कुत्र्याप्रमाणे मालकाशीं लडिवाळपणा करतो. हा लडिवाळपणाचा देखावा आपल्याला सर्कसमध्ये पहावयास सापडतो. सिंह माणसाळला तरी त्याचेवर फारसा विश्वास ठेवता येत नाहीं, कारण तो कधीं कधीं एकाएकीं चवताळून बेफाम होतो, व तावडींत सापडेल त्याचा प्राण घेतो. सिंह रानांत असता सहसा माणसाच्या वाटेस जात नाहीं, पण त्याची माणसानेच काहीं खोड काढली, तर तो त्याच्यावर शौर्याने हल्ला करतो. इतर प्राण्यासही तो केवळ क्षुधातृप्तीकरिताच मारतो, उगीचच्या उगीच त्याचा संहार करीत सुटत नाहीं.

सिंह इतका बळकट व भयंकर प्राणी आहे, तरी तो केलेला उपकार जाणतो, असे अनेक प्रसंगीं आढळून आलेले आहे. आड्रोक्लीज नावाच्या एका माणसाने रानात एका सिंहाच्या पायातील काटा काढून तो बरा केला हे उपकार मनात आणून त्या सिंहाने आड्रोक्लिजाशीं पुढें मायाळूपणाचे वर्तन केले, ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहे म्हणून ती येथे देण्याचे प्रयोजन नाहीं. परंतु ह्या गोष्टीपासून जो बोध घ्यावयाचा तो मात्र येथे स्पष्ट शब्दानीं सांगावासा वाटतो. सर्व प्राण्यामध्ये मनुष्य हा श्रेष्ठ होय. परंतु त्याच्या अंगीं उपकाराची जाणीव नसल्यास तो रानटी पशूच्याही पेक्षा खालच्या पायरीचा ठरतो. तर सर्व लोकानीं आड्रोक्लीजाच्या गोष्टींतील सिंहाप्रमाणे आपल्या अंगीं कृतज्ञता हा गुण आणण्याचा प्रयत्न करावा.

## ५३. कारल्याचीं लेणीं.

सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी बौद्ध लोकानीं एकातांत अध्ययन व उपासना करण्यासाठीं सह्याद्रीमध्ये व इतर ठिकाणीं जीं विवरें खोदिलीं, त्याना

लेणीं असें म्हणतात. आपल्या लोकांत शिल्पकलादिकांत प्रवीणता किती पुरातन कालापासून होती व तींत त्याची किती प्रगति झाली होती, ह्या गोष्टीच्या निदर्शक अशा ज्या वस्तु अद्यापि अवशिष्ट राहिल्या आहेत, त्यांपैकीं हीं बौद्धांचीं लेणीं होत. बौद्ध लोकांच्या सर्व लेण्यांत कारल्याजवळचीं लेणीं सौंदर्यानें, भव्यपणानें आणि विशालपणानें, फार श्रेष्ठ आहेत.

पुणें जिल्ह्यांत लोणावळें म्हणून जो गांव आहे. त्याचेपासून सुमारें चार मैलांवर आग्नेयी दिशेस कार्लें म्हणून एक खेडें आहे. त्याला लागून जो डोंगर आहे. त्यांत हीं लेणीं आहेत, ह्या लेण्यांमध्यें मुख्य जें लेणें तें बौद्धांचें चैत्य, म्हणजे उपासनेचें स्थान होय. ह्या मुख्य लेण्याकडे जातांना प्रथम एक मोठा स्तंभ लागतो, त्यावर चार सिंहांचे पुतळे आहेत. नंतर पुढें चैत्याकडे जातांना उजव्या बाजूस एक जुनें देऊळ आहे,तें बौद्धांनीं ध्यानस्थ बसण्यासाठीं केलेलें असावें, पण अलीकडे त्यांत एका देवीची स्थापना केली आहे. तिचें नांव एकवीरा तिला समुद्रकांठचे कोळी लोक भजतात.

हें देऊळ उजव्या हातास टाकून पुढें गेलें असतां मुख्य चैत्य दृष्टीस पडतें ह्याच्या तोंडाशीं उभें राहून आंत नजर टाकिली असतां जो देखावा दिसतो, तो पाहून मन सानंदाश्चर्यानें थक्क होऊन जातें. हें चैत्य म्हणजे एक मोठा थोरला आणि उंच दिवाणखाना आहे. त्याची विशालता पाहून प्रेक्षक आनंदानें, विस्मयानें आणि कौतुकानें स्तब्ध होऊन उभा राहतो. अडीच हजार वर्षांमागें आपल्या लोकांनीं प्रमाणशुद्ध खोदकामांत इतकें प्राविण्य मिळविलें होतें. हें पाहून आपणाला अतिशय अभिमान व आनंद वाटतो.

दरवाज्यापासून मागच्या भिंतीपर्यंत चैत्याची लांबी सुमारें १२५ फूट, व रुंदी सुमारें ४५ फूट आहे. ह्या चैत्यांत लांबीला समांतर अशीं तीन दालनें आहेत, त्यांपैकीं मधलें दालन पंचवीस फूट रुंद असून बाजूचीं दहा फूट रुंद आहेत. मधल्या दारासमोर, आणि मागच्या भिंतीपासून सुमारें पंधरा फुटांवर, एक टोपाच्या आकृतीचा उंचवटा आहे,त्याला बौद्ध लोक "स्तूप" असें म्हणतात. स्तूप बहुधा गोलाकार असतात,व त्यांत बौद्ध लोक आपल्या धर्माचा संस्थापक जो गौतम बुद्ध त्याच्या शरीराचा कांहीं अवशेष, ( नख, केश, दांत, वगैरे) ठेवीत, व कधीं कधीं बुद्धानें वापरलेल्या वस्तु, ( म्हणजे त्याचीं वस्त्रें वगैरे ) ठेवीत.

ज्या लेण्याचें मी वर्णन करीत आहे, त्यातील स्तूपाचा व्यास सुमारे २० फूट व उची ४५ फूट आहे. मधल्या मोठ्या दालनाच्या दोन बाजूस व स्तूपाच्या मागून एक खांबांची रांग आहे. हे खांब अष्टपैलू असून त्यावरचें कोरींव काम उत्कृष्ट आहे.

ह्या चैत्याची छावणी उच व अर्धवर्तुलाकृति आहे. त्यात पुढच्या दरवाज्यातून प्रकाश येतो, तो भरपूर असून त्याच्या योगाने आतील सर्व भाग स्पष्टपणे दिसतात ह्या चैत्याच्या मधोमध उभे राहून सर्व बाजूस नजर टाकली असता मनावर गंभीरपणाचा ठसा उमटून चित्तवृत्ति तटस्थ होऊन जाते.

ह्या चैत्याच्या आजूबाजूस आणखीहि पुष्कळ विवरें आहेत. तीं कारागिरीच्या मानाने सामान्य प्रतीचीं आहेत. हीं बौद्धधर्माच्या यतींचीं निवासाचीं व अध्ययनाचीं स्थानें होत. ह्यापैकीं काहीं दुमजली आहेत, त्यांचे जिने डोंगराच्या गर्भांत खोदलेले असून ते वाकडेतिकडे व ओबडधोबड असे आहेत.आज दोन अडीच हजार वर्षांचे अवधींत त्याच्या दुरुस्तीकडे कोणी न पाहिल्यामुळे तीं सर्वविध्वंसक अशा कालाच्या तडाक्यात सापडून काहीं ठिकाणीं ढासळलीं आहेत. तेणेकरून अशा ठिकाणीं प्रवेश करणें धोक्याचें झालें आहे.

आपल्या देशात प्रेक्षणीय अशीं जीं शेकडो स्थळें आहेत, त्यात हीं लेणीं श्रेष्ठ होत, व ज्याला शक्य असेल त्यानें तीं एकदा तरी पाहावीं.

## ५४. तुम्ही केलेल्या एकाद्या प्रवासाचें वर्णन करा.

आमच्या शाळेची वार्षिक परीक्षा आटोपून आम्हाला दिवाळीची सुट्टी झाली होती ही सुट्टी पुण्यास न घालविता मुंबईत घालवावी, असा आमचा बेत ठरून आम्हीं—मी आणि माझे तीन सोबती—दुपारच्या ‘ एक्सप्रेस ’ गाडीनें मुंबईस यावयास निघालों.

पुण्याच्या स्टेशनावर तिकिटे काढण्यासंबंधानें उतारूस जे कष्ट होतात ते पुसूच नयेत. कारण उतारूंची संख्या मोठी, तिकिटें देणारा इसम एकच, जागा भारी अडचणीची, आणि ज्याला त्याला आपणास अगोदर तिकीट मिळावें ही इच्छा. मग अशा परिस्थितींत शिरून धक्काबुक्की करून जो कोणी एकदाचें तिकीट मिळवील, त्यानें शतक्रृत्यच केलें, असें म्हटलें

पाहिजे. आगगाडीची पहिली घटा झाली, तेव्हा आम्हाला तिकिटे मिळालीं. मग तेथून धक्काबुक्की करून आम्ही प्लॅटफार्मवर यावयास निघालो. इतक्यात एका उतारूचा पाय केळ्याच्या सालीवरून निसरून तो धाड्दिशीं जमिनीवर आपटला. परतु सर्वांना गाडी मिळविण्याची घाई असल्यामुळे त्याला हसावयास आम्हाला किंवा दुसऱ्या कोणाला फुरसतच नव्हती. असो. आम्ही तिघेजण एकदाचे प्लॅटफार्मवर गेलो. इतक्यात दुसरी घटा झाली. आम्ही लगबगीने एका डब्यात शिरलो, तो तिसरी घंटा होऊन गाडी सुटली.

डब्यात देखील अतोनात गर्दी होती. कोणी उतारू जवळच्या एखाद्या स्टेशनावर उतरावयाचे असतील अशा आशेने आम्हीं दोघा तिघास "तुम्ही कोठे उतरणार?" म्हणून विचारले. त्या सर्वांनीं "आम्हास मुबईस जावयाचे आहे," असे सागितले, तेव्हा तर आमची पाचावरच धारण बसली! साऱ्या वाटेने आम्हास उभे राहावे लागेल की काय, अशी आम्हास भीति वाटली. खडकीस दोन उतारू उतरले, परतु आम्हा तिघापैकीं एकासच जागा मिळाली आणि दोघेजण उभे राहिलो. पुढे आमच्या सुदैवाने तळेगावास दहा बारा उतारू उतरले, तेव्हा आमची चैन उडाली! आम्ही अघळपघळ जागा करून घेऊन पत्याचा डाव माडला. मग लोणावळ्याचे स्टेशन आले, तेव्हा आम्हीं आपला डाव आवरला, आणि थोडासा उपाहार केला. या अवधीत आगगाडीचे एजिन बदलून आगगाडी पुन्हा चालू झाली. नतर खडाळे मागे टाकून आम्ही रिव्हर्सिंगवर आलो. येथें वारा इतक्या सोसाट्याने वाहात होता कीं, आमची गाडी थडथडा हालत होती. तेथें कातकऱ्याच्या पोरांनीं द्रोणात करवदे घालून विकावयास आणि होतीं. आम्हीं चार पाच द्रोण विकत घेतले, व एकीकडे करवदे खात, एकीकडे गप्पा मारीत किंवा सृष्टीच्या देखाव्याचे निरीक्षण करीत, बसलो. गाडीची दिशा बदलून ती घाट उतरू लागली.

पावसाळा सरल्यानतर पुढे येणाऱ्या दिवसाचा घाटातील देखावा रमणीय असतो, व दिवाळीची सुट्टी याच दिवसात येत असल्यामुळे आम्हास अत्यत मनोहर देखावा पहावयास मिळाला. कांहीं ठिकाणीं धुके इतके दाट असे कीं, आमची गाडी जणू काय ढगातूनच चालली आहे, असा आम्हास भास होत होता! ठिकाठिकाणीं डोंगरावर साचलेले पाणी लहान

लहान धबधब्याच्या व ओहोळाच्या रूपाने खाली पडत होते. हे धबधबे व ओहोळ दुरून पहाण्यास फार सुरेख दिसत होते. मोठमोठ्या दऱ्या हिरव्यागार झाडांनी व गवताने भरून गेल्या असल्यामुळे त्या हिरव्या रंगाच्या मखमालीने आच्छादिल्यासारख्या दिसत होत्या.

हा व अशा तऱ्हेचा अन्य देखावा आम्ही पहात असता आमची गाडी पर्वत, खिंडी, बोगदे, पूल, वगैरेंना मागे टाकीत पुढे पुढे चालली होती, लवकरच आम्ही कर्जतच्या स्टेशनावर आलो.

या ठिकाणीं इंजिन पुन्हा बदलल्यावर आमची गाडी चालू झाली, व धडधडत धडधडत एकामागून एक स्टेशने मागे टाकीत चालली. कर्जतच्या पुढे विशेष पहाण्यासारखे काहीं नसल्यामुळे आम्ही गाडीचे हिसके खात खात मुबईस आलो, व तेथून एका व्हिक्टोरियात बसून आमच्या उतरण्याच्या ठिकाणीं आलो.

## ५५ शिळाछाप.

कागदावर काढलेलीं अक्षरे शिळेवर उमटवून नतर शिळेवरून त्या अक्षराच्या हव्या तितक्या प्रती कागदावर छापून घेण्याची जी कला, तिला शिळाछापाची कला असे म्हणतात.

प्रथम एक प्रकारचा काही पिवळा पदार्थ असतो, त्याचा लेप एका कागदावर करून त्या कागदावर आपणास जे लिहावयाचे असेल ते लिहितात. मग शिळा थोडीशी तापवून ती एका दाबण्याच्या यत्रावर ठेवितात, आणि हा लिहिलेला कागद तिच्यावर उपडा, म्हणजे लिहिलेली अक्षरे शिळेला लागतील अशा रीतीने, घालतात. मग ह्या कागदावर यत्रानेच दाब घालतात. म्हणजे कागदावरची अक्षरे शिळेवर उमटतात भेद'इतकाच कीं,कागदावर जे सुलटे असते, ते शिळेवर उलटे उमटते. मग ह्या शिळेवर ओले फडके फिरवितात. आणि त्यावर शाईचा रूळ फिरवितात. ही शाई शिळेवरील अक्षरास मात्र लागते. मग तिच्यावर कोरा कागद घालून दाबला म्हणजे त्याच्यावर शिळेवरचीं अक्षरें सुलट उठतात.

शिळेवर पहिली प्रत छापून काढली, म्हणजे ती काळजीपूर्वक तपासतात. प्रत्येक अक्षर बिनचूक वठलें आहे किंवा नाहीं हे पहातात. एकाद्या अक्षराचा काना, मात्रा, वगैरे कांहीं भाग असावा तसा नसल्यास शिळेवर

दुरुस्ती करतात. नको असेल तेथील शाई नाजूक हाताने चाकूच्या पात्याने खरडून काढतात. काना, मात्रा, वगैरे भरणे झाल्यास तो लेखणीने जेथल्या तेथे भरतात. अशा रीतीने शिळा बिनचूक झाली, म्हणजे तिच्यावर ओले फडके फिरवितात. मग तिच्यावर शाईचा रूळ फिरवितात, मग तिच्यावर कोरा कागद घालून यत्रानेच दाबून काढतात. ह्या कागदावर योग्य ठिकाणीं शाई लागून आपणास जें छापावयाचे असेल ते छापून निघते. नतर पुढच्या प्रतीचे वेळीं पुन्हा फडक्याचा बोळा शिळेवर फिरवितात, मग शाईचा रूळ फिरवितात. मग कोरा कागद घालून पूर्वीप्रमाणेच छापतात. शिळेचे हे सस्कार दर प्रतीच्या वेळीं करावे लागतात. ह्या रीतीने हव्या तितक्या प्रती छापून काढतात.

आपणाला हव्या असतील तितक्या प्रती छापून काढल्यावर ती शिळा पुन्हा स्वच्छ करावयाची असते. ह्यासाठीं असल्या दोन शिळा अक्षराच्या बाजू एकमेकींस लागतील अशा रीतीने एकमेकींवर पाणी घालून कांहीं वेळपर्यंत घासतात. तेणेकरून दोन्ही शिळावरचीं अक्षरे नाहींतशीं होऊन त्या स्वच्छ कोऱ्या होतात. त्याच्यावर पुनः पूर्वीप्रमाणे अक्षरे उमटवून पुनः दुसरे कागद छापून काढता येतात.

सुमारे ६० वर्षांमागे सर्व मराठी पुस्तके शिळाछापाने छापलेलीं असत. हल्लीं नाना तऱ्हेचे सुदर ठसे करण्याची कला आपल्या लोकास अवगत झाल्यापासून शिळाछापाने पुस्तके छापीत नाहीत. चित्रे, नकाशे, भूमितीच्या आकृति, भिंतीवर चिकटावयाच्या मोठमोठ्या जाहिराती, वगैरेसारखे काम मात्र शिळाछापाने छापतात.

## ५६ नदी.

डोंगरापासून किंवा सरोवरापासून उत्पन्न होऊन वाहात वाहात जाऊन शेवटीं समुद्रात पडणारा जो पाण्याचा प्रवाह, त्याला नदी असे म्हणतात. ज्या स्थळीं नदी उत्पन्न होते, त्या स्थळाला त्या नदीचा उगम असें म्हणतात. उगमापाशीं नदी फार लहान व अरुद असते, परतु तिच्या मार्गांत तिला अनेक लहान मोठे नाले, ओढे, किंवा पावसाच्या पाण्याचे ओहोळ वगैरे येऊन मिळतात, तेणेंकरून तिचा जलसचय उत्तरोत्तर वाढत जातो, तिचें पात्र रुदावत जाते, आणि शेवटीं ती जेथें समुद्रास मिळते,

तेथे तर ते पात्र कधीं कधीं चार पाच मैल देखील रुंद होतें. नदी ज्या ठिकाणीं समुद्रास मिळते, त्या ठिकाणाला तिचे मुख म्हणतात.

उगमापासून नदी वाहू लागली म्हणजे तिला जिकडे जिकडे सखल प्रदेश सापडेल, तिकडे तिकडे ती वाहात जाते. पृथ्वीचा पृष्ठभाग उचसखल असल्यामुळे व सखल प्रदेशाकडे धाव घेण्याचा पाण्याचा धर्म असल्यामुळे नदीची गति सरळ रेषेत कधींही नसते, ती नेहमीं वाकडीतिकडी असते. डोंगर, टेकड्या, वगैरेसारखे मोठमोठाले उचवटे नदीला वाटेमध्ये लागल्यास तिला फारच मोठीं मोठीं वळणे घ्यावीं लागतात. वाटेत एकादा कडा आला तर नदी त्याचेवरून जाराने खालीं पडते. अशा रीतीने कड्यावरून नदीचा प्रवाह खालीं पडला म्हणजे त्याला धबधबा म्हणतात.

नदी ज्या प्रदेशातून वाहात असते, तो बराचसा सपाट असल्यास तिचा प्रवाह सथ असतो. अशा प्रवाहावर होड्या चालविण्यास फार प्रयास पडत नाहींत म्हणून व्यापारी मालाची नेआण करणे सोईचे होते, परतु ज्या प्रदेशातून नदी वाहात असते, तो उच सखल, खडकाळ किंवा मोठ्या उतरणीचा असला, तर नदीचा वेग सर्व ठिकाणीं सारखा राहात नाहीं, व प्रवाहाला ओढही भारी असतो. अशा ठिकाणीं व्यापारी मालाची नेआण करणे त्रासाचे असते.

नदीचा प्रवाह जेथे सपाट किंवा बहुतेक सपाट अशा प्रदेशावरून चाललेला असतो, तेथे व्यापारी मालाची नेआण करण्यासाठीं कित्येक मैल लाबीचे कालवेही पाडतात.

जेव्हा नदी कड्यावरून उडी घेते, तेव्हा तेथे धबधबा होतो. धबधब्याचें पाणी फार जोराने खालीं पडत असते. ह्या जोराचा उपयोग नाना प्रकारचीं यत्रे किंवा गिरण्या चालविण्याच्या कामीं करता येतो.

पावसाळ्यात नद्या तुडुब भरून वाहतात. उन्हाळ्यात त्याचे पात्र लहान होते. बारा महिने सतत वाहणाऱ्या अशा ज्या नद्या असतात, त्यापैकीं काहीं नद्याच्या प्रवाहाबरोबर माती वाहात येते, ती इतकी कीं, तिच्या योगानें त्या नद्याचे मुख बद होते, आणि ह्या साठलेल्या मातीच्या दोन बाजूनीं वाहू लागतें. अशा रीतीनें एका नदीचे दोन फांटे होऊन ते समुद्रांस जाऊन मिळतात. कधीं कधीं ह्या एका एका फाट्याचे पुन्हा आणखी दोन दोन

फाटे होतात. अशा रीतीने फाटे होता होता नदीच्या मुखाजवळ पाण्याचे जणू काय जाळे झाले आहे, असा भास होतो. नदीच्या मुखाजवळ अशा रीतीने उत्पन्न झालेली जमीन अतिशय सुपीक असते. गगानदीच्या मुखाजवळ अशा रीतीने जी जमीन झाली आहे, तिला " सुदरवन," असे नाव आहे.

आपणास नदीचे उपयोग अनेक होतात. वर सागितल्याप्रमाणे व्यापारी मालाची नेआण करण्यास व मनुष्याच्या प्रवासास नदी हा निसर्गनिर्मित मार्ग होतो. शिवाय नदींतील जे मासे त्याचा उपयोग मनुष्याच्या आहारात होतो तसेच नदीचे पाणी पाटानीं शेतास, मळ्यास, बागास देता येते, आणि मोटानीं विहरीतील पाणी काढण्याचे श्रम वाचतात. नदीचा आणखीही एक मोठा उपयोग आहे. तो हा की, ती आसपासच्या बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशातील घाण धुऊन नेते. नदीला पूर आला म्हणजे ती मोठे नुकसान करते, परतु असल्या नुकसानीच्या मानाने नदीचे उपयोग किती तरी पटीने ज्यास्ती आहेत.

## ५७ दिवाळी.

हा शब्द "दीपावलि' ह्या सस्कृत शब्दापासून निघालेला आहे. "दीपावली" म्हणजे दिव्याची ओळ. ह्या सणात घरोघर दिवे लावून तीं शोभायमान केलेलीं असतात, म्हणून ह्या सणास " दिवाळी " असे म्हणतात.

ह्या सणाची मुदत चार दिवसाची असते. अश्विन वद्य १४ ला दिवाळीचा सण सुरू होतो. दुसऱ्या दिवशीं म्हणजे अमावास्येस लक्ष्मीपूजन, तिसऱ्या दिवशीं बलिप्रतिपदा, व चवथ्या दिवशी भाऊबीज असते.

हा सण हिंदू लोकात फार मोठा आणि महत्त्वाचा समजला जातो. दिवाळीचा सण जवळ येऊ लागला म्हणजे मुलाबाळास भारी आनद होतो, कारण त्याना सुट्टी मिळून यथेच्छ बागडावयास सापडते. सर्व कचेऱ्या, व सर्व कारखाने, ह्याना रजा असल्यामुळे मोठ्या माणसानाही आपल्या इष्टमित्रासह आनदाने खेळण्यास आणि गप्पा गोष्टी करण्यास चागली सधी मिळते.

दिवाळीचे पूर्वी सर्व लोक आपापली घरे झाडून, सारवून, व रगवून शोभिवत करतात, आणि अगणे चोपून सारखी करतात.

नरकचतुर्दशीच्या पहाटेस सर्व लोक उठून अगास नानाप्रकारचीं तेलें लावून स्नाने करितात. हीं स्नानें होत असता मुलें फटाकडे उडवितात. नतर करंज्या, कडबोळी, अनरसे, चकल्या, चिरोटे, लाडू, पोहे, वगैरे खाद्यांचा उपहार करितात. दुपारीं काहीं तरी पक्कान्न करून सर्व माणसे आनदाने भोजन करतात. नतर सोगट्या, पत्ते, वगैरे खेळ खेळतात. मग रात्रीं दिवे लावून जिकडे तिकडे लखलखाट करतात. दिवे लागल्याबरोबर मुलाच्या फटाकड्याचा कडाका सुरू होतो. दारूसामान उडविण्याची मुलाना भारी गमत वाटते.

अमावास्येच्या दिवशीं सध्याकाळीं घरोघर लक्ष्मीपूजन होते; व्यापारी लोक आपापलीं दुकाने झेंडूच्या फुलाच्या माळानीं शृगारून मोठ्या थाटाने लक्ष्मीपूजन करून मित्रमडळीस पानसुपारीस बोलावितात. ह्या दिवशीं व्यापारी लोकाचे नवें वर्ष सुरू होते.

बलिप्रतिपदा हा दिवाळीचा मुख्य दिवस असून ह्या दिवशीं जावयास जेवावयास बोलावतात, व मुलीकडून त्याला ओवाळवितात, तेव्हा जावई आपल्या बायकोस काही ओवाळणी, (रुपये, लुगडे, चोळ्याचे खण, दागिना वगैरे), देतो.

भाऊबिजेच्या दिवशीं बहिणी आपल्या भावास जेवावयास बोलावून त्याना ओवाळितात, तेव्हा भाऊ आपल्या ऐपतीप्रमाणे त्याना काही तरी ओवाळणी देतात.

अशा रीतीने दिवाळीच्या चारी दिवसात जिकडे तिकडे आनदीआनद दृष्टीस पडतो.

सर्व पुरुष, सर्व बायका, सर्व मुले, उत्तम उत्तम वस्त्रे धारण करतात. आपल्याजवळ असतील ते दागिने अगावर घालतात. मुलें फटाकडे वगैरे उडवितात. स्त्रिया एकत्र बसून गाणीं म्हणतात. अगणात नानाप्रकारच्या रागोळ्या घालतात. मोठे पुरुष नानाप्रकारचे खेळ खेळतात. अशा रीतीने हा सण अबालवृद्धास अतिशय आनदप्रद असतो.

## ५८ आट्यापाट्या.

आट्यापाट्या हा खेळ फार प्राचीन काळापासून आपणामध्ये चालत आला आहे.

महान् भगवद्भक्त साधु तुकाराम याच्या कित्येक अभगात आट्या-

पाट्या किंवा मृदगपाट्या असे नाव देऊन त्याचा उल्लेख केला आहे. यावरून हा खेळ तुकारामाच्याही पूर्वीपासून चालत आला असावा, असे म्हणण्यास काहीं हरकत नाहीं.

ह्या खेळास पैशाची मुळींच जरूर लागत नाहीं. ईश्वरनिर्मित सपाट जमीन, ह्याशिवाय आट्यापाट्यास दुसरें कोणतेही साधन लागत नाही. पाट्या पाडण्याचे दोन प्रकार आहेत. काहीं ठिकाणीं पाणी घालून पाट्या पाडतात, व काहीं ठिकाणीं पाट्याची जागा थोडी खोदून पाट्या कायमच्या तयार करतात. ह्या खेळास सुमारे वीस फूट रुंदीची व ज्या मानाने गडी असतील, त्या मानानें लांबीची जागा लागते. पाट्याच्या दोन बाजूस दोन सीमा पाडतात व त्याना समांतर व त्याच्या बरोबर मध्या-वर अशी एक तिसरी रेघ पाडतात, तिला " सूर " किंवा " मुर्दुंग, " असे म्हणतात. सुर ( मुर्दुंग ) धरणाऱ्या इसमास " मुर्दुंग्या " म्हणतात. सुर व सीमा पाडल्यावर त्याना काटकोनामध्ये आडव्या रेघा पाडतात, त्यास "पाट्या" असे म्हणतात. पहिल्या पाटीस "चाभारपाटी," व शेवटच्चीस " लोणपाटी, " अशीं नावे आहेत. पाट्या पाडून झाल्यावर भिडू, म्हणजे गडी, वाटून घेण्याचे काम होते. नंतर पाट्या आधी कोणच्या पक्षाने धरावयाच्या, याचा निर्णय होऊन पाट्या धरणारे गडी पाट्या धरावयास जाऊन डावास सुरवार होते.

सर्व गडी चाभारपाटीच्या बाहेर रांगेने पाट्यामध्ये घुसण्यास अगदीं आतुर होऊन उभे असतात. तेव्हा मुर्दुंग्याच्या हातावर टाळी मारण्याकरिता एकजण येतो, व डावास सुरवात होते. टाळी मारणाऱ्या इस-मास " लाभ्या " असे म्हणतात.

लाभ दिल्याबरोबर सर्व भिडू एकदम पाट्यात घुसू लागतात. तोंप-र्यंत मुर्दुंग्या काडे चिरून खालीं तिसऱ्या पाटीशी येतो. लाभ दिल्याबरोबर मुर्दुंग्यानें चाभारपाटीपासून पाहिल्या पाटीपर्यंत जाणे, व फिरून चाभार-पाटीवर येणे, यास " काडे चिरणे, " असे म्हणतात. बहुतकरून नेहमीं कोंडी तिसऱ्या पाटीत होते. तीन किंवा तिघाहून अधिक भिडूस पाटीच्या अर्ध्या भागात मुर्दुंग्या व पाटीवाला अडकवितात, तिला " कोंडी "म्हण-तात. खेळाची सर्व खुबी ही कोंडी फोडून जाण्यामध्ये असते, अशा वेळीं अंग चोरून मुर्दुंग्या व पाटीवाला या दोघास तीन बाजूंनी गडी हुलकावण्या

दाखवितात. बराच वेळ हुलकावण्या दाखवून एकादा चपळ गडी कोंडी फोडून निसटतो. ह्याप्रमाणे पाट्या खेळत खेळत गडी लोणपाटी ओलांडून जातो, तो लोणपाटी ओलांडून गेला म्हणजे तोंड मागतो, म्हणजे त्यास पाटीवाला तोंड देतो, म्हणजे त्याच्याकडे तोंड वळवतो. अशा वेळीं सर्व भिडू खेळ थांबवून बसतात, व तो गडी लोणपाटी खेळून आत आला, म्हणजे त्या पाटींतील गड्यास तो शिवतो. म्हणजे त्यास पुन्हा खालीं जाण्याचें कारण पडत नाहीं. अशा रीतीनें खेळत खेळत सर्व पाट्या खेळून पुन्हा चांभारपाटीच्या पलीकडे गडी निघून जातो. तो निघून गेला म्हणजे पाट्या धरणाऱ्या बाजूवर लोण लागला, असें समजून फिरून दुसऱ्या डावास सुरवात होते.

आट्यापाट्या खेळण्यापासून अंगीं चपलता येते, शरीर नीरोगी राहून अन्नपचन वगैरे चांगले होतें. सर्व खेळांत आट्यापाट्यास विशेष महत्त्व देण्यांत येतें, याचें कारण असें कीं हा खेळ श्रीमंतापासून गरिबापर्यंत सर्वांस सारख्याच रीतीनें खेळतां येतो कारण, हा खेळ खेळण्यास कसलीहीं सामुग्री लागत नाहींत, व पैसे बिलकूल लागत नाहींत. आट्यापाट्या हा सर्व हिंदू लोकांचा राष्ट्रीय खेळ आहे, व तो परकीयांच्या खेळांनीं मागें न पडेल अशी आपण सावधगिरी बाळगिली पाहिजे.

## ५९ माथेरान.

सह्याद्रीच्या एका भुजावर माथेरान नांवाचें एक ठिकाण आहे. हें मुंबई शहराच्या येट पूर्वेस २८ मैलांवर आहे.

माथेरानाचा पृष्ठभाग सपाट असून त्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें पांच मैल आहे, व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें दोन मैल आहे. येथील हवा उन्हाळ्याच्या दिवसांत फार थंड परंतु आल्हादकारक असून आसपासच्या प्रदेशाचा देखावा अत्यंत भव्य असतो, यामुळें येथें युरोपियन लोक उन्हाळ्यांत येऊन दोन महिने राहतात.

माथेरानाच्या सपाटीच्या कांठाशीं आपण उभे राहिलों असतां खालीं सुमारें दीड दोन हजार फूट उंचीचे कडे आहेत, हे कडे बहुतेक भिंतीसारखे उभे असल्याकारणानें खालचा देखावा अत्यंत भव्य दिसतो. तो देखावा भयानक आहे, तरी तो आनंदजनक होतो. असल्या भिंतीसारख्या उंच कड्यावरून खालचा देखावा पाहण्याला योग्य अशीं पांच सहा स्थळें विशेष प्रसिद्ध

आहेत. एक चौक गावाच्या बाजूचें स्थळ आहे, त्याला ' चौक पाइंट ' म्हणतात, दुसऱ्या एकाला ' हार्ट पाइंट' म्हणतात, तिसऱ्या एका स्थलाला ' पार्क्यूपाइन पाइंट ' म्हणतात, चवथ्याला ' प्रबळ पाइंट ' म्हणतात, अशाच दुसऱ्या स्थलाना दुसरीं नावें आहेत.

माथेरानाच्या सपाट प्रदेशासभोंवार किर्र झाडी आहे, आणि या झाडीतून ज्या बारीक बारीक वाटा आहेत, त्यातून कित्येक मैल चाललें तरी सूर्यदर्शन होत नाहीं. या वाटानीं चालले असता शेकडो माकडे आणि वानरे आपणास झाडावर उड्या मारतांना दिसतात तीं सहसा वाटसराना उपद्रव करीत नाहींत. उलट त्याचें खिसखिसणें, त्याचें दात विचकणें, व त्याच्या नानाप्रकारच्या चेष्टा पाहून वाटसरास मोठी गमत वाटते.

माथेरानावरून सायकाळीं सूर्यास्ताचा देखावा फारच मनोहर दिसतो. सूर्याचें तांबडे लाल बिंब अदृश्य होताच एकामागून एक असे अनेक रग आकाशाच्या घुमटात दिसतात. सधिप्रकाश अगदीं नाहींसा होतो न होतो तोंच रात्रकिड्याच्या कर्कश शब्दाला सुरवात होते. हजारो काजव्याच्या क्षणात दिसणाऱ्या आणि क्षणात दिसेनाशा होणाऱ्या ज्योती चमकू लागतात. आणि थडगार वारा एकसारखा वाहात असल्याकारणानें आपण घराच्या चार भिंतींच्या आत केव्हा एकदा जातो असें होऊन जाते.

मुंबईच्या धनाढ्य लोकाना थारापालट करण्यास यावयाला माथेरान हें फार सोयीचें ठिकाण आहे.

## ६. बेडूक.

( रा. गोपाळ नारायण साठ्ये याच्या पुस्तकातून. )

काहीं प्राणी पूर्ण अवस्थेस पोंचण्याच्या पूर्वी त्यास निरनिराळीं रूपातरें प्राप्त होत असतात, ही गोष्ट जितक्या आश्चर्याची व विचाराची आहे, तितकी दुसरी या सृष्टीच्या नित्यक्रमात प्रायः कोणतीच नसेल. या गोष्टीची फोड करण्याकरिता आपण बेडकाचें उदाहरण घेऊ. वसतऋतु लागताच बेडकाचीं अडीं साचलेल्या पाण्याच्या डबक्यात घातलेली असतात. हीं अडीं एका पारदर्शक व चिकट अशा पदार्थाशीं चिकटून त्याचा पुजका जमलेला असतो. त्यातून तीं लहान लहान काळ्या ठिपक्याप्रमाणें दिसतात. ह्या अड्याची जी चोहोंकडे वाटणी व्हावयाची ती नियमित काळीं होते.

काहीं दिवस लोटल्यावर तीं अडीं ज्या पाण्यात घातलेलीं असतील. तेथल्या उष्णतेच्या मानाप्रमाणे तीं अडीं फुटून त्यातून लहान लहान जीव बाहेर निघतात. ह्या अवस्थेत ते आपली उपजीविका उद्भिज्जावर करितात. ह्या अवस्थेत त्यास लाब शेपटे असून तीं पाण्यात फिरण्यासवरण्यास त्याच्या उपयोगी पडतात. हे प्राणी माशासारखे कल्ल्याच्या योगाने श्वासोच्छ्वास करितात. ह्या प्राण्याचे कल्ले झाकलेले नसतात, तर ते त्याच्या डोक्याच्या दोन्हीकडेस पखाप्रमाणे असून पातळ असतात. ही अवस्था पूर्ण झाली म्हणजे पुढे हळूहळू पख व शेपटीं हीं नाहीशीं होत जातात, आणि शेपटी-जवळ दोन लहान लहान पाय फुटतात. नतर काहीं दिवसानीं त्याची वाढ पूर्ण होते, मग त्याच्या तोडाचा आकार बदलून त्याची उद्भिज्जावरची इच्छा नाहीशी होते, शेवटीं पुढचे पाय फुटून त्याची वाढ सपताच शेपटी गळून पडते. मग त्यास बेडकाची अवस्था प्राप्त होऊन ते फुफ्फुसाच्या द्वारे श्वासोच्छ्वास करू लागतात. " गोल्डस्मिथ " नामक एका इंग्लिश ग्रथ-काराचे म्हणणें असे आहे, कीं " या प्राण्यास बेडकाचे स्वरूप प्राप्त झालें कीं, लागलेच त्याच दिवशीं त्याचे भक्ष्यही बदलते. या रूपातराचा आणखी दुसरा असा काहीं चमत्कार आहे. की जे भक्ष्य तो पूर्वीं मोठ्या अधाशीपणाने खात असे, तेंच त्यास ह्या अवस्थेत अगदीं नकोसे होते, आणि ह्या अवस्थातरात जे त्याचे भक्ष्य असते, ते न मिळाले तर तो उपासही काढतो. ह्या प्राण्यास ही अवस्था पूर्ण प्राप्त झाल्यावर तो मासभक्षक होऊन सर्व प्रकारचे कृमि, कीटक खाऊन टाकितो. परतु ते जर पाण्यात त्यास दिसेनातसे झाले, तर आपले जन्मस्थान सोडून भक्ष्याच्या शोधार्थ जमीनीवरही राहाणे त्यास भाग पडते. तेथे तो किडे वगैरे खाऊन आपली उपजीविका करितो. "

## ११. एल्फिन्स्टन् हायस्कूलची इमारत.

धोबीतलावाहून बोरीबदर स्टेशनाकडे जाणारा जो रस्ता, त्याला क्रुक्-शँक्रोड असे नाव आहे. ह्या रस्त्याने जाताना डाव्या हाताकडे जी पहि-लीच इमारत आहे, ती एल्फिन्स्टन् हायस्कूलची इमारत होय. मुबई शहरात ज्या नामाकित इमारती आहेत, त्यापैकी ही एक आहे.

ह्या इमारतींत शिरण्याला रस्त्यावरून सुमारें ५० फूट रुंदीचा एक भव्य दगडी जिना आहे. त्याला ४० पायऱ्या आहेत. ह्या जिन्याच्या

दोन्ही बाजूस इंग्रजी धरतीवर सुरेख बगीचा केला आहे, व त्यात नाना-प्रकारची सुंदर सुंदर फुलझाडे लाविलेली आहेत. ह्या दगडी जिन्याच्या मध्यावर उभे राहून इमारतीकडे नजर केली असता अत्यंत भव्य आणि सुरेख अशा बांधकामाचा देखावा दिसतो. ह्या जिन्याच्या दोन्ही बाजूकडील इमारतीची मांडणी अगदी एकाच नमुन्यावर केलेली आहे.

हा जिना चढून आपण आंत गेलो म्हणजे दुसऱ्या मजल्यावर मधोमध असलेल्या हॉलमध्ये येतो. हॉल सुमारे ७३ फूट लांब व ३६ फूट रुंद आणि ६० फूट उंच आहे. सर्व इमारतीचा अत्यंत भव्य भाग हा हॉल आहे. ह्या हॉलच्या उजव्या बाजूस ८ मोठी दालनें व ५ लहान खोल्या आहेत, तशीच आणि तितकींच दालनें व खोल्या डाव्या बाजूस आहेत. ह्या मजल्यावर सर्व बाजूंनीं साडेनऊ फूट रुंदीचा कॅरिडॉर ( म्हणजे जाण्या-येण्यासाठीं वाट ) आहे.

दुसऱ्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावर जावयास दोन प्रशस्त लाकडी जिने आहेत, आणि दोन वेटोळ्याच्या आकाराचे दगडी जिने आहेत. तिसऱ्या मजल्यावर उजव्या हाताकडे तीन मोठी दालनें आणि एक लहान खोली आहे. तशींच आणि तितकींच दालनें व एक खोली डाव्या हाताकडे आहेत. ह्या मजल्यावरही सभोंवार ९॥ फूट रुंदीची कॅरिडॉर आहे दुसऱ्या मजल्यावर असलेल्या हॉलमधील देखावा तिसऱ्या मजल्यावरून चारी बाजूंनी फार चांगला दिसतो, कारण दुसऱ्या मजल्यावरील हॉल आणि चौथा मजला ह्याच्या-मध्ये तिसऱ्याचा कांहींही भाग आलेला नाहीं.

तिसऱ्या मजल्यावर जावयाला वेटोळ्याच्या आकाराचे दोन दगडी जिने आहेत. ह्या जिन्यानी चढून वर गेले असता चवथा मजला येतो. येथें एकच विस्तीर्ण दालन आहे, व त्याच्या दोन्ही बाजूस प्रशस्त गच्च्या आहेत, त्यावरून सर्व मुंबई शहर व समुद्र यांचा देखावा फार सुंदर दिसतो.

ह्या इमारतीच्या तळमजल्यावर मधोमध मुलांना खेळावयासाठीं जागा केली आहे, आणि उजव्या व डाव्या बाजूस पांच पांच मोठीं दालनें आणि चार चार लहान खोल्या आहेत.

इमारतीच्या पिछाडीस एक प्रशस्त मैदान आहे. तेथे संध्याकाळच्या वेळीं शाळेतील मुलें क्रिकेट, हॉकी, वगैरे खेळ खेळत असतात.

ह्या इमारतीचा पहिला धोंडा नामदार फिट्स् जेराल्ड, मुंबईचे गव्हर्नर-साहेब, ह्याच्या हस्ते ता. ३ मे १८७२ रोजीं बसविण्यात आला, व ता. १ जानेवारी १८७३ रोजीं कामाला सुरवात करण्यात आली. काम चाल-लेले असता रावबहादूर वासुदेव बापूजी कानिटकर असिस्टंट इंजिनियर इन् चार्ज होते. सर्व काम दिसेंबर १८७९ मध्ये पुरें झालें. ह्या इमा-रतीला ५, ६७, ५७६, रुपये खर्च लागला.

शाळेच्या उपयोगाला ही इमारत सर्व प्रकारांनी उत्तम आहे, कारण, ती हवाशीर, प्रकाशयुक्त, प्रशस्त, व सोइस्कर अशी आहे. हिच्या तोडीची हायस्कूलची इमारत सर्व मुंबई इलाख्यात दुसरी नाहीं.

## ६२ "तुम्हीं केलेल्या एकाद्या प्रवासाचें वर्णन करा."

सुमारे दोन वर्षांमागे मी पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात शिकावयाला राहिलो असता, एके दिवशी सकाळी आठ वाजता, मला टपालवाल्या शिपा-याने एक पत्र आणून दिले. त्याच्या वरच्या पत्त्याच्या अक्षराच्या वळणावरून आणि तिकिटाच्या छापावरून मीं ते पत्र माझ्या वडिलाचे व भिवंडीहून आलेले असें तेव्हाच ओळखिले. आधल्याच दिवशी मला वडिलाचे पत्र आलेले असून पुन्हा दुसऱ्याच दिवशीं आणखीही एक पत्र का आले, म्हणून मला थोडेसे आश्चर्य वाटले आणि किंचित भीतीहि वाटली. मी ताबडतोब पत्र फोडून वाचलें. त्यात 'माझी बहीण कृष्णी हिचें लग्न अटकळीच्या अगोदर जमले, मुहूर्त पुढच्याच शुक्रवारचा धरला आहे,' असा मजकूर असून मला वडि-लांनीं 'ताबडतोब भिवंडीस ये,' असें लिहिलें होतें. पूर्वी मी पाच सहा वेळा एकटाच भिवंडीस गेलेला होतों, तेव्हा मला कोणी माणूस सोबतीस असण्याची जरूर नव्हती. मी ताबडतोब आपले कपडे, धोतर, मुकटा, वगैरे सामान एका पाकिटात घातले. नतर आमच्या शाळेचे सुपरिंटेंडेंट-साहेब याच्या नावाचे एक पत्र लिहिलें. त्यात अमुक अमुक कारणासाठीं मला एका आठवड्याची रजा पाहिजे असून समक्ष भेटावयास फुरसत नाही, असा त्यात मजकूर लिहिला. वडिलाचे मला आलेले पत्रही त्याच्या अवलोकनासाठीं ह्याच पत्रासोबत लिफाफ्यात घालून त्याला तिकिट लावून ते जवळच्याच एका टपालाच्या खांबांत टाकिलें. मग मी लागलाच खाणा-वळींत जाऊन जेवून आलो. नतर माझी सामानाची पिशवी घेऊन एका

भाड्याच्या टांग्यात बसून आगगाडीच्या स्टेशनावर गेलो. तेथें कल्याणचें तिकीट विकत घेऊन लागलाच एका डब्यात जाऊन बसलों. सुदैवानें मला एका कोपऱ्यात खिडकीजवळ जागा मिळाली. मी येथें बसल्यावर सुमारें वीस मिनिटांनीं गाडी सुटली

कल्याणच्या स्टेशनात गाडी येताच मी प्लॅटफॉर्मवर आपली पिशवी घेऊन उतरलो, आणि स्टेशनाच्या बाहेर पडून टांग्यात बसून बाहेरच्या वाटेनें तरीवर गेलो. ह्याच वेळीं धक्क्यापासून होडी सुटावयाच्या बेतात होती. तींत मी जाऊन बसताच ती चालू झाली.

ह्याच होडींत गणपतराव रानडे, माझे कल्याणचे मामा, मामी आणि मावसभाऊ आणि मावसबहिणी, हीं माणसें बसलेलीं होतीं. आणि तींही माझेप्रमाणेच कृष्णीच्या लग्नासाठीं भिवडीस जावयास निघालीं होतीं. आम्ही सर्व माणसें पलीकडच्या काठास पोहोंचताच दोन टांग्यात बसून भिवडीस निघालो. मी माझे दोन मावसभाऊ रामा आणि सदाशिव, आणि एक मावसबहीण चिंगी, इतकीं माणसें एका टांग्यात बसलो होतों, आणि मामा, मामी, त्यांची स्वयपाकाची बाई आणि एक शेजारीण बाई, अशीं माणसें दुसऱ्या टांग्यात बसलीं होतीं.

वाटेनें मला जे कांहीं दिसले ते सारेंच माझ्या पूर्ण परिचयाचें होते. १९०३ सालच्या वारेझोडींत मोडून पडलेल्या त्याच तीन गोरखचिंचा, तेच पूल, तीच वळणें, सर्व कांहीं तेंच. हा पूर्व परिचित देखावा पाहून मला फार आनंद झाला. आमच्या टांग्यात आम्ही चारी माणसें मुलें मुलेंच होतो. घरीं गेल्यावर कृष्णीस अमुक अमुक बोलून चिडवावयाचें, तिची अमुक अमुक तऱ्हेनें थट्टा करावयाची वगैरे पोरकट विषयावर आमचें सभाषण चाललेलें होतें.

भिवडी गावात आमचे टांगे शिरल्यावर दहा मिनिटांच्या आत आमचें घर आलें, तेथें आम्ही सर्व माणसें खाली उतरलो. टांगेवाल्याचे सर्व पैसे मामांनीं चुकते करून दिले.

मी घरात शिरून पहातो तो मांडव तयार झालेला होता. घराला रंगसफेता देण्याचें काम अर्धवट झालेलें होतें, पडवीमध्यें दळपिणी गाणीं गात गात गहूं वगैरे दळीत होत्या. आम्ही आलो असें पाहताच माझे वडील

माडीवरून खालीं आले. सर्वांच्या गाठी पडून कांहीं किरकोळ प्रश्नोत्तरे झाल्यावर आम्ही लग्नप्रबंधाचीं कामे करावयास सरसावलो.

## ६ ३. लोहचुंबक व होकायंत्र.

लोखंडास आकर्षण करण्याचा स्वाभाविक धर्म एका खनिज पदार्थांत आहे. त्याला "लोहचुंबक," असें म्हणतात. हा खनिज लोहचुंबक पोलादावर घासल्याने ते पोलादही लोहचुंबकच होते. अशा रीतीनें नैसर्गिक लोहचुंबकापासून कृत्रीम हवे तितके लोहचुंबक तयार करता येतात.

लोहचुंबक नैसर्गिक असो किंवा कृत्रिम असो, त्याच्या अंगीं दोन धर्म असतात. त्यापैकीं लोखंडास ओढण्याचा जो एक धर्म, तो आम्हीं वर सांगितला आहे. त्यांत एक मौजेचा प्रकार आहे तो असा लोहचुंबकास एक लोखंडाचा तुकडा चिकटला म्हणजे, ह्या लोखंडाच्या तुकड्यातही दुसरा लोखंडाचा तुकडा ओढण्याचा धर्म उत्पन्न होतो. ह्या दुसऱ्या तुकड्याला तिसरा तुकडा चिकटतो, नंतर पुन्हा त्याला चवथा तुकडा चिकटतो, अशा रीतीनें आपणाला लोखंडाच्या तुकड्याची एक माळच्या माळ करावयाला येते. मूळचा जो लोहचुंबक, त्याचें सामर्थ्य ज्या मानानें अधिक किंवा कमी असेल, त्या मानानें ही तुकड्याची माळ लांब किंवा आखूड असते. आणि मूळचा लोहचुंबक पहिल्या तुकड्यापासून दूर केला म्हणजे त्या सर्वांच्या अंगचा हा नवीन उत्पन्न झालेला धर्म नाहीसा होतो.

लोहचुंबकाचा दुसरा धर्म असा आहे कीं, तो स्वेच्छेनें फिरेल अशा रीतीनें एकाद्या आधारावर ठेवला, म्हणजे तो नेहमीं दक्षिणोत्तर राहतो. ह्या धर्माचा उपयोग दर्यावर्दी लोकांस दिशा ओळखण्याच्या कामीं फार होतो. दर्यामध्यें जिकडे तिकडे पाणीच असतें, जमीन मुळींच दिसत नाहीं, अशा ठिकाणीं गलबत कोणत्या दिशेकडे चाललें आहे, हे कळण्याला कांहीं साधन नसतें, व तेणेंकरून गलबत इच्छिलेल्या ठिकाणीं नेमकें नेतां येईल, अशी खात्री नसते. दिशांची भुरळ पडली असतां गलबत इष्ट ठिकाणापासून भलतीकडेच झुकेल इतकेंच नव्हे, तर ते खडकावर देखील आपटेल!

दिवसा सूर्यावरून, व रात्रीं चंद्र आणि नक्षत्रें यांचेवरून, दिशा समजू शकतात, परंतु धुकें पडलें असल्यास, किंवा ढगांनीं आकाश आच्छादित झालेलें असल्यास, दिशा समजणें अशक्य होतें. अशा प्रसंगीं दिशा ओळखण्याचें

बिनचूक असें साधन लोहचुंबकच होय. लोहचुंबकाच्या काडीचीं दोन टोकें दक्षिणोत्तर रहात असल्यामुळे दिशा समजणे सोयीचे झाले आहे.

खलाशाची लोहचुंबक किंवा होकायत्र करण्याची कृति अशी आहे. भिंगाच्या झाकणाची एक लहानशी पेटी घेऊन तिच्या मधोमध एक सळई उभी बसविलेली असते, व तिच्या अग्रावर एक लोहचुंबकाची काडी स्वच्छदाने फिरेल अशी ठेविलेली असते, आणि ह्या काडीवर उत्तर, दक्षिण व इतर दिशा, माडलेली एक वाटोळी तबकडी बसविलेली असते. गलबताच्या हालचालीबरोबर होकायत्राच्या पेटीची कशीही हालचाल झाली, तरी दिशा दाखविणाऱ्या तबकडीवरची उत्तर दिशा दाखविणारा बिदु उत्तरेकडेच असतो. दक्षिण दिशा दाखविणारा बिदु दक्षिण दिशेकडेच असतो, व इतर दिशा दाखविणारे बिंदुही त्या त्या दिशेकडेच असतात. त्यामुळे गलबताचा मोर्चा कसाही फिरला, तरी खऱ्या दिशा कोणत्या, हे तबकडीवरून स्पष्टपणे कळते, आणि गलबत ज्या दिशेकडे न्यावयाचे असेल, तिकडे ते बिनचूक नेता येते.

युरोपियन लोकाना लोहचुंबक हा पदार्थ माहीत झाला त्याच्यापूर्वी शेंकडो वर्षे तो चिनी लोकास माहीत होता, व त्याचे गुणधर्म त्याना ठाऊक असून त्याचा ते दर्यावर फिरण्याच्या कामीं उपयोग करून घेत असत.

### ६४. खडू.

खडू हा पदार्थ खाणीतून निघतो, म्हणून त्याला खनिज पदार्थ असें म्हणतात. सोनें, रुपे, तांबे, कोळसा, वगैरे पदार्थही खाणींत सापडतात. म्हणून त्याच्याच कोटीमध्ये खडूचीही गणना करण्यात येते. इग्लडात दक्षिण-भागीं खडू विपुल आढळतो.

खडूचा रग पाढरा असतो. खडू फार सच्छिद्र असतो, म्हणजे परमाणूमध्यें असख्य बारीक बारीक छिद्रें किंवा भोकें असतात. अर्थात् ही जागा पोकळ असते. खडू जेव्हा अगदीं कोरडा असतो, तेव्हा त्याच्या ह्या छिद्रामध्ये त्याच्या आकारमानाच्या तृतीयांशाइतके पाणी मुरू शकते. जमिनीमध्यें जेथे खडूचे थर असतात, तेथे त्याच्या सच्छिद्रतेमुळे पुष्कळ पाणी साठून राहिलेले असते. ह्या थराच्यावर विहीर खणली, तर तिला ह्या पाण्याचे जोरदार झरे लागतात. लडन शहरात अशा प्रकारच्या पुष्कळ विहिरी आहेत.

शेतकीच्या कामाला योग्य अशी जमीन करण्याकडे खडूचा उपयोग होतो. जी जमीन पाणथळ किंवा चिखलट असते, तिच्यात खडूचीं डिखळें पसरून दिल्यानें जमीन चागली होते. हीं खडूचीं डिखळें सूर्याच्या उन्हानें व रात्रीच्या थडीनें फुटून त्याची बारीक पूड होते, व तिचें आणि मातीचें जें मिश्रण होते, तेणेंकरून तेथील ओलावा कमी होऊन शेत जास्ती सुपीक होते.

खडू भट्टींत घालून त्याला उष्णता दिली, तरी सोनें, रुपें, वगैरेप्रमाणें वितळत नाहीं, तर तो भारी ठिसूळ होतो त्याची भुकटी करून वाळू आणि पाणी याच्याशी तिचें मिश्रण केलें असता उत्तम सनल्याचा चुना तयार होतो.

खडूचा आणखीही एक उपयोग आहे. तो अगदीं पाढरा सफेत असल्याकारणानें फळ्यावर लिहिण्याला फार सोयीचा पडतो. फळ्याचा रग काळा असल्यामुळे त्याचेवर खडूच्या पाढऱ्या रेघा स्पष्ट आणि ठळक दिसतात. शिवाय खडूनें फळ्यावर लिहिण्याला श्रमही लागत नाहींत, व रेघ फार बारीक काढता येते. तसेंच एकदा काही लिहिलें, म्हणजे तें फडक्यानें अगदीं अनायासें साफ पुसून टाकिता येतें, आणि तेणेंकरून फळ्यावर पुन्हा दुसरें काही तरी लिहिता येतें त्या विशेष गुणावरून शाळा-मध्ये खडूचा फार उपयोग होतो.

## ६५. बडोद्यास भरलेलें मराठी ग्रथकारांचें समेलन व साहित्यपरिषद.

इ० सन १९०९ सालच्या आक्टोबर महिन्याच्या २३, २४, आणि २५, ह्या तारखाला बडोद्यास भरलेलें मराठी ग्रथकाराचें समेलन व साहित्य-परिषद हीं पहावयासाठीं मीं मुद्दाम त्या शहरीं गेलों होतों. पहिले दोन दिवशींचें समेलन व तिसऱ्या दिवशींची परिषद, ही दोन्हीं एकाच ठिकाणीं भरलीं होतीं. त्या ठिकाणचा जो देखावा माझ्या नजरेस पडला, त्याचें वर्णन मी ह्या निबधात देतों.

बडोदे शहराच्या मध्यावर न्यायमदिराची इमारत आहे. हिचा मुख्य भाग म्हणजे एक उच्च, विस्तीर्ण, आणि सुदर, असें दालन आहे. ह्या दालनाला लागूनच उजव्या आणि डाव्या बाजूस मोठमोठालीं पटागणें असून त्याच्या भोवतीं दुमजली बाधकाम आहे. ह्या दोन पटागणापैकीं जे

उजव्या हाताकडचे आहे, त्यात मराठी ग्रंथकाराचें समेलन व साहित्यपरिषद हीं भरलीं होतीं.

हे पटागण सुमारे १५० फूट लांब, आणि ८० फूट रुंद आहे. त्याच्या एका कडेला सुमारे ३॥ फूट उंचीचे एक तख्त रचिले होते. तें अर्धवर्तुळाकृति असून त्याची पुढची बाजू म्हणजे व्यास ६० फूट होती ह्या तख्तावर अध्यक्षासाठीं एक सुंदर टेबल व खुर्ची असून त्याच्या दोन्ही बाजूस सुमारे पन्नास खुर्च्या व्यवस्थितपणे ठेविलेल्या होत्या. ह्या तख्तावर पांढऱ्या स्वच्छ चादरी आंथरलेल्या होत्या. वरच्या बाजूस सुंदर रेशमी छत होते, व तख्ताच्या कांठाला म्हणजे अर्धवर्तुळाकार परिघाच्या घेरावर छताच्या खालीं रेशमी वस्त्राच्या महिरपी करून त्याच्याखालीं झालरी लोंबत सोडल्या होत्या, व तख्ताच्या सभोंवार सुंदर फुलांच्या कुंड्या ठेविलेल्या होत्या.

ह्या अर्धवर्तुळाकृति तख्तावर अध्यक्षाची खुर्ची मध्यभागीं असून त्यांच्या दोन बाजूस म्हैसूर, सांगलीं, धार, उज्जनी, ग्वाल्हेर, वगैरे संस्थानचे प्रतिनिधि किंवा आमंत्रिलेले बडे बडे गृहस्थ, तसेंच समेलन व परिषद ह्या सभांचे ठरावावर बोलणारे किंवा ठरावाचे समर्थन करणारे लोक, व कार्यकारी मंडळी, बडोद्याचे श्रीमन्महाराज सयाजीराव व त्यांचे चिरंजीव, तसेंच गायकवाडच्या राजघराण्यातील पुरुष श्रीमंत संपतराव वगैरे, व बडोदे संस्थानच्या वेगवेगळ्या खात्याचे मुख्य अधिकारी, हे गृहस्थ बसत असत.

ह्या तख्ताच्या पुढच्या जागेत तख्ताला अगदीं लागून वर्तमानपत्राच्या बातमीदारासाठीं जागा केलेली होती, आणि पटांगणांत मांडव घालून सुमारे १००० खुर्च्या ४० रांगामध्ये मांडलेल्या होत्या. त्या रांगांपैकीं पहिल्या वीस रांगा मराठी ग्रंथकारासाठीं होत्या, व बाकीच्या रांगा सामान्य प्रेक्षकासाठीं मांडलेल्या होत्या.

ह्या पटांगणाच्या एका बाजूस, ( म्हणजे तख्तावर उभे राहिले असतां उजव्या हाताकडे ), जी पडवी आहे, तिच्यांत चिकाच्या पडद्याच्या आंत सुमारे २५० स्त्रियांची बसण्याची सोय केली होती.

पटांगणातील अर्धवर्तुळाकृति तख्त व त्याच्या पुढचा मांडव यांचा देखावा अत्यंत भव्य व सुंदर होता तसा देखावा मीं पूर्वीं कधीं पाहिला नव्हता या ठिकाणीं तीन दिवस सकाळीं व दुपारीं सुमारे दीड हजार मंडळी जमत असत

तरी येथें यत्किंचितही गलबला होत नव्हता. त्यामुळें प्रत्येक वक्त्याचा प्रत्येक शब्द अगदीं लांबच्या रांगेपर्यंत सहज ऐकू जात होता. ह्या समारंभाचे प्रसंगीं बडोदेंशहरच्या रहिवाशांनीं घेतलेली तसदी व केलेली व्यवस्था अत्यंत प्रशंसनीय होती.

## ३६. रेशमाचा किडा आणि त्याच्या तीन अवस्था.

एक प्रकारचें पाखरूं असतें. त्याची मादी उन्हाळ्यांत तुतीच्या पानावर ३०० पासून ७०० पर्यंत एका खेपेस अंडीं घालते. हीं अंडीं सूर्याच्या उष्णतेनें आठ दहा दिवसांत परिपक्क होऊन त्यांपैकीं प्रत्येकांतून एक एक आळी बाहेर पडते. ह्या आळ्या सुतासारख्या बारीक असून पाव इंच लांब असतात. त्यांना तुतीचीं पानें फार आवडतात, तीं त्या अति अधाशीपणानें खातात. सुमारें एक दोन महिने हीं पानें खाऊन एक एक आळी इतकी माजते, कीं ती दोन दोन इंच लांब होते, व त्या मानानें तिची जाडीही वाढते, आणि ती सुरवंटाप्रमाणें दिसूं लागते. आळीला ही सुरवंटाची स्थिति येईपर्यंत तिच्या अंगावरील त्वचा, म्हणजे कात, चार वेळ गळून पडते. ह्या पूर्ण वाढीच्या स्थितींत तिच्या शरीराला १२ मणके व सोळा पाय असतात. ही आळीची एक स्थिति झाली. ह्यानंतर ती आळी कांहीं खाईनाशी आणि वाढेनाशी होते, आणि मग तिचें दुसऱ्या अवस्थेंत संक्रमण होतें. ती आपल्या अंगाभोंवतीं आपल्याच अंगांतून काढलेला तंतु वेष्टून घेऊं लागते. तिच्या तोंडाच्या खालच्या ओंठाला दोन बारीक भोंकें असतात, त्यांतून दोन तंतु निघतात. हे तंतु बाहेर पडतांना जरी पृथक् असतात, तरी त्या आळीच्या तोंडांतून एक प्रकारचा पातळ पदार्थ निघतो त्याच्या योगानें ते जुळून त्या दोहोंचा एक तंतु बनतो. व त्याला हवा लागून तो चिवट आणि बळकट होतो. हा तंतु आळी आपल्या अंगाभोंवतीं हजारों वेळा गुंडाळून घेऊन आपल्याला रहावयासाठीं एक लांबोड्या गोटीच्या आकाराचें घर पांच सहा दिवसांत तयार करते, त्याला "कोश" असें म्हणतात. हा कोश सुमारें दोन इंच लांब व एक किंवा दीड इंच जाड असून पोकळ असतो, आणि ह्या पोकळींत आळी असते. हा आळीचा एक प्रकारचा कारागृहवास होय. बहुतेक आळ्या ह्या कोशांतच मरण पावतात. परंतु कित्येकांचें रूपांतर होतें, म्हणजे, त्यांना पंख फुटून

त्याना पाखरांचें रूप प्राप्त होतें, आळ्यांचीं पाखरें झालीं, म्हणजे कोशावस्था समाप्त होते. तीं पाखरें कोशातून वाट पाडून बाहेर निघतात आणि हवेत उडून जातात. आणि हीं पाखराची जी स्थिति, ती त्या प्राण्याची तिसरी अवस्था.

कोशातून पाखरें निघून हवेमध्ये उडूं लागतात, आणि त्यांचा सर्व जीवनक्रम इतर पाखराप्रमाणे चालतो. ह्या पाखराच्या माद्या अडीं घालतात. त्यातून आळ्या निघतात, त्या आपणांस कोश तयार करतात, त्यातून पुन्हा पाखरें निघतात, असा क्रम सतत चाललेला असतो.

वरील कलमात सांगितलेला जो कोश, तो बारीक ततूचा बनलेला असतो कोश ऊन पाण्यात घातला, म्हणजे हा ततु सुलभ रीतीनें उलगडता येतो. हा जो ततु, तेंच रेशीम, एका कोशापासून सुमारे ३०० यार्ड लांब रेशीम निघते, आणि सुमारे १२ कोशापासून एक रत्तल रेशीम निघतें. ज्या आळीच्या अगातून रेशमाचा धागा निघतो तिला " रेशमाचा किडा" म्हणतात, आणि जें पाखरू अडीं घाल्ते, त्याला "रेशीमकिड्याचें पाखरू" असें म्हणतात.

## ६७ विमान आणि आकाशयान.

आकाशामधून हवेवर तरगत जाण्याचे जे वाहन, त्याला " विमान " असें म्हणतात. धूर, वाफ, वगैरे पदार्थ वातावरणातील हवेपेक्षा हलकें असतात, म्हणून ते हवेमध्ये तरगतात, व हवेतून वरवर जातात. ह्या तत्त्वाचें मनन करून माउट गोल्फियर् यानें इ. स. १७८३ ह्या वर्षी आकाशात उडणारे विमान तयार केले. त्याने एक हलकी पिशवी घेऊन तींत तापलेली हवा भरली. ही हवा साध्या हवेपेक्षा हलकी असल्याकारणानें गोल्फियरचें विमान आकाशात उच्च उच्च चढूं लागलें. हे विमान अर्थात अगदीं ओबडधोबड होतें. परतु त्याच्या वेळेपासून विमानात उत्तरोत्तर सुधारणा होत जाऊन त्याना हल्लींच्या आकाशयानाचे स्वरूप प्राप्त झालें आहे. पाहिल्या पाहिल्याने जीं विमाने तयार करण्यात आलीं, त्याच्या योगानें उच्च उच्च मात्र जाता येत असे. परतु अलीकडच्या आकाशयनामध्ये आपल्या इच्छेस येईल तितक्या उचीवर आणि इच्छेस येईल त्या दिशेने आणि वेगानें आकाशात प्रवास करण्याच्या तजविजी केलेल्या असल्यामुळे ही आकाशयानें बरींच उपयोगीं पडण्याजोगी असतात.

आकाशयानाचे दोन प्रकार असतात. पहिल्या प्रकारात हैड्रोजन् ग्यास्ने भरलेल्या लहान लहान पिशव्या एका मोठ्या पिशवीत घातलेल्या असतात. ही मोठी पिशवी हवेमध्ये तरगत वर जाते, तेव्हा तिला जोडलेल्या बैठकीवर बसलेली माणसेंही वर जातात. ह्या प्रकारच्या आकाशयानास इच्छिलेल्या दिशेने जाण्यासाठीं सुकाणू असते, व त्याला ढकलण्याला पखे असतात. पख्याच्या योगाने पाणी कापून आगबोट ज्या तत्त्वावर पाण्यात चालते, त्याच तत्त्वावर हीं आकाशयाने वातावरणातील हवा कापून पुढे सरकतात. असल्याच प्रकारच्या आकाशयानाने काउट झेपेलिन् याने थोड्याच दिवसामागे एक हजार मैलांचा प्रवास ४८ तासात केला.

दुसऱ्या प्रकारच्या आकाशयानात हैड्रोजनचा उपयोग केलेला नसतो. ह्या यानाना जोडलेल्या पख्याच्या योगाने हवा कापली जाऊन तीं हवेमध्ये पुढें सरकतात. हे पखे पेट्रोलियमनें, ( म्हणजे रॉक् आइल्ने ), किंवा वाफेनें फिरतात. ह्या प्रकारचीं आकाशयाने प्रथम काही अतरापर्यंत जमिनीवर चाकावरून चालवावी लागतात, मग त्याच्या अगीं पुढे सरकण्याची गति येताच तीं जमिनीचा आधार सोडून सुकाणूने लाविलेल्या दिशेने आकाशातील हवेमध्ये चढत चढत जातात. मग त्याना सुकाणू वगैरेच्या योगानें इष्ट दिशा देता येते. ह्या यानाना पक्ष्याच्या पखाप्रमाणे दोन बाजूस समतोल व समातर असे एकावर एक पख केलेले असतात. त्याची एक जोडी, किंवा दोन जोड्या असतात. यानाच्या मध्यभागीं एक किंवा अधिक माणसें बसलेलीं असतात.

फ्रान्स आणि जर्मनी ह्या दोन राष्ट्रात युद्ध चाललेले असता इ. स. १८७० ह्या साली जर्मन लोकानीं प्यारिसला वेढा दिला, व आतील माणसाना बाहेर व बाहेरच्या माणसास आत जाणे अशक्य झाले. तेव्हां प्यारिसमधील फ्रेंच लोक विमानानी आकाशात उच जाऊन शत्रूच्या फौजेची टेहेळणी करीत असत. विमानाच्या साहाय्याने फ्रेंच लोकानीं सभोवतालच्या मुलखातील लोकाशीं दळणवळण चालू ठेवले. अशा रीतीने फ्रेंच लोकाचा युद्धाच्या बिकट प्रसगीं निभाव लागला. नुकत्याच झालेल्या रूसोजपानीज युद्धामध्ये सुद्धा उभयपक्षाच्या लोकानी आकाशयानाचा पुष्कळ उपयोग करून घेतला.

आकाशयानात हळू हळू सुधारणा होत चालल्या आहेत, व पुढे त्या अशाच रीतीने होत चालल्यास आपले पुत्रपौत्र या यानाचा उपयोग आगगाड्या, आगबोटी वगैरेसारखा करू लागतील. त्याच्यासाठीं घराच्या माथ्यांवर उतरण्याचढण्यासाठीं धक्के तयार करतील. वातावरणामध्ये आकाशयानासाठीं तबेले, स्टेशने, वगैरे बाधण्यात येतील. आगगाड्या, आगबोटी, वगैरे वाहने जशी नेमलेल्या वेळीं सुटतात तशीं हीं आकाशयानेंही सुटू लागतील.

हल्लींच्या काळीं आगगाड्या, आगबोटी, मोटार गाड्या, ट्रामच्या विजेच्या गाड्या वगैरे वाहने आपल्या परिचयाचीं झाल्यामुळे त्यांचें आपणास कांहीं आश्चर्य वाटेनासें झाले आहे, त्याचप्रमाणे पुढच्या काळीं आकाशयानाचेंही आश्चर्य किंवा कौतुक लोकास वाटेनासे होईल ह्यात शंका नाहीं

## ६८ ज्वालामुखी

पृथ्वीच्या गर्भामध्ये अतिशय उष्णता आहे, इतकेच नव्हे तर कित्येक ठिकाणीं उकळ्या फुटत असलेले देखील द्रव्य असणे संभवनीय आहे. ह्या उष्ण द्रव्यापर्यंत पाण्याचा प्रवेश झाला, म्हणजे त्या पाण्याची वाफ होते, आणि वाफेच्या अंगीं अमर्याद प्रसरणशीलता असल्याकारणाने ती वाफ आकारमानाने वाढते. आणि आपल्यापुढे असलेल्या उष्ण द्रव्यास पुढे सारते. ह्या द्रव्यावर मागून वाफेचा दाब झाल्यामुळे ते वाट फुटेल तिकडून वाहत जाते, आणि शेवटीं पृथ्वीचें कवच जेथे पातळ असून ढिसूळ असे असते, तेथे द्वार पाडून बाहेर पडते. हे उकळ्या फुटत असलेले द्रव्य ह्या द्वाराच्या सर्व बाजूस वाहात जाऊन जमिनीवर पसरते तेथ ते वातावरणातील हवेच्या योगाने थंड होऊन घट्ट होते. त्याच्यावर मागून येणाऱ्या पातळ द्रव्याचे आणखी थर बसतात, तेही घट्ट होऊन पहिल्या थरास चिकटतात. अशा रीतीने ह्या द्वाराच्या भोवतीं एक डोंगर वाढतो. ह्या डोंगराच्या मध्यभागीं पृथ्वीच्या पोटातून बाहेर पडणाऱ्या द्रव्यासाठीं नळीच्या आकाराची वाट राहते, अशा रीतीने बनलेला जो डोंगर, त्याला ''ज्वालामुखी,'' असे म्हणतात.

ज्वालामुखीचा उद्रेक कधीं कधी एकाएकीं होतो, व कधीं कधीं उद्रेकाच्या

अगोदर मेघगर्जनेप्रमाणे कर्कश ध्वनि ऐकू येतात, पृथ्वीचा पृष्ठभाग थरथरतो आसपासच्या पाण्याच्या झऱ्याच्या प्रवाहात बदल होतात, आणि जवळच्या समुद्रात भयकर लाटा उसळतात. यानतर पाण्याची वाफ, नानाप्रकारचे वायु, राख, वगैरे पदार्थ ज्वालामुखीच्या तोंडातून जोराने बाहेर पडून आकाशात उच उडू लागतात. नतर उष्णतेने वितळलेल्या धोंड्याचा रस बाहेर पडून ज्वालामुखीच्या तोंडातून आजूबाजूस वाहू लागतो. असा प्रकार पुष्कळ महिनेपर्यंत देखील चालू राहतो. ज्वालामुखीचा उद्रेक होत असता आकाशात मेघगर्जना होत असतात, विजा चमकत असतात, आणि पाऊस पडत असतो.

हल्ली पृथ्वीवर सुमारे सव्वातीनशें ज्वालामुखी पर्वत आहेत. त्यापैकीं दोनशाहून जास्त पॅसिफिक व हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर आहेत. ज्वालामुखींची पृथ्वीच्या पाठीवर माडणी कोणत्या पद्धतीने झाली आहे, ह्या सबधाने आपण विचार केला असता आपणास असे आढळेल, कीं सर्व ज्वालामुखींचे आपणास दोन समुदाय करता येतील. पहिल्या समुदायातील ज्वालामुखी एका विशिष्ट रेषेत आहेत ही रेषा दक्षिण अमेरिकेचें खालचें टोक केप् हॉर्न् येथें सुरू होऊन आंडिज् पर्वताच्या रांगेवरून व रॉकी माउटन्सवरून आलास्का नावाच्या द्वीपकल्पाकडे जाते, व तेथून ती अल्यूशियन् बेटातून कामश्चाट्काकडे जाते. तेथून क्युराईल् बेटात. व तेथून पुढे ती जपानी बेटात जाते. नतर ती फोर्मोसा बेटावरून येऊन फिलिपाइन् बेटात शिरते. येथे त्या रेषेचा एक लहानसा फाटा पश्चिमेकडे ज्यान्हा आणि सुमात्रा ाकडे जातो, व दुसरा म्हणजे मुख्य फाटा सेलिबीस, न्यूगिनी, यावरून न्यू झीलडला जाऊन नतर पुढे दक्षिण ध्रुवाच्या जवळ मौंट इरीबर आणि मौंट् टेरपर्यंत गेला आहे. ज्वालामुखींच्या दुसऱ्या समुदायाचे केंद्र अझोर्स् बेटात असून तेथून वर्तुळाच्या त्रिज्याप्रमाणे त्याच्या चार बाजूस रेषा फुटल्या आहेत. उत्तरगामिनी रेषा, अझोर्सपासून स्काट्लड्, फेरी बेटें व आईस्लड् यावरून जॉन मेयेन् बेटाकडे गेली आहे. पूर्वगामिनी रेषा भूमध्यसमुद्रातून काकेशस् पर्वतापर्यंत गेली आहे. दाक्षिणगामिनी रेषा कानरी बेटातून केप् व्हर्ड् बेटातून कामेरून पर्वताकडे गेली आहे, आणि चवथी म्हणजे पश्चिमगामिनी रेषा वेस्ट् इडीज् बेटाकडे गेली आहे.

ज्वालामुखींच्या उद्रेकाच्या कालावरून त्याचे तीन प्रकार केले आहेत.

ज्या ज्वालामुखींचे उद्रेक अनेक वेळा पाहण्यात आले आहेत, त्याना चालू ज्वालामुखी म्हणतात, व ते पहिल्या वर्गात येतात, ज्याचा उद्रेक झालेला एकदाच पाहण्यांत आला आहे, त्याना निद्रित ज्वालामुखी म्हणतात, हे दुसऱ्या वर्गात येतात, आणि ज्या ज्वालामुखींतून उद्रेक झालेला कधीच पाहण्यात आला नाहीं, परतु पूर्वी केव्हा तरी उद्रेक झाला असला पाहिजे असा तर्क करता येतो, ते विझलेले ज्वालामुखी होत. ते तिसऱ्या वर्गात येतात.

## ६९ इ० स० १९०७ सालच्या जानेवारी महिन्यामधील सूर्यग्रहण.

सोमवार तारीख १४ जानेवारी १९०७ रोजीं जे सूर्यग्रहण झाले, त्याचे स्मरण माझ्या हृदयातून कधींही बुझावयाचे नाहीं. कारण, हा दिवस मला अतिशय मौजेचा आणि महत्त्वाचा असा वाटला.

ज्योतिषशास्त्राचे मला जे कांही थोडेसे ज्ञान होते, त्यावरून मला इतके ठाऊक होते, कीं पृथ्वी आणि सूर्य याच्या दरम्यान चद्र आला असता सूर्याला ग्रहण लागते, आणि सूर्याचे पुढें चद्र आला असता सूर्याच्या बिंबाचे दोन भाग होतात. एक प्रकाशयुक्त व दुसरा चद्राने झाकलेला. हे ग्रहणासबधाचे ज्ञान मला पुस्तकावरून प्राप्त झालेले, परतु प्रत्यक्ष सूर्यग्रहण मीं कधीं पाहिले नव्हते, म्हणून माझें पुस्तकी ज्ञान प्रत्यक्ष अवलोकनाने खरें करून पाहण्याची मला फार दिवसापासून उत्कठा लागलेली होती. म्हणून जानेवारीच्या १४ व्या तारखेस मीं काजळ लाविलेल्या भिगातून सूर्यबिंब लक्ष्यपूर्वक पाहिले तेव्हा पुस्तकात वर्णिल्याप्रमाणेच खरोखरी निसर्गातील देखावा आहे, हे पाहून मला अतिशय आनद झाला.

वर दिल्याप्रमाणे सूर्यबिंबाचे अवलोकन सुमारे पाऊण तास केल्यानतर मी पाच मित्रासह समुद्रस्नानास गेलो. कारण, ह्या दिवशीं समुद्रस्नान फार पुण्यकारक असे होते. ग्रहण, अमावास्या, आणि सोमवार, ह्या तिन्हीं-पैकीं कोणत्याही एका पर्वणीस केलेले समुद्रस्नान पुण्यकारक असते, ह्या तिन्ही पर्वण्या एका दिवशी आल्या असता समुद्रस्नान विशेष पुण्यकारक होते. ह्या तिन्हा पर्वण्याचा सयोग सदर सोमवारीं घडून आल्यामुळे हजारों हिंदु लोक बॅकबेवर स्नानासाठीं जमा झाले होते. इतका मोठा जमाव मीं पूर्वी कधींही पाहिलेला नव्हता. सबध चर्नी रोड्, क्वीन्स् रोड्, आणि

कुलाब्याच्या दांडीपासून तो वाळकेश्वराच्या पायथ्यापर्यंत सर्व समुद्रकाठ, हे प्रदेश स्त्रीपुरुषांनीं गजबजून गेले होते. येथे इतका कलकलाट होता, की जवळच्या माणसाशीं बोलावयाचें झालें तरी मोठ्याने ओरडावें लागत होते!

समुद्रावर गुजराथी भट ताम्हनामध्ये पूजेचें साहित्य घालून स्नान करूं इच्छिणाराना मत्र सागत होते. हा देखावा फार भव्य आणि धर्मश्रद्धा जागृत करणारा असा होता

स्नाने झाल्यानतर आम्ही सर्वजण आपापल्या घराकडे परत यावयास निघालो.

हा दिवस माझ्या आयुष्यातील चिरस्मरणीय दिवसापैकी एक होय असे मी समजतो

## ७० देवमासा

देवमासा हा जगातील अत्यत मोठा प्राणी आहे. याची लाबी ७० फूट असून शरीराचा घेर ४० फूट असतो सर्व शरीराच्या तिसऱ्या हिश्शा-एवढें त्याचे डोके असते. शेपूट ६ फूट लाब, व पूर्ण पसरले असता २० फूट रुंद असतें. जबडा पूर्ण उघडा असता तो १६ फूट लाब, ७ फूट रुद, आणि १२ फूट उच असतो. जबड्यातील हाडे, ( जनावराच्या दाताच्या जागचीं ), सुमारे ७०० किवा ८०० असून, सुमारे १२ फूट लाब असतात. ह्या हाडाचा घेर बुडाशीं एक फूट असून अग्राशीं त्याना फणी-प्रमाणे दात असतात देवमाशाच्या अगावरचे कातडे फारच जाडी असते. त्याला तीन पदर असून आतला पदर बाहेरच्या दोन पदरापेक्षा फारच जाडी असतो त्यात तेल खूप साठलेले असते.

देवमासा हा जरी पाण्यात राहणारा प्राणी आहे, तरी त्याच्या शरीराची रचना आणि जीवनव्यापार, हीं साधारण माशाच्याहून वेगळ्या तऱ्हेचीं असतात. कारण देवमाशाची उत्पत्ति घोडा, मनुष्य, हत्ती, वगैरेंच्या प्रमाणे जरायु-पासून होते, साधारण माशाची उत्पत्ति कावळा, चिमणी, साप, वगैरेंच्या प्रमाणें अड्यापासून होते. देवमाशाची श्वसनक्रिया फुप्फुसाच्या द्वारें चालते, साधारण माशाची कल्ल्याच्या द्वारे चालते, म्हणून देवमाशाला वारवार उघड्या हवेत नाक काढावे लागते. साधारण माशाला पाण्यात राहूनच श्वासोच्छ्वास करता येतो. देवमाशाचे रक्त उष्ण असतें, साधारण माशाचे

रक्त थड असते. देवमासा आणि साधारण मासा ह्याच्यातील हे मुख्य भेद झाले, बारीकसारीक भेद दुसरे पुष्कळ आहेत.

देवमाशाचे शरीर फारच जाडी असते, ह्यामुळे त्याला ते हवे तसें वळविता किंवा मुरडता येत नाही. त्याचे नाक त्याच्या डोक्यावर असते, आणि तो उसळत उसळत बाहेर पडत असता ह्या नाकातून पाणी अत्यंत जोराने उंच उडते, आणि त्याला प्रचंड कारंजाचे स्वरूप येते. त्याचा घसा त्याच्या अवाढव्य शरीराच्या मानाने फारच लहान असतो. म्हणून त्याची उपजीविका अगदीं लहान लहान माशावर चालते. त्याला खाण्याची आवश्यकता वाटली, म्हणजे तो आपला जबडा पूर्ण उघडून पाण्यातून जोराने पुढे सरकत जातो, तेणेकरून पाण्याबरोबर बारीक बारीक मासे त्याच्या तोंडात येतात. मग जबडा मिटून तो दाताच्या फटींतून पाणी बाहेर सोडून देतो, तेव्हा अर्थात् पाण्याबरोबर आलेले मासे मागे अडकून राहतात. व ते तो हळूहळू एकामागून एक गिळून टाकतो.

देवमाशाला पकडण्याचा प्रकार पुढे दिल्याप्रमाणे असतो.

उत्तर ध्रुवाकडील समुद्रामधील देवमाशाना पकडण्याच्या कामाला मे महिन्यात सुरवात होऊन ते काम ऑगस्ट महिना सरेपर्यंत चालत असतें. देवमासे पकडणाऱ्या प्रत्येक टोळीचें एक मोठें गलबत व सहा होड्या असतात. प्रत्येक होडीवर एक एक भालेवाला असतो. देवमासा दिसल्याबरोबर होडीवरचा भालेवाला त्याच्या अंगात आपला भाला खुपसतो. हें काम मोठें धोक्याचे असून ते फार कौशल्याने करावे लागते, आणि तेही तो देवमासा आपल्या शेपटीचा तडाखा पाण्यावर मारावयाच्या अगोदर करावे लागते. भाला त्याच्या अंगात खुपसल्याबरोबर तो वेदनेने समुद्रात बुडी मारतो. अर्थात त्याच्या अंगात खुपसलेला भालाही त्याच्याबरोबर जातो. ह्या भाल्याच्या दुसऱ्या टोकाला दोर बांधलेला असतो. हा दोर एका रहाटाभोवतीं गुंडाळलेला असल्यामुळे देवमासा जितका लांब जाईल, तितक्या लांबीचा दोर रहाटावरून भराभरा उलगडत जातो. हे होत असतां बाकीच्या पांच होड्या, ( ज्या समुद्रात इकडे तिकडे पसरलेल्या असतात त्या ), ह्या होडीच्या मदतीला येतात. कांहीं वेळाने देवमासा श्वासोच्छ्वास करण्यासाठीं समुद्राच्या पृष्ठभागाला येतो, आणि तो आल्याबरोबर पुन्हा आणखी एक

मागितले त्यावेळी श्री चक्रधरानी लोकाकडे बोट दाखविले ह्या उष्टया विडयाच्या प्रसादासबधाने गतवर्षी चित्रमयजगत् या मासिकाच्या एका अकात (मे १९४९) प गोविदराज दयाळ-राज महानुभाव यानी प्रो न र फाटक याच्या विधानावर जी टीका केली ती समाधानकारक वाटत नाही या उष्टया प्रसादासबधाने लीळाचरित्रात अनेक ठिकाणी उल्लेख आलेले आहेत भाविक लोकाची साधु सत्पुरुषावर फार श्रद्धा असे सत्पु-रुषाच्या कृपा प्रसादामुळे आपणाला मुक्ति मिळते अशी त्याची समजूत असे त्यामुळे ते श्री चक्रधरासारख्या महात्म्याचा उष्टा प्रसाद मागत त्याच्या या कृत्यामुळे समाजात टीकाहि होई नागाबिकेने चक्रधराचा उष्टा प्रसाद घेतल्यामुळे हसराजु आणि पाडे तिची निदा करू लागले 'हे काई जाले या नागुबाईसी चळली काइ नेणो कोण आणिला असे तेयाचे उसीटे खाती असे पायवणी पीती असे' श्री चक्रधर स्वत उष्टा प्रसाद देत नसत एका बाईने 'परपुरुषाचे मी उष्टे खात नाही' असे म्हणून स्वामीचा उष्टा विडा घेतला नाही त्यावेळी त्यानी केळयाचा प्रसाद तिला दिला या बाबतीत भाविक लोकानी जरी त्याना आग्रह केला असला तरीपण त्यानी उपदेश करून त्याचा निषेध केला असता तर ही चाल बद झाली असती गोदावरीच्या काठी पैठण, पुरुषोत्तमपुरीसारखी वसलेली गावे अग्रहारे असल्यामुळे विद्वान आणि कर्मठ ब्राम्हणाची वस्ती अशा अनेक गावातून जास्त होती ज्यावेळी श्री चकधराचे वास्तव्य एखाद्या गावात होई त्या-वेळी या धार्मिक आचार विचाराबाबत आपल्या शिष्यानी जास्त दक्षता घ्यावी असा त्याचा कटाक्ष असे एकदा त्याचे वास्तव्य गोदावरीच्या काठी एका गावी होते त्याचे भक्त 'गगेला गेले

# वृत्तान्तात्मक निबंध.

## ७१. रामायणाची गोष्ट.

प्राचीन काळीं अयोध्यानामक नगरींत दशरथ ह्या नावाचा एक राजा राज्य करीत असे. त्याला तीन बायका होत्या. ह्या तीन बायकांत कौसल्या ही पट्टाभिषिक्त राणी होती, कैकेयी ही त्याची आवडती राणी होती, आणि सुमित्रा ही साधी राणी होती. कौसल्येच्या पुत्राचें नांव राम असें होतें, कैकेयीच्या पुत्राचें नांव भरत असें होतें, व सुमित्रेचे दोन पुत्र असून त्यांचीं नांवें लक्ष्मण आणि शत्रुघ्न अशीं होतीं लक्ष्मणाचा ओढा रामाकडे, व शत्रुघ्नाचा ओढा भरताकडे असे.

हे चारी पुत्र क्षत्रियाच्या मुलांना योग्य अशा सर्व विद्यांत पारंगत होऊन यौवनदशेंत आले, तेव्हां विश्वामित्र ऋषीनें दशरथ राजापासून आपल्या यज्ञाच्या संरक्षणासाठीं राम आणि लक्ष्मण ह्यांना आपल्या तपोवनामध्यें नेलें. मार्गामध्यें ह्या कुमारांनीं ताटकानामक एका दुष्ट राक्षसीचा वध केला. तपोवनांत विश्वामित्राचा यज्ञ चालला असतां, यज्ञाला उपद्रव करावयाला आलेल्या शेंकडों राक्षसांना ह्या बाल वीरांनीं ठार मारलें. यज्ञाची समाप्ति झाल्यावर हा ऋषि आणि हे दोन कुमार मिथिलेचा राजा जो जनक त्याचा यज्ञ पहावयास गेले. यज्ञ आटोपल्यावर सीतास्वयंवराचा समारंभ झाला, त्यांत रामानें शिवाच्या धनुष्याचा भंग केला, तेव्हां सीतेनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. हा लग्नाचा समारंभ यथाशास्त्र पूर्ण करण्यासाठीं जनक राजानें दशरथास मिथिलेस बोलाविलें, तेव्हां दशरथ राजा अयोध्येहून भरत आणि शत्रुघ्न ह्या दोन पुत्रांसह मिथिलेस आला, तेव्हां रामाचा सीतेशीं विवाह झाला, व जनकाच्या भावाच्या मुलींशीं लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न, ह्यांचे विवाह झाले. नंतर दशरथ आपल्या आप्तइष्टांसह अयोध्येस परत येत असतां त्यांना वाटेंत परशुराम भेटला. तेथें राम हा पराक्रमी पण सुशील आहे, आणि तो प्रजेचें चांगलें परिपालन करील, व जुलुमी राजांचें पारिपात्य करील, अशी परशुरामाची खात्री होतांच तो रामाला आशीर्वाद देऊन महेन्द्र पर्वतावर तपश्चर्या करण्यासाठीं निघून गेला.

अयोध्यानगरीस परत आल्यावर दशरथ राजाने वसिष्ठादि गुरुजनाच्या अनुमोदनाने रामाला युवराज करावे असे ठरविले. ह्या विधीची तयारी सुरू झाली. सर्व नगरींत जिकडे तिकडे आनदीआनद झाला. परतु हा आनद फार वेळ टिकला नाहीं. कारण कैकेयीनें दशरथ राजाचे मन वळवून रामाला युवराज न करता भरतास युवराज करावे, व रामाला १४ वर्षे वनात पाठवावे, असें निश्चित करून घेतले अर्थात, यौवराज्याचा अभिषेक रामाला झाला नाहीं, व भरत ह्या वेळीं अयोध्येंत नव्हता म्हणून त्यालाही झाला नाहीं.

पित्याच्या आज्ञेनें राम वनवासास निघाला. त्याच्याबरोबर त्याची स्त्री सीता, भाऊ लक्ष्मण अशी दोन माणसेही गेलीं.

राम वनवासास गेला तेव्हा दशरथ पुत्रशोकाने मरण पावला. अयोध्या नगरींत जिकडे तिकडे हाहाःकार झाला. दुर्दैवाची गोष्ट ही, कीं दशरथाच्या चार पुत्रांपैकीं एकही पुत्र ह्यावेळीं नगरांत नव्हता. राम आणि लक्ष्मण हे वनवासात होते. भरत हा आपल्या मामाच्या घरी होता व त्याच्याबरोबर शत्रुघ्नही गेलेला होता. दशरथाचा अत्यविधि करण्यासाठीं भरताला वसिष्ठादिकानी अयोध्येस आणविले. भरत अयोध्येस येऊन पाहातो तों सर्वच काही विपरीत ! पुत्रविरहानें दशरथ मरण पावला होता. पित्याची अत्याक्रिया केल्याबरोबर भरत रामाला परत बोलावण्यासाठी त्याच्या मागोमाग चित्रकूटापर्यंत गेला. त्याने रामाची परत येण्यासाठीं पुष्कळ विनवणी केली, पण राम काहीं केल्या परत येईना. तेव्हा भरताने रामाच्या पादुका मागून घेतल्या, आणि त्या पादुकाच्या नावाने मी राज्य चालवीन असें सागून तो परतला. परतु तो अयोध्यापुरींत न शिरता बाहेरच नदिग्रामीं राहिला, आणि तेथूनच तो अयोध्येचे राज्य करू लागला.

इकडे राम हा चित्रकूट सोडून सीता व लक्ष्मण यासह दक्षिणेकडे निघाला, तो पचवटीमध्ये एक पर्णकुटी बाधून राहिला. येथे शूर्पनखेने त्यांच्याशीं अमर्यादेचें भाषण व वर्तन केल्यावरून लक्ष्मणाने तिचे कान व नाक कापिले. तेव्हा तिनें जनस्थानातील खर, दूषण, वगैरे राक्षसाना रामाविरुद्ध लढाईला पाठविले. परतु रामाने त्यांचा पराभव करून त्या सर्वांस ठार मारले. तेव्हा शूर्पनखा लकेंत रावणाकडे गेली, आणि रामाचा सूड घेण्याला त्याला तिने चिथविले. रावण पचवटींत आला.

त्याने कपटाने सीतेचे हरण केले. तेव्हा सीतेचा शोध करीत करीत राम ऋष्यमूक पर्वताकडे आला. तेथे सुग्रीव नावाचा वानर त्याला भेटला. त्याला रामाने किष्किंधा नगरीचे राज्य मिळवून दिले, तेव्हा सुग्रीवाने रामाला साहाय्य करावयासाठीं आपले वानर सीतेच्या शोधार्थ दशदिशाकडे पाठविले. मारुति वानरास लंकेत अशोकवनिकेत सीता दिसली, तेव्हा हे वृत्त मारुतीने परत किष्किंधेस येऊन रामास सांगितले. तेव्हा राम, वानर आणि अस्वल यांचे मोठे सैन्य घेऊन लंकेवर चाल करावयास निघाला. वाटेत दक्षिणसमुद्रावर त्याने सेतु बांधिला. ह्या सेतूवरून तो आणि त्याचे सर्व सैन्य लंकेत जाऊन पोचले. मग राम आणि रावण यांचे युद्ध झाले. त्यांत रावण आपल्या सर्व आप्तइष्टांसह मरण पावला. रावणाचा एक भाऊ बिभीषण हा रामाच्या आश्रयास येऊन राहिला होता, त्याला रामाने लंकेचे राज्य दिले. मग सीतेला घेऊन राम आपल्या सैन्यातील मोठमोठे योद्धे यांसहवर्तमान परत अयोध्येला आला. तेथे त्याच्या सर्व आप्तइष्टांशीं गाठी पडल्या. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. मग शुभ मुहूर्तावर रामाला राज्याभिषेक झाला. नंतर रामाने आपल्या बरोबरीच्या सर्व वीरांना देणग्या देऊन निरोप दिला.

रामाने यानंतर उत्तम प्रकारे प्रजेचे पालन करून अनेक वर्षे राज्य भोगले.

### ७२. अकबर.

हिंदुस्थानांत ज्या मुसलमान बादशहांनीं राज्य केले, त्यामध्ये अकबर हा मोठा वैभवशाली होता. त्याचा जन्म सिंधप्रांतांत अमरकोट गांवी इ० स० १५४२ मध्ये झाला. तो केवळ चौदा वर्षांचा असतां त्याचा बाप हुमायून हा मरण पावला तेव्हा अकबर हा इतक्या लहान वयांतच बादशाही तक्तावर बसला.

अकबर हा वयाने लहान असल्याकारणाने बहिरामखान नांवाचा एक मुसलमान सरदार सर्व राज्यकारभार पाहात असे. बहिरामखानाच्या कारकीर्दीचीं पहिलीं चार वर्षे अफगाण लोकांशीं लढाया करण्यांत गेलीं. ह्या लढायांत त्याला बरेंचसे यश प्राप्त झाले, परंतु तो मगरूर स्वभावाचा असल्यामुळे दरबारांतील अमीरउमरावांस तो अप्रिय झाला, आणि त्यांनींच भर दिल्यावरून अकबराने बहिरामखानाला दूर करून इ० स० १५६०

सालीं राज्याचा सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. आपल्या हातातील सर्व सत्ता नाहींशी झाली, हे बहिरामखानाला अर्थात् भारी विषम लागले. तेंव्हा त्याने अकबराविरुद्ध उघडपणे बड केले. परतु त्यात त्याचा पुरता मोड होऊन तो अकबराला शरण आला. अकबराने त्याचा अपराध त्याला माफ केला. मग बहिरामखान मक्केच्या यात्रेला निघाला, परतु वाटेमध्ये एका अफगाणानें त्याचा खून केला.

अकबर बादशहाच्या कारकीर्दीची पहिलीं काहीं वर्षे बडखोर अशा अमीरउमरावांचे पारिपत्य करण्यात गेलीं. पुढचीं काहीं वर्षे राजपुतान्यात लहानमोठ्या राजास जिंकण्यांत गेलीं. ह्या राजामध्ये चितोडेचा राणा हाच काय तो अकबराला शरण न येता आपले राज्य सोडून देऊन अरवली पर्वताकडे निघून गेला, आणि मग तेथे त्याने उदेपूर शहर वसविले

रजपूत लोकाचीं मनें आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं अकबराने एक नवीन हिकमत काढली. त्याने रजपुताच्या राजकन्याशीं स्वतः लग्ने केलीं, व मुसलमान लोकाच्या मुलींचीं रजपूत राजाशीं लग्ने करविलीं अशा रीतीने रजपूत आणि मुसलमान ह्या दोन जातींमध्ये सलोखा वाढून त्याच्यातील वैमनस्य बऱ्याच अशाने कमी झाले.

अकबर जेंव्हा तख्तनशीन झाला, तेंव्हा त्याच्या राज्यात पजाब आणि वायव्य प्रात, हे नव्हते. परतु त्याच्या कारकीर्दीत त्याच्या राज्याचा विस्तार हिंदुकुश पर्वतापासून दक्षिणेपर्यंत, व कदाहारापासून ब्रह्मपुत्रा नदीपर्यंत झाला.

पूर्ववयात अकबर हा कट्टा मुसलमानी धर्माचा अभिमानी होता, परतु उत्तरवयात त्याला हिंदुधर्माचीं तत्त्वे आवडू लागलीं. कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या लोकाचा पक्षपात न करिता, तो खिरिस्तावास, मुसलमानास, आणि हिंदूस समतेने वागवीत असे. त्याच्या पूर्वीच्या मुसलमान बादशहानीं जे अन्यायमूलक किंवा मूर्ख प्रकारचे कर रयतेवर लादले होते, ते सर्व त्यानें रद्द केले. तो फारसा शिकलेला नव्हता तथापि तो न्यायी होता. त्याच्या राज्याच्या जमाबदीची आकारणी, वसुलात, वगैरे बाबती राजा तोडरमल्ल ह्याने आपल्या अगावर घेऊन त्यांत उत्तम प्रकारचीं सुधारणा केली,

अकबर इ० स० १६०५ ह्या वर्षी मरण पावला. हिंदुस्थानांत ज्या मुसलमान बादशहानीं राज्य केले, त्या सर्वांत अकबर हा मनाच्या मोठेपणाने, निःपक्षपातीपणामुळे, न्यायबुद्धीने, व शहाणपणाने मोठा होता, असे म्हटले पाहिजे.

## ७३. महाभारताची गोष्ट.

पडु आणि धृतराष्ट्र असे दोन सावत्र भाऊ होते, त्यात धृतराष्ट्र हा वडील होता, परतु तो आधळा असल्याकारणाने पडु हा राज्याचा अधिकारी झाला. कोणे एके समयीं पडु हा आपल्या दोन पत्न्या, कुती आणि माद्री, यासह वनात गेला. वनांत असता पडु मरण पावला, आणि माद्री त्याच्याबरोबर सती गेली. तेव्हा वडील पत्नी कुती आपले तीन पुत्र धर्म, भीम, आणि अर्जुन, आणि माद्रीचे दोन पुत्र नकुल आणि सहदेव, यासह परत हास्तिनापुरास आली. धृतराष्ट्राचे मुलगे शभर होते. त्यात दुर्योधन हा वडील होता, व त्या सर्वांना " कौरव " असे नाव होते.

पाच पाडव हे पराक्रमाने व सौजन्याने सर्व लोकास प्रिय होते, व कौरव आपल्या दुष्टपणाने सर्वांस अप्रिय होते. तेव्हा पाडवाविषयीं कौरवाच्या मनात मत्सर उत्पन्न होऊ लागला, तो इतक्या थरास गेला, कीं त्यानीं पाडवाना ठार मारण्याचे अनेक वेळा बेत केले, परतु ते सर्व फसले. मग हे तटे मिटविण्यासाठीं धृतराष्ट्राने पाडवास राज्याचा काही भाग दिला

पाडवानीं पराक्रमाने दिग्विजय करून मग राजसूय यज्ञ केला. हे पाडवाचे वैभव पाहून कौरवाना फारच मत्सर वाटला. तेव्हा पाडवाना हतवीर्य करण्यासाठीं दुर्योधनाने एक युक्ति केली. त्याने पाडवाना द्यूत खेळावयास बोलावून त्याचें सर्व राज्य पणास लावावयास त्यांचे मन वळविले. ह्या द्यूतांत कौरवानीं खोटया फाशाच्या योगाने पाडवास जिकले, आणि द्यूताच्या अटीप्रमाणे त्याना बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास करावयास पाठवून दिले.

याप्रमाणे पाच पाडव व त्याची पत्नी द्रौपदी अशीं सहा माणसे वनवासास गेलीं. त्याचा वनवास सपून अज्ञातवासही सपला. मग धर्म आपल्या सर्व माणसांसह विराट राजाच्या घरी प्रकट झाला, व आपणांस पूर्वीप्रमाणे राज्याचा काहीं भाग मिळावा, म्हणून त्याने कौरवांच्या जवळ बोलणें सुरू

केलें. परतु कौरवाचा अग्रणी दुर्योधन याने त्याची मागणी कबूल केली नाहीं. तेव्हा अर्थात् पाडवाना युद्धास सिद्ध होणे भाग पडले. परतु युद्ध झाल्यास उभय पक्षाची विनाकारण हानि होणार ती न व्हावी, म्हणून धर्माने श्रीकृष्णास दुर्योधनाला चार बोधाच्या गोष्टी सागून त्याचे मन वळविण्यास पाठविले. कृष्णाने पाडवांस त्याचा भाग द्यावा असे दुर्योधनास आग्रहपूर्वक सांगितले. परतु दुर्योधन म्हणाला, "मी पांडवाना सुईच्या अग्रावर राहील इतकी देखील भूमि देणार नाहीं!" याप्रमाणे ही कृष्णशिष्टाई म्हणजे कृष्णानें दुर्योधनापाशीं पाडवाच्या तर्फेने केलेली रदबदली, निष्फळ झाली. तेव्हा पांडव युद्धास सिद्ध झाले. कौरवानींही आपल्या बाजूने सर्व तयारी केली, आणि उभयपक्षाचे युद्ध झाले.

हे युद्ध अठरा दिवस चालून त्यात सर्व कौरव व त्याच्या पक्षाचे सर्व राजे मरण पावले. पाडवाच्या पक्षाकडे देखील पाच पाडव व द्रौपदी आणि काहीं लहान वीर, इतकींच काय ती माणसे शिल्लक राहिलीं. धर्माला राज्यप्राप्ति झाली. पुढे सद्धर्माने आणि न्यायाने प्रजेचे पालन करून नतर अर्जुनपुत्र अभिमन्यु याचा मुलगा परिक्षिति याला राज्यावर बसवून पाच पाडव व द्रौपदी अशीं सहा माणसे निजधामास गेलीं. त्यात धर्म हा सत्यनिष्ठ असल्या कारणानें तो देहासकट स्वर्गाला गेला.

## ४. अशोक.

मगध देशावर नद या वशातील राजांचे राज्य होते. ते मौर्यवशातील "चद्रगुप्त" या नावाच्या पुरुषाने काबीज करून आपल्या सत्तेखालीं आणले. चद्रगुप्त इसवी सनापूर्वी २९१ ह्या वर्षी मरण पावला. मग त्याच्या मागून त्याचा मुलगा मित्रगुप्त ऊर्फ बिंदुसार याने २० वर्षें राज्य केले. त्याच्यानतर त्याचा मुलगा अशोक हा इसवी सनापूर्वी २७१ ह्या वर्षी. राज्याचा अधिकारी झाला. ह्या राज्याची राजधानी पाटलीपुत्र हें शहर होते.

अशोकाने आपल्या राज्याची मर्यादा खूप वाढविली. हे राज्य पूर्वेस बगालपासून तो पश्चिमेस अर्धे अफगाणिस्थान व काठेवाड या देशांपर्यंत, व उत्तरेस हिमालयाच्या पायथ्यापासून तों दक्षिणेस म्हैसूरापर्यंत, पसरलेले होते. त्या काळच्या इतर राज्यांपेक्षां अशोकाचें राज्य किती तरी पटीने अधिक विस्तीर्ण होते.

हें राज्य जरी इतकें अफाट होतें तरी त्यांत बंदोबस्त अति उत्तम प्रकारचा होता. हें राज्य उदात्त आणि शहाणपणाच्या तत्त्वावर चालविलें जात होतें. अशोकाचे सर्व कायदे प्रजेच्या सुखाकडे लक्ष देऊन केलेले होते. राजधानीच्या जवळचा प्रदेश खुद्द अशोकाच्या देखरेखीखालीं असून दूर अंतरावरच्या प्रदेशाची देखरेख त्याच्या कुटुंबातील कर्तबगार पुरुषांकडे सोपविलेली असे. हे पुरुष अर्थात त्याचे प्रतिनिधि होते. ह्या प्रतिनिधींवरही अशोकाची नजर असे त्यामुळें त्याना प्रजेवर जुलूम करणें शक्य नव्हतें. सर्व राज्यांतील प्रजा सदा संतुष्ट असून राजाला दुवा देत असे.

एका अफाट राज्याचा महावैभवशाली व लोकप्रिय चक्रवर्ती राजा ह्या नात्यानें अशोक हा प्रसिद्ध होता, तथापि त्याची विशेष प्रसिद्धि त्यानें बौद्धधर्माच्या फैलावाचें काम केलें ह्यावरून आहे. हा चक्रवर्ती स्वतः बौद्धधर्मीय होता, व आपल्या सर्व राज्यामध्ये व इतर देशातही हा धर्म लोकांनीं स्वीकारावा म्हणून त्या धर्माचीं तत्त्वें लोकाना समजावून देण्यासाठीं हजारों धर्मोपदेशक त्यानें नेमिले होते हे धर्मोपदेशक सीलोन, हिंदी महासागरांतील बेटें, ब्रह्मदेश, चीन, जपान, इराण, सिरिया, एशियामायनर, वगैरे देशांत जाऊन तेथील भाषा शिकत, व बौद्धधर्माचीं तत्त्वें तेथील लोकांना समजावून देऊन त्यांना त्या धर्मामध्यें समाविष्ट करून घेत. अशोक हा जरी बौद्धधर्माच्या प्रसारासाठीं रात्रंदिवस इतका झटत असे, तरी राजा ह्या नात्यानें जीं त्याचीं कर्तव्यें होतीं, त्याकडे त्यानें कधीं दुर्लक्ष केलें नाहीं. धर्मप्रसारासाठीं जुलूम करणें, हें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें, असें असूनही बौद्धधर्माचा प्रसार त्यानें इतका केला, कीं आज जगामध्यें ह्या धर्माचे अनुयायी शेंकडा ४५ आहेत, म्हणजे जगातील बहुतेक निमे लोक बौद्ध आहेत

अशोकानें जीं इतर कामें प्रजेच्या हितासाठीं केलीं, त्यांत मुख्य हें होतें, कीं त्यानें इतर देशांतील कलाकौशल्यें जितकीं आणवतील तितकीं हिंदुस्थानांत आणविलीं, आणि लोकाना पोटाचे नवीन धंदे उत्पन्न करून दिले. त्याच्या राज्यांतील बांधकामें आणि खोदकामें तत्कालीन कलाकौशल्याची आजमित्तीस साक्ष देत आहेत. त्यानें धर्मसंबंधीं आज्ञा लोकोपयोगार्थ जागोजाग खडकावर खोदविल्या, तसेंच त्यानें बौद्ध धर्मग्रंथ तपासवून शुद्ध करविले.

अशोक राजा ४५ वर्षे राज्य करून इसवीं सनापूर्वी २२६ ह्या वर्षी मरण पावला.

## ७५ गंगा नदीची पौराणिक उत्पत्ति.

पूर्वी सगर ह्या नावाचा सूर्यकुलोत्पन्न राजा अश्वमेध करीत असता त्याचा यज्ञिय अश्व इंद्राने चोरून नेऊन पाताळात लपवून ठेविला. हा अश्व शोधून आणण्यासाठीं सगराने आपली धाकटी पत्नी सुमति हिचे साठ हजार पुत्र पाठविले त्यांनी सर्व भूमि शोधिली, आणि नंतर ते भूमीला विवर करून पाताळात उतरले. तेथे विष्णु हा कपिल मुनीचे रूप धारण करून बसला होता. त्याच्या सन्निध सगराचा यज्ञिय अश्व चरत होता. सगराचे साठ हजार पुत्र, ( सौमतेय ), यानी कपिलमुनी व यज्ञिय अश्व हे जवळ जवळ असलेले पाहून असा तर्क केला, की ह्याच मुनीने अश्व चोरून येथे आणिला असावा. म्हणून ते त्या कपिलास अपशब्द बोलले. तेव्हा त्याने नेत्राग्नीने सौमतेयास जाळून भस्म केले.

इकडे अश्वाभावीं सगराचा यज्ञ खोळंबलेला होता, व सौमतेयाचाही ठिकाण नव्हता. तेव्हा सगराने आपला नातू असमजपुत्र अंशुमान् ह्याला पुत्राच्या आणि अश्वाच्या शोधार्थ पाठविले. अंशुमान् हा सौमतेयानीं म्वणलेल्या मार्गाने थेट पाताळात गेला. तेथे त्याला यज्ञिय अश्व व मोठा थोरला भस्मराशि दिसला. जवळच गरुड पक्षी बसलेला होता. त्याने अंशुमानास सौमतेयाची अशी स्थिति का झाली हे सांगितले, व त्याच्या उद्धारासाठीं स्वर्गीय गंगा खालीं आणिली पाहिजे, असेही सांगितले. नंतर अंशुमान् तो अश्व घेऊन परत अयोध्येला आला. सगराचा अश्वमेध पूर्ण झाला. परंतु त्याच्याने किंवा त्याचा नातु अंशुमान् व नंतर पणतु दिलीप याच्यानेंही स्वर्गीय गंगा खालीं आणण्याचे महत्कृत्य झाले नाही. पुढे दिलीपाचा पुत्र म्हणजे सगराचा निपणतू जो भगीरथ, तो राज्याचा अधिकारी झाला. गंगेने स्वर्गलोकाहून खालीं उतरावे, ह्यासाठीं भगीरथाने प्रथम तिची आराधना केली. परंतु गंगा स्वर्गातून खालीं पडताना तिच्या वेगाने पृथ्वीचे तुकडे तुकडे होतील अशी भीति होती. म्हणून तिचा वेग मंद करण्यासाठीं शंकराने तिला मस्तकावर धारण करणे आवश्यक होते. म्हणून भगीरथानें शंकराची आराधना केली. गंगेचा ओघ मस्तकावर पाडून घेण्यास

शंकर सिद्ध झाला. तेव्हां गंगा स्वर्गातून खालीं पडूं लागली. परंतु शंकरास आपल्या जलौघाबरोबर वाहून नेण्याची तिला दुष्ट इच्छा झाली, ती शंकरास अंतर्ज्ञानानें समजली म्हणून तिचा गर्व कमी करण्यासाठीं त्यानें तिला आपल्या जटाजूटांत अडकवून धरिलें. तेव्हां तिला बाहेर पडतां येईना. तेव्हां पुन्हां भगीरथानें शंकराची आराधना करून गंगेला वाट देवविली. तेव्हां गंगा बाहेर पडली आणि भगीरथाच्या मागोमाग जाऊं लागली. मार्गामध्यें एके ठिकाणीं जन्हुराजा यज्ञ करीत होता. त्याची याज्ञिय सामग्री वाहून नेण्याची खोडसाळ बुद्धि गंगेला झाली. तेव्हां जन्हूनें तिचें पारिपत्य करण्यासाठीं तिचें प्राशन करून टाकिलें. तेव्हां पुन्हां भगीरथानें जन्हूची विनवणी करून त्याचा राग शांत केला, आणि त्याच्याकडून गंगेची सुटका करविली.

जन्हूनें गंगेची सुटका करतांच ती भगीरथाच्या मागून जाऊं लागली. यानंतर तिनें पुन्हां कांहीं द्वाडपणा केला नाहीं. ती मुकाट्यानें भगीरथाच्या मागून पाताळांत गेली. तेथें सौमतेयाच्या भस्मराशीला तिच्या जलाचा स्पर्श होतांच त्यांचा उद्धार झाला, आणि ते दिव्यरूप धारण करून आणि विमानांत बसून स्वर्गाला गेले

अशा रीतीनें गंगानदी स्वर्गावरून भूलोकीं आली, आणि भूलोकाहून पाताळांत गेली, म्हणून तिला " त्रिपथगा " असें नांव प्राप्त झालें. तिला भगीरथानें स्वर्गाहून खालीं आणिलें, म्हणून तिला " भागीरथी " असें नांव प्राप्त झालें. ती वाटेंत जन्हूच्या उदरांतून बाहेर पडली, म्हणून तिला " जान्हवी " असेंही नांव मिळालें.

भगीरथानें प्रथम गंगेची, नंतर दोन वेळां शंकराची, नंतर जन्हूची, आराधना करून व अपरंपार कष्ट सोसून गंगेला पाताळांत नेलें, आणि आपल्या पितरांचा उद्धार केला, ह्यावरून " भगीरथप्रयत्न " म्हणजे अत्यंत दीर्घ प्रयत्न, ही म्हण प्रचारांत आली आहे.

## ७६. मोरोपंत कवि.

मोरोपंत कवीचें संपूर्ण नांव मोरेश्वर रामचंद्र पराडकर असें असून ते जातीचे क-हाडे ब्राह्मण होते. त्यांचें गोत्र जामदग्न्य. रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूर तालुक्यांत सौंदळ म्हणून जें गांव आहे, तें मोरोपंत कवींच्या

पूर्वजाचे मूळ ठिकाण. ह्या गावीं मोरोपताचे आजे डागे पतकी म्हणजे जमीनीवरील जकात घेण्याचे काम करीत. मोरोपताचे वडील रामचद्रपत हेही ह्याच गावीं जन्मले, व येथे काही दिवस राहून नतर ते कोंकणातून घाटावर गेले,आणि कोल्हापूर दरबारच्या अमलातील पन्हाळगडावर मुजुमदाराच्या कामावर राहिले रामचद्रपत पन्हाळगडी असता मोरोपत इ० स० १७२९ मध्यें जन्मले, हे रामचद्रपताच्या तीन पुत्रापैकी मधले होते.

मोरोपताचे अगदी लहानपणाचे शिक्षण त्याचे वडिलापाशी झाले, आणि नतर पुढचे हरिशास्त्री याचे जवळ झाले नतर पडित केशवशास्त्री पाध्ये व गणेशशास्त्री पाध्ये ह्याचे जवळ मोरोपत सस्कृत शिकले. पन्हाळगडीं मोरोपताचे अध्ययन होत असता रामचद्रपत हे काही कारणाने हे मुजुमदारीचे काम सोडून देऊन पुणे जिल्ह्यात बारामती येथे बाबूजी नाईक जोशी म्हणून कोणी शाडिल्यगोत्री कोंकणस्थ ब्राह्मण होते, त्याच्या पदरी पागेच्या कामावर कारकुन राहिले बाबूजी नाईक हे छत्रपति शाहूमहाराजाच्या पदरचे जाहागीरदार होते

आपल्या वडिलास भेटण्यासाठी मोरोपत पन्हाळगडाहून आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षी बारामतीस गेले येथे बाबूजी नाईक यास मोरोपताच्या अगचे अलौकिक गुण, विद्वत्ता, सुस्वभाव, वगैरे आढळून येताच त्यास त्यांनी आपल्या घरी पुराण सागावयास सालीना ५०० रुपयाची नेमणूक देऊन ठेविले. बाबूजी नाईक मोरोपताना राहावयास स्वतत्र वाडा देऊन, त्याना शिधाही पुरवीत असत मोरोपताच्या कुटुबात त्याचे वडील, मातुश्री, सख्खे व चुलत भाऊ, भावजया, स्वताच्या दोन बायका, नातवडे, वगैरे पधरावीस माणसे असत. त्या सर्व माणसाचे मोरोपतावर भारी प्रेम असे. बारामती येथेच मोरोपताचे सर्व उत्तर आयुष्य गेले.

मोरोपताचा अगदी लहानपणापासूनच कविता करण्याकडे कल असे. त्यांनीं अनेकविध विषयांवर अनेक प्रकारचीं काव्ये रचिलीं. त्याचीं बहुतेक काव्ये पौराणिक विषयाचा आधार घेऊन रचलेलीं आहेत, तथापि स्वतत्र अशींहि त्याचीं शेकडो काव्ये आहेत. त्याची एकदर कविता सुमारे, साठ हजारावर आहे. त्याच्या पौराणिक काव्यात महाभारत, बृहद्दशम, प्रल्हादविजय, कुशलवचरित, अष्टोत्तरशत रामायणे, हीं महत्त्वाचीं आहेत. व

स्वतंत्र काव्यांत केकावलि, संशयरत्नमाला, सन्मणिमाला, वगैरे महत्त्वाची आहेत. मोरोपंताच्या कवितेची लोकप्रियता त्यांच्या हयातींत जशी होती, तशीच किंबहुना त्याहूनही अधिक अशी, हल्लीं आहे. मोरोपंत संस्कृतांत चांगले विद्वान होते. त्यांचें संस्कृत ग्रंथांचें वाचन फार होतें. त्याचप्रमाणें महाराष्ट्रभाषेंतील कविताही त्यांनीं सारी वाचिली होती. ते स्वभावानें चतुर, समय जाणणारे, मार्मिक, आणि मितभाषी, होते. त्यांनी महाराष्ट्र वाङ्मयांत अपरंपार भर घातली इतकेंच नव्हे, तर महाराष्ट्र भाषेचें सर्व सामर्थ्य जागृत करून तिला नीटनेटकें वळण लाविलें. हे त्यांचे महाराष्ट्रीयांवर मोठे उपकार झाले.

मोरोपंत इ० स० १७९४ मध्यें निवर्तले. त्यांचे वंशज निपणतू म्हणजे नातूंचे नातू हल्लीं बारई येथें आहेत.

## ७७ विष्णुशास्त्री चिपळूणकर.

आपल्या महाराष्ट्रांतील नामांकित पंडितांत अग्रगण्य असे जे कृष्णशास्त्री चिपळूणकर, त्यांच्या दोन पुत्रांमध्यें विष्णुशास्त्री हे ज्येष्ठ पुत्र होते. विष्णुशास्त्री यांचा जन्म पुणें येथें तारीख २० मे सन १८५० इसवी रोजीं झाला. त्यांचें बालवयांतील शिक्षण त्यांच्या आजोबांच्या देखरेखीखालीं झालें. त्यांचा मराठी अभ्यास झाल्यावर ते पुण्याच्या हायस्कुलांत गेले. त्यांचें तेथील शिक्षण पुरें होऊन इ० स० १८६५ सालीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन पुढें कॉलेजांत गेले. आणि इ० स० १८७१ मध्यें त्यांची बी. ए. ची परीक्षा उतरली.

विष्णुशास्त्र्यांचे वडील महापंडित असून विद्याव्यासंगी होते, आणि शिवाय ते ग्रंथरचनाही करीत असत. त्यांच्या सहवासानें विष्णुशास्त्री हेही विद्याव्यासंगी होऊन त्यांची लेखनाकडे प्रवृत्ति झाली. विष्णुशास्त्री कॉलेजांत होते, तेव्हांपासूनच ते आपल्या वडिलांच्या मराठी शालापत्रकांत मधून मधून लेख लिहित असत, आणि ते बी. ए. झाल्यावर ह्या मासिक पुस्तकाचें चालकत्व कृष्णशास्त्र्यांनीं सर्वथैव आपल्या चिरंजीवांकडे सोंपविलें. विष्णुशास्त्र्यांनी शालापत्रकांत जे विविध विषयांवर लेख लिहिले, त्यांत कालिदास व भवभूति ह्या दोन संस्कृत कवींवरील निबंधामुळें तत्कालीन मराठी लेखकांमध्यें त्यांची गणना होऊं लागली.

नंतर इ० स० १८७४ सालीं स्वतंत्र व भारदस्त मासिक काढण्याची विष्णुशास्त्री यास स्फूर्ति होऊन त्यांनी निबंधमालेचा उपक्रम केला. ह्या मासिकांतील त्यांच्या लेखांनीं सर्व महाराष्ट्रास आठ वर्षे जसे हालवून सोडलें! कारण, त्यांचे निबंध महत्त्वाच्या विषयावर असून ते अत्यंत प्रौढ व भारदस्त भाषेत लिहिलेले असत. त्या निबंधांनीं मराठी गद्यवाङ्मयाची एक नवीन शाखा महाराष्ट्रीयास दाखवून दिली, इतकेंच नव्हे, तर ते निबंध कालाच्या क्रमानें व गुणाच्या मानानें अग्रस्थानीं बसण्याच्या लायकीचे आहेत. ही निबंधमाला अत्यंत लोकप्रिय झाली होती. कारण, तींतील विषय महत्त्वाचे असत भाषा शुद्ध आणि जोरदार असे. आणि शिवाय लोकांच्या मतांना त्या वेळीं जें नवीन वळण लागत चाललेलें होतें, त्या वळणावरच विष्णुशास्त्रीबोवांचीं मतें ह्या लेखांत येत असत. तेणेंकरून महाराष्ट्र वाचकास ह्या निबंधमालेची इतकी गोडी लागून राहिली होती. कीं मालेचा ताजा अंक निघतो केव्हां आणि आपण वाचतों केव्हां, असें त्यांना होत असे तरुण पिढीचे लोक मोठ्या उत्कंठेनें ताज्या अंकाची मार्गप्रतीक्षा करीत. परंतु जुन्या पिढीच्या लोकांना निबंधमालेचा प्रत्येक ताजा अंक हा हृदयावर वज्राघाताप्रमाणें वाटत असे. ताज्या अंकांत शास्त्रीबोवा आपली काय वर्मे कर्मे काढतात, कोणच्या दिशेनें उपहास करतात, हे मनांत येऊन जुन्या पिढीच्या लोकास निबंधमालेच्या ताज्या अंकाची भीति वाटत असे! सारांश हा, कीं निबंधमालेचा ताजा अंक हा त्या काळच्या जुन्या व नव्या पिढीच्या लोकांच्या विचाराचा व संभाषणाचा एक महत्त्वाचा विषयच होऊन रहात असे! निबंधमालेनें आठ वर्षे महाराष्ट्रांत जी चळवळ उडवून दिली. तिची खरी कल्पना त्या वेळच्या लोकांखेरीज इतरांना होण्याजोगी नाहीं!

आठ वर्षे निबंधमाला चालविल्यावर ती बंद करून महाराष्ट्राचा इतिहास वगैरे विषय हातीं घ्यावे, असा शास्त्रीबोवांचा इरादा होता परंतु निबंधमालेचा शेवटचा अंक छापून बाहेर पडावयाच्या अगोदरच, म्हणजे १७ मार्च इ० स० १८८२ रोजीं, त्यांचा ज्वरानें अंत झाला!

विष्णुशास्त्री यांनीं कांहीं वर्षे सरकारी नोकरी केली, परंतु आपल्या हौसेप्रमाणें वाचन, अध्यापन व लेखन, करावयास वारंवार अडथळे येत, म्हणून सोडून देऊन त्यांनीं स्वतःच्या हिंमतीवर अनेक नवीन व्यवसाय

काढले. त्यांनी अस्तित्वात आणिलेली केसरी व मराटा ही वर्तमानपत्रे, आणि न्यू इंग्लिश स्कूल, किताबखाना व चित्रशाळा, ह्या संस्था अद्यापि चालू असून ती शास्त्रीबोवांची जणों काय स्वयंसिद्ध स्मारकेंच होऊन राहिली आहेत !

विष्णुशास्त्री यास चार मंडळींत जाऊन गप्पागोष्टी करणं आवडत नसे. ते बोलत थोडे, तथापि कोण काय बोलतो, कोणाची काय वर्मे कर्मे आहेत, हे ते लक्षपूर्वक पहात असत त्यांच्या निकटस्नेहाच्या मंडळींत मात्र ते मन मोकळे करून बोलत असत. त्यांचे आचरण अत्यंत शुद्ध व राहणी अगदीं साधी असे. त्यांना द्रव्याचा लोभ मुळींच नव्हता.

शास्त्रीबोवांच्या लेखांनीं आणि वर्तनानें समाजाला जे अनेकविध लाभ झाले आहेत, ते येणेप्रमाणे:—

( १ ) त्यांनीं मराठी गद्यवाङ्मय समृद्ध केलें.

( २ ) अव्वल इंग्रजीमध्यें भटकलेल्या लोकांच्या चुका दाखवून देऊन त्यांनीं पुढच्या पिढीस चांगलें वळण लाविलें.

( ३ ) सरकारी नोकरीवर किंवा आश्रयावर भिस्त न ठेवतां सर्व लहानमोठीं देशसेवेचीं व भाषासेवेचीं कामें आपलीं आपणास करणें शक्य आहे. हें त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें

इतकी मूल्यवान् कामगिरी ज्या पुरुषानें केली. तो लोकोत्तर होय ह्यांत संशय नाहीं !

### ७८ रामदास.

गोदावरीच्या उत्तरतीरीं राक्षसभुवनाजवळ जांब म्हणून एक गांव आहे, तेथें शके १५३० ( म्हणजे इ. स. १६०८ ) मध्यें रामदासस्वामीचा जन्म झाला. त्याच्या बापाचें नांव सूर्याजीपंत असून तो जांबगांवचा कुलकर्णी होता.

रामदासाचा बाप निवर्तल्यावर त्याच्या आईनें त्याची मुंज केली आणि पुढं लग्नाचा बेत केला. परंतु लग्नाचे वेळीं ब्राह्मण मंगलाष्टकें म्हणूं लागले, तेव्हां ' सावधान ! सावधान ! '' हे शब्द रामदासाच्या कानीं पडतांच त्याचा अर्थ त्याच्या मनांत पूर्णपणें ठसला, आणि सांसारिक स्थिती संबंधानें त्याच्या मनांत विरक्ति उत्पन्न होऊन. व गृहस्थाश्रम स्वीकाराव-

याचा नाहीं असा निश्चय करून, तो लग्नाच्या समारंभातून पळून गेला, आणि नाशकास पंचवटींत जाऊन राहिला.

रामदास पंचवटींत राहून आपलें कुलदैवत जो राम त्याची उपासना करूं लागला तेथें त्यानें आपलें पहिलें, म्हणजे आईबापांनीं ठेविलेलें "नारायण' हें नांव सोडून दिलें, आणि तो आपणास 'रामदास," (रामाचा उपासक), असें म्हणवून घेऊं लागला पंचवटींमध्यें रामोपासनेंत रामदासानें बारा वर्षे घालविलीं.

नंतर रामदास तीर्थयात्रेस निघाला. उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध तीर्थ पाहून व जागोजाग मारुतीची स्थापना करून, तो दोन वर्षांनीं परत महाराष्ट्रांत आला, आणि कृष्णातीरीं माहुली नांवाचें जें पवित्र स्थान आहे, तेथें राहिला या ठिकाणीं रामदासाची अलौकिक भक्ति व शुचिता पाहून लोकांनीं त्याला 'समर्थ" ही पदवी दिली

माहुलीस कांहीं वर्षे राहून रामदास साताऱ्याजवळ चाफळ म्हणून गांव आहे, तेथें येऊन राहिला. मराठी राज्याचा संस्थापक जो शिवाजी, त्याच्या कानीं रामदासाची कीर्ति गेली, तेव्हां त्यानें रामदासास गुरु केलें, आणि रामदासानें आपल्या गुरुपणाची खूण म्हणून शिवाजीच्या फौजेचा झेंडा भगव्या रंगाचा करविला. त्या काळीं मराठे लोक भेटीच्या वगैरे प्रसंगीं 'जोहार!' हा शब्द उच्चारीत असत, त्याच्या ऐवजीं "राम! राम" हा शब्द रामदासाच्या आज्ञेनें शिवाजीनें मराठे लोकांत प्रचलित केला. ता शब्द अजूनही त्या लोकांत चालू आहे रामदासाची सल्लामसलत शिवाजी राजकारणांत अनेक प्रसंगीं घेत असे.

रामदासानें आपलें सर्व आयुष्य लोकांना सदुपदेश करण्यांत घालविलें. त्यानें मनाचे श्लोक, दासबोध, वगैरे बरीच काव्यें रचिलीं, त्यांत सन्मार्गानें चालण्याचा, व चित्तामध्यें आत्मजागृति करून घेण्याचा उपदेश मोठ्या कळकळीनें केलेला आहे

शिवाजीच्या हयातींत मराठी राज्याचें व हिंदुधर्माचें वैभव रामदासास पहावयास सांपडलें, परंतु शिवाजी शके १६०२, (इ. स. १६८०), मध्यें मरण पावला, तेव्हां त्याचा पुत्र संभाजी हा राज्याचा अधिकारी झाला. त्याचें दुराचरण पाहून रामदासास भारी वीट येत असे त्यानें संभाजीला पुष्कळ उपदेश केला, परंतु तो फुकट गेला संभाजीचें दुष्ट आचरण म्हणून

सुटलें नाहीं ! ज्या राज्याचें वैभव आपण पाहिलें, तें संभाजीसारख्या बिन-अकली इसमाच्या ताब्यांत गेलें, हें पाहून रामदासास भारी वाईट वाटत असे. ह्या कारणामुळें आणि वृद्धापकाळामुळें रामदास भारी थकला, आणि शके १६०३ ( इ० स० १६८२ ) माघ वद्य नवमी. ह्या दिवशीं निधन पावला

ही नवमी त्याच्या शिष्यपरंपरेकडून ' दासनवमी '' म्हणून आजमित्तीसही पाळली जात आहे

## ७९. पानपतची पहिली लढाई

पानिपत येथ अनेक वेळा निकराच्या लढाया झाल्या आणि या सर्व लढाया हिंदुस्थानच्या इतिहासांत मोठमोठाल्या क्रांत्या घडवून आणण्यास कारणीभूत झाल्या. कौरव आणि पांडव यांचे मध्यें जे घनघोर युद्ध झालें,(ज्याचें सविस्तर वर्णन महाभारतांत व्यासमुनींनी केलें आहे ) तें याच ठिकाणीं झालें. आणि अलीकडच्या काळींही येथें तीन प्रसंगीं तीन मोठ्या लढाया झाल्या. ह्या कारणामुळें पानिपत हें ठिकाण पुराणप्रसिद्ध आणि इतिहास-प्रसिद्ध आहे.

पानिपत हें शहर दिल्लीच्या उत्तरेस सुमारें ५० मैलावर असून त्याचे शेजारीं एक विस्तीर्ण मैदान आहे ह्या मैदानावर इ स १५२६ च्या एप्रिल महिन्याच्या २१ व्या तारखेस तुर्की सरदार बाबर आणि दिल्लीचा पठाण बादशहा इब्राहीम लोदी, यांचेमध्यें मोठी भयंकर लढाई झाली. हिंदुस्थानांत तोफा आणि बंदुका या प्राणनाशक साधनांनीं जी पहिली लढाई झाली, ती हीच होय.

या लढाईचे प्रसंगीं बाबरानें आपल्या सैन्याच्या वेगवेगळ्या शाखा, आणि शिपायांच्या टोळ्या,यांची रचना फार कौशल्यानें केली होती.त्यानें आपल्या सैन्याच्या उजव्या आणि डाव्या बगलांचा उत्तम रीतीनें बंदोबस्त केला होता. उजव्या बगलेकडे पानिपतचा किल्ला आणि पानिपत शहर असल्या कारणानें तिकडून शत्रूचा हल्ला येणें शक्य नव्हतें. डाव्या बाजूस बाबरनें खूप खोल खंदक खणवून त्या खंदकाच्या बाहेरच्या बाजूस झाडांच्या फांद्या रचून ठेव-विल्या होत्या.

अशा रीतीनें आपल्या सैन्याच्या दोन्ही बगला सुरक्षित करून बाबरनें

आघाडीस देखील तोफखान्याच्या योगानें बंदोबस्त केला होता. तो असा कीं, तोफा एकमेकींपासून थोडक्या थोडक्या अंतरावर ठेवून मधली जागा वाळूच्या पोत्यांनी भरून काढली होती, आणि ह्या तोफा हालूं नयेत, म्हणून त्या एकमेकींशी मजबूत दोऱ्यांनी जखडून टाकल्या होत्या. तेणेंकरून हीं वाळूचीं पोतीं आणि तोफा, ह्यांचा जणों काय एकजीव होऊन आयत्या वेळचा एक भक्कम तटच झाला होता

ह्या तात्पुरत्या तटाच्या मागें बंदुकवाल्यांना उभे राहण्यासाठीं जागा केलेली होती, व त्यांना ह्या तटाच्या आड सुरक्षितपणें राहून तटावरून पलीकडे समोर शत्रूवर गोळ्या झाडतां याव्यात, म्हणून तटांत सोयीच्या ठिकाणीं भोकें ठेविलीं होतीं

प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्याच्या पाठीमागे कसलेल्या आणि चलाख्या शिपायांची एक तुकडी त्यानें राखून ठेविलेली होती, अशासाठीं, कीं प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्याच्या एकाद्या भागास मदतीची जरूर पडली, तर ह्या राखून ठेवलेल्या तुकडीनें मदत करावी

सैन्याच्या दोन्ही बगलांच्या दरम्यान जें सैन्य होतें, त्याचे बाबरनें अनेक भाग आणि पोटभाग करून प्रत्येकावर एक एक कुशल अधिकारी नेमला होता.

सकाळीं साताच्या सुमारास इब्राहीम लोदीचें सैन्य बाबरच्या सैन्यावर चाल करून यावयाला निघालें. त्याचा समज असा होता, कीं आपणास उघड्या मैदानावर घोडेस्वार आणि पायदळ यांच्याशींच लढावें लागेल परंतु ते बरेचसे जवळ आले, तेव्हा त्यांच्यावर बाबरच्या सैन्यानें तोफा आणि बंदुका उडविण्यास सुरवात केली. तोफांचे गोळे व बंदुकांच्या गोळ्या ह्यांचा वर्षाव होऊं लागला, तेव्हा इब्राहीम लोदीचे हत्ती. घोडे. शिपायी वगैरे जागच्या जागीं पटापट मरून पडूं लागले. तोफांचा धडधडाट, बंदुकांचा फडफडाट, पेटणाऱ्या दारूच्या ज्वाळा व धुराचे लोट, असा अपूर्व प्रकार पाहून इब्राहीम लोदीचे शिपायी घाबरून मागें हटूं लागले. इतक्यात बाबरच्या सैन्याच्या दोन्ही बगलांनीं शत्रूच्या सैन्याच्या पिछाडीस जाऊन मागच्या बाजूनें त्यांच्यावर हल्ला केला. अशा कचाटींत शत्रूचें सैन्य सापडलें. त्यांना कोणत्याच बाजूनें बाहेर पडावयास किंवा पळून जाण्यास

वाट उरली नाहीं. सान्याच बाजूकडून ते बाबरच्या सैन्यानें गराडले गेले होते. ते सर्व समरांगणावर मरण पावले त्यांतच इब्राहीम लोदी मरण पावला

ह्या लढाईमुळें इब्राहीम लोदीचें राज्य बाबरास प्राप्त झालें.

## ८० अहल्याबाई.

अहमदनगर जिल्ह्यांत पाथर्डी म्हणून एक गाव आहे. तेथें आनंदराव शिंदे ह्या नांवाचा एक शेतकरी असे. त्याची मुलगी अहल्याबाई तिचा जन्म इ स. १७२५ मध्यें झाला.

अहल्याबाई पुढें मोठ्या पदावर चढेल असें एका ज्योतिषानें आनंदरावास सांगितलें होतें. ह्या भाकितावर त्याचा पूर्ण विश्वास असल्याकारणानें त्यानें आपल्या मुलीला मोठ्या पदाला योग्य असें शिक्षण देण्याची तजवीज केली होती

एकदा मल्हारराव होळकर हे उत्तर हिंदुस्थानांतील एका मोहिमेवरून दक्षिणेकडे येत असतां ते पाथर्डी गावांतील एका देवळांत मुक्कामास उतरले. तेथेंच अहल्याबाई ही कर्मधर्मसंयोगानें देवदर्शनास गेली असतां मल्हारराव होळकर यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां अहल्याबाईचें रूप व सभ्यपणाची वर्तणूक मल्हाररावांस फार आवडली, व त्यांनीं तिच्यासंबंधानें विचारपूस केली. त्यावरून ती आपल्याला सून मिळाली तर उत्तम होईल, म्हणून त्यांनीं तिचा बाप आनंदराव ह्याचेजवळ त्यासंबंधानें गोष्ट काढली. अर्थात आनंदरावास मल्हाररावाची मागणी मान्य झाली. यानंतर लवकरच मल्हाररावाचा मुलगा खंडेराव आणि आनंदरावाची मुलगी अहल्याबाई यांचें लग्न पुणें मुक्कामीं मोठ्या थाटानें झालें. ह्या वेळीं तिचें वय ११ वर्षांचें होतें. ती सुस्वभावी असल्याकारणानें तिनें सासू, सासरा. वगैरेंचें प्रेम तत्काळ संपादन केलें.

ह्या लग्नाला १० वर्षें झालीं न झालीं तोंच खंडेराव हा जाट राजाशीं लढत असतां मरण पावला. अहल्याबाई पतीबरोबर सती जावयास सिद्ध झाली, परंतु मल्हाररावांनीं तिला, " तूं इतःपर मला पुत्राच्या जागीं आहेस, तूंच राज्यकारभार पहात जा, " इत्यादि समजुतीच्या व सांत्वनाच्या गोष्टी सांगून तिचें मन वळविलें, व सती जाण्यापासून तिला निवृत्त

केले. यानतर पुढे लवकरच मल्हाररावांसही देवाज्ञा झाली. तेव्हा अहल्याबाईचा मुलगा मालोजी ह्यास पेशव्याकडून सरदारीची वस्त्रे मिळाली; तथापि तीच स्वत सारा राज्यकारभार पहात असे. कारण, मालोजी वयाने लहान व स्वभावाने दुष्ट असल्यामुळे तो अगदी कुचकामाचा होता. परतु तोही तिच्या दुर्दैवाने लवकरच मरण पावला. तेव्हापासून साऱ्या होळकरशाहीची मालकीण अहल्याबाईच झाली, आणि सारा राज्यकारभार तिलाच आमरण पहावा लागला

अहल्याबाईचा गगाधरपत म्हणून एक कारभारी होता. परतु अहल्याबाईची सर्वत्र नजर असल्याकारणाने त्याला तिच्या कारभारात फारशी ढवळाढवळ करता येत नव्हती, यामुळे तिच्या हातातून सारा कारभार निघून आपल्या हाती यावा, म्हणून त्याने अनेक कारस्थाने केली, परतु ती सर्व निष्फळ झाली. शेवटी त्याने राघोबादादास अहल्याबाईवर स्वारी करून तिचे राज्य जिकून घेण्यासाठी इदुरास बोलाविले. या निरोपावरून राघोबादादा सैन्यानिशी माळव्यात आला. तेथे अहल्याबाईची सुरळीत राज्यव्यवस्था आणि प्रजेची आबादानी पाहून तो फार सतुष्ट झाला, आणि अहल्याबाईवर स्वारी करावयाचा बेत त्याने सोडून दिला आणि " आपला पुत्र मालोजी मरण पावल्याची खबर ऐकल्यावरून मी आपले सात्वन करावयासाठी आलेला आहे, " अशी थाप मारून परत दक्षिणेत आला.

या नतर काही दिवसानी राघोबादादास पैशाची फार जरूर लागली म्हणून तो अहल्याबाईच्या समृद्ध खजीन्यातून जबरदस्तीने पैसे काढावे ह्या इराद्याने पुन्हा आपल्या सैन्यानिशी माळव्यात आला. परतु अहल्याबाईची धर्मनिष्ठा, न्याय्य राज्यपद्धति, कर्तव्यदक्षता, वगैरे अलौकिक गुण पाहून त्याची त्यालाच लाज वाटली. आणि मग तिला काही एक उपद्रव न करता तो परत दक्षिणेकडे वळला. यानतर अहल्याबाईच्या राज्यकारभारात कोणीही काही उपद्रव केला नाही. आणि आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षापर्यंत राज्य करून ती इसवी सन १७९५ मध्ये मरण पावली.

अहल्याबाईचे राज्य म्हणजे केवळ रामराज्यच होते. सर्व प्रजा तिला देवीप्रमाणे मानीत असे. तिच्या कारकीर्दीत व्यापार, धदे वगैरे भरभराटीच्या स्थितीत होते. तिने केलेली धर्मकृत्ये पुष्कळ आहेत तिने जागोजाग विहिरी

धर्मशाळा, वगैरे बांधविल्या. तिने मुख्य क्षेत्रात स्थापलेली अन्नसत्रे आणि सदावर्ते अद्यापि चालत आहेत

असली स्त्री ज्या देशात जन्मली त्या देशाच्या लोकाना धन्यता कशी वाटणार नाही ? आणि मोरोपंताचा तिच्या संबंधाचा पुढील उद्गार तरी कोणाला यथार्थ वाटणार नाही ?

देवि अहल्येबाई । झालीस जगत्रयात तू धन्या ।
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि जाहली कन्या ॥

पथाला आश्रय होता असे दिसते कारण सन ११९१ यावर्षी वीर बल्लाळ होयसळाच्या विरुद्ध लढत असताना त्याने एक गाव सिद्धातचद्रभूषण पडित या स्थानकाचार्याला इनाम दिला होता हा आचार्य कालामुख शैव होता या शैवपथाप्रमाणेच बसवाच्या वीरशैवपथाला आणि त्या पथातील जगमाचा यादवानी परामर्श घेतला होता या पथाच्या अनुभवशिखामणी या ग्रथात एक कथा दिली आहे त्या कथेत पाचवा भिल्लम हा वीरशैव होता असे म्हटले आहे परतु या कथेला दुसरा पुरावा नसल्यामुळे ही दतकथाच असावी यावरून देवगिरीच्या यादवाचा लिगायत पथाला आश्रय नव्हता असे म्हणता येणार नाही कृष्ण यादवाची वासुदेवावर किती भक्ति होती हे वर सागितलेच आहे त्याच-कृष्णाने बसवाच्या वशातील हाल बसवीदेव या वीरशैव साधूला जगमाना भोजन घालण्यासाठी एक गाव दान केला होता असा उल्लेख शके ११८२ मधील अर्जुनवाडा ताम्रपटात आहे यादवाचे काही प्रधान आणि सेनापति वीरशैव होते महाप्रधान देवराज हा महादेव यादवाचा सुभेदार लिगायतपथी होता त्याने सोला-पुराला भेट देऊन कपिलसिद्धमल्लिकार्जुनाचे दर्शन घेतले आणि त्या देवाच्या पूजेसाठी एक गाव इनाम दिला रामदेवाचा चाउडरस नावाचा एक सेनापति धर्माने वीरशैव होता तो मेला तेव्हा त्याला लिगायत पथाच्या आचारपद्धतीने पुरण्यात आले

यावरून यादवराजे स्वत वैदिकधर्माचे पुरस्कर्ते आणि कृष्णाचे भक्त असूनहि बसवाच्या वीरशैव मताला त्याचा उदार आश्रय होता हे स्पष्ट दिसते विशेषत या पथाला वैदिकधर्माचे प्रमुख अग चातुर्वर्ण्य आणि इतर आचार विचार मान्य नाहीत. एका शिवाखेरीज इतर देवताची ते उपासना करीत नाहीत.

नव्हे तर सुज्ञ लोक त्याबद्दल आपली तारीफच करतात. परंतु नीचाच्या निष्कारण निंदेला आपण भ्यालों तर सुज्ञ लोक आपणास मूर्ख म्हणतात.

आणखी असें कीं, आपण कांहीं काम करावयास निघालों असतां नीच लोक आपली निंदा करावयास सदा तत्पर असतात. तथापि कर्मधर्मसंयोगानें ही निंदा कधीं कधीं सकारण ठरते. असल्या प्रकारच्या निंदेच्या योगानें आपल्या कामांतील दोष आपणांस कळून येऊन आपली सुधारणा होते. नीचांस भिऊन जर आपण कोणतेंच काम करावयास हातीं घेतलें नाहीं, तर अशा प्रकारें आपल्यामध्यें सुधारणा होण्याचा मार्गच नसतो. नीचांनीं केलेली निंदा कधीं कधीं हितपरिणामी होते, म्हणूनच एका साधुपुरुषानें म्हटलें आहे, " निंदकाचें घर असावें शेजारीं ! "

पुष्कळ लोकांचे ठायीं मत्सरादि दुष्ट मनोविकार असतात कित्येक नीच लोकांना हे दुष्ट मनोविकार लपविता येत नाहींत, आणि त्यांनीं निंदा केली असतां तींत मत्सर स्पष्ट दिसत असतो, आणि तेणेंकरून तेच लोक उपहासास पात्र होतात. परंतु कित्येक नीच लोक इतके पटाईत असतात, कीं तें आपला मत्सर पूर्णपणें झांकून ठेवितात, आणि साधुपुरुषाच्या सत्कृत्याला विनाकारण नांवें ठेवीत असतात. पहिल्या प्रकारच्या नीच लोकांपेक्षां हे दुसऱ्या प्रकारचे नीच लोक अर्थात जास्ती भयंकर असतात. कारण, हे दुसऱ्या प्रकारचे नीच लोक संभावितपणाचें पांघरूण घेऊन निंदा करीत असतात. ज्याला असले संभावित नीच लोक ओळखितां येणार नाहींत, तो अर्थात खचून जाईल, आणि हातीं घेतलेलें सत्कृत्य अर्धेंच सोडून देईल, असें करणें बरोबर नाहीं.

वर केलेल्या निरूपणावरून वाचकास कळून येईल कीं सद्धेतूनें प्रेरित होऊन जे लोक आपले दोष दाखवितील, त्यांच्या म्हणण्याचा आपण विचार करावा. परंतु जे लोक हाडाचे नीच असतात, त्यांना ओळखून त्यांच्या निंदेकडे आपण लक्ष देऊं नये, आणि जें कांहीं करावयाचें आपण योजिलेलें असेल, तें नेटानें, उत्साहानें आणि शांत मनानें पुरें करण्याच्या मार्गास आपण लागावें.

## ८२. जनावरांशीं निर्दयपणाची वागणूक.

जनावरांशीं निर्दयपणानें वागण्याची प्रवृत्ति सर्व काळीं आणि सर्व

देशात कोणच्या नाही कोणच्या तरी प्रकारची दृष्टीस पडते ही प्रवृत्ति अत्यत निंद्य आणि लाजीरवाणी आहे, असे म्हणणें भाग आहे

जनावराशीं निर्दयपणान वागण्याचे प्रकार पुष्कळ आहेत. युरोपातील मुलें केवळ गमतीखातर माजराचीं किंवा कुतऱ्यांचीं पिलें पाण्यात बुडवून त्यास ठार मारितात, किंवा त्याच्या डोळ्यात सुया खोचून त्यांस आधळीं करितात, आपल्या देशातील मुलें शिमग्याच्या दिवसात गाढवाचे केवळ गमतीखातर हाल करितात, दिवाळीच्या दिवसात गाढवाच्या शेपट्यास फटाक्याच्या माळा बाधून त्या पेटवून द्यावयाच्या, आणि गाढवें घाबरून सैरावैरा पळू लागलीं म्हणजे ती गमत पहावयाची. ही मुलाची प्रवृत्ति अतिशय निंद्य आहे, ह्यात शका नाहीं. परतु मोठ्या माणसाच्या ठायींही ही प्रवृत्ति पाहून आपणास आश्चर्य वाटते. डुकराच्या सर्वांगावरील केश भादरून काढून त्याला लोणी चोपडून धावडविणें, आणि तें जिवासाठीं पळत असता त्याच्या मागून दहा दहा माणसानीं धावून त्याला पकडण्या-साठीं त्याच्या तगड्या, डोकें, कान, शेपूट, वगैरेंची हिसकाहिसक करणे, हा करमणुकीचा प्रकार पुष्कळ देशात आढळतो आपल्या देशात बैल, रेडे, गाढवें वगैरे भारवाहक जनावरास त्याचे हाकणारे फार क्रूरपणानें वाग-वितात, त्याच्या जिवापाड ओझें त्याना वहावयास किंवा ओढावयास लावणें, किंवा तीं जनावरें दमलेलीं असता त्याच्याकडून काम करून घेणें, त्याना पोटाला पुरेसें न घालणें, हे प्रकार तर बाजलाच राहोत. परतु त्यास जलद चालण्यासाठीं काठ्या मारणें, त्याच्या शेपट्या मुरगाळणें, त्याच्या अगात खचाखच पराण्या भोंसकणें, हे प्रकार पाहून आपणास अति वाईट वाटते आणि मानवी प्राण्याचा क्रूरपणा इतक्या थराला गेलेला पाहून खति वाटते !

मुक्या जनावरांना दुःख देणें ह भित्रेपणाचे लक्षण होय. ज्याना आपले दुःख, आपल्या वेदना, बोलून दाखविता येत नाहीत, ज्याना कोणी त्राता नाहीं, ज्यांचे जन्मजात स्वातत्र्य आपण आपलपोटेपणानें आणि जबरद-स्तीने हिरावून घेतलें आहे, अशा प्राण्यांस दुःख देणें हे भ्याडपणाचे काम होय. सुधारलेल्या देशांत असे प्रकार चालत असणें, ही आश्चर्याची गोष्ट होय !

मुक्या जनावरास निर्दयपणानें वागविणें हें जसें न्याडपणाचें द्योतक आहे, तसेंच कृतघ्नपणाचेंही द्योतक आहे. बैल, रेडे, घोडे, गाढवें वगैरे प्राणी जन्मभर आपल्यासाठीं देह झिजवीत असतात हे प्राणी आपलीं शेतें नागरितात, गाड्या ओढतात, माणसांना वाहून नेतात, भार वाहतात, अशा अनेक प्रकारांनीं ते आपल्या उपयोगीं पडत असतात. ह्या प्राण्यांचे आपणावर मोठे उपकार आहेत. म्हणून त्यांना वाईट रीतीनें वागविणें हें अत्यंत कृतघ्नपणाचें काम होय, ह्यांत संशय नाहीं !

ह्या प्राण्यांचें जन्मजात स्वातंत्र्य आपण आपल्या सोयीसाठीं आणि सुखासाठीं हिरावून घेतों, हा तर एक आपला आपलपोटेपणा आहेच, आणि त्याच्या भरतीला आपण त्यांस वाईट रीतीची वागणूक देऊं नये. त्यांस चांगली वागणूक दिली, तर ते आपणावर ममता करितात.

आपणा मानवी प्राण्यास जशा सुखदुःखाच्या भावना आहेत, तशाच मुक्या जनावरासही आहेत, आपणास जसें सुख हवेसें वाटतें, आणि दुःख नकोसें वाटतें तसेंच मुक्या जनावरासही वाटतें. मग आपण त्यांच्या सुखाची काळजी न वाहणें, व त्यांच्या दुःखाची पर्वा न करणें, हें आपणास योग्य नाहीं.

## ८२ वक्तशीरपणा.

आपलीं कामें अगदीं ठरविलेल्या वेळीं करण्याचा जो गुण, त्याला ' वक्तशीरपणा '' असें म्हणतात हा गुण समाजांत राहणाऱ्या सर्व माणसांस अत्यंत आवश्यक आहे. ता गुण अंगीं असला, म्हणजे सर्व कामें नीट आणि सुरळीतपणें चालतात,आणि तो नसला, म्हणजे प्रत्येक कामांत घोटाळा उत्पन्न होऊन ते बिघडतें

मनुष्याच्या अंगीं वक्तशीरपणाचा गुण नसल्यानें त्यास नुकसान सोसावें लागतें, इतकेंच नव्हे, तर इतरांसही त्यापासून गैरसोय सोसावी लागते. प्रथम बेवक्तशीर मनुष्याचें स्वतःचें जें नुकसान होतें, त्याच्याबद्दल आपण विचार करूं.

कोणी आळशी मनुष्यानें आपलें कांहीं एक काम हातीं घेण्याला उशीर लाविला, तर तें काम संपावयालाही उशीर लागतो, आणि तेणेंकरून त्याच्या पुढचेंही काम हातीं घेण्याला उशीर होतो. हें दुसरें काम उशीरा संपलें, म्हणजे तिसऱ्यालाही उशीर होतो, आणि असें होता होता शेवटचें

काम पुरता वेळ न मिळाल्याकारणानें अपुरें रहातें किंवा बिघडतें, किंवा अगदीं पहिलें काम हातीं घ्यावयाला उशीर लागला म्हणून जर तो मनुष्य तें काम घाईघाईनें ठरलेल्या वेळेंत पुरें करूं लागेल, तर तें बिघडेल ह्यांत संशय नाहीं. जो मुलगा वक्तशीर नसतो, तो उशिरा उठतो, उठावयाला उशीर झाला म्हणजे अभ्यास करावयास त्याला पुरता वेळ मिळत नाहीं. त्यामुळें तो कच्चा राहून शाळेंत गुरुजींकडून त्याला रागें भरून घ्यावें लागतें. एकादा अभ्यास संपवून मग उठावयाचें असें त्यानें केलें तर आंघोळीला उशीर होतो, आणि जेवावयालाही उशीर होतो, तेणेंकरून त्याला शाळेंत जावयाला उशीर होऊन त्याचे घटेचे मार्क बुडतात. जी गोष्ट विद्यार्थ्यांस लागू, तीच गोष्ट मोठ्या माणसांनाही लागू. वेळच्या वेळीं कामें न केल्यानें प्रत्येकाचें नुकसान होतें. एकादा कारकून वक्तशीरपणें कचेरीस जात नसला, तर त्याचीं कामें वेळेवर तयार होत नाहींत, आणि त्याचेवर वरिष्ठाची गैरमर्जी होते. तेणेंकरून बढतीच्या प्रसंगीं तो मागें पडतो. जो मनुष्य वक्तशीर नाहीं, त्याला आपल्या सामानसुमानाची बांधाबांध करून रेल्वेस्टेशनावर जावयाला उशीर होतो, आणि त्याला आगगाडी न सांपडून हिरमुष्टें होऊन घरीं परत यावें लागतें. जो शेतकरी पावसाचें धोरण जाणूनही पेरणी, लावणी, वगैरे कामें वेळेवर करीत नाहीं, त्याला विपुल पीक मिळत नाहीं. एकाद्या जागेसाठीं अर्ज करावयास कोणी मनुष्यानें उशीर केला, तर इतर उमेदवारांचे अर्ज अगोदर जाऊन त्याला ती जागा मिळत नाहीं. असे बेवक्तशीरपणापासून होणारे तोटे जितके सांगावे तितके थोडे.

एकाद्या मनुष्याच्या बेवक्तशीरपणापासून त्याचेंच नुकसान होतें असें नव्हे, तर इतरांसही त्याचे योगानें गैरसोय सोसावी लागते, इतरांचींही कामें जीं त्याच्यावर अवलंबून असतात तीं बिघडतात, आणि अन्य प्रकारांनींही इतरांना त्याच्या बेवक्तशीरपणाचा त्रास होतो. एकाद्या ठिकाणीं भोजनास जावयास जर कोणी उशीर लावला, तर इतरांस त्याच्यासाठीं तिष्ठत बसावें लागतें. एकाद्या जत्रेस किंवा नाटकास जावयाचा बेत कांहीं मंडळींनीं ठरविलेला असला, आणि त्यांपैकीं एक मनुष्य वेळेवर न आला, तर इतरांस खोळंबावें लागतें, आणि त्याच्या रंगाचा भंग होतो. कुटुंबांतील मिळविणारा मनुष्य वक्तशीर नसला, तर त्याचें जें नुकसान होतें तें त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या माणसांसही भोगावें लागतें।

वर सांगितल्याप्रमाणे वक्तशीरपणाचा गुण अंगी नसल्याने होणारे दुष्परिणाम ज्याचे त्यास भोगावे लागतात, इतकेंच नव्हे, तर ते इतरासही भोगावे लागतात. यासाठीं वक्तशीरपणाचा गुण प्रत्येकानें आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. तसेंच आईबापानींही तो गुण आपल्या मुलाच्या अंगीं येईल, अशी तजवीज केली पाहिजे

## ८४. करी नराला धनलोभ राक्षस !

मनुष्याच्या मनामध्ये द्रव्याचा लोभ योग्य मर्यादेच्या बाहेर गेला असता त्याची वृत्ति आणि आचरण ही राक्षसाच्या प्रमाणे होतात

असें होण्याचें एक कारण हे आहे, कीं धन हें सर्व प्रकारची सुखे मिळविण्याचे एक मुख्य साधन आहे. मनुष्याला सुखासाठीं धन मिळविण्याची इच्छा होणें रास्त आहे. परंतु ही इच्छा उत्तरोत्तर मर्यादेच्या बाहेर जाते, आणि सुखसंवनासाठीं पैसा मिळविणे हें बाजूलाच राहून पैशासाठींच पैसा मिळविण्याकडे मनुष्याचा कल होतो असा एकदा मनाचा कल झाला म्हणजे मुख्य गोष्ट बाजूला राहून गौण गोष्टीचेंच महत्त्व वाढतें, आणि तेणेंकरून मूर्खपणाच्या वर्तनाला सुरवात होते. शेतामध्ये उत्तम पीक येण्याला खताची जरूरी असते, आणि जर कोणी शेतकऱ्याने विपुल धान्य येण्यासाठीं शेतांत खत साठविलें, तर ते वाजवी आहे, पण जर तो शेतात खताच्या राशीच्या राशीच जागोजाग साठवू लागला, तर तेथें घाण होईल, किडे, डांस, चिलटे, वगैरे घातक प्राणी उत्पन्न होतील आणि धान्याचें पीक येणें बाजूलाच राहून शेतकऱ्याला नसता उपद्रव होऊं लागेल !

धनाच्या अमर्याद लोभामुळे मनुष्याचा कल भलत्याच गोष्टीकडे होतो, इतकेंच नव्हे, तर पैसा मिळविण्यासाठीं तो प्रत्यक्ष पापे देखील करूं लागतो. पैशासाठीं खोटें बोलणें, खोटे दस्तऐवज करणें चहाड्या करणें, साधुजनाचा छळ करणें. खून करणें, 'अंग गलितं पलितं मुंडं' अशी शरीराची दशा झाली तरी दास्य करीत राहणें ह्या गोष्टी हरहमेश घडतांना आपण पाहतों

धनाचा लोभ अमर्याद झाला म्हणजे मनुष्याला आपल्या खऱ्या कर्तव्याचा विसर पडतो, आपल्या देशासंबंधानें, आपल्या समाजासंबधानें, आपल्या कुटुंबासंबधानें आणि खुद्द आपणा स्वतःच्या संबधाने, आपली जीं कर्तव्यें

आहेत, तीं कर्तव्यें तितकीं करण्यास प्रत्येक मनुष्यानें झटलें पाहिजे. परंतु मनुष्य पैशाच्या पाठीस लागला, म्हणजे ह्या कर्तव्याची त्याला विस्मृति पडते, आणि तो पैशासाठीं प्राण टाकीत असतो! मनुष्य कर्तव्यपराङ्मुख झाला, म्हणजे त्याला मनुष्यपणाचें नावच शोभत नाहीं!

मनुष्याचा धनलोभ अमर्याद झाला म्हणजे पवित्र, उदात्त, आणि भूषणावह अशा मनोवृत्ति अगदीं लयास जातात. पैसा मिळविण्यासाठीं म्हाताऱ्या नवऱ्याला पोटची पोर देणें, आपल्या मुलाच्या विद्येसाठीं ऐपत असूनही योग्य तितका पैसा खर्च न करणें, देहधारणासाठीं ससत्त्व अन्न खाण्याची ऐपत असता मुलाबाळांस रूक्ष अन्न खाऊ घालून पैसा वाचविणें, मित्राशीं बेइमान होणें, उपकारकर्त्याशीं कृतघ्न होणें, ह्यापेक्षा अधिक लाजिरवाण्या गोष्टी आपणास क्वचितच पहावयास मिळतील! अशाही लाजिरवाण्या गोष्टी करणारे लोक आपणास जगात थोडे आढळतात असें नाहीं, असें भारी दिलगिरीनें आपणास म्हणावें लागतें! असल्या लोकांस राक्षस या नावावाचून दुसरें कोणतेंही नाव यथार्थ होणार नाहीं!

वरील सर्व विवेचनावरून वाचकांची खात्री होईल कीं, धनलोभानें मनुष्याच्या मनोवृत्ति राक्षसी होतात इतकेंच नव्हे तर त्याचें आचरणही राक्षसीच होतें!

## ८५ युद्ध.

दोन किंवा अधिक निरनिराळ्या देशांत, किंवा एकाच देशांतील दोन भिन्न पक्षांमध्यें, एकाद्या गोष्टीसंबधानें वाद उत्पन्न झाला व तो शांतपणाच्या रीतीनें व गुण्यागोविंदानें मिटण्यासारखा नसला, म्हणजे तो देश किंवा ते पक्ष एकमेकांशीं प्राणहानिकारक शस्त्रास्त्रांनीं भांडावयास सिद्ध होतात. अशा प्रकारच्या भांडणास "युद्ध" असें म्हणतात. वादाचा निकाल लावण्यासाठीं जशीं युद्धें होतात, तशींच शूर पुरुषांच्या महत्त्वाकांक्षेमुळेंही होतात. असल्या दोन्ही प्रकारचीं युद्धें फार प्राचीन काळापासून चालत आलीं आहेत

जें राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे पुष्कळ लोक मारतें, तें राष्ट्र बहुधा विजयी ठरतें, परंतु कधीं कधीं असें घडतें कीं, ज्या राष्ट्राला जय प्राप्त होतो त्या राष्ट्राचे अधिक लोक मरण पावलेले असतात

युद्धामध्ये नेहमी सत्याचाच जय होतो असे नव्हे. ' बळी तो कान पिळी, ' या नियमाने युद्धाचे निकाल लागत असतात.

ज्या राष्ट्राचे दरम्यान युद्ध चालत असते. त्या राष्ट्राचे त्यापासून फार नुकसान होते. त्यापासून पैशाची नासाडी होते, विद्या, शेतकी, व्यापार, कारखाने, वगैरे अंशतः किंवा सर्वथैव बंद पडतात, कलाकौशल्याची वृद्धि न होता कधी कधी त्यांची पिछेहाट होते, हजारो तरुण देशभक्त नाहींतसें होतात. शेकडो कुटुंबे उघडीं पडतात, व कधीं कधी सबंध राष्ट्रचें राष्ट्रच रसातळास जातें !

लढाईला अतोनात पैसा लागतो. हल्लीं फक्त दोनच तास जरी लढाई चालू ठेविली, तरी तेवढ्या अवकाशात लाखो रुपयाचा फन्ना उडतो !

प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या युद्धांच्या हत्यारात पुष्कळ फरक पडला आहे. अर्वाचीन काळी प्राणहानीचीं शस्त्रास्त्रे पूर्वींहून फार भयंकर झाली आहेत. हल्लींच्या दर मिनिटास शंभर गोळे सोडणाऱ्या तोफा, डायनामाइटचे सुरुंग, वगैरे वगैरे पाहून पूर्वीच्या लोकांनी तोंडात बोटच घातले असते !

युद्ध चालू नसून जरी सर्वत्र शांतता असली, तरी युद्धाची तयारी ठेवण्यासाठी देखील पैशाची जरूरी लागते. सुधारलेल्या राष्ट्रांतही शिक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबींत होणारा खर्च लष्करी खात्याच्या खर्चाच्या निम्याहून बराच कमी असतो.

मनुष्यप्राणी आपणास ज्ञानी म्हणवितो, व क्षुद्र स्वार्थाकरितां लढाई करून लाखो लोकांचे जीव घेतो, हा त्याचा केवढा तरी सुधारलेला रानटीपणा आहे ! हल्लीसुद्धा अल्पकालांत, अल्पश्रमानें प्राणाची हानि करणारीं उपकरणें जो शोधून काढील, त्याची वाहवा सुधारलेली राष्ट्रे करतात, आणि उपकरणे जवळ ठेवून लढाईची जय्यत तयारी ठेवणें, हें सुधारणेचे एक अंग मानतात. ज्या राष्ट्राच्या जवळ अशी तयारी नाहीं, त्याला मागासलेले राष्ट्र—किंवा अप्रत्यक्षपणे रानटी राष्ट्र—मानतात.

युद्ध हे मनुष्यप्राण्यास अत्यंत हानिकारक आहे. तेव्हां युद्धे बंद करण्यास आणि होता होईतोपर्यंत तडजोडीनें सर्व तंटे मिटविण्यास प्रत्येक राष्ट्राने मनोभावाने झटले पाहिजे. युद्धापासून होणारी प्राणहानि व द्रव्यहानि मनांत आणून अलीकडे मोठमोठी राष्ट्रे आपआपसात तडजोड करून तंटे मिटवू

लागलीं आहेत. काहीं वर्षांमागे हेग येथें भरलेल्या कानूफरन्सवरून वरील विधानाची सत्यता लक्ष्यांत येण्याजोगी आहे.

### ८६. मिठाची केली वाण आणि लोणच्याची झाली घाण !

लोणच्यांत कांहीं ठराविक प्रमाणात मीठ घालावें लागतें. पैसे वांचविण्यासाठीं आपण प्रमाणापेक्षा कमी मीठ घातलें, तर तितके आपले पैसे वांचतील हें खरें आहे, परतु मीठ कमी झालें या कारणानें लोणचें नासेल. आणि आपलें मोठें नुकसान होईल. त्याप्रमाणें ससरामध्यें एकाद्या अल्प बाबीबद्दल होणारा खर्च अगदीं अल्प आहे असें म्हणून तो खर्च वाचविण्याची आपण इच्छा केली, तर पुढें ह्या खर्चाच्या कितीतरी पटीनें खर्च आपणास करावा लागेल !

गलबत, घर, दुकान, कारखाना, वगैरेमध्यें मौल्यवान् माल सांठविलेला असतो. गलबत बुडाल्यास किंवा तें घर जळाल्यास मालकाचें अतोनात नुकसान होतें. यासाठीं तें गलबत किंवा घर वगैरेचा विमा उतरण्याची चाल आहे. मालाच्या मानानें अगदीं स्वल्प म्हणजे शेकडा तीन किंवा चार टक्के विमाकंपनींत पैसे भरल्यानें मालकास ही नुकसानाची भीति रहात नाहीं. परतु जर कोणी मालक हे विम्याचे पैसे खर्च करणार नाही, आणि दुर्दैवानें तें गलबत बुडालें, किंवा तें घर वगैरे जळालें, तर त्यानें वाचविलेल्या पैशाच्या शेकडो पटीनें मोठं असें त्याचें नुकसान होईल !

घरांत कोणी मनुष्य आजारी असला, तर त्याच्या औषधपाण्याबद्दल योग्य तो खर्च केलाच पाहिजे. हा खर्च वांचविण्यासाठीं औषधपाण्याची टंगळमगळ केली, तर कदाचित् तो आजार वाढून त्यात त्या मनुष्याचा अतही होईल. मनुष्यमरणाची ही हानि अल्प आहे काय ?

आईबापांनी मुलांच्या विद्येकरितां शक्य तितका पैसा खर्च केला पाहिजे. मुलगा विद्वान् झाला म्हणजे तो पुष्कळ पैसे मिळवितो, आणि त्याचें व त्याच्यावर अवलबून असलेल्या माणसांचें आयुष्य सुखानें जातें. परतु हा विद्येसाठीं खर्च करावयास आईबाप कचरलीं, तर मुलास विद्या प्राप्त होत नाहीं, त्याला पैसे मिळत नाहीत, आणि तो सर्वथैव किंवा काहीं तरी अशानें दुसऱ्यावर भारभूत होऊन रहातो. अशा स्थितींत त्याला सुख काय होणार !

वरील म्हणीपासून व्यापारी लोकांनीही बोध घेण्याजोगा आहे. आपला माल खपावा अशी इच्छा असल्यास जाहिराती देणे आवश्यक आहे. जाहिराती दिल्याने लोकास मालाची माहिती होऊन त्याना जो माल पाहिजे असतो तो ते विकत घेतात. अशा जाहिरातींकरिता व्यापाऱ्यास जो खर्च येतो, तो त्या मालाच्या किमतीपेक्षा पुष्कळच कमी असतो. हा एवढा खर्च जर कोणी व्यापारी करावयास कचरला तर त्याचा माल पडून राहून त्याचं मोठेच नुकसान होते !

वरील विवेचनावरून वाचकाची खातरी होईल कीं, आवश्यक जो खर्च तो केलाच पाहिजे. तो वाचविण्याचा प्रयत्न केल्यानें मोठी नुकसानी होते.

## ८७. विपत्ति.

एकाद्या कामी यश प्राप्त न झाल्याकारणानें, किंवा अत्यंत आतुरतेनें इच्छिलेली वस्तु न मिळाल्याकारणाने, किंवा सुखाची साधने गमावल्यामुळे आलेली जी खिन्नतेची स्थिति, तिला " विपत्ति, " असं म्हणतात. ह्या स्थितीत मनुष्य असला म्हणजे त्याच्या मनाला यत्किंचित् उत्साह नसतो, आणि तो निराशेने अगदी दडपून गेलेला असतो. अर्थात्, अशा स्थितीत आपण असावे अशी इच्छा करणारा मनुष्य जगात कोणी सापडणार नाही. प्रत्येक मनुष्य सुखस्थितीचीच इच्छा करणार, आणि हे साहजिकच आहे. तथापि विपत्तीचा काहीच उपयोग नाही, असे मात्र नव्हे.

विपत्ति जरी भोगकाळी दुःख देते, तरी शेवटी ती आपणास हितकारकच होते. डांस वगैरे प्राणी अपणास अतिशय दुःख देतात, तरी ते आपणास स्वच्छता राखण्यास भाग पाडतात. ह्यामुळे घरात तसल्या प्राण्याचा प्रादुर्भाव परिणामी हितकारक होतो. त्याप्रमाणें विपत्ति ही जरी सर्वांना अप्रिय अशी वाटते, तरी परिणामी ती सर्वथैव अहितकारच असते असे नव्हे. तिच्यापासून आपणास पुष्कळ लाभ होतात, व त्यापैकीं काही प्रत्यक्ष भोगकाळींच होत असतात.

मनुष्यास विपन्नदशा प्राप्त झाली असता त्याला पहिला लाभ हा होतो कीं, त्याचें मन घट्ट होतें, म्हणजे सुखस्थितीचा एकसारखा अनुभव घेत असल्याकारणानें मनाला जो नाजूकपणा आलेला असतो, तो नाहीसा होतो. मन

नाजूक असल्याने मनुष्यास अनेक प्रसंगी त्रास होतो, तो त्रास मन घट्ट असल्यास टळतो. जगात भिन्न भिन्न स्वभावाच्या माणसांशी आपला संबंध येत असतो, आणि आपले मन नाजूक असल्यास व्यवहार सुरळीतपणे चालणे कठीण असते. ज्याचें मन नाजूक आहे त्याला भलत्याच वेळीं भीड पडते, लबाड मनुष्याशी सौम्यपणानें वागण्याकडे त्याचा कल असतो, व नालायक माणसावर विश्वास टाकण्याला तो कचरत नाहीं. परंतु ज्याचे मन जात्या घट्ट आहे त्याला वरील प्रकाराच्या अडचणी व्यवहारात सहसा येत नाहींत विपत्तीच्या योगाने मनुष्याचे मन घट्ट होते, हा काहीं लहान लाभ नव्हे.

विपत्तीच्या योगाने मनुष्याच्या मनांत भूतदया उत्पन्न होते. आपले आयुष्य सुखविलासात जात असता सहसा आपणास हीन, दीन मनुष्यास पाहून कळवळा येत नाही, व त्याच्या दुःखाचे शक्य तितके निरसन करण्याकडे आपली प्रवृत्ति होत नाही. परंतु आपण स्वतः विपन्न स्थितीत असल्यास, किंवा आपण पूर्वी कधी विपन्न स्थितीचा अनुभव घेतलेला असल्यास, दुसऱ्याचे दुःख पाहून आपल्या मनात त्याच्याविषयीं अनुकंपा उत्पन्न होते, कारण त्याच्या स्थितीशीं आपले तादात्म्य होते, त्याच्या स्थितीशीं आपण आपली स्थिति लावून पहातो, आणि आपल्या स्थितीवरुन त्या मनुष्याच्या स्थितीची आपणास बरोबर कल्पना होते, आणि त्याला यथाशक्ति मदत करण्यास आपण मनापासून झटतो. सुखी मनुष्यास परदुःख शीतल वाटते तसे विपन्न स्थितीचा अनुभव घेतलेल्या मनुष्यास वाटत नाहीं. सारांश, विपत्तीच्या योगाने मनाचा आकुंचितपणा नाहींसा होतो, आणि त्याला ' वसुधैव कुटुंबकम्'' असें वाटू लागते.

· विपत्तीच्या अनुभवाने आपणास आणखी एक फायदा होतो तो हा, की आपणास सुखाची खरी योग्यता कळू लागते. आपल्या सुदैवानें आपणास एकसारखें सुखच अनुभवावयास मिळत असले, म्हणजें त्याची किंमत आपणास कळेनाशी होऊन आपला जन्म सुखासाठीच होय अशी मूर्खपणाची आपली कल्पना होते, आणि पुढें पुढे तर ते सुखच आपणास कंटाळवाणें वाटू लागते परंतु आपणास मधून मधून विपत्तीचा अनुभव आलेला असल्यास आपल्या सुखाची चव वाढते रात्रीं दिव्याचा प्रकाश आपणास उज्ज्वल दिसतो आणि दिवसास फिक्का दिसतो, त्याचप्रमाणे विपत्तीच्या नतरचें किंवा अगोदरचे सुख आपल्या मनास मोठ्या किंमतीचे वाटतें, व त्या सुखाबद्दल आपण

ईश्वराचे उपकार मानतो. सुखी मनुष्यास ईश्वराचें स्मरण होत नाहीं. विपन्न मनुष्याला ईश्वराचा कधीं विसर पडत नाहीं.

विपत्तीविषयीं विचार केला असता आपणास हे कबूल करावे लागेल, कीं विपत्ति ही सर्वथैव वाईट आहे असें नव्हे मात्र, ती प्रसंगविशेषापुरतीच असावी.

## ८८. वाक्चातुर्य.

( कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या निबंधावरून. )

मोठ्या सभेंत उभे राहून सुरस व सयुक्तिक भाषण करून ऐकणाराचें मन वश करून घेण्याची जी कला, तिला "वाक्चातुर्य "असें म्हणतात. ही मोठी उपयोगी परंतु कठिण कला आहे. ही कला पुरी साधण्यास अनेक गोष्टींचें आनुकूल्य असावें लागतें. वाणी गोड असली पाहिजे. तसेंच ज्या विषयावर बोलावयाचें तो चांगला अवगत असून तो सुबोध करण्याची शक्ति पाहिजे. तसेंच ज्या लोकांत भाषण करावयाचें त्यांची ग्रहणशक्ति किती आहे, त्यांच्या समजुती कशा आहेत, व त्यांचे रागद्वेष कोणकोणत्या गोष्टींविषयीं आहेत, हें सर्व वक्त्याला समजलें पाहिजे. तसेंच त्याची मुद्रा व शरीर हींही भव्य असलीं पाहिजेत, व बोलतांना भाषणांतील रस त्यास मुखचर्येनें व अंगविक्षेपानें दाखविता आला पाहिजे.

ह्या गुणांपैकीं कितीएक गुण स्वभाविक आहेत व कित्येक अभ्यासानें यावयाजोगे आहेत, व जे स्वाभाविक असे आहेत, त्यांपैकीं वाही अभ्यासानें वाढण्याजोगे आहेत.

ही वक्तृत्वाची कला प्राचीन काळी आपल्या लोकांत फारच प्रगल्भ दशेस आलेली होती. सर्व लहानमोठ्या राजेरजवाड्यांच्या दरबारांत न्याय, व्याकरण धर्म, वगैरे शास्त्रामध्ये प्रवीण अशा लोकांच्या सभा होत असत त्या प्रसंगी जो पंडित प्रतिपक्ष्याच्या मताचें खंडन समर्पक रीतीनें करून आपलें मत स्थापित करी, त्याचा बहुमान केला जाऊन त्याला योग्य अशी पदवी किंवा शालजोडी देण्यात येत असे किंवा द्रव्यद्वारा त्याची संभावना केली जात असे. सभेमध्ये बोलण्याची कला प्राचीन काळीं आपले लोक गुरूपाशीं शिकत असत; आणि ते तयार झाले म्हणजे काशीपासून तों रामेश्वरापर्यंत सभामध्ये जय मिळवीत असत.

परंतु त्याच्याहीपेक्षा अधिक उपयुक्त अशा कामी वक्तृत्व करून लोकांची मनें वळविण्याची ही कला आपल्या देशामध्ये पूर्वी अत्यंत प्रगल्भ दशेला आलेली होती. तरवारीची किंवा राजदंडाची भीति न दाखविता, किंवा प्राणाहिंसेचा किंवा वचनेचा अवलंब न करता, बौद्ध भिक्षूंनी आपल्या धर्माचा प्रसार सर्व हिंदुस्थान व अफगाणिस्थान, बलुचिस्थान, इराण, तार्तरी, चीन, जपान, सिलोन, ब्रह्मदेश, सुमात्रा, वगैरे ठिकाणी, सुधारलेल्या, अर्धवट सुधारलेल्या, किंवा अगदीं रानटी लोकांत केला, तो केवळ सत्याच्या आणि वक्तृत्वाच्या जोरावर केला. आणि प्रसार झाल्यावर अन्यधर्मीयांच्या त्याच्यावर वावटळी आल्या असताही सर्व जगातील निम्मे लोक अद्यापि बौद्धधर्मीय आहेत. यावरून आपल्या लोकांत वक्तृत्वाची कला किती प्रगल्भ दशेस आलेली होती आणि तिचा उपयोग आध्यात्मिक उन्नतीकडे कसा झाला, हे स्पष्ट कळण्याजोगें आहे.

वक्तृत्वाचा गुण अंगी असणे हे फार उपयोगी असून भूषणावह आहे. मनुष्यास पुष्कळ ज्ञान आहे, अनेक गोष्टींची माहिती आहे, पण आपल्या मनांतील भाव दुसऱ्याच्या मनात आणून देता येत नाहीं, तर त्या ज्ञानाचा व त्या माहितीचा कांहीं उपयोग जगास व्हावयाचा नाहीं. एका करंड्यात हजारो रुपयाची उंची कस्तूरी झाकून ठेविली आहे, पण तिचा वास्तविक, मनोरम गंध बाहेर पडत नाहीं, तर त्या कस्तूरीच्या परिमलाने लोकांना आल्हाद कसा होईल ?

सर्व काळी व सर्व देशांत वक्तृत्वकलेची थोड्या अधिक प्रमाणात जरूर असते. धर्मोपदेशक, सार्वजनिक विषयावर बोलणारे लोक, वकील, वगैरे सर्वांस वक्तृत्वाचा फार उपयोग आहे.

सामान्य व्यक्तिव्यवहारात देखील वक्तृत्वगुणाने पुष्कळ कामे होतात. त्यासाठीं वक्तृत्वाचा गुण अंगी आणण्याचा आपण प्रयत्न करावा.

### ८९. ढेकुणाच्या संगें हिरा जो भंगला, कुसंगें नाडला साधू तैसा ॥

हिरा जरी अति टणक असतो, तरी तो ढेकणाचा स्पर्श होताच पिचतो. त्याप्रमाणें साधुपुरुषही दुर्गुणी माणसाच्या संगतीत राहिला असतां त्याच्या अंगचे चांगले गुण लोप पावून त्याच्या ठायीं त्या दुर्गुणी माणसाचे वाईट गुण येतात.

याचें एक कारण असे आहे कीं, मनुष्य हा अनुकरणशील प्राणी आहे. जे त्याच्या नजरेस पडते, किंवा जे त्याच्या कानावर येतें, तें करण्याकडे त्याची सहाजिक रीत्या प्रवृत्ति होते. घरीं जी भाषा मुले ऐकतात, तीच तीं बोलूं लागतात. ती भाषा शुद्ध असली तर त्याच्या तोंडाला शुद्ध भाषा लागते, व अशुद्ध असली तर अशुद्ध भाषा लागते. अक्षराचें जे वळण, उभे किंवा तिरकस मुलाच्या नजरेस पडते, तेच त्याच्या हाताला लागतें. जो धंदा बापाचा, त्या धंद्यातच मुलालाही गोडी वाटते. सारांश हा, कीं जे जें मनुष्यास वारवार दिसते किंवा ऐकू येते, ते तें करण्याकडे त्याचा स्वभावसिद्ध कल असतो. आणि म्हणून कोणी मनुष्य जर वाईट लोकांच्या संगतींत असला, तर त्याला त्याच्या वाईट चालीरीती लागतात.

दुसरे कारण असे कीं, तात्त्विक बोधापेक्षा प्रत्यक्ष उदाहरणाचा परिणाम मनावर लवकर होतो. आईबापानीं मुलाला खोटे बोलूं नये, चोरी करू नये, वगैरेसारखीं नीतितत्त्वें कितीहि कळकळीने उपदेशिलीं असलीं, तरी तीं बाजूलाच राहतात, आणि त्या मुलाना खोटे बोलणाऱ्याची व चोरी करणाऱ्याची संगति असली, तर तीं खोटे बोलण्यास व चोरी करण्यास कचरत नाहींत.

तिसरे कारण असे कीं, परिचयाच्या योगाने मनुष्याला वाईट गोष्टीचा वाईटपणा भासेनासा होतो. कोणी मनुष्य जात्या कितीही चांगला असला, तरी त्याचा सहवास नित्य वाईट माणसाशीं घडत असल्यास, त्याला वाईट माणसाच्या अंगच्या वाईट गुणांचा वाईटपणा जाणवेनासा होतो. जोपर्यंत वाईट गोष्टींची किळस एकाद्या माणसाच्या मनात असते, तोपर्यंत ती गोष्ट न करण्याविषयीं तो जपत असतो. परंतु एकदां का ही किळस नाहींशी झाली, म्हणजे मग ती गोष्ट करावयास त्याला हरकतच रहात नाहीं. असे झाले म्हणजे मूळचे सद्गुण नाहींतसे होऊन त्याच्या अंगीं दुर्गुण येऊ लागतात.

चवथे कारण असे कीं, कोणाही मनुष्याला छांदिष्ट किंवा फाजील सोवळा म्हणवून घेण्याची आवड नसते. कोणी मनुष्य वाईट लोकांच्या मंडळींत गेला आणि त्यांच्याप्रमाणे वाईट गोष्टी करावयास तयार नसला, तर ते लोक त्याला फाजील सोवळा म्हणून त्याचा उपहास करतात. हा उपहास टाळावयासाठीं तो त्यांच्याप्रमाणें वाईट गोष्टी करावयास प्रवृत्त होतो. मनुष्याला जीं वाईट

वाईट व्यसनें जडतात, तीं प्रथम ह्याच कारणामुळे जडतात, असें आपल्या पहाण्यांत येते.

शिवाय असें, कीं ज्या वाईट गोष्टी मनुष्य एकटा असता करावयास कचरतो त्या तो चारचौघांत गेला असता निःशकपणें करतो त्याला असे वाटत असतें कीं वाईट गोष्टीचें पातक आपल्या एकट्याच्याच माथीं न बसता आपल्या सोबत्याच्याही माथीं बसून आपल्याकडे त्याचा अगदीं थोडका अंश येईल !

वरील विवेचनावरून वाचकांना कळून येईल, कीं मनुष्याला वाईट संगत लागली असतां तो मूळचा चागला असला तरी वाईट होतो. यासाठीं आपण कोणाचीही संगत करावयाच्या वेळीं नीट विचार केला पाहिजे.

---

हा निबंध वाढवावयाचा झाला तर पुढील म्हणी व दाखले याचा योग्य स्थळीं विद्यार्थ्यानें उपयोग करावा.

( १ ) एकरात्रप्रसंगेन काष्ठघटाविटम्बनम् ।

( २ ) दुधात मिठाचा खडा पडल्यानें दुधाची मधुरता नाहींशी होते.

( ३ ) स्वच्छ पाण्यांत शाईचा एक थेंब पडला असता तें टाकाऊ होतें.

( ४ ) कोळशाशीं व्यवहार केला असतां बोटें काळीं होतात.

( ५ ) मंडळींत एकास जांभई आली असता इतरासही येऊं लागतात. एका मनुष्याला हसू आले म्हणजे इतरासही हसू येते.

( ६ ) वाईट गुण लवकर लागतात.

## ९०. जत्रा.

वर्षाच्या काहीं ठराविक दिवशी आणि काही ठराविक ठिकाणीं जत्रा भरविण्याचा परिपाठ आपल्या देशात आज हजारो वर्षांपासून चालत आलेला आहे, आणि आजमित्तीसही हिंदुस्थानात हजारो ठिकाणीं जत्रा भरत असतात. मौर्यवंशीय चक्रवर्ती अशोक—ज्याला कमीत कमी दोन हजार वर्षे झालीं—त्यानें खोदविलेल्या शिलालेखात जत्राचा उल्लेख आहे. यावरून त्याच्याही पूर्वी हजारो वर्षांपासून आपल्या देशात जत्रा भरविण्याची चाल असली पाहिजे हे स्पष्ट आहे. आपल्या पूर्वजांनीं सुधारणेची, शिक्षणाचीं, व्यापारवृद्धीची, व ज्ञानप्रसाराचीं जीं स्वयंप्रेरणेने चालणारीं यंत्रे उत्पन्न केलीं, त्यापैकीं जत्रा हे एक होय.

एकाद्या सणाच्या किंवा देवाच्या निमित्तानें, किंवा एकाद्या साधुपुरुषाच्या पुण्यतिथीसंबधानें, आपल्या देशांत जत्रा भरत असतात.

जत्राचे अनेक उपयोग आहेत, त्यांपैकीं काही खालीं नमूद करतों.

१. जत्राचा पहिला उपयोग हा आहे, कीं एकादा सण म्हणून पाळावयाच्या दिवशीं पूर्वी कोणत्या देवानें किंवा महात्म्यानें कोणकोणते पराक्रम केले किंवा लोककल्याणाचीं कामें केलीं, कोणत्या साधुपुरुषानें आपली आध्यात्मिक उन्नति करून लोकांस सद्वर्तनक्रम कसा उपदेशिला, वगैरेसंबधानें आपले विचार जागृत होतात, आणि आपणास तसें करण्याची प्रेरणा होते.

२. अशा जत्रांच्या प्रसगीं घरांतील वडील माणसें लहान मुलास त्या त्या विशिष्ट दिवसासंबधाचे इतिहास किंवा दतकथा किंवा कहाण्या सांगतात ह्यामुळें गतगोष्टींची परपरा वर्षानुवर्षे, पिढ्यानुपिढ्या, शतकानुशतकें अबाधित अशी चालू राहते, आणि तेणेंकरून लहान मुलास एक प्रकारचें शिक्षणच प्राप्त होतें.

२. अशा जत्राचे प्रसगीं हरतऱ्हेचे विकावयाचे जिन्नस, नाना प्रकारच्या कलाकौशल्याच्या चिजा, धान्यें, जनावरें, वगैरे पहावयास मिळून आपल्यास हवे ते जिन्नस एकदम आणि एके ठिकाणीं विकत घ्यावयास सापडतात, आणि आपली दहा ठिकाणीं हिंडावयाची दगदग वाचते. प्राचीन काळीं जेव्हा प्रवासाचीं साधनें हल्लींच्या इतकीं विपुल नव्हतीं, तेव्हा अशा जत्राचा फार उपयोग होत असे. व्यापारी लोकांना आपल्या जिनसांची अदलाबदल करण्यास संधि सापडत असे.

४. इतर कारागिरानीं तयार करून जत्राचे प्रसगी विकावयास आणलेले पदार्थ पाहून कल्पक कारागीर लोकाना त्यांतील गुणदोष समजून घेऊन आपली स्वतःची कारागिरी सुधारण्याची प्रवृत्ति होते. सारांश, हल्लींच्या काळीं भरणाऱ्या प्रदर्शनाचा जो उपयोग, तोच प्राचीन काळच्या जत्राचा होत असे, व अजूनही होत आहे.

५. जत्रेच्या निमित्तानें वेगवेगळ्या ठिकाणचे लोक एकत्र जमल्यानें परस्परामध्यें दळणवळण वाढून बधुप्रीति उत्पन्न होते. समाषणाच्या योगानें एकमेकांचे विचार, चालीरीति वगैरे एकमेकांस कळून मनाचा आकुंचितपणा कमी होतो. बौद्ध भिक्षूनीं अशा जत्राच्या प्रसगीं लोकांचा मोटा

जमाव होण्याची संधि साधून आपल्या धर्माच्या तत्त्वाचे विवरण करून त्याचा फैलाव केला.

वर निर्दिष्ट केलेल्या फायद्याशिवाय आणखीही जत्रापासून होणारे फायदे आहेत. यावरून जत्रा प्रचलित करण्याच्या बाबतीत आपल्या पूर्वजांनी आपणावर किती उपकार करून ठेविले आहेत, हे स्पष्ट कळण्याजोगे आहे.

पूर्वीच्या काळी जत्राच्या योगाने जें काम होत असे, ते हल्ली पुस्तकें, वर्तमानपत्रें, प्रदर्शनें, प्रवासाची सुलभ साधनें, यांच्या योगाने अशतः घडून येतें, तथापि जत्राचें महत्त्व अद्यापि बरेंच आहे.

## ९१. पापाची वासना मोडणें.

पापाची वासना मनात येताच तिचा विध्वंस करावयास आपण झटावें, हे अत्यंत हितकर आहे.

पापाच्या वासना आरंभीं आरंभीं फारशा प्रबल नसतात, आणि म्हणून त्यांचा प्रथमच उच्छेद करणे सोपे असते. परंतु ह्या वासनांकडे आपण जर प्रथम दुर्लक्ष्य केले तर त्या बळावून त्याना सवयींचे रूप येते, म्हणजे मूळारंभीं ज्या केवळ वासना असतात त्या सवयी होतात, आणि ह्या सवयी आपल्या ताब्यात रहात नाहींत, तर उलटपक्षीं आपणच त्यांच्या ताब्यात जाऊन त्यांचे दास होतों. मग पापाचा प्रतिकार करणे हे आपणास अशक्य होते.

एकादा रोग नुकताच उद्भवूं लागत असता तो योग्य उपायांनीं ताब-डतोब नाहींसा होतो. रोगाची प्रथम उपेक्षा केली तर तो बळावतो, आणि त्या हतभाग्य मनुष्यास त्याची पीडा चिरकाल सोसावी लागते, व कधीं कधीं त्या रोगाने त्याचा प्राणनाशही होतो. जे तत्त्व वैद्यशास्त्रात शरीरासंबधानें खरें आहे, तेंच तत्त्व नीतिशास्त्रात मनासंबधानेंही खरें आहे, म्हणजे पाप-वासना वेळींच जर करारीपणानें दाबिली नाहीं, तर ती वृद्धिंगत होते, व अखेरीस मनाची पवित्रता नष्ट होऊन मनुष्य नीतिभ्रष्ट होतो, आणि मग अर्थातच तो दुःखी होतो.

योग्य वेळीं पापाची वासना न दाबल्यामुळे जीं दुःखे मनुष्यास भोगावी लागतात, त्यांचीं उदाहरणें हरहमेश आणि रस्तोरस्तीं आपल्या दृष्टीस पडतात. परंतु इतिहासप्रसिद्ध उदाहरण घ्यावयाचें झाल्यास शिवाजीचा पुत्र संभाजी याचें देता येईल. हा वाईट लोकांच्या संगतीस लागल्यामुळे

त्याच्या मनातील पापाची भीति नाहींशी झाली, त्याच्या मनात विषय-वासनाचा प्रादुर्भाव झाला, हितकर्त्या लोकांचीं बोधवचनें त्यानें मनांत आणिलीं नाहींत, पापमार्गानें चालण्याचा त्याचा क्रम दृढतर होत गेला, आणि शेवटीं तो शत्रूच्या तावडींत सापडून पराकाष्ठेचे हाल सोसून मरण पावला. तो जर वेळींच आपल्या पापवासनाचा उच्छेद करण्याचा निश्चय करता, तर हे सर्व परिणाम टळून तो मोठ्या वैभवास चढून प्रजेचा कल्याण-कर्ता म्हणून प्रसिद्ध झाला असता.

जो मनुष्य सज्जनाशीं सहवास करतो, आणि नेहमीं कोणच्या तरी उद्योगात गुतलेला असतो, त्याची सहसा पापाकडे प्रवृत्ति होत नाहीं. यासाठीं वाईट माणसाची सगति सर्वथैव वर्ज करून कांहीं तरी उद्योगांत कालक्रमणा करीत असावे, म्हणजे असे होईल, कीं मनांत सहसा पापाची वासना उद्भवणार नाहीं, व उद्भवलीच, तर करारीपणानें तिचा तत्काल उच्छेद करण्याचे सामर्थ्य आपल्या अगीं येईल.

## ९२. अतिपरिचय.

अतिपरिचय म्हणजे अत्यत निकट प्रकारची सलगी. असली सलगीही, हानिकारक होते.

कोणाही माणसाशीं आपण अतिपरिचय केला असता, आपल्याविषयीं त्याच्या मनात आदरबुद्धि रहात नाही, आणि शेवटीं उभय पक्षास त्रास होतो. याचे कारण असे कीं जोपर्यंत दोन माणसात विशेषसा सबंध नसतो, तोपर्यंत त्याना एकमेकाविषयीं पूज्यबुद्धि वाटत असते, आणि सबध निकट झाला, म्हणजे ही पूज्यबुद्धि नाहींशी होऊन तिरस्कार वाटू लागतो. दुर्मळ वस्तूविषयीं पूज्यबुद्धि असते, तशी सुलभ प्राप्त होणाऱ्या वस्तूविषयीं नसते. ज्या गावात पाण्याचें दुर्भिक्ष आहे, तेथील लोक पाणी बेताबेतानें खर्च करतात, व ज्या गावात पाणी मुबलक आहे तेथे पाण्याची अतोनात नासाडी केली जाते, हे आपल्या माहितीचे उदाहरण आहे. तसेच हवा नसली तर आपण क्षणभरही जगणार नाही. तथापि तिच्याविषयीं कोणाला कधी आदर वाटतो काय? कधींही नाहीं. कारण ती आपणास विपुल मिळते, त्याप्रमाणे जीं माणसे आपणास प्रसगविशेषींच दिसतात त्याच्याविषयीं आपणास बहुमान वाटतो, आणि जीं आपल्याला नेहमीं दिसतात, त्याच्याविषयीं वाटेनासा होतो.

दुसरे कारण असें आहे, कीं दोन माणसात अतिपरिचय झाला म्हणजे हळू हळू शिष्टाचाराचा लोप होतो, आणि तीं एकमेकाशीं मोकळ्या मनाने बोलू लागतात, आणि सलगीच्या नात्याने वागू लागतात. तेणेकरून त्याना एकमेकाच्या ठायीं असलेले दोष दिसू लागतात. अशा रीतीनें दोष दिसले, म्हणजे तीं मागसें एकमेकांस आवडेनातशीं होतात.

तिसरे कारण असें, की दोन माणसाची जोपर्यंत साधी ओळख आहे, तोपर्यंत त्याची एकमेकाशी विनोद करण्याची प्रवृत्ति दाबात असते. परन्तु ही ओळख जसजशी दाट होत जाते, तसतसा त्याचा थट्टा करण्याकडे कल होतो, पुढें पुढे ही थट्टा मर्मभेदक होते, एकमेकाची वंम कर्में काढून ते बोलू लागतात. आणि मग अर्थात स्नेहाचा भग होतो.

चवथें असें, कीं दोन माणसात अतिपरिचय झाला, म्हणजे ते एकमेकास आपलीं कामे सागतात, एकमेकाजवळ पैसे उसने मागतात, व अनेक प्रसगी मदत मागतात. एकमेकाच्या उपयोगीं पडणें हा सद्गुण आहे, हे खरें आहे. तथापि जर कोणी वारवार आपली मदत मागितली, तर आपणास त्याचा कटाळा येतो, शिवाय असे, कीं मदत मागावयाची तीही पुष्कळ प्रसगीं भलत्याच कामात मागण्यात येते, आणि नीतीच्या किंवा सोयीच्या दृष्टीने ही मदत करणे योग्य नसते, म्हणून जर अशा कामीं मदत केली, तर मदत करणाराचें मन दुसऱ्याविषयीं विटते, व मदत न केली तर मदत मागणारा रागावतो. साराश, मदत केली किंवा न केली, तरी एका पक्षाचें मन दुसऱ्यावरून उडते आणि मग स्नेहाला उतरती कळा येऊ लागते.

अतिपरिचयापासून हानि होते असे आम्हीं वर म्हटले आहे, परतु हा नियम सामान्य जनासच लागू आहे. दोन्ही लोकोत्तर माणसात अतिपरिचय झाला असता, किंवा एकाद्या लोकोत्तर पुरुषाशी कोणा सामान्य मनुष्याचा अतिपरिचय झाला असता, काही हानि होत नाही, तर उलट पक्षीं लाभच होतो, हें शिवाजी आणि रामदास, श्रीकृष्ण आणि अर्जुन, रामचद्र आणि मारुति, वगैरे सारख्याच्या उदाहरणावरून व्यक्त होते. परतु सामान्य माणसासबधानें बोलताना अतिपरिचय करू नये, व दुसऱ्या कोणाचाही आपणाशी होऊ देऊ नये, हें उत्तम.

## ९३. शाळेतील सुट्टी उत्तम रीतीनें कशी घालवावी ?

ज्या मुलाने आपल्या शाळेतील पहिली सहामाही चांगल्या रीतीने अभ्यास करण्यात घालविली असेल, त्याने सुट्टीमध्ये आपले शाळेतील अभ्यास वगैरे सर्व बाजूला ठेवून आपल्या मनास पूर्ण विश्रांति द्यावी. दर सहामाहीनंतर जी सुट्टी देण्यात येते, तिचा हाच उद्देश. त्याने दररोज सकाळी व संध्याकाळी चार चार, पांच पांच मैलाची रपेट करावी, आणि त्याच्या गांवाला नदी, तळें, किंवा एकादी प्रशस्त विहीर असल्यास कधीं कधीं पोहावयासही जावें. बाकी राहिलेला वेळ पुस्तकें वाचण्यात न घालविता मित्रमंडळींशीं उपयुक्त किंवा गमतीच्या विषयावर बोलण्यांत घालवावा.

मन हे एक नाजूक यंत्र आहे, आणि त्याला मधून मधून पूर्ण विश्रांति लागते. एकाद्या मुलाला जर वाटले, कीं आपल्या मनाला विश्रांति पुरेशी मिळाली आहे, तर त्याने मागील अभ्यासाची उजळणी व थोडे पुढील अभ्यास दररोज थोडथोडे केले असता चालेल. परंतु हा अभ्यास करणें हे सुट्टींतील मुख्य कर्तव्य असे त्याने समजू नये, तर शारीरिक व्यायाम घेणे हेच मुख्य कर्तव्य समजावें. त्याने रात्री कोणच्याही तऱ्हेचा अभ्यास करू नये.

शाळा चालू असता एकादा जरूरीचा अभ्यास करणे असल्यास त्यानें रात्रीं जागून तो पुरा करावा, परंतु सुट्टीमध्ये रात्रीं कधींही जागरण करू नये. इंग्रजी भाषेत एक म्हण आहे, कीं " जो लवकर निजतो व लवकर उठतो, तो सशक्त, संपत्तिमान् आणि विद्वान् होतो. " ह्या म्हणीप्रमाणे चालणे फायदेशीर आहे.

ज्यानें आपली पहिली सहामाही सुट्टीच्या दिवसाप्रमाणें घालवून वेळेचा दुरुपयोग केला असेल. त्याने मात्र आपली सुट्टी वर सांगितल्या रीतीनें घालवू नये. त्यानें आपल्या शिक्षकाच्या मदतीची अमूल्य संधि गमावली, म्हणून तें नुकसान शक्य तेवढे सुट्टीमध्ये त्यानें झटून अभ्यास करून भरून काढण्याचा प्रयत्न करावा, व अशा रीतीने तो आपला अभ्यास करू लागला तर त्याचे आप्तइष्ट व मित्रमंडळी यांस खात्रीनें आनंद होईल. त्याने एक वेळापत्रक करावें, व त्याप्रमाणें सर्व अभ्यास होईपर्यंत त्यानें आपळा वेळ खेळण्याकडे घालवू नये. अशा रीतीनें त्याचें मागील सहामाहींत झालेलें नुकसान थोडेबहुत तरी भरून निघेल, व हुषार मुलाला जशी सबंध सुट्टी चैनींत घालवावयास मिळते, तशी ह्याला थोडीबहुत तरी

मिळेल. त्याने पुनः ताजेतवाने होऊन अभ्यास करण्यास व मागील चुकी दुरुस्त करण्याच्या इराद्याने पुन: शाळेत जावें.

ज्या मुलाचे पालक त्याना सुट्टीमध्ये हवापालट करण्यास पाठविण्याइतके श्रीमत असतील, तीं मुले खरोखर दैववान समजलीं पाहिजेत.

हवापालट करणें ही फार हितावह गोष्ट आहे. हवापालट करण्यास थोडा प्रवास लागतोच, व प्रवासाच्यायोगें ज्ञान मिळतें, परतु ही गोष्ट श्रीमत लोकांची आहे, तरी गरीब मुलांनींसुद्धा थोड्याबहुत प्रमाणानें हवापालट करून पुढील अभ्यास नेटानें व हुपारीने करण्यास ताजेतवाने होऊन यावें.

## ९४. आंथरूण पाहून पाय पसरावे.

आपले आथरुण किती मोठें आहे हे पाहून त्यावर आपले हातपाय ताणावे, म्हणजे ते जमिनीवर जाणार नाहींत, व त्यांना थडी. वारा, धूळ, वगैरे कांही लागणार नाहीं. त्याचप्रमाणें आपली ऐपत पाहून खर्च करावा. नाहीतर आपणास कर्ज होऊन आपणास दु:खकारक स्थिति प्राप्त होईल.

वरील म्हणींत उपदेशिलेलें तत्त्व फार मूल्यवान् आहे. आपला आदा काय आहे हे नीट पाहून त्याच्या आत, व फार झाले तर त्याच्या इतका, खर्च करावा. हा निर्बंध पाळणें सर्व प्रकारांनीं इष्ट आहे. आपल्या स्वत:च्याच सुखाचा जरी विचार केला, तरी आपल्या आद्यापेक्षां खर्च जास्ती न होऊ देणें ह्यातच शहाणपण आहे. एकाद्या श्रीमत मनुष्याने बायसिकल घेतली, किंवा बाजाची पेटी घेतली, म्हणून आपणही तशी घेतली, तर तिच्यापासून आपणास सुख होईल हे खरे आहे. परतु चैनीच्या वस्तूसाठीं खर्चिलेला पैसा आपल्या अद्याच्या बाहेर असल्याकारणानें आपणांस कर्ज तरी काढावें लागतें, किंवा जरुरीच्या वस्तु विकत घेण्यास पैसा न उरल्याकारणानें अडचण तरी काढावी लागते कर्ज कसे फिटेल ही विवंचना, किंवा जरुरीच्या वस्तु न मिळाल्याकारणाने होणारी आडचण, हीं आपणास सोसावी लागते. आणि चैनीच्या पदार्थावर आपल्या ऐपतीच्या बाहेर खर्च केल्याबद्दल आपणास परिणामीं दुःख होतें.

आद्यापेक्षां कमी खर्च करणें हें जसे आपल्या स्वतःच्या सुस्थितीच्या दृष्टीनें जरूर आहे, तसेंच तें कर्तव्याच्या दृष्टीनेंही आवश्यक आहे. जी वस्तु विकत घेण्याची आपणास ऐपत नाही, ती विकत घेतली असता आपल्या

कुटुंबातील माणसें—जीं आपणावर अवलंबून असतात—त्याच्या सुखावर आपण घाला घालतों असें होतें. कारण, जो पैसा कुटुंबपोषणाकडे लावावयाचा, तो आपण आपल्या चैनीकडे खर्च करतों. असें केलें म्हणजे आपण आपल्या कुटुंबासंबंधानें जें आपलें कर्तव्य तें बजाविलें नाहीं असें होतें.

आपल्या आयापेक्षां जास्ती खर्च करणें हें नीतीच्या बाजूनेंही गैर आहे. कारण, जीं सुखें, विलास किंवा चैनी, भोगावयास एकाद्या माणसाची ऐपत नाहीं, तीं सुखें, ते विलास व त्या चैनी, जर तो भोगूं लागला, तर लोकांना तो आहे त्यापेक्षा जास्ती श्रीमंत वाटूं लागतो. लोकांचा असा खोटा ग्रह होऊं देणें म्हणजे त्यांना फसविणेंच होय! प्रत्यक्ष खोटें बोलणें हें जसें पाप होय, तसेंच आपल्या खोट्या वर्तनानें लोकांचा खोटा ग्रह होऊं देणें हेंही पापच होय.

वर सांगितल्याप्रमाणें आयापेक्षां जास्ती खर्च केल्यानें मनुष्य स्वतः दुःखें व संकटें भोगतो इतकेंच नव्हे, तर त्याच्यावर अवलंबून असलेल्या माणसासंबंधानें त्याचें जें कर्तव्य तें तो बजावीत नाहीं, आणि शिवाय नीतीचें उल्लंघन करून समाजास वाईट उदाहरण घालून देतो. यासाठीं आपल्या आयापेक्षा जास्ती खर्च न होऊं देण्याविषयीं आपण जपत असावें.

### ९५ एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये.

अमक्या माणसानें गाय मारण्याचें घोर पातक केलें, म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारावयाचें लहानसें पातक करावयास हरकत नाहीं, असें समजणें हें चुकीचें आहे.

कारण, एका मनुष्यानें कांहीं वाईट गोष्ट केली ह्या सबबीवर दुसरा जर तीच किंवा तसलीच वाईट गोष्ट करावयास प्रवृत्त झाला, तर दुसऱ्याचा गुन्हा क्षम्य ठरेल असें नव्हे. पहिल्याच्या वाईट कृत्याबद्दल पहिल्यास लोक दोषी समजतील आणि दुसऱ्याच्या वाईट कृत्याबद्दल लोक दुसऱ्यालाही दोषी समजतील. दोन्ही कृत्यें वाईटच आणि तीं करणारीं दोन्ही माणसें गुन्हेगारच होत. पहिल्याच्या वाईट कृत्यानें दुसऱ्याच्या वाईट कृत्याचें समर्थन होणें अशक्य आहे.

दुसरें असें, कीं कोणी एकादें दुष्कृत्य केलें, तर तज्जन्य पश्चात्तापाचें दुःख

त्याला भोगावें लागते. तसलेंच किंवा त्याहून अधिक भयकर दुष्कृत्य दुसऱ्या एकानेंही केलें आहे, ह्या विचाराने त्याचे हे पश्चात्तापाचें दुःख तिळभरही कमी व्हावयाचे नाहीं. तें दुःख त्याचे त्यालाच, आणि पूर्णपणें, भोगावें लागते. तात्पर्य असें, कीं आपण केलेले दुष्कृत्य पूर्वी कितीही पुष्कळ माणसांनीं केलेलें असलें, तरी आपल्या पश्चत्तापाची तीव्रता त्या प्रमाणांत कमी होते असें नव्हे.

आणखी असें, कीं आपण केलेले जे दुष्कृत्य तें कितीही हलके असलें, तरी त्याबद्दल आपणास केव्हांना केव्हां तरी शिक्षा भोगावी लागतेच. प्रत्येक माणसाच्या वर्तनावर समाजाची आणि राजाची नजर असते. कोणीही माणसानें काहीही अपराध केला, तरी त्याला समाजाकडून आणि राजाकडून शिक्षा होते. ही शिक्षा करतेवेळीं समाज किंवा राजा असे पहात नाही, कीं हा अपराध पूर्वी अमक्या अमक्यानीं केलेला आहे, म्हणून ह्या माणसास शिक्षा कमी द्यावी. जे कोणी अपराध करतील, त्या सर्वांस शिक्षा होते, कोणाची शिक्षा चुकत नाही.

आणखी असें, कीं एकाद्या मनुष्याने दुसऱ्याचा अपराध पाहून तसा अपराध केला ह्या सबबीवर समाज किंवा राजा त्याच्यावर मेहेरनजर करून कदाचित् त्याला कमी शिक्षा करील, परंतु मरणोत्तर यमधर्म जी शिक्षा करतो, तिच्यांत मेहेरबानीचा अंश नसतो जसा अपराध तशी शिक्षा, मग तो कोणीही केलेला असो, किंवा एकाचा पाहून दुसऱ्याने केलेला असो.

वरील विवेचनावरून वाचकाना हे कळेल, कीं एकानें कांही वाईट गोष्ट केली म्हणून दुसऱ्यानें ती करणे हे क्षम्य होत नाही.

## ९६. इतिहास आणि चरित्र यांची तुलना.

इतिहासामध्ये एका किंवा अधिक देशाचा व बऱ्याच मोठ्या कालाचा वृत्तांत सांगितलेला असतो. चरित्रामध्यें एकाच पुरुषाच्या आयुष्यात घडलेल्या वृत्तांताचे निवेदन केलेले असतें.

इतिहास आणि चरित्र हीं दोन्ही मनोरंजक आणि बोधप्रद असतात. प्रत्येक अनुभवानें आपणास नेहमींच शहाणपण येत असतें. काय काय श्रम केल्यामुळें आपण सुखी झालों व काय काय चुका केल्यामुळें आपण दुःखी झालों, ह्याचें मनन केले असतां आपण शहाणे होतों, हे कोणीही कबूल करील. परंतु हा शहाणपणा आपणाला फुकट मिळालेला

नसतो. सुख मिळविण्यासाठीं आपणास मेहनत पडलेली असते, व आपल्या हातून घडलेल्या चुकाचे दुःखकारक परिणाम आपणास भोगावे लागलेले असतात. म्हणून आपणास आपल्या आयुष्यात आपल्या स्वत.च्या अनुभवाने मिळालेले शहाणपण कितीही मूल्यवान् असले, तरी ते सुखाने मिळालेले नसते परतु इतिहास किंवा चरित्र ह्याच्या वाचनापासून मिळालेले शहाणपण हे मूल्यवान् असून शिवाय मनोरजक असते. कारण, जी सकटे एकाद्या देशाला किंवा पुरुषाला भोगावीं लागलेली असतात, त्याचे प्रत्यक्ष वाटेकरी आपण नसतो. इतिहासात किंवा चरित्रात निवेदिलेल्या गोष्टी नानाविध व उत्कटाजनक असून त्या वाचण्याकडे आपले मन आकृष्ट होते, व तेणेकरून आपले रजन होते. मनोरजन व ज्ञानप्राप्ति, ही दोन्ही आपणास एकदम प्राप्त होतात

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे मनोरजन आणि ज्ञानप्राप्ति होते, ह्यासबधाने इतिहास आणि चरित्र ही दोन्ही सारखींच आहेत, तथापि इतिहास आणि चरित्र ह्या दोहोपासून सारख्याच प्रामाणात किंवा सारख्याच प्रकारच्या लोकास मनोरजन व ज्ञानप्राप्ति ही होतात असे मात्र नव्हे. इतिहास हा मोठ्या जनवृदाची हकिकत देतो, ह्यामुळे आपले लक्ष्य एकदम शेकडो व्यक्तींवर विभागले जाते. चरित्राचा विषय एकच व्यक्ति असल्याकारणाने आपले लक्ष्य त्या एकट्याच व्यक्तीवर लागलेले असते. आपली अनुकपा व प्रेम ही त्या एकाच व्यक्तीवर जडलेली असल्यामुळे ह्या व्यक्तीची हकीकत आपल्या हृदयात नीट ठसते, आणि तेणेकरून ती आपणास जास्ती मनोरजक वाटते, व तिच्यापासून घ्यावयाचा बोधही मनामध्ये चागला ठसतो आपण नेहमीं असे पाहतो, कीं आपण एकाच वेळीं पुष्कळ गोष्टी करू लागलो असता कोणतीच गोष्ट धड होत नाही. परतु एकाच वेळीं एकच गोष्ट आपण हाती घेतली असता ती चागली साध्य होते. त्याचप्रमाणे इतिहासवाचनापासून होणारे मनोरजन व होणारा बोध याचा अनेक व्यक्तींशी सबध असल्यामुळे त्याचे स्वारस्य व स्थायिकपणा, ही कमी प्रमाणात असतात. चरित्राचा नायक हा आपल्या विचाराचा एकच केंद्र झाल्यामुळे आपणास इतिहासवाचनापेक्षा चरित्रवाचन जास्ती गोड वाटते. व तज्जन्य बोधही जास्ती वेळ टिकणारा असतो चरित्रनायक हा आपल्याच सारखा सामान्य पुरुष असतो आपल्याच प्रमाणे त्याला ससारात अनेक प्रकारच्या अडचणी व विविध सकटे

आलेलीं असतात. त्यांचे निरसन त्याने कसे केले, तो कोणकोणच्या उपायांनीं वैभवास चढला, वगैरे गोष्टी आपणास कळतात, व जे त्याला करता आलें तें करणे आपणासही शक्य आहे, हें तत्त्व आपल्या मनावर चागले ठसते, आणि सहजच आपण त्या व्यक्तीचे अनुकरण करण्यास प्रवृत्त होतो.

आणखीही एका बाबतींत इतिहासाच्या वाचनापेक्षा चरित्राचे वाचन हे आपणास जास्ती लाभप्रद असते. इतिहासाने राजनीतीचीं तत्त्वे आपणास समजतात चरित्राने व्यक्तीनीतींची तत्त्वे मनावर ठसतात. इतिहास हा मुत्सद्यांच्या उपयोगी पडण्याजोगा असतो परतु चरित्र हे प्रत्येक मनुष्याला उपयोगी असते. समाजातील एकाददुसराच मनुष्य मुत्सद्दी असावयाचा, परतु व्यक्तीनीति ही प्रत्येक मनुष्याला, प्रत्येक व्यवहारात अनुसरावयाची असते. शिवाय असे, कीं मुत्सद्दीपदावर मनुष्य असता जीं नीतितत्त्वे तो अनुसरत असतो, तीं खोटीं किवा भ्रामक आणि डोळ्यात धूळ टाकणारीं आहेत, असे तो अतःकरणात जाणत असूनसुद्धा त्याचे समर्थन करीत असतो, परतु तोच मनुष्य आपल्या खासगी व्यवहारात तसल्या नीतितत्त्वाचे अवलबन करावयाला कचरतो साराश हा, कीं इतिहासाच्या वाचनापासून जीं तत्त्वे आपल्या मनावर ठसतात, तीं खोटीं नसलीं तरी फार थोड्याच मनुष्यास उपयोगी पडणारीं असतात, आणि चरित्राच्या वाचनापासून आपणास खऱ्या आणि शुद्ध नीतींची तत्त्वं समजतात. इतिहासात ज्या पुरुषानीं मोठमोठे पराक्रम केले म्हणून सागितलेलें असते, त्या सर्वच पुरुषाची नीति ग्राह्य किवा अनुकरणीय असते, असे नव्हे. इतिहासामध्ये खोट्या नीतितत्त्वाच्या जोरावर एकादा पुरुष किंवा एकादा देश वैभवशाली झाला असे आपण वाचिले, म्हणजे त्या खोट्या नीतितत्त्वाविषयीं आपणाला फारशी किळस वाटत नाहीं. परतु खाजगी व्यवहारात जरी कोणी मनुष्य खोट्या नीतितत्त्वाचे अनुसरण करून वैभवशाली झाला असला, तरी त्याचे चरित्र वाचून आपणास त्याचे कौतुक वाटेल असा सभव नसतो.

साराश हा, कीं इतिहास आणि चरित्र हीं दोन्हीं मनोरजक व बोधप्रद असतात, परतु सारख्याच प्रमाणात नसतात.

### ९७ हांसत कर्म करावे, भोगावे रडत तेंचि परिणामीं.

मनुष्य पुष्कळ गोष्टी प्रथम गमतीखातर किंवा कौतुकाने करतो, परतु पुढे त्याला त्याच्याबद्दल दुःख भोगावे लागते.

मनुष्याला कोणतेही व्यसन जडते, ते प्रथम त्याला त्याच्यापासून तात्कालिक सुख होते, म्हणूनच जडते. ह्या सुखाला भुलून तो त्या व्यसनाकडे जास्ती जास्ती ओढला जातो आणि शेवटीं तो त्या व्यसनाचा पूर्ण दास बनतो. असे झाले म्हणजे त्या व्यसनाचे सर्व दु:खकारक परिणाम त्याला भोगावे लागतात. दारू प्याली असता तत्कालिक सुख वाटते. मनुष्य प्रथम थोडी थोडी, मग पुष्कळ पुष्कळ दारू पिऊ लागतो. पुढे क्रमाक्रमाने त्याला ते व्यसन जडते. ते काही केल्या त्याला सोडता येत नाहीं अशा स्थितींत मनुष्य आला असता त्याच्या पैशाची, अब्रूची, शरीराची अपार हानि होते, आणि तेणेकरून त्याला नानाविध दु खे भोगावी लागतात.

दुसरे असे, कीं मनुष्य पुष्कळ गोष्टी मूर्खपणाने किंवा अविचाराने करता. त्याचा परिणाम काय होईल, इकडे तो लक्ष्य पुरवीत नाहीं. अविचाराने किंवा मूर्खपणाने केलेल्या कृत्याचा परिणाम नेहमीं दु:खातच व्हावयाचा. तरुणपणीं विद्या न करता खेळण्यात काळ घालविणे, हे लहान मुलाना गोड वाटते, परतु तेणेकरून त्याना मोठेपणीं चरितार्थाची मुबलक साधने मिळेनातशी होतात, आणि कष्टात दिवस घालवावे लागतात. तरुणपणीं ज्यानीं खेळण्यात काळ घालविला आहे, अशीं माणसे पुढे हालात दिवस काढीत असलेलीं आपणास घरोघर पाहावयास सापडतात.

दुसऱ्याला चिडविण्यासाठीं, किंवा त्याला वेडावण्यासाठीं, त्याच्यासारखे बोलणे, चालणे, वगैरे करण्याची लहान मुलाना भारी खोडी असते. परतु पुढे त्याना तशाच रीतीने बोलण्याची किंवा चालण्याची सवय लागते. आणि तेणेकरून तीं स्वत च लोकाच्या तिरस्कारास व उपहासास पात्र होतात. प्रथम जी गोष्ट केवळ गमतीखातर केलेली असते, तिचे परिणाम पुढे भोगावे लागतात. कबध ह्या नावाच्या एका गधर्वाने स्थूलशिरा नामक ऋषीला हिडिस्स रूप धारण करून वेडावले. तेव्हा त्या ऋषीने कबधाला “ तसाच हो !” असा शाप दिला. तेणेकरून त्या गधर्वाला मूळचें रम्य रूप गमावून घेऊन नव्या हिडिस्स रूपाने जन्मभर राहावे लागलें. त्याने प्रथम जी गोष्ट गमतीखातर केली, तिचे दुःखकारक परिणाम त्याला जन्मभर भोगावे लागले !

वरील विवेचनावरून वाचकाची खात्री होईल कीं एकादी वाईट गोष्ट करतांना आपणास जरी सुख झाले, तरी परिणामीं तिच्यामुळें दु:ख भोगावे लागते.

## ४८ अनेक मित्रांप्रति जोडि संपदा, कसास लावी परि त्यास आपदा ॥

मनुष्य वैभवस्थितीत असता त्याच्या भोंवतीं अनेक मित्र गोळा होतात, परंतु त्याला हीन दशा आली म्हणजे त्याचे मित्र त्याचा परित्याग करितात.

असा प्रकार असण्याचीं अनेक कारणें आहेत एक कारण असें आहे, कीं जगांत मैत्री केली जाते ती बहुतकरून आपलपोटेपणाच्या तत्त्वावर केली जाते. श्रीमंत, वजनदार, किंवा उच्च अधिकाराच्या जागीं असलेल्या मनुष्याची मैत्री लोक करतात, ती त्याच्यापासून आपणास पैशाअडक्याची मदत होईल, तो आपलें वजन खर्च करून कांहीं वस्तु आपणास मिळवून देईल, किंवा आपण एखाद्या अडचणींत सांपडलों असतां आपला बचाव करील, ह्या आशेनेंच मैत्री करतात खरें पाहिलें असतां त्या मोठ्या माणसाविषयीं त्यांच्या मनांत कांहीं भक्ति, प्रीति, आदरबुद्धि, किंवा त्याच्या कल्याणाची कळकळ नसते तो मोठा मनुष्य जर कांहीं कारणानें हीन दशेस आला, तर त्याच्यापासून लोकांना कोणताही फायदा होण्याची आशा रहात नाहीं, आणि त्याची खुशामत करणारे लोक हळुहळू गळूं लागतात निसर्गांत देखील असाच प्रकार दृष्टीस पडतो पशुपक्षी वगैरे प्राणी मोठ्या वृक्षाचा आश्रय करतात, तो त्याची छाया, फळें, संरक्षण, इत्यादिकांचा लाभ व्हावा म्हणून वसंत ऋतूंत वृक्ष पशुपक्ष्यांनीं गजबजलेले असतात, परंतु शिशिर ऋतूंत झाडांचे खराटे होतात, तेव्हां पशुपक्षी तेथून निघून दुसरीकडे जातात

दुसरें असें, कीं फायद्यासाठीं जसे कित्येक लोक मोठ्याचा आश्रय करतात, तसे कित्येक लोक आम्ही मोठ्याच्या मेहेरबानींतले आहों असा जगांत डौल मिरविण्याकरितांच मोठ्याचा आश्रय करून असतात मोठ्याच्या आश्रयापासून जरी प्रत्यक्ष फायदा झाला नाहीं, तरी अप्रत्यक्ष रीतीनें पुष्कळ फायदे होतात. अमुक अमुक गृहस्थ अमक्या अमक्या बड्या गृहस्थाच्या मर्जींतला आहे असें लोकांनीं पाहिलें, म्हणजे लोक त्याला भिऊन, नमून, आणि दबून असतात. आणि अशा आबादाबानें लोक त्याच्या वाटेस जात नाहींत, त्याच्या उपयोगीं पडतात, त्याला मोठेपणा देतात, तसेंच आपल्या अडचणीच्या प्रसंगीं तो आपल्याबद्दल त्या बड्या गृहस्थास कांहीं सांगेल, व त्या बड्या गृहस्थाच्या वशिल्यानें तो आपली अडचण दूर करू

शकेल असे लोकास वाटत असते. म्हणून लोक त्याला धरून असतात वडयाच्या आश्रयापासून असा अप्रत्यक्षही फायदा होतो

आणखी असे, की वैभवशाली मनुष्य उच्च स्थितीला कोणच्या उपायांनी चढला, हे माहीत करून घेऊन आपणही तेच उपाय केले असता, त्याच्याप्रमाण वैभवाला चढू, असे लोकास वाटत असते हे उपाय आपण त्याच्या सहवासात असलो म्हणजे आपणास कळून येतील, अशा आशेनही लोक त्या वैभवशाली मनुष्याला चिकटून असतात परतु तो काही कारणाने हीन दशेस आला, तर तो मूर्खपणाने वागला म्हणून हीन दशेस आला, असे समजून व त्याचे अवगुण आपणास लागू नयेत म्हणून ते त्याचा परित्याग करितात.

वैभवशाली मनुष्याच्या आश्रयास असल्याने हलक्या लोकास अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे होतात परतु तो हीन दशेस येऊ लागला, म्हणजे लोकास अशी भीति वाटते, की त्याच्या सहवासाने आपणासही सकटे प्राप्त होतील. ह्या भीतीने लोक त्याचा परित्याग करतात घर सुरक्षित असले म्हणजे उदीर, घुशी हे प्राणी तेथे रहातात, परतु ते जळू लागले म्हणजे तेथून भराभर निघून दुसऱ्या घराकडे जाऊ लागतात जे वर्तन हलक्या प्राण्याचे, तेच मनुष्यकोटीतील प्राण्याचे असत

खोट्या मित्राचे वर्तन वर सागितल्याप्रमाणे कृतघ्नपणाचे असते, परतु खरे जे मित्र असतात, ते आपल्या मित्रास सकटसमयी कधीही सोडीत नाहीत. यामुळे सकट ही एक प्रकारची कसोटी आहे ह्या कसोटीला जे मित्र टिकतील, ते खरे मित्र, व बाकीचे सारे खोटे मित्र

वरील विवेचनावरून वाचकास हे कळले असेल, की सपन्न स्थितीत मनुष्याला पुष्कळ मित्र भेटतात, परतु विपन्न स्थितीत त्याला फार थोडे मित्र असतात.

## ९९. जगी–सर्वसूखी असा कोण आहे ?

हे म्हणीप्रमाणे योजण्यात येणारे वाक्य रामदासाच्या एका श्लोकाचा चरण आहे. हे वाक्य इतके मूल्यवान् आहे, की ते लोकाच्या मुखी अगदी खिळून जाऊन आज म्हणीची योग्यता पावले आहे.

ह्या वाक्यामध्ये असे विधान केलेले आहे, की ज्याला सर्व प्रकारची

सुखें आहेत व ज्याला लवलेशही दुःख नाहीं, असा मनुष्य जगांत आढळावयाचा नाहीं

असें असण्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण हें, कीं प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत कामक्रोधादि विकार कमीजास्ती प्रमाणांत असतात, आणि त्यांना पूर्णपणें दाबांत ठेवण्याचें सामर्थ्य कोणासही नसतें. त्यामुळें कामक्रोधादिकांचा उद्भव होतांच आपलें स्वास्थ्य नाहींसें होतें, आणि आपणास थोडें तरी दुःख भोगावें लागतें आपणाजवळ जें आहे तें पुरेसें नाहीं असें वाटणें, किंवा तें पुरेसें आहे अशी जरी आपली खात्री असली तरी दुसऱ्या कोणास तितकें नसावें अशी इच्छा करणें, वगैरे दुष्ट मनोविकारांच्या तडाख्यांत आपण सहज सांपडतों, आणि तेणेंकरून आपण दुःख पावतों.

घटकाभर आपण अशी जरी कल्पना केली, कीं आपण आपलें मन पूर्णपणें आपल्या ताब्यांत ठेविलें आहे, तरी देखील आपल्याला निर्भेळ सुख मिळणें शक्य नसतें. कारण, ज्या गोष्टींवर आपला मुळींच ताबा चालत नाहीं, त्यांचेही परिणाम आपणास नेहमीं भोगावे लागत असतात. समाजांतील इतर लोकांच्या कामक्रोधादिकांस आपण अनेक वेळां, आपला कांहीं एक अपराध नसतां, बळी पडतों, त्यायोगें आपणास पुष्कळ दुःख सोसावें लागतें. तसेंच शरीराचे व्याधि आपल्या स्वतःच्या अनियमितपणाचे जरी परिणाम नसले, तरी ते पुष्कळ प्रसंगीं वंशपरंपरागत असतात. ह्या व्याधींच्या योगानेंही आपणास पुष्कळ दुःखें भोगावीं लागतात, आणि त्यामुळें आपणास निर्भेळ सुख प्राप्त होत नाहीं.

आणखी असें कीं, मनुष्यप्राण्याची असेल त्यांत तृप्ति होत नाहीं. भिकाऱ्याला वाटतें, कीं आपल्याजवळ १० रुपये असावे. ज्याच्या जवळ १० रुपये आहेत, त्याला १०० रुपयांची इच्छा होते. ज्याच्या जवळ १०० रुपये आहेत, त्याला आपणाजवळ १००० रुपये असावे असें वाटतें. अशा रीतीनें लक्षाधीशाला आपण कोट्याधीश असावें असें वाटतें, कोट्याधीशाला आपण जहागीरदार असावें असें वाटतें, जहागीरदाराला आपण राजपदाचा उपभोग घ्यावा असें वाटतें, आणि ज्यांना राजपद प्राप्त झालें आहे, त्यांच्या महत्त्वाकांक्षेनें जगांत किती विपत्ति आजपर्यंत उत्पन्न केली आहे, हें आपणास युद्धादिकांवरून नेहमीं दिसत असतें. सारांश हा,

कीं मनुष्य सदा अतृप्त असतो. इच्छिलेली स्थिति येईतोपर्यंत त्याला चैन पडत नाहीं. तेणेकरून सदा सुखी, व सर्वथैव सुखी, असा मनुष्य सापडणें कठिण आहे.

वर सांगितल्याप्रमाणें कोणीही मनुष्य ह्या जगांत पूर्णपणें सुखी असू शकत नाहीं. तरी जें सुख आपणास मिळालेलें आहे, त्यातच आपण समाधान मानून असण्याची सवय करून घ्यावी, हें आपलें कर्तव्य आहे.

## १००. मन झांकलेंस म्हणून रूप कां तुला झांकतां येईल. ?

मनुष्यानें आपल्या मनांतील विचार कितीही गुप्त राखण्याचा निश्चय केला, तरी ते विचार त्याच्या बाह्य स्वरूपावरून, म्हणजे त्याच्या नजरेवरून, त्याच्या मुखचर्येवरून, त्याच्या बोलण्याचालण्यावरून, व त्याच्या हस्तपादादिकाच्या क्रियावरून प्रकट होतात.

ह्याचें कारण असें आहे, कीं मन आणि शरीर ह्याचा अतिनिकट संबंध आहे. मनुष्याच्या मनांत जे विचार घोळत असतात, त्याचा ठसा साहजिकपणेंच त्याच्या मुखावर उमटतो. प्रत्येक मनोविकाराला अनुरूप असा बदल त्याच्या चेहेऱ्यात होत असतो. मुख्य मुख्य असे जे मनोविकार, त्याच्या योगानें चेहेरा कसा बदलतो हें हरहमेश आपल्या दृष्टीस पडतें. मनुष्य रागावला म्हणजे तोंड, डोळे, वगैरे लाल होणें, त्याला आनंद झाला म्हणजे चेहेरा टवटवीत होणें किंवा हसू येणें, त्याला दुःख झालें म्हणजे चेहेरा निस्तेज होणें, तो गहन विचारात गुंतलेला असला म्हणजे डोळे मिटणें, किंवा एकाच दिशेकडे दृष्टि वळणें, ह्या गोष्टी आपल्या पूर्ण परिचयाच्या आहेत. तेणेकरून आपणास कोणाही मनुष्याच्या मुखचर्येवरून त्याच्या मनांत काय विचार घोळत आहेत ह्याची अटकळ बांधता येते

मनुष्याच्या मनांतील विकाराचा जसा त्याच्या चेहेऱ्यावर परिणाम घडतो, तसाच त्याच्या भाषणावरही घडतो. जो विचार मनुष्याच्या मनांत एकाद्या वेळीं घोळत असेल, त्या विचाराची झाक त्याच्या भाषणांत दृष्टीस पडते. कोणा मनुष्याला एकाद्या गांवीं जावयाचें असलें, म्हणजे तो तें गांव किती दूर आहे, रस्ता कसा काय आहे, वगैरेसंबधानें ज्याच्या त्याच्याजवळ चौकशी करीत असतो. तसेंच कोणी मनुष्याला एकाद्या गृहस्थास भेटावयास जावयाचें असल्यास, तो मनुष्य " तो गृहस्थ कोठें रहातो, केव्हा भेटतो, स्वभावानें कसला

त्यानी रुक्मिणीच्या लग्नप्रसगी थोडे विषयातर केले आहे ते म्हणजे त्यानी लग्नाच्या साहेळचाचे वर्णन केले आहे त्याला मुळात आधार नाही. याच्या उलट काहीसा नरेद्राच्या रचनेचा प्रकार आहे एरव्ही कल्पनावैभव आणि रसाविष्कार या दृष्टीने रुक्मिणीची विरहावस्था अथवा किन्नराचे उपाख्यान कितीही सुदर वाटत असले तरीपण पुनरुक्ति आणि विषयातर या सारख्या दोषाना अशी वर्णने पात्र होतात हे विसरता येत नाही

रुक्मिणीस्वयंवराची ही कथा भागवत, हरिवश विष्णुपुराण, आणि पद्मपुराण या सस्कृत ग्रथातून आलेली आहे पैकी नाथानी आपल्या ग्रथातील प्रत्येक प्रसगाच्या शेवटी " इति श्री मद्भागवते महापुराणे दशमस्कधे हरिवंश सहिता संमते इ " असा आधारभूत ग्रथाचा उल्लेख केला आहे. या दोन पौराणिक ग्रथाचा मागोवा घेऊन त्यानी आपल्या काव्याची रचना करताना स्वत च्या कल्पनाशक्तीचा योग्य असा मालमसाला वापरला आहे इतकेच नव्हे तर कृष्णाला पाठविलेल्या पत्रिकाप्रसंगात त्यानी मूळ भागवतातील श्लोक देऊन त्यावर आपल्या मराठी टीकेची रचना केली आहे. यावरून विषयातर न करिता मूळ कथानक मराठीत आणताना त्यानी किती खबरदारी घेतली होती याची कल्पना करता येते याच्या उलट नरेद्राच्या रचनेचा प्रकार आहे भागवत आणि पद्मपुराण या ग्रंथाच्या आधाराने आपल्या ग्रथाची रचना केली असे नरेद्राने जरी सागितले आहे तरीपण त्याच्या काव्यातील किन्नराच्या उपाख्यानासारखे काही प्रसग मूळ भागवत अथवा पद्मपुराण या ग्रथात आढळत नाहीत यावरून त्याने आपले काव्य रचताना विषयातराचा दोष पत्करून आपल्या स्वतत्र प्रतिभेचा विलास दाखविला आहे असाच प्रकार

# पत्रें.

१०१. परीक्षेत कधीं कधीं विद्यार्थ्यांना पत्र लिहावयास सांगतात. पत्रांत मजकूर काय असावा आणि पत्र कोणास लिहावयाचें, हेंहीं सांगितलेलें असतें.

हीं पत्रें लिहितांना आरंभाचा मायना जो योग्य असेल तो लिहून शेवटची समाप्तीही योग्य रीतीनें करावयाची असते. पत्रांतील जो मजकूर त्यांत पुनरुक्ति न होईल अशी विद्यार्थ्यानें खबरदारी घ्यावी, आणि जी भाषा योजावयाची, ती त्या माणसाचा आपल्याशीं ज्या प्रकारचा संबंध असेल त्याला अनुरूप अशी योजावी.

विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं पत्राचे पांच नमुने आम्हीं पुढें दिले आहेत.

## १०२ बापाचें मुलाला पत्र.

चिरंजीव राजश्री विनायक, मुक्काम पुणें. यांसी प्रती गोविंद नारायण देशमुख, मुक्काम चिपळूण, अनेक आशीर्वाद, उपरि येथील कुशल तागायत २७ एप्रिल, १९१४ पावेतों इकडील सर्व मंडळी सुखरूप असो, विशेष.

तुझा अभ्यास कसा चालला आहे, आणि शाळेंत तुझी वर्तणूक कशी आहे ह्याची चौकशी करण्यासाठीं मीं तुझ्या शाळेच्या हेडमास्तरास आठ दहा दिवसांमागें पत्र लिहिलें होतें, त्याचें मला काल उत्तर आलें ते उत्तर वाचून मला अतिशय वाईट वाटलें, आणि तुझा रागही आला कारण, तुझे हेडमास्तर गणपतराव ह्यांनीं आपल्या पत्रांत तुझ्या वर्तणुकीसंबधानें आपली नापसंती दर्शविली आहे. तू कोणा एका द्वाड मुलाच्या संगतीला लागला आहेस, तुझें चित्त अभ्यासाकडे नाहीं, एक दोन प्रसंगीं तू आपल्या वर्गाच्या मास्तराशीं उद्धटपणा केलास, ही हकीकत मला गणपतरावांनीं कळविली आहे, तुझ्यासाठीं आम्हीं इतके दिवस पैसे खर्च करून तुला पुण्यास ठेविलें, आणि तू तर अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करून बिघडत चालला आहेस, हें पाहून मला किती दुःख झालें तें माझें मलाच ठाऊक, आणि तुझी आई तर काल सारा दिवस रडत होती. गंगीच्या दिवाळसणानिमित्त तुला आम्हीं चिपळुणास बोलावण्याचा बेत केला होता, परंतु तुझें असमाधानकारक वर्तन असल्यामुळें तो बेत आतां आम्हीं रहित केला आहे. घरीं यावयाला न मिळाल्यामुळें तुझी निराशा होईल, तेवढी शिक्षा तुला पुरेल आणि तू सुधारशील, अशी आमची उमेद आहे. परंतु येवढ्या शिक्षेनेंही जर तू ताळ्यावर आला

नाहींस, तर तुला शाळेतून काढून परत चिपळुणास बोलवावें, असें आम्हीं ठरविलें आहे. पुन्हा दोन महिन्यानीं मी गणपतरावास पत्र पाठवून तुझा अभ्यास आणि वर्तणूक ह्या संबधानें चौकशी करणार आहे, तुझ्या विद्ये-साठीं आम्हीं इतःपर खर्च करावयाचा किंवा नाहीं, हें गणपतरावाच्या उत्त-रावर अवलंबून राहील, असें तुला बजावून ठेवीत आहों.

तुझें वर्तन आजपर्यंत चांगलें होतें. अभ्यासाकडे तुझें चित्त होतें, आणि तुझ्या निसबत आम्ही खर्च करितों तो पैसा अनाठायीं जात नाहीं, असा आमचा समज होता. तो समज चुकीचा नाहीं, आणि तुझें असमाधान-कारक वर्तन केवळ क्षणभंगुर होतें, असें आम्हांस वाटविणें, हें तुझ्याकडे आहे. कळावें, बहुत काय लिहिणें, हे आशीर्वाद.

गोविंद नारायण देशमुख.

## १०३. बापाला मुलाचें पत्र.

तीर्थरूप राजमान्य राजश्री गोविंदराव देशमुख, मुक्काम चिपळूण, वडि-लांचे सेवेसीः—

अपत्यें बालकें विनायकानें दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. तागाईत तारीख ११ माहे मे १९१४ इसवी पावेतों मुक्काम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असो, विशेष.

आपलें ता. २७ एप्रिलचें पत्र आलें तें पावलें. त्यांत आपण मजबद्दल जी नापसंती दाखविली आहे, तिला मी सर्वथैव पात्र आहें, आपल्या आणि मातुःश्रीच्या मनाला माझ्या दुर्वर्तनानें दुःख दिल्याबद्दल मला खरोखरी दिलगिरी वाटत आहे. आपला कोप मजवर पुन्हा न होईल अशा रीतीनें वागण्याचा मीं निश्चय केला आहे. इतके दिवस आपण मजवर जसा लोभ आणि प्रीति करीत आला, तसाच लोभ आणि तशीच प्रीति करावयाला मी पात्र आहें, असें आपणास पुन्हा वाटूं लागावें, म्हणून मी मनापासून झटूं लागलों आहें.

मधें मधें मी एका वाईट मुलाच्या संगतीला लागलों होतों, हें खरें आहे, अभ्यासाकडे दुर्लक्ष्य करीत असें, हेंही खरें आहे, आणि माझ्या वर्गाच्या मास्तरास मीं आपल्या सोबत्याच्या चिथावणीवरून एकदां दुरुत्तरें केलीं हेंही खरें आहे. परंतु लवकरच माझी चूक मला कळून आली. वाईट संग-

तीनें माझें होत असलेलें नुकसान मला कळून आलें, आपण आणि आईनें केलेल्या बोधाची जागृति माझ्या अंतःकरणांत झाली, ह्या सर्व कारणामुळें माझ्या मनाला उपरति झाली, आणि आपलें पत्र यावयाच्या पूर्वींच मी त्या वाईट मुलाची संगति सोडून दिली होती. गेल्या दोन महिन्यांत माझा नंबर दर आठवड्यास विसाच्या खालीं असे, ह्या आठवड्यांत माझा नंबर चवथा आला आहे, ह्यावरून मी सुधारत आहे, अशी आपली खात्री होईल. दोन महिन्यांनीं आपण हेडमास्तरसाहेबाकडे चौकशी केल्यास त्याचेकडून आपणास समाधानकारक उत्तर जाईल, अशी माझी खात्री आहे.

गंगीच्या दिवाळसणास मला चिपुळुणास येतां येत नाहीं, याबद्दल मला भारी वाईट वाटत आहे. परंतु तें माझ्याच दुर्वर्तनाचें फळ असल्यामुळें दुसऱ्या कोणास मी दोष देऊं शकत नाहीं.

आपलें आणि आईचें माझ्याबद्दल पुन्हा पूर्वींप्रमाणें मन प्रसन्न होवो, असें ईश्वरापाशीं मागणें मागून, आणि आपली क्षमा मागून हें पत्र पुरें करतों. कळावें, सेवेसी श्रुत होय, ही विज्ञापना.

विनायक गोविंद देशमुख.

## १०४ विद्यार्थ्याचें शिक्षकास पत्र.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदाशिवराव रानडे, मास्तरसाहेब, मुक्काम पुणें, स्वामींचे सेवेसीः—

पोष्य बहिरव काशिनाथ फडणीस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम तागाईत १ जून १९०९ पावेतों सर्व सुखरूप असो विशेष.

उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त मी ओतूर येथें आपल्या घरीं आलों. येथें आल्यावर सुमारें एक महिनाभर माझे दिवस आनंदांत गेले. परंतु मागल्या शनिवारीं माझ्याच वयाच्या सात आठ मुलांबरोबर मी पाटीलबागेंत वनभोजनास गेलों होतों. तेथें विहिरींमध्यें पोहावयासाठीं माझे सोबती उतरले, त्याचेबरोबर मीही उतरलों. दुपारीं जेवण मोठ्या गमतीनें झालें, संध्याकाळीं आम्ही सर्वजण परत गांवांत आलों. मी घरीं येऊन पोहोंचतों कीं नाहीं, तोंच ह्या दगदगीनें माझ्या अंगांत ताप भरला, दोन दिवस मी बराच आजारी होतों. आतां मी अगदीं बरा झालों आहे परंतु तापांतून उठल्यावर इतक्या लवकर बैलगाडीनें ४० मैलांचा प्रवास करून पुण्यास जावें हें ठीक नाहीं, असें माझ्या वडिलांचें मत आहे, म्हणून मी शाळेमध्यें तारीख ८ ला

हजर न होता तारीख १५ ला हजर होईन. तोपर्यंत माझी रजा माडण्याची मेहेरबानी व्हावी. कळावे हे विनति.

बहिरव काशीनाथ फडणीस.

## १०५. शाळामास्तराला मुलाच्या बापाचे पत्र

राजमान्य राजश्री सीताराम गोविंद परचुरे, हेडमास्तर, यास विनति विशेष.

उदईक आम्ही सर्व मडळी नाशिक येथे भाचीच्या लग्नासाठी जाणार आहो आणि आमच्याबरोबर चिरंजीव नारायण ( इयत्ता ४, तुकडी अ ) हाही यावयाचा आहे. तर मेहेरबानी करून त्याला आजपासून पुढच्या बुधवारपर्यंत रजा द्यावी. ह्या गैरहजीरीमुळे त्याच्या अभ्यासाचे जे नुकसान होईल. तें आम्ही भरून काढू कळावे ही विनति

पुणें ता. ७ माहे मार्च सन १९११ } सदाशिव विश्वंभर काळे

## १०६ एका गृहस्थाचें दुसऱ्या गृहस्थास पत्र.

राजश्रि या विराजित राजमान्य राजश्री पद्माकरपंत तुळपुळे, मुक्काम नागपूर स्वामीचे सेवेसी पो य गोविंद आप्पाजी मेहेंदळे, मुक्काम पुणे, कृतानेक साष्टांग नमस्कार विनति. येथलि क्षेम तागाईत ता. २८ डिसेंबर १९१३ पावेतो सर्वत्र क्षेम असो विशेष आपणाकडून ता. १७ डिसेंबरचे पत्र आले ते पोचले मजकूर समजला. यानतर इकडील मजकूर.

आपणासाठी पुणे येथे विकाऊ घरें पाहाण्यासाठी मी आपले पत्र आल्यावर सात आठ वेळा गेलो होतो. दोन हजारापासून तीन हजारापर्यंत मिळतील अशी पाच सहा घरें आहेत, आणि ती सारी आपल्या कुटुंबातील माणसाना पुरण्याइतकीं मोठी आहेत. सर्वांचे बाधकाम मजबूत आहे. आणि आपण घर खरेदी करण्यासाठीं जी रक्कम खर्च करण्याचा सकल्प केला आहे, तिजपेक्षा ह्या घराच्या किंमतीही फारशा अधिक नाहींत. आपली इच्छा असल्यास ह्या पाच सहा घराचे आराखडे करून पाठवीन, आणि आपणास जे घर पसत असेल, त्याची अगदीं नक्की किंमत मालकास विचारून कळवीन.

आपणास घर खरेदी करण्याची फारच घाई असल्यास तसे कळवावे, म्हणजे मीं पाहिलेल्या घरापैकीं एकादे घर नक्की ठरवीन. परंतु आपणास

घाई नसल्यास माझे मत असे आहे, की आपण आणखी काही दिवस हे काम लांबणीवर टाकावें कारण, मी पाहिलेलीं घरे जरी सोईवर आणि मजबूत आहेत, तरी पश्चिम दिशा खुली अशी दोनच घराची आहे. आणि ह्या दोन घराना शेजार वाईट आहे दुसऱ्या तीन घराना पश्चिम खुली नसून उजेड अगदींच थोडा आहे. साराश, ह्या पाच सहा घरापैकीं एकही घर माझ्या स्वत च्या पसतीस येत नाही

आपला विचार लवकर कळवावा म्हणजे ठीक पडेल

इकडील सर्व मडळी खुशाल आहेत कळावे, बहुत काय लिहिणे, लोभ करावा ही विनति

१०७. येथवर आम्ही विद्यार्थ्यांना निबध लिहून दाखविले. प्रत्येक निबध विद्यार्थ्याने मननपूर्वक वाचून त्याची माडणी कशी केली आहे हे पाहिले असता त्याला रचना करण्याची हातोटी बरीच चागली साधेल, असे आम्हास वाटते. पत्राचेही नमुने चार पाच दाखविले त्यावरून पत्राची भाषा कशी असावी हेही विद्यार्थ्यास समजून येईल आता याच्या पुढे सुमारे तीस निबधाची सदरवारी दिली आहे. ह्या सदरवारीवरून विद्यार्थ्याने स्वत एक एक निबध लिहून पहावा. पहिले पहिले जे विषय, त्यावर निबध लिहावयाची सामग्री जास्ती भरपूर दिली आहे, आणि पुढे पुढे ती त्रोटक अशी दिली आहे

## १०८ स्पज.

**( १ ) स्पंज हा काय पदार्थ आहे ?—**

समुद्राच्या तळाशी खडकाला चिकटून राहणाऱ्या एक प्रकारच्या प्राण्याचा सागाडा. ह्या प्राण्याचीं शरीरे खडकापासून काढून सौम्य मूरिआटिक आसिड-मध्ये बुडवून ठेवितात. मग तीं हापटून धुऊन टाकिलीं, म्हणजे त्यांतून मासरूप भाग निघून जाऊन बाकी फक्त त्या प्राण्याचा सागाडा राहतो, बाजारात स्पज म्हणून जो पदार्थ विकत मिळतो, तो हाच सागाडा.

**( २ ) उत्पत्तिस्थान**—उष्णकटिबधातील समुद्र, भूमध्यसमुद्राचा पूर्व-भाग, वेस्ट् इंडीज बेटे, फ्लॉरिडाचा किनारा.

**( ३ ) गुणधर्म आणि उपयोग**—स्पज मऊ आणि हलका असल्यामुळे गिरद्या, गाद्या, वगैरेंत तो भरता येतो, पदार्थाला स्पज घासून झिलई आणता

येते. स्पजात अत्यत बारीक छिद्रे असल्यामुळे पाणी वगैरे गाळण्यास तो उपयोगी पडतो, सच्छिद्र आणि स्थितिस्थापक असल्यामुळें तो पाण्याने भरता येतो. व पुन्हा दाबून त्यातले पाणी काढून टाकता येते, म्हणून अग धुवून काढण्याच्या कामी त्याचा फार उपयोग होतो.

### १०९. दिरगाई.

( १ ) **उपोद्घात**—योग्य वेळीं काम न करता ते आळसावर ढकलणे ह्याला " दिरगाई " म्हणतात. दिरगाई करणे हे वाईट आहे.

( २ ) **दिरंगाईपासून पुष्कळ प्रकारें नुकसान होतें**:—

क. गेलेला वेळ पुन: येत नाहीं, योजलेल्या कामाला पुनः इतकी सोयीची वेळ येऊ शकत नाहीं.

ख. हल्लींची परिस्थिति पुन: जमून येईल अशी खात्री नसते. आपल्या किंवा आप्त–मित्राच्या आजाराने आपण योजलेल्या कामास हरकत होईल

ग. आपल्या अगोदर दुसरा कोणी तेंच काम पुरे करील, आणि त्यामुळे आपल्या नफ्याला खोट येईल, कदाचित् आपलें मोठें नुकसान देखील होईल

घ आपल्या कामाचे फल ज्या माणसावर अवलबून आहे, त्याचे मन फिरेल, आणि ते आपल्या कामाला आश्रय देणार नाहींत.

( ३ ) उदाहरणें—

क आपल्या किंवा कोणा नातलगाच्या आजाराकरिता औषध आणावयाची आपण हयगय केली, तर आजार विकोपाला जाईल, त्याचा परिणाम कदाचित् मरण हा देखील होईल !

ख शेतकऱ्याने पावसाचें धोरण पाहिले नाहीं, आणि भाजणी, लावणी, वगैरे कामें दिरगाईवर टाकिलीं, तर त्याला काहीं उत्पन्न व्हावयाचे नाहीं.

( ४ ) **उपसंहार**—कामाच्या सुयोजनेला जरूर तो वेळ दिला पाहिजे, परतु एकदा मनाने सुयोजना ठरविल्यावर दिरगाई करू नये.

### ११०. उतावळेपणा.

( १ ) **उपोद्घात**—एकाद्या कामाला जरूर जो वेळ लागावयाचा, त्याच्या

अगोदर फलाविषयीं उत्कंठित होणे, ह्याला " उतावळेपणा " म्हणतात.

( २ ) उतावळेपणानें नुकसान होते—

क. काम व्यवस्थित रीतीने करण्याकडे आपले लागावे तसे लक्ष्य लागत नाहीं.

ख. हातीं असलेल्या कामाकडे दुर्लक्ष्य झाले, म्हणजे ते नीट होऊ शकत नाहीं.

ग. कामाच्या वेगळ्या भागाची चांगली योजना व जुळणी होत नाहीं.

घ. फल लवकर न मिळाल्यामुळे आपण त्रासून ते हातीं घेतलेले काम अर्धेच टाकून देतो, किंवा ते चालू ठेविले, तरी आपल्या डोक्यात घोटाळा उत्पन्न होतो, आणि म्हणून काम तडीस जात नाही.

ङ. ज्या प्रमाणात उतावळी ज्यास्त, त्या प्रमाणात फलप्राप्ति दूर.

( ५ ) उदाहरणें—भोपळीचा वेल दोन महिन्यात वाढतो, त्याला फळे मोठीं आली, तरी तिचा शेवट दोन महिन्यात होतो. नारळीचे झाड लागाला यावयाला दोन वर्षे लागतात, पण नंतर ते कित्येक वर्षे नारळ देते. सिंही आणि कुत्री यांची इसापनीतीतील गोष्ट.

उपसंहार—कामाला योग्य रीतीनें सुरवात करून ते नेटाने आणि शांत चित्ताने चालवावे.

## १११. अति सर्वत्र वर्जयेत्

( १ ) उपोद्घात—कोणत्याही कामात किंवा व्यवहारात किंवा संसाराच्या कोणत्याही बाबतींत, अतिरेक होऊ देऊ नये अतिरेक परिणामीं दु:ख देतो

( २ ) कारणें—

क. चांगल्या कामीं देखील अतिरेकापासून अपाय घडतात. काटकसरीपणाचा अतिरेक झाल्याने चिक्कूपणा होतो, दानधर्माच्या अतिरेकानें उधळेपणा होतो, धर्मनिष्ठेच्या अतिरेकाने धर्मभोळेपणा किंवा धर्मवेड उत्पन्न होतें. कोणत्याही दुर्गुणाची उत्पत्ति अतिरेकातच असते.

ख. परस्परविरुद्ध अशा दोन गुणाचा जो मध्य,त्यालाच"सद्गुण" असे नाव आहे, भितरेपणा आणि साहस ह्याच्यामध्ये खरे धैर्य, अति खेळणे आणि अति अभ्यास ह्याचा मध्य खरे अध्ययन, म्हणून कोणत्याही एका गुणाकडे फारच कलणे हे योग्य नाहीं.

ग अतिरेक करणे सोपे असते, अतिरेक टाळावयाला मनोनिग्रह लागतो. मनोनिग्रहाचा प्रयत्न केल्याने मनाला चागली शिस्त लागते. मन शिस्तींत असणे हा सद्गुणच होय

घ खाण्यापिण्यात अतिरेक केल्यास अजीर्णादिकामुळे जशी सुखाची हानि होते, तशी तोलूनमापून खाण्याच्या अतिरेकानें दुर्बल अतिनाजूकपणा अगी येऊन किवा उपासमार होऊन सुखाची हानि होते.

ङ अतिरेक केल्याने आपणाकडे लोकाचे फाजील लक्ष्य जडते, आणि आपण बहुधा लोकाच्या प्रतिकूल टीकेस विषय होतो.

( ३ ) उपसहार—अतिरेकाची प्रवृत्ति दुर्गुणाकडे होते, तशी सुखभगाकडेही होते, यासाठी कोणत्याही बाबतींत अतिरेक न होऊ देण्याविषयीं आपण जपावे

## ११२ रात्रीस खाई तूप आणि सकाळीं पाही रूप

**उपोद्घात**—कोणी स्त्री रात्रीस तूप खाऊन लागलींच दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या तोडावर टवटवी व चकाकी आली आहे नाहीं हे आरशात पाहू गेली असता ती उपहासास पात्र होते, त्याप्रमाणे आरभिलेल्या कृत्याचे फळ आपणास तावडतोब मिळावयाची इच्छा केल्यास आपण मूर्ख ठरतो.

( २ ) **कारणे**—

क. कोणत्याही कारणापासून कार्य घडावयाला काहीं तरी काळ हा लागलाच पाहिजे. हा काळ लोटावयाच्या आधीं कार्य होणे शक्यच नसते.

ख. आरभिलेल्या कृत्याच्या फळाविषयीं आपण उतावळी केली, तर फळाकडेच सारे लक्ष्य लागून करावयाच्या कृत्याकडे दुर्लक्ष्य होते, तेणेकरून ते बिघडते.

ग. फळाच्या प्राप्तीबद्दल उतावळी करून तें लवकर न मिळाल्यास आपले धैर्य खचते, धैर्य खचलें असतां कोणतेंच कृत्य तडीस जात नाहीं.

( ३ ) उपसहार—व्यर्थ उतावळी करू नये.

## ११३. थेंबें थेंबें तळें सांचें.

( १ ) उपोद्घात—एका एका वेळीं एक एक थेंब याप्रमाणें जरी पाणी आले, तरी काहीं काळाने तेथे मोठें तळें साचतें, त्याप्रमाणें प्रत्येक कार्य —धनोपार्जन, ज्ञानोपार्जन, वगैरे—क्रमाने करीत गेले असता ते अखेरीस फार मोठे होते.

( २ ) कारणें—

क. प्रत्येक मोठ्या कार्याचे भाग आणि पोटभाग असतात. ते क्रमाक्रमाने म्हणजे एक झाल्यावर दुसरा, दुसरा झाल्यावर तिसरा, अशा रीतीनें करावयाचे असतात. आणि ते करतेवेळीं एक एक भाग जरी लहान असा वाटला, तरी शेवटीं ह्या सर्व भागाचा समुच्चय पाहिला असता मोठें काम पदरात पडते. दाखले—मधमाशाचे पोवळे, मुंग्याचें वारूळ, काडी काडी जुळवून केलेले पक्ष्याचे घरटे, इ०.

ख. प्रत्येक मोठें काम धीरानेच करावें लागते, एकदम सर्व काम करू म्हटल्यास ते बिघडते, किंवा मुळींच होत नाहीं. दाखला—मुलगा आणि बोरे.

( ३ ) उपसहार—फळावर नजर ठेवून उत्साहाने आणि नेटाने काम करावे.

## ११४. पुस्तकें.

( १ ) पुस्तकें—प्राचीनाचे ज्ञान व विचार अर्वाचीनास, एका देशाचे ज्ञान व विचार दुसऱ्या देशांस देण्याचीं किंवा कळविण्याचीं पुस्तकें हीं आटोपसर आणि टिकाऊ अशा स्वरूपाचीं साधने होत.

( २ ) आवश्यकता—ज्ञानाच्या वृद्धीमुळे ज्ञान साठविण्याचीं साधनें उत्पन्न केल्याशिवाय गत्यतर नाहीं, असें लोकांस आढळून आलें, तेव्हांपासून पुस्तके लिहिण्याची चाल पडली.

( ३ ) **प्राचीन काळीं पुस्तकें कशी लिहीत ?**—ताडपत्रावर वगैरे लिहीत, त्यामुळे तीं दुर्मिळ असत, व आपल्या देशाची हवा उष्ण असल्यामुळें ती चिरकाल टिकणारीं नसत. दुसरी प्रत वेळीच न करून घेतल्यामुळे शेकडो ग्रथ आजपर्यंत बुडाले आहेत.

( ३ ) **हल्लींच्या काळी पुस्तके कशी लिहितात ?**—कागदावर लिहितात, तीं स्वस्ती असतात.

( ४ ) **पुस्तकांपासून फायदे**—

क. ज्ञानवृद्धि अनायासें होते.

ख. एकाच बाबतीत अनेक माणसानीं विचार, शोध, वगैरे करण्यात कालाचा अपव्यय होत नाहीं.

( ५ ) **तोटे**—छापण्याची साधने स्वस्ती झाल्यामुळे हल्लीं भिकार पुस्तकें निर्माण होऊ लागलीं आहेत.

( ६ ) **अवांतर विचार**—स्वत चीं पुस्तके विकत न घेता, दुसऱ्याच्या पुस्तकावर गरज भागविण्याची आपल्या लोकाची जी प्रवृत्ति आहे ती निंद्य आहे. उसनीं आणलेलीं पुस्तके वाईट रीतीनें वापरण्याची खोडी पुष्कळ लोकास असते, लोकाचीं पुस्तके परत करणे हे आपले कर्तव्य आहे असे न समजणारे पुष्कळ लोक आढळतात. आपल्या आवडीच्या पुस्तकाचा सग्रह ऐपतीप्रमाणे घरात करणे हे घराचे भूषण आहे असे आपल्या लोकास वाटत नाहीं. इ० इ०

( ७ ) **उपसंहार**—आपल्या स्वत च्या व आपल्या मुलाच्या उपयोगासाठीं उत्तम पुस्तकाचा सग्रह प्रत्येकाने ऐपतीप्रमाणे करावा.

### ११५ कादबऱ्याचे वाचन.

(१) **उपोद्घात**—वाङ्मयाच्या इतर शाखापेक्षा हीच शाखा सर्वांस अधिक मोहक वाटते. लहान मुले गोष्टीची पुस्तके वाचतात, मोठी मुले अद्भुत गोष्टी वाचतात, प्रौढ पुरुष आणि स्त्रिया ऐतिहासिक, सामाजिक वगैरे विषयावरील कादबऱ्या वाचतात. कोणत्याही ग्रथालयाची चोपडी पाहिली असता हीच गोष्ट सिद्ध होते.

( २ ) **हेंच वाङ्मय सर्वांना आवडण्याचीं कारणे.**—

क. मानवी व्यवहाराचे चित्र कादबऱ्यात रेखाटलेले असते.

ख. इतिहास, तत्त्वज्ञान, शास्त्रें, वगैरे विषयावरील पुस्तकें त्या त्या विषयात अभिरुचि असलेल्याचीच करमणूक करू शकतात, परतु कादबऱ्या सर्वांची करू शकतात.

( ३ ) कादबऱ्यांचा उपयोग—करमणूक, मनोरजक रीतीने ज्ञानप्राप्ति, वगैरे.

( ४ ) कादबऱ्या अतिशय वाचल्यापासून तोटे:—

क. कादबरीची गोडी लागली म्हणजे कर्तव्यें मागे पडतात, दिरगाईवर पडतात, किंवा घाईघाईने केली जातात.

ख वाईट कादबऱ्या मनोविकार उद्दीपित करतात, वाचकाला अनीतीकडे प्रवृत्त करतात, इ०.

( ५ ) उपसहार—योग्य प्रमाणात चागल्या कादबऱ्या वाचाव्या.

## ११६. खुशामत.

( १ ) उपोद्घात—आपल्या अगच्या गुणाच्या जोरावर, किवा सरळ मार्गाने, आपली कामना सफल होण्याचा सभव नसला, म्हणजे लबाड लोक ज्या कुटिल मार्गांचे अवलबन करतात, त्यापैकी खुशामत हा एक मार्ग आहे. एकाद्याच्या अगीं नसलेले गुण त्याच्या अगीं आहेत म्हणून तारीफ करणे, किवा असलेले गुण फुगाविणे, त्याचीं हलकीं कामे करणें, त्याच्या दर्शनास जाणे, त्याला नजराणे देणे, त्याला चहाड्या सागणें, इत्यादि मार्गांनीं खुशामत करता येते.

( २ ) उत्पत्ति—प्रत्येक मनुष्याला स्तुति गोड वाटते, म्हणून लबाड माणसाला खुशामत करण्याला अवसर सापडतो.

( ३ ) तिचे प्रकार—

क. लहानाने मोठ्याची खुशामत करणे.

ख. मोठ्याने लहानाची ,,

ग. बरोबरीच्या माणसाची ,,

( ४ ) तिचे अनिष्ट परिणाम—खऱ्या गुणाचे चीज होत नाहीं, इ०.

( ५ ) इलाज—ज्यानें त्याने आपला खरा दर्जा, व खरी योग्यता, याची आपल्या मनाशीं खरी पारख करून ठेवावी, म्हणजे दुसऱ्याची खुशामत करण्यात आपला कमीपणा आहे असे त्याला कळून तो त्या मार्गाकडे

नळणार नाहीं, व कोणी त्याची खुशामत करण्याला प्रवृत्त झाला, तर त्याला त्याची खत वाटेल.

( ६ ) **उपसहार**—खुशामत करू नये, व करूनही घेऊ नये. सदा सरळ मार्गाने चालावे, यश देणारा परमेश्वर आहे.

## ११७. नाटके.

( १ ) **व्याख्या**—प्रत्यक्ष व्यवहारात दिसणाऱ्या मनोरजक, चटकदार, व चित्तवेधक अशा गोष्टींचे, व मनुष्याचे विचार व मनोविकार, ह्याच्या परिणामाचे जे दृश्य चित्र, त्याला " नाटक " असे म्हणतात.

( २ ) **नाटके लोकप्रिय कां होतात ?**—

क. मनुष्याला काहीं तरी करमणूक आवश्यक असते

ख. डोळे, कान, आणि बुद्धि, ह्याची एके समयींच नाटकाने करमणूक होऊ शकते.

ग. ज्या स्थितीचा आणि परिस्थितीचा आपण ससारात अनुभव घेत असतो तिचें चित्र रमणीय वाटणे, हा मनुष्यस्वभावच होय, इ०.

( ३ ) **प्राचीन काळीं नाटकांची स्थिति**—भरताच्या नाट्यशास्त्रावरून नाटकांची रचना आपल्या लोकात पूर्ण प्रगल्भ झालेली असून तिला शास्त्राचें रूप प्राप्त झालें होते, असें दिसून येते. कालिदास, भवभूति, वगैरेंच्या नाटकावरून हीच गोष्ट सिद्ध होते.

( ४ ) **अर्वाचीन काळी नाटकाचें स्वरूप प्रथम कसें होतें व हल्लीं कसें आहे ?**—दशावताराचे खेळ, ललितें, इ० इ०, सस्कृत नाटकाचीं अनुकरणें, इ०, सगीत नाटके, फार्स, इ०.

( ५ ) **नाटकें पहाण्यापासून नफे**—करमणूक, ज्ञानप्राप्ति, वगैरे

( ६ ) **नाटके पहाण्यापासून तोटे**—

क. पैशाचा व वेळेचा व्यय.

ख. जागरण.

ग. मनोविकाराचे उद्दीपन.

घ. विद्याभ्यासाकडे दुर्लक्ष करून नाटकात शिरण्याची मुलाची प्रवृत्ति.

( ७ ) उपसहार—नाटकाची करमणूक कोणच्या प्रकारे करून घेतली असता अपाय होणार नाहीत, आईबापांनी आपल्या मुलाच्या सबधानें कोणती खबरदारी घेतली पाहिजे, वगैरे सबधाने तुमचे विचार.

## ११८ तरुणपण.

( १ ) तरुणपण हे काय आहे ?—बाल्यावस्था सपून प्रौढ दशा येईपावेतो जे वय ते.

( २ ) तरुणपण हा आयुष्याचा अत्यत सुखावह भाग होय. कारणे —

क सृष्टीतील सर्व वस्तु नवीनपणामुळे रमणीय भासतात.

ख. त्याच त्याच वस्तु अनेक वेळा पाहिल्याने येणारा वीट आलेला नसतो.

ग. आपण प्रौढ दशेत आल्यावर अमुक अमुक करू वगैरे गोड मनोराज्ये करता येतात.

घ जगाची रहाटी किती दुःखमय असते, ह्याचा गधही नसतो.

ङ, तरुणपणाच्या मैत्री शुद्ध, म्हणजे निरपेक्षबुद्धीच्या, असल्या-कारणाने सुखावह असतात, इत्यादि.

( ३ ) तरुणपण हा काळ अत्यत उपयुक्त, आणि मौल्यवान् म्हणून महत्वाचा आहे

कारणे—

क. ह्या वयात ज्ञानोपार्जन करण्याच्या सोयी, सामर्थ्य, आणि स्मृतीची प्रखरता, हीं फार असतात.

ख. पुढचे आयुष्य सुखाने जाण्यासाठीं तजविजी करावयाच्या त्या ह्याच वयात.

( ४ ) तरुणपणाबद्दल फार काळजी वहावी लागते.

कारणें—

क. वाईट सगति लागण्याचा फार सभव असतो.

ख. वाईट सवयी ह्या वयात लवकर जडतात.

( ५ ) उपसहार—ह्या वयाबद्दल मुलांनी आणि त्यांच्या पालकांनी फार खबरदारी घेतली पाहिजे.

## ११९ म्हातारपण.

( १ ) **आयुष्याच्या कोणत्या भागाला हा शब्द लावतात ?**—ह्या भागात मन बळकट असते, विचार प्रौढ असतात, आणि अनुभव विशाल असतो, परतु शरीर पगु होते. म्हणून पहिल्या कारणाने मनुष्य जरी सन्मानास पात्र झाला, तरी दुसऱ्या कारणानें तिरस्कारास पात्र होतो.

( २ ) **म्हातारपणाविषयी आपल्या जुन्या लोकांचे काय मत होतें ?**—म्हातारे लोक हे समाजात मोठ्या योग्यतेचे म्हणून पूज्य होते, असें त्याचे मत स्पष्ट दिसते

**कशावरून ?**—म्हातारा=महत्तर=सर्वांत मोठा, आणि म्हणून पूज्य, ह्या व्युत्पत्तीवरून.

( ३ ) **गैरसोयी**—

क. परस्वाधीनपणा.

ख उत्साहशून्यता

ग. आपल्या डोळ्यादेखत मेलेल्या आप्तेष्टमित्राचे स्मरण.

घ. शारीरिक व्यगामुळे थट्टा होते, इत्यादि.

( ४ ) **म्हातारपणी दु:खाची तीव्रता अशत तरी कमी होते.**

**कारणे**—

क. सुज्ञाकडून मोठेपणा मिळतो

ख दुसऱ्याला उपदेश करून सन्मार्गाला लाविल्याचे श्रेय मिळविण्याचे पुण्य सपादिता येते.

ग. तारुण्य सद्गुणात घालविलेले असल्यास चित्ताला पूर्ण शाति असते

( ५ ) **उपसहार**—म्हाताऱ्या माणसाना योग्य तो मान आपण देण्यास शिकावें. सद्गुणी वृत्तीने तरुणपणीं रहावे. म्हणजे म्हातारपणीं इतराच्या मानास आपण पात्र होऊं, व न झालों तरी निदान आपल्या मनाला तरी शाति राहील.

## १२०. नूरजहान.

( १ ) तिचा बाप मूळचा इराणचा राहाणारा. त्याचे नाव अयाझ ऊर्फ मिर्झा ग्यासबेग.

( २ ) तो हिंदुस्थानांत येत असता वाटेत मेहेरउन्निसा, ( नतरची नूरजहान )हिचा जन्म इ० स० १५८५ त झाला.

( ३ ) हिंदुस्थानात आल्यावर ती अकबराच्या दरबारी राहिला.

( ४ ) जहांगिराची तिजशीं लग्न करण्याची इच्छा अकबरास न आवडून त्यानें तिचे लग्न शेरखान नामक एका अफगाण मनुष्याशीं लाविलें.

( ५ ) जहांगीर हा राजा झाल्यावर तिच्या नवऱ्यास मारून त्यानें तिच्याशीं लग्न केलें

( ६ ) जहांगीर तिच्या कह्यात वागू लागला.

( ७ ) तिला राज्यकारभाराची हौस होती

( ८ ) तिचा स्वभाव चांगला होता.

( ९ ) नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती एकटी राहिली.

(१०) तिचा मृत्यू इ० स० १६४६ मध्ये झाला.

## १२१ हत्ती.

( १ ) **स्वरूप**—चतुष्पाद प्राण्यात अत्यंत मोठा, शरीर ओबडधोबड; उंची सुमारे ११ फूट, सोंड पोकळ आणि लवचीक, पावलें वाटोळीं, चालतांना आवाज होत नाहीं. तो सोंडेनें पाणी शोषून घेऊं शकतो.

( २ ) **शक्ति**—पाठीवर सात आठ माणसें सहज वाहूं शकतो. दिवसात ६० मैल चालतो.

( ३ ) **मूलस्थान**—आफ्रिका खंडाच्या मध्यभागीं, सिलोनात, हिमालयाच्या पायथ्याशीं, ब्रह्मदेशात.

( ४ ) **स्वभाव**—रानटी स्थितींत ३० पासून १०० पर्यंत हत्ती कळप करून राहतात. झाडाच्या सालीं, पानें, आणि कंद हे त्याचें भक्ष्य. शेताची नासाडी करतो. माणसाळलेला असतां पानें, ऊस, आणि धान्य खातो. त्याचा महात म्हणजे हाकणारा मानेवर बसून अंकुशानें त्याला हाकतो. थोड्याच आठवड्यात माणसाळतो. ममतेनें वागवील त्याच्यावर ममता करतो. त्याला राग जलद येतो एका शिंप्यानें एका हत्तीच्या सोंडेस सुई टोंचली ही गोष्ट द्यावी.

( ५ ) **कसा पकडतात**—एक मोठा खड्डा खणून त्यावर काटक्या झाकण घालून

( ६ ) **मनुष्याला हत्तीचा उपयोग**—प्राचीन काळीं लढाईच्या प्रसंगीं ओझीं वाहणें, गाड्या ओढणें, किल्ल्यांचे दरवाजे फोडणें, ह्या कामीं त्याचा उपयोग करीत. हल्लींच्या काळीं गाड्या ओढणें, ओझीं वाहणें, तुळवटें राशी करून रचणें, दलदलीच्या जागेंतून प्रवास करणें, इत्यादि कामीं हत्तीचा उप-

योग केला जातो. पूर्वी आणि हल्लीही मिरवणुकींत हत्ती चालवितात. हत्ती मेल्यावर त्याचे दात वगैरेचा उपयोग फण्या वगैरे वस्तु करण्याकडे होतो

## १२२. स्वावलबन आणि परावलबन

( १ ) **स्वावलबन म्हणजे काय ? परावलबन म्हणजे काय ?—** स्वावलबी मनुष्य कमी बुद्धिवान् असला आणि परावलबी मनुष्य ज्यास्ती बुद्धिवान् असला तरी पहिला मनुष्य आपल्या हिमतीवर काम लवकर शेवटास नेतो. दुसऱ्या मनुष्याला उशीर लागतो किंवा ते मुळींच शेवटास जात नाही.

( २ ) **स्वावलबनापासून फायदे—**

क. दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात बसण्याचे कारण रहात नाही.

ख दुसऱ्याचा तिरस्कार सहन करण्याचे प्रसग येत नाहात

ग काम चालले असता मध्येच काही अडचणी आल्या तरी ज्याचा तो आपल्या हिमतीने पुढे जातो.

घ. स्वावलबी मनुष्याचे काम सिद्धीस गेले तर त्याला यश मिळते, व सिद्धीस न गेले तरी फजिती होत नाही.

ङ. स्वावलबी मनुष्याचा स्वतःच्या हिमतीवर भरवसा असल्या-कारणानें लोकांचाही भरवसा बसतो, आणि लोक सकट-समयीं त्याची मदत मागतात.

च. व्यवहारात स्वावलबी मनुष्यास पैसा, मान, बढती, वगैरे लवकर प्राप्त होतात.

( ३ ) **उपसंहार—**यासाठीं स्वावलबनाचा गुण अगीं येण्यास प्रत्ये-कानें झटावे

## १२३. छापण्याची कला.

( १ ) **उत्पत्ति—**ही कला केंव्हा, कोणी व कोठें शोधिली ? तिची पूर्वीची स्थिति—

( २ ) **सोयी—**स्वस्तपणा, जलदी, स्वच्छपणा, सुवाच्यपणा, आटो-पसरपणा, शुद्धपणा, टिकाउपणा, इ०.

( ३ ) **छापलेल्या कामांचे प्रकार—**पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्त-मानपत्रे, जाहिराती, तिकिटें इ०.

( ४ ) **छापण्याच्या तऱ्हा**—शिलावरून, खिळ्यावरुन, लांकूड, धातूचे पत्रे, वगैरेवरून.

( ५ ) **छापण्याच्या कलेचे परिणाम**—ज्ञानवृद्धि, भिन्न भिन्न राष्ट्रामध्ये प्रीतिभाव उत्पन्न करणे, इ०.

( ६ ) **छापण्याच्या कलेचे वाईट परिणाम**—अश्लील, अनीतिवर्धक पुस्तकें, वगैरेचा फैलाव.

( ७ ) उपसंहार—

## १२४. दानधर्म.

( १ ) **व्याख्या**—जे द्यावयाला आपण कायद्याने किंवा समाजाच्या नियमानीं बद्ध नाहीं, ते दुसऱ्यालाआपखुषीने देणे.

( २ ) **आपल्या लोकांची दानधर्माची रीति**—

क. अन्नसत्रे.

ख सदावर्ते.

ग. धर्मशाळा, विहिरी, वगैरे

घ. दक्षिणेचे विविध प्रकार

( ३ ) **हल्लींची दानधर्माची पद्धति**

क. वर्गण्या.

ख शिष्यवृत्त्या, बक्षिसे, पदके, वगैरेसाठीं पैसा खर्चणे.

( ४ ) **पूर्वीच्या व हल्लींच्या दानधर्मपद्धतींतील गुणदोष.**

( ५ ) उपसंहार—

## १२५. आळस.

( १ ) **व्याख्या**—कर्तव्य न करतां रिकामे बसणें.

( २ ) **दुष्परिणाम**—

क. मन कमजोर होते.

ख. मन अनीतीकडे कलते.

ग. मनाची तरतरी जाऊन ते सुखोपभोगाला नालायक होतें.

घ. नवीन ज्ञान व अनुभव प्राप्त होत नाहींत, व पूर्वीचें ज्ञान व अनुभव लोप पावतात.

ङ. आळशी माणसे लोकाच्या तिरस्कारास पात्र होतात.

च. आळशी बसण्याचे उदाहरण घालून देऊन आळशी माणसे समाजाचे गुन्हेगार होतात.

छ. जगातील मोहाचे निवारण करण्यास आळशी मनुष्ये असमर्थ असतात, उद्योगशील माणसे असमर्थ नसतात.

( ३ ) उपसहार—सर्वांनीं आपआपलीं कर्तव्ये योग्य रीतीने केल्यानतर हवी ती करमणूक करून घ्यावी

## १२६. दुष्काळ.

( १ ) दुष्काळ म्हणजे काय ?

( २ ) तो कसा उत्पन्न होतो ?

क. अतिवृष्टि.

ख. अनावृष्टि.

ग. भलत्याच वेळीं वृष्टि

घ. टोळधाड, इ०.

( ३ ) दुष्काळ निवारण्याचे उपाय—

क. धान्य साठवून ठेवण्याचा परिपाठ.

ख. रिलीफ कामे काढावीं ( लोकांनीं आणि सरकारने ).

ग. धनाढ्य असतील त्यांनी विपन्न माणसास यथाशक्ति मदत करावी.

घ. वर्गण्यानीं पैसा उभारावा.

( ४ ) दुष्काळासबधानें अवांतर विचार—

## १२७. आगगाडी.

( १ ) प्रथम स्टिफन्सन्नें वाफेच्या अगीं शक्ति असते हे ठरविले.

( २ ) पहिल्या कल्पनात सुधारणा.

( ३ ) हल्लींची स्थिति.

( ४ ) सोयी.—

क. व्यापाराच्या कामीं.

ख. दुष्काळ निवारण्याच्या कामीं.

ग. देशात शातता राखण्याच्या कामीं.

घ. प्रवासाच्या बाबतींत.

( ५ ) गैरसोयी

क. धोके.

ख. शेतकीची जमीन कमी होते

ग. प्रवासाच्या वेळीं पारतन्त्र्य.

घ फार घाई, उकाडा, कोळशाचे कण डोळ्यात जातात, इ०.

( ६ ) उपसहार—एकदरींत आगगाडीपासून फायदे आहेत.

## १२८. टपालखातें.

( १ ) टपालखाते म्हणजे काय ?—पत्रे दुसऱ्या ठिकाणीं पोहोंचविणारे खाते.

( २ ) पूर्वी हे काम कसें होत असे ?—श्रीमत लोक जासूद पाठवीत असत. गरीब लोक वाटसराबरोबर पत्रे पाठवीत असत.

( ३ ) हिंदुस्थानांत प्रथम कोणी सुरू केलें ?—शीरशहाने.

( ४ ) हल्लींच्या व्यवस्थेंत अधिक सोयी कोणच्या ?—

( ५ ) ह्या खात्यासंबंधाने तुमचे विचार.

## १२९. धंद्याची निवड.

( १ ) अनेक नवीन धंदे हल्लीच्या सुधारणामुळे अस्तित्वात आले आहेत कारखाने, गिरण्या, छापखाने यात हजारो लोकाना काम मिळू शकते

( २ ) धंद्याची निवड कशी करावी ?—
आपल्या प्रकृतीला आणि स्वभावाला सोयीचा पडेल असा धदा स्वीकारावा.

( ३ ) एकदां पसंत केलेला धंदा विशेष कारणावांचून सोडूं नये.

क. पहिल्या धद्यात मिळविलेला अनुभव फुकट जातो.

ख. नवीन धदा साधावयासाठीं जास्ती वेळ, काळजी, वगैरे खर्च होतात.

ग. लोक आपणाला अस्थिर बुद्धीचा समजून आपला कटाळा करतात.

( ४ ) उपसंहार—

## १३०. करमणूक

( १ ) **करमणूक**—मन रमविण्याचा उपाय.

( २ ) **करमणुकीची आवश्यकता**—

क. एकसारखें काम केल्यानें मन क्षीण होतें.

ख. शरीर क्षीण होते.

ग. आनदी वृत्ति नाहीशी होते

घ. करमणूक नसल्यानें कधीं कधीं वेडही लागते.

( ३ ) **करमणुकीचे प्रकार**—

क. शारीरिकः—व्यायाम, खेळ, इ०.

ख. मानसिकः—कादबऱ्या वाचणे, इ०.

( ४ ) **फायदेः**—करमणुकीच्या मार्गाचे योग्य प्रकारें अवलबन केल्याने हित होते, नाहीं तर आळशी बनण्याकडे किंवा दुर्व्यसनाकडे प्रवृत्ति होते.

( ५ ) उपसंहार—

## १३१.तालीम.

( १ ) **तालीम**—शरीराच्या अवयवाना जोरदार चलनवलन देणे.

( २ ) **तालमीचे पूर्वीचे प्रकार**—तालिमखान्यात हौदा असे, त्यात कुस्त्या खेळणे, मल्लखांबावर उड्या मारणे, जोर व बैठका काढणे, जोडींचे हात करणे, वाटोळे जड धोंडे उचलणे, इ०.

( ३ ) **हल्लींचे प्रकार**—डंबेल्स, सिंगल बार, प्यारलल् बार्स घोडा, इत्यादि.

( ४ ) **तालमीपासून फायदे**—रुधिराभिसरण जोरानें चालते, अन्नपचन चागले होते, शक्ति आणि कणखरपणा वाढतो, प्रकृति नीरोगी राहते, मनाला हुशारी वाटते इ०.

( ५ ) **तालमीविरुद्ध आक्षेप**—वेळ जातो, अपघात होतात, इत्यादि.

( ६ )—**आक्षेपांचें खडन** काळजी बाळगिली असता अपघात टाळता येतात. वेळ गेला तरी तो आरोग्य वाढविण्याकडे जातो, इत्यादि.

( ७ ) उपसहार—

## १३२. आनदी वृत्ति.

( १ ) **आनदी वृत्ति म्हणजे काय ?**

( २ ) तिचे फायदे—

क. स्वतःलाः—दुःखाची तीव्रता कमी होते.

ख. दुसऱ्यालाः—लोकास आपला कटाळा येत नाहीं.

( ३ ) ती स्वाभाविक असते किंवा सवयीनें संपादन करून घ्यावयाची असते ?—कित्येक माणसे स्वभावतःच रंगेल असतात, कित्येक माणसे स्वभावतः गंभीर असतात, तथापि आनंदी मनुष्याच्या सहवासानें त्यांना थोडी तरी आनंदी वृत्ति संपादिता येते.

( ४ ) आनंदी वृत्तीचा अतिरेक—प्रसंग आणि स्थल हीं मनात न आणता दाखविलेली आनंदी वृत्ति दुसऱ्यास राग आणते. ह्या वृत्तीचा अतिरेक झाल्यास लोकांना आपला त्रास येतो.

( ५ ) उपसंहार—

### १३३. ग्रंथसंग्रहालय.

( १ ) ग्रंथसंग्रहालय म्हणजे काय ?—पुस्तकांचा मोठा संग्रह.

( २ ) जरूरी—कोणाही मनुष्याला आपल्याला लागणारीं सर्व पुस्तके विकत घेणें किंवा मित्राकडून मिळविणे शक्य नसते.

( ३ ) त्याचे प्रकार—

क. विशिष्ट विषयावरील पुस्तकांचा संग्रह. (उ० कायदा, वैद्यकी, इ०).

ख. सर्व विषयावरील पुस्तकांचा संग्रह.

( ४ ) त्याचे उपयोग—

क. त्या त्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या लोकास.

ख. समाजातील सामान्य वाचकास.

( ५ ) फायदे —

क. उपयुक्त किंवा मनोरंजक ज्ञानाचा प्रसार.

ख. समाजाला सोयीच्या आणि आपखुषीच्या द्वारानें शिक्षण प्राप्त होते.

ग. गरीब विद्यार्थ्यांची चांगली सोय होते.

( ६ ) आपल्या देशांत हल्लींच्या काळी ग्रंथसंग्रहालयें कोणच्या स्थितींत आहेत ?—तीं जास्ती उपयुक्त करण्यास काय तजविजी केल्या पाहिजेत ? चांगलीं ग्रंथसंग्रहालयें कोणकोणच्या गावीं आहेत ?

( ७ ) अन्य विचार कांही असल्यास ते.

**१३४. खेडेगांवच्या रहाणीपासून फायदे.**

( १ ) स्वच्छ हवा.
( २ ) मुबलक जागा.
( ३ ) स्वस्ताई
( ४ ) खेळणे, पोहणे, वनभोजने, वगैरेच्या सोयी.
( ५ ) निसर्गातील भव्य देखावे.

**१३५. खेडेगांवच्या राहणीपासून तोटे.**

( १ ) नजर आकुंचित होते.
( २ ) परनिंदेची गोडी लागते.
( ३ ) कोणत्याही कामी गुप्तपणा रहात नाहीं

**१३६. शहराच्या राहणीपासून फायदे.**

( १ ) आपली आणि मुलाच्या विद्याभ्यासाची सोय, शाळा, ग्रंथसंग्रहालयें, अजबखाने, विद्वान् लोकाची विपुलता, व्याख्यानें, इ०.

( २ ) पैसा मिळविण्याची साधनें, व्यापार, नोकरी, दलालीचे धंदे, इत्यादि.

( ३ ) अनुभव वाढतो, विविध विषयासंबंधी माहिती होते, दुसऱ्याच्या कारभारात उगीच नाक खुपसण्याची प्रवृत्ति नाहींशी होते

( ४ ) करमणुकीची अनेक साधनें असतात नाटकें, सर्कशी, फोनोग्राफ, सिनेमाटोग्राफ.

**१३७. शहराच्या राहणीपासून तोटे.**

( १ ) अशुद्ध हवा
( २ ) वृक्ष वगैरे हवा स्वच्छ राखणाऱ्या वस्तूंची कमताई.
( ३ ) जागेची अडचण
( ४ ) महागाई.
( ५ ) अनीतीकडे व उधळेपणाकडे प्रवृत्त करणाऱ्या गोष्टी.

**१३८. काटकसरीपणा.**

( १ ) **विषयाचे स्वरूप आणि व्याख्या**—जपून खर्च करण्याकडे प्रवृत्ति.

( २ ) फायदे—

क. दुसऱ्याची मदत मागण्याचे संकट टळते.

ख. कामाकाजानिमित्त किंवा आजारीपणात पोटाचा धंदा चार दिवस बाजूला टाकता येतो.

ग. उद्याचे कसे होईल ही चिंता टळते.

घ. मन शांत असते.

ङ. गरीबांना मदत करण्याचे सामर्थ्य असते.

च. बायकामुलांचे आपल्या मागे कसे चालेल ही मरणसमयीं हुरहुर नसते.

( ३ ) उपसंहार—वरील विवरणावरून बोध काय घ्यावा याचा ?—

## १३९. गाढवाला गुळाची काय चव ?

( १ ) गाढवाला भुसापेक्षा गुळाची किंमत अधिक वाटत नाहीं.

( २ ) मूर्खाला सुबोधाचे महत्त्व वाटत नाहीं

( ३ ) ज्याला गुणग्राहकता नाहीं त्याला चांगली वस्तु देणे मूर्खपणा होय. मूल्यवान् वस्तूचा हा दुरुपयोग होय.

( ४ ) थोड्या खर्चानें होणाऱ्या कामास पुष्कळ पैसा खर्चणे हा मूर्खपणा होय.

## १४०. कुसतानापेक्षां निसतान बरे.

( १ ) वाईट पुत्र असण्यापेक्षा मुळींच पुत्र नसलेले बरे.

( २ ) पुत्राच्या दुर्वर्तनानें लोकांत मातापितरांची व कुलाची बदनामी होते

( ३ ) वाईट पुत्र मातापितरांचे हृद्रोग होत.

( ४ ) आपण मुलांचे फार लाड केले, त्याला चांगले शिक्षण दिले नाहीं, अशी मातापितरांना विनाकारण चिंता लागत नाहीं.

( ५ ) वाईट पुत्रामुळे मातापितरांचे पैशाचे नुकसान होते.

( ६ ) त्याचा संसार दुःखमय होतो. त्याचे चित्त शांत नसते.

( ७ ) तुमचे विचार.

आतां विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं वर्णनात्मक, वृत्तांतात्मक, आणि विमर्शात्मक निबंधांना योग्य अशा विषयांची यादी देतो.

## १४१. वर्णनात्मक निबधांस विषय.

१. ह्या परीक्षेसाठीं तुम्ही तयारी कशी केली?
२. मुबईची ट्रामवे कपनी.
३. दिवाळीच्या सणात पुण्याचा (किंवा दुसऱ्या एकाद्या शहराचा) देखावा.
४. मरीन लाइन्सवरील म्याट्रिक्युलेशन परिक्षेचा मडप.
५. एकादा दुष्काळ.
६. तुम्हीं पाहिलेला एकादा लग्नाचा समारभ.
७. घारापुरीचीं लेणीं.
८. सातारा ( किंवा दुसरें कोणतेही) शहर.
९. एकादा सार्वजनिक उत्सव.
१०. महाराष्ट्राचे सक्षिप्त वर्णन (भौगोलिक).
११. तुम्हाला प्राप्त झालेला एकादा मूल्यवान् अनुभव.
१२. तुम्ही एखादी पाहिलेली जत्रा.
१३. सूर्योदयाचा किंवा चद्रोदयाचा देखावा.
१४. क्रिकेटचा खेळ.
१५. सायकाळीं बॅक्‌बेवरील देखावा.
१६. अनतचतुर्दशीच्या दिवशींचा गणपतिविसर्जनाचा समारभ.
१७. सक्रातीचे दिवशीं रस्त्यात दृष्टीस पडणारा देखावा.
१८. सीमोल्लघन.
१९. तुमच्या शाळागृहाची रचना
२०. तुम्ही पाहिलेली गिरणी.
२१. तुम्ही पाहिलेली आगबोट.
२२. तुमच्या गावातील पुस्तकालय
२३. बायसिकलची यत्ररचना.
२४. मुबईच्या कोटोंतील एकादें दुकान.
२५. एकादे गावजेवण
२६. एकादा किल्ला.
२७. वाघ, लाडगा, गाय, म्हैस पोपट, वगैरेसारखा एकादा प्राणी
२८. एकाद्या वनभोजनाचा प्रसग.
२९. छापखाना.
३०. भरतीच्या (किंवा ओहोटीच्या) वेळच ासमुद्राचा देखावा.
३१. ढग, पर्वत, धबधबा, उन्हाळे, इत्यादिपैकीं एकादा सृष्टचमत्कार
३२ एकादे देऊळ, ( किंवा घर ).
३३. उसाचे गुऱ्हाळ.
३४. सोने, रुपे, लोखड वगैरे धातु
३५. डोळ्याची रचना.
३६. एकाद्या पक्षाचें घरटे
३७. पक्ष्याच्या शरीराची रचना.
३८. नारळीचे झाड.
३९. गुरुत्वाकर्षण, स्नेहाकर्षण, केशाकर्षण.
४०. ग्रहण, वीज, इद्रधनुष्य, वारे, दव, उल्कापात, वगैरेसारखा सृष्ट चमत्कार.

४१. बीजापासून वृक्षाची उत्पत्ति. ४२ सह्याद्रि.

## १४२. वृत्तांतात्मक निबधांस विषय

१. हुमायुनाचे चरित्र
२. शिबिराजाची कथा.
३ महाराष्ट्राचे सक्षिप्त वर्णन (ऐतिहासिक.)
४. तुम्ही खेडेगावात घालविलेल्या एकाद्या दिवसाचे वर्णन करा.
५. गुरु गोविंद, तुकाराम, वगैरेंची चरित्रे.
६. तुम्ही उन्हाळ्याची सुट्टी कशी घालविली ही हकीकत सागा.
७. एकाद्या लग्नसमारंभात करावयाच्या विधींची हकीगत लिहा.
८. उमीचदाचे चरित्र द्या.
९. वसईच्या वेढ्याची हकीगत लिहा.
१० फिरगी लोक हिंदुस्थानात येऊन त्यानीं आपला अमल कसा बसविला ?
११. कोलंबसाच्या जलपर्यटनाची हकीगत
१२. गौतमबुद्धाने बौद्धधर्माचा कसा प्रसार केला ?
१३. औरगजेबाने आपल्या भावास दूर करून राज्य कसें मिळविलें ?
१४. चद्रगुप्ताच्या राज्याचे वर्णन करा.
१५. मुसलमानी राज्याच्या ऱ्हासाची कारणें.
१६. मुसलमानानीं हिंदुस्थानात राज्य कसे स्थापिले ?
१७. सोमनाथावर महमुदाची स्वारी
१८. पहिल्या बाजीरावाचे चरित्र द्या.
१९. तुमच्या शाळेत गुदस्त साली भरलेल्या संमेलनाची हकीगत लिहा.
२० तुम्ही वाचलेल्या एकाद्या कादबरीचे कथानक लिहा.
२१ तुमच्या आयुष्याच्या १४ व्या वर्षी घडलेल्या गोष्टी सक्षेपानें लिहा.
२२ इंग्लिश लोकानीं ह्या देशात सत्ता कशी स्थापन केली?
२३ शिवाजीने मराठ्याचे राज्य कसे स्थापिले ?
२४. मराठ्याच्या राज्याच्या ऱ्हासाची कारणें.
२५ तुम्ही प्रो. छत्रे ह्याच्या सर्कशीत ज्या गोष्टी पाहिल्या त्या क्रमाने द्या.
२६ रामाने सुग्रीवाला किष्किंधेचे राज्य कसे मिळवून दिले हे सागा.
२७. रामाने समुद्रावर सेतु बाधला त्यासबधाची तपशीलवार हकीगत लिहा.

२८. हसकाफीय कथानक द्या

२९ विश्वामित्र वसिष्ठाची कामधेनु बलात्कारें नेऊ लागला त्या प्रसंगाचे वर्णन लिहा.

३०. अभिमन्यू कसा मरण पावला ते सागा.

३१ सावित्रीने सत्यवानास कस वाचविले हे लिहा.

३२. हरिश्चद्राची गोष्ट लिहा

३३. नलराजाची गोष्ट लिहा

३४. गजेद्रमोक्षाची कथा लिहा

३५ कलकत्याच्या ब्लाक होलची हकीगत लिहा.

३६. तुम्ही आगबोटीने केलेल्या एकाद्या प्रवासाची हकीगत सागा.

३७. कै० महादेव गोविंद रानडे याचे चरित्र द्या.

३८. इसापनीतीतील लावी पक्षीण आणि तिची पिले ह्या गोष्टीचा साराश द्या.

३९ शिशिर ऋतु सपून वसत ऋतु लागेतोपर्यंत निसर्गातील देखाव्याचे कसे स्वरूप पालटते ते लिहा.

४०. छापखान्यात हस्तलेख दिल्यापासून तो पुस्तक छापून विकावयास तयार होईतोंपर्यंत त्याचे काय काय होते ह्याचे वर्णन करा.

४१. अबोयना येथील कत्तल.

४२. प्लासिची लढाई.

४३. शालिवाहन भोज, विक्रमादित्य.

४४. विद्यार्थिदशेत तुम्ही किंवा दुसऱ्या कोणी अनुभविलेली किंवा पाहिलेली एकादी गमतीची गोष्ट

## १४४. विमर्शात्मक निबधांची सदरवारी

१. प्रामाणिकपणाचे वर्तन सोपे आणि सोयीचे असते.

२. आशा.

३. लोकोत्तर पुरुषाविषयी आपणास थोडीच माहिती असते.

४. युरोपियन लोक आणि हिंदू लोक ह्याच्या चालीरीतींतील फरक.

५. आपल्या देशाविषयी तुम्हाला काय वाटते ?

६. खरे शौर्य.

७. नीतिधैर्य.

८. फुरसतीचा वेळ कसा घालवावा?

९. तुम्हाला कोणचा खेळ फार आवडतो, आणि का ?

१०. सत्य भाषण.

११. मादक पदार्थांचे सेवन.

१२. व्यायामाची आवश्यकता.

१३. आपल्या आवडीची पुस्तके सग्रहास ठेवण्याची आवश्यकता.

१४. शिक्षणाची आवश्यकता.
१५. शांतता.
१६. प्रवास.
१७. कविता.
१८. चित्रकला.
१९. गायनविद्या.
२०. व्यापार.
२१. जुगारी.
२२. तत्त्वज्ञान.
२३. शहाणपणाने सुरवात केली म्हणजे अर्धे काम पदरात पडले असें होतें.
२४. दीर्घ प्रयत्न.
२५. चाकू, कातरी हीं मुलाची खेळणी नव्हत.
२६. प्रयत्नाअतीं परमेश्वर.
२७. व्यवस्थितपणा.
२८. सुखोपभोगांत परिमिति राखण्याची आवश्यकता.
२९. टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपणा येत नाहीं.
३०. आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं.
३१. दुःसगतीचे दुष्परिणाम.
३२. जात्यावर बसले म्हणजे ओवी सुचते.
३३. गर्विष्ठपणा.
३४. सवयीचा जोर.
३५. सगतीवरून माणसाची परीक्षा होते.
३६. निष्कामबुद्धीने सुमार्ग अनुसरावा
३७. उद्योगशीलता.
३८. फुरसतीच्या वेळीं पुढची तरतूद करून ठेवावी.
३९. वडिलास मान
४०. शिस्त.
४१. वेळ.
४२ शालीनता
४३ पोषाख कसा असावा ?
४४. इतिहास
४५. रसिकता.
४६ सस्कृत भाषा शिकण्याची आवश्यकता.
४७. वर्तमानपत्रे
४८. घराभोंवतीं बाग करण्याची हौस.
४९. वाहात्या गगेत हात धुऊन घ्यावे
५०. आईबापाची माया.
५१. चांगल्या चालीरीती
५२. चागला लौकिक.
५३. क्रोध.
५४. प्राप्तसहिष्णुता.
५५. वाचलेल्या विषयाचे मनन.
५६. रसिकपणाचे सभाषण करण्याची कला
५७. अनुकपा
५८. मनोविकार नियत्रित ठेवल्याने फायदे
५९. एकान्तवास.

काशीनिवासात या सूफी कवीच्या काव्याचा त्याच्यावर परिणाम झाला असावा

नाथाना सूफी पथ आणि त्याचे साहित्य याची कितपत माहिती होती हे समजण्यास आज त्याच्या ग्रथात आधार सापडत नाही दुसरे असे की अशा प्रकारची रूपकात्मक काव्य-रचना महाराष्ट्रात नाथानीच सुरू केली किंवा त्याची एकट्याचीच आहे असे नाही नाथापूर्वी होऊन गेलेल्या काही मराठी मत कवीनी अशा प्रकारची रचना केल्याचा दाखला आहे उदाहरणार्थ —सेनान्हाव्याचा पुढील अभग पहावा —

आम्हीवारीक वारीक । करू हजामत बारीक
विवेकदर्पण आयना दावू । वैराग्य चिमटा हालवू
उदकशाति डोई घोळू । अहकाराची शेंडी पिळू
भावार्थाच्या बगला झाडू । कामक्रोध नखे काढू
चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवात

सेनान्हाव्याप्रमाणे नरहरी सोनाराने देखील आपल्या धद्यातील उपकरणावर अध्यात्माचा रग चढविला आहे तेव्हा आपल्या साप्रदायातील पूर्वसूरीचे अशा प्रकारचे साहित्य पुढे असताना नाथाना सूफी पथाची उसणवारी करण्याचे काय प्रयोजन होते हे समजणे कठीण आहे

असो रुक्मिणी स्वयवरावर उपलब्ध असलेल्या मराठी कृतीपैकी नरेंद्र आणि एकनाथ याच्या ग्रथातील काव्यगुणासबधाने वर विवेचन करण्यात आले आहे दोघे कृष्णभक्त असूनहि प्रत्येकाची प्रकृति आणि दृष्टिकोण याच्या भिन्नत्वामुळे त्याच्या रचनेत अतर पडलेले दिसते नरेंद्राची भक्ति सौंदर्यप्रधान आहे याच्या उलट नाथाची दृष्टि बोधप्रधान

# अनुवाद.

१ एकाद्या वाक्याचा अनुवाद करणे म्हणजे त्या वाक्याचा मतलब वेगळ्या शब्दांनीं दर्शविणे. मूळच्या वाक्यातील शब्द व रचना ह्यांच्यामध्ये जितका फेरबदल करता येईल, तितका करून पुन्हा त्यातील अर्थाची हानि न होऊ देता साध्या व सोप्या भाषेने केलेला जो अनुवाद, तो उत्कृष्ट होय. मूळातील रचनेत आणि शब्दात महत्तम फेरफार केला जाऊन मूळातील अर्थाची लघुतम हानि ज्या अनुवादात होईल, त्याची योग्यता जास्ती असे समजण्यात येते.

२ उत्कृष्ट अनुवादात पुढील चार अटी पूर्ण झाल्या पाहिजेत.—

( १ ) मूळातील सर्व मतलब अनुवादात झाला पाहिजे.

( २ ) मूळात नसलेला मतलब अनुवादात येता कामा नये.

( ३ ) मूळातील शब्द आणि वाक्यरचना याच्याहून अनुवादातील शब्द आणि वाक्यरचना ही शक्य तितकी वेगळीं असलीं पाहिजेत.

( ४ ) मूळातील भाषेपेक्षा अनुवादाची भाषा अधिक सोपी आणि सुबोध असली पाहिजे.

३ ह्या चारी अटी कशा पूर्ण करावयाच्या, हे पुढील सूचनावरून विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.

( १ ) मूळातील वाक्यसमूह गद्यात्मक असो किंवा पद्यात्मक असो, तो वाक्यसमूह विद्यार्थ्यांनें काळजीपूर्वक वाचून त्याचा अर्थ आपल्या मनात चांगला ठरवावा, म्हणजे मूळातील सर्व मतलब अनुवादात येऊन दुसरा काहीं येणार नाहीं.

( २ ) अनुवाद करावयास दिलेला वाक्यसमूह पद्यात्मक असल्यास त्यातील शब्दांची मांडणी गद्याप्रमाणे करून घ्यावी, व फक्त कवितेतच येणारीं अशी जीं रूपे असतील, तीं गद्याच्या प्रचाराप्रमाणे करावीं.

( ३ ) मूळामध्ये जे काहीं सामासिक शब्द असतील, त्याच्या जागीं सुटे शब्द घालावे, व अनुवादाची भाषा व सरणी मूळापेक्षा शक्य तितकी साधी करावी.

( ४ ) पुष्कळ अर्थालंकार असे असतात, की त्याच्या घटक अवयवामध्ये थोडीशी बदल केली असता वेगळे अलंकार निष्पन्न होतात. अशी बदल शक्य असेल तेथे अवश्य करावी. अशा प्रकारे रूपकाची उपमा करणे शक्य असते.

( ५ ) कित्येक अर्थालंकार केवळ शब्दाच्या विशिष्ट मांडणीवरच अवलंबून असतात. ही मांडणी बदलली, म्हणजे त्यांचे अलंकारत्व नष्ट होते. तथापि अर्थ जास्ती साधा, सरळ आणि सुगम होतो. अशा रीतीने यथासंख्य अलंकाराचे रूपांतर करता येईल.

( ६ ) श्लेषालंकार हा शब्दविशेषावर अवलंबून असतो, अर्थावर अवलंबून नसतो, ह्यामुळे श्लेषयुक्त पद्याचा अनुवाद करताना त्या श्लिष्टपदाचा अर्थ सहज लक्षात येण्याजोगा असल्यास तो तशीच ठेवावी, नसल्यास त्या श्लिष्टपदाचे दोन्ही अर्थ दिले पाहिजेत. मुख्य विधानाला लागू पडणार अर्थ प्रथम देऊन नंतर कंसांत दुसरे अर्थ द्यावे. असे केल्याने श्लिष्टपदामध्ये श्लेष उत्पन्न होऊन दोन्ही पक्षाकडे ती पदे सारखीच कशी लागू पडतात. हे आपणास समजले आहे, असे द्योतित करिता येते.

( ७ ) मूळातील दोन तीन साधी वाक्ये एकत्र करून एक मिश्र किंवा संयुक्त वाक्य करावे, मिश्र आणि संयुक्त वाक्ये असली, तर त्यांची साधी वाक्ये करावी, किंवा मिश्र वाक्यांची संयुक्त, व संयुक्त वाक्यांची मिश्र वाक्ये करावी.

( ८ ) स्वार्थ, संकेतार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ, संशयार्थ, वगैरेंची रूपे पालटून एकाच्या जागी दुसरा अर्थ योजावा.

४. आता वर दिलेल्या नियमाच्या स्पष्टीकरणासाठी प्रत्येक प्रकारची एक दोन उदाहरणे देतो.

**न चोराला लाधे, प्रकट न दिसे, दे सुख सदा,**
**दुणावे की देतां, किमपि न सरे लेशहि कदा ।**
**न कल्पांतीं पावे निधन, धन विद्याभिध असे—**
**असे ज्याचें त्याशी प्रतिभटती जे पामर पिसे ॥**

वामन—नीतिशतक.

ह्या श्लोकांत गद्यात न येणारीं जी रूपे किंवा शब्द आहेत, ते येणे-प्रमाणे.—( १ ) लाधे=लाधते=प्राप्त होते. ( २ ) दिसे=दिसते. ( ३ ) दे=देते. ( ४ ) दुणावे=दुणावते=दुप्पट होते. ( ५ ) न सरे=न सरते=सरत नाहीं. ( ६ ) पावे=पावते. ( ७ ) प्रतिभटति=प्रतिभटतात=स्पर्धा करतात ( ८ ) असे=असते.

आता ह्या श्लोकाचा अनुवाद पुढें दिल्याप्रमाणें करता येईल —विद्या ह्या नावाचें जे द्रव्य आहे, ते चोराला प्राप्त होत नाही, ते लोकाना उघड दिसत नाहीं, ते नेहेमीं सुख देतें, ते लोकाना दिल्याने यत्किंचित् कमी न होता उलट दुप्पट होते, कल्पाच्या अंतीही ते नाश पावत नाहीं, अशा प्रकारचें द्रव्य ज्याच्याजवळ असते, त्याच्याशी क्षुल्लक वेडगळ लोक मात्र स्पर्धा करतात !

**५. त्यासि म्हणे राम, " सख्या ! हरितों त्वद्दुःख सर्व मी आधीं ।**
**कार्य करुनि मग माजें सद्यश तूंही सख्या ! जगीं साधीं " ॥**

मोरोपत—आद्यार्यारामायण–आर्या ७९.

ह्या आर्येत गद्यात न घालण्याजोगीं शब्दाचीं रूपे हीं आहेत. ( १ ) त्यासि, ( २ ) म्हणे, ( ३ ) माजे, ( ४ ) साधीं. ह्या रूपाच्याबद्दल अनु-वादात अनुक्रमें ( १ ) त्यास ( किंवा त्याला ), ( २ ) म्हणतो ( किंवा म्हणाला ), ( ३ ) माझें, ( ४ ) साध, अशी किंवा ह्या अर्थाचीं रूपे योजिलीं पाहिजेत

तसेंच वरील आर्येतील शब्दाची माडणी जी गद्यात येऊ शकत नाहीं, ती पुढे दिल्याप्रमाणे आहे. ( १ ) त्वद्दुःख सर्व, ( २ ) कार्य माजे, ( ३ ) सद्यश तूही साधीं. ह्या माडणीच्याबद्दल अनुवादात पुढीलप्रमाणे माडणी केली पाहिजे.

( १ ) सर्व त्वद्दुःख, ( २ ) माझें कार्य, ( ३ ) तूही सद्यश साधीं.

वर नमूद केल्याप्रमाणें फेरफार करून उदाहृत आर्येचा अनुवाद असा होईलः—

त्याला ( सुग्रीवाला ) राम म्हणाला, " मित्रा, अगोदर मी तुझे सारे सकट दूर करितों, ( आणि ) नतर ( हे ) मित्रा, तूही माझें काम करून सत्कीर्ति मिळींव. "

या अनुवादात ( १ ) सुग्रीवाला, ( २ ) आणि ( ३ ) हे ! असे

तीन शब्द पदरचे घातले आहेत, तसे घालावयाला काही हरकत नाहीं. " त्याला " हे सर्वनाम सुग्रीवाला उद्देशून योजिले आहे, असे आपणास ठाऊक नसले, तर " त्याला " ह्याचा अनुवाद " त्याला " असाच करावा.

**६ वनदेवता म्हणति त्या, " बा! गा! मूर्च्छोत्थिता चकोरा! हो-**
**स्वस्थ, जोत्स्ना की हे, द्रुत उठचि, नमावया नको राहों ॥ "**

ह्या आर्येत ( १ ) वनदेवता, आणि ( २ ) मूर्च्छोत्थिता, हीं दोन सामासिक पदे आहेत. त्याचे जागी सुटे शब्द घालून पुढे दिल्याप्रमाणे अनुवाद होईल.

वनातील देवता त्याला ( सत्यवानाला ) म्हणाल्या, 'अरे मूर्च्छेतून उठलेल्या चकोरा, शांत हो कारण, ( ही सावित्रीच्या रूपाने ) तुजपुढे चंद्राची कांति ( चांदणे ) उभी आहे ऊठ लवकर, तिला नमन केल्याशिवाय राहू नको ! "

**टीप**—चकोर पक्ष्याला चंद्राची कांति ( चांदणे ) आवडते, ही कल्पना विद्यार्थ्याला अवगत असली पाहिजे. ह्या आर्येमध्ये सत्यवान् आणि सावित्री ह्या व्यक्ति अनुक्रमे पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी आहेत. त्यांच्या संबंधाने कवीने ' चकोर ' आणि ' ज्योत्स्ना, ' असे शब्द योजिले आहेत, ते अनुक्रमे पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी आहेत. असे करणे हे अलंकाराच्या शुद्धतेस आवश्यक आहे. अनुवादामध्ये ' ज्योत्स्ना ' ह्या शब्दाला प्रतिशब्द चांदणे ( नपुं० लिं० ), किं० चंद्रप्रकाश ( पु. लि. ) असा न योजता ' चंद्राची कांति ' असा स्त्रीलिंगी प्रतिशब्द योजिला आहे, हे विद्यार्थ्याने लक्ष्यात बाळगावे.

**७ मन्मतिदरींत न शिरे कोपमतंगज, विवेकहरि जागे ।**
**म्यां न त्यजितां नेतो भूप बळे तुज रुचेल तरि जा गे ! ॥**

वरील आर्येत एक सुंदर रूपक आहे. ते कायम ठेवून पुढे दिल्याप्रमाणे तिचा अनुवाद होईल.—

माझ्या बुद्धिरूपी गुहेमध्ये रागरूपी हत्ती प्रवेश करू शकत नाहीं. कारण, तेथे योग्य आणि अयोग्य ह्या संबंधाचा विचार हाच कोणी सिंह, तो सदा जागत असतो. माझ्या संमतीवाचून राजा तुला जबरदस्तीने नेत आहे, तुला आवडल्यास, हे गार्यी, तू जा.

आर्येतील रूपक काढून टाकून त्याच्या जागीं उपमा घालून पुढे दिल्या-प्रमाणे अनुवाद होईल

गुहेमध्ये सिंह जागृत असला म्हणजे तींत हत्ती जात नाहीं त्याप्रमाणे माझ्या मनात योग्यायोग्याचा विचार नेहमीं चालत असल्यामुळे त्यात काप येऊ शकत नाहीं माझ्या अनुमतीशिवाय राजा तुला बलात्कारानें नेत आहे. तर तुझी इच्छा असल्यास, हे गार्गी, तू त्याच्याबरोबर जा

८. यथासख्य अलकारात दोन किंवा अधिक पदार्थांचा प्रथम उल्लेख केलेला असून त्याच क्रमाने त्या पदार्थांशीं दुसऱ्या तितक्याच पदाचा अन्वय केला असतो. हा अलकार ज्या वाक्यात असेल त्याचा अनुवाद करताना प्रथम उल्लिखित केलेल्या पदार्थांपैकीं प्रत्येक पदार्थ वेगळा वेगळा घेऊन त्याच्याशीं अन्वित असे जे पद असेल ते घेऊन त्याच्याशीं याचा सबध जुळवावा. उदाहरणासाठीं वामनाचे पुढील पद्य घेतो.—

**तृणें मृगाला, सलिलें झषाला,**
**संतोष हे वृत्ति महाजनाला ।**
**तयांस निष्कारण तीन वैरी**
**किरात, कैवर्तक, दुष्ट, भारी ॥**

या पद्यात मृग, झष [ मासा ], महाजन [ थोर लोक ], ह्या क्रमाने तीन पदार्थांचा उल्लेख केलेला आहे. त्याच्याशी किरात [ पारधी ], कैवर्तक [मासे धरणारा ], आणि दुष्ट जन [ हलकट लोक ], या तीन पदार्थांचा त्याच क्रमानें अन्वय केला आहे. ह्या तीन जोड्या पुढे दिल्याप्रमाणे होत.

| | | |
|---|---|---|
| मृगाला | वैरी | किरात. |
| झषाला | वैरी | कैवर्तक |
| महाजनाला | वैरी | दुष्ट. |

ह्या तीन जोड्या घेऊन वरील पद्याचा पुढे दिल्याप्रमाणे अनुवाद होईल—

गवतावर हरिणाची उपजीविका होते, पाण्यावर माशाची उपजीजिका होते, आणि सतोषावर थोर पुरुषाची उपजीविका होते. परतु पारधी लोक हरिणाशीं, कोळी लोक माशाशीं, आणि दुष्ट लोक थोर पुरुषाशीं, विनाकारण शत्रुत्व करतात.

९. यथासख्य अलकाराचे दुसरें एक उदाहरण घेऊ.

**सुविद्यता, शौर्य, विनीतता खरी**
**कुमारकांची अवलोकिल्यावरी ।**
**कृतार्थता, भीति, मुदा हृदन्तरी**
**गुरूंस, शत्रूंस, पित्यास हो खरी ॥**

वि० वा० भिडे, रा० प०, सर्ग १ श्लोक ८२.

ह्या श्लोकात अन्वित झालेल्या पदार्थांचे तीन समूह पुढे दिल्याप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| सुविद्यता | गुरूस | कृतार्थता. |
| शौर्य | शत्रूस | भीति. |
| विनीतता | पित्यास | मुदा. |

त्या कुमाराची सुविद्यता पाहून गुरूना कृतार्थता वाटली, त्याचे शौर्य पाहून शत्रूना भीति वाटली, आणि त्याची विनीतता पाहून त्याच्या पित्याला मुदा वाटली. आता ह्या श्लोकातील यथासख्य अलकार नाहींसा करून पुढे दिल्याप्रमाणे अनुवाद होईल.

ह्या लहान मुलाची विद्वत्ता पाहून त्याच्या शिक्षकाना अतःकरणापासून धन्यता वाटली, त्याचे शौर्य पाहून त्याच्या शत्रूना भय वाटले, आणि त्याचा नम्रपणा पाहून त्याच्या बापाना आनद झाला

१०. याच प्रकारचे दुसरे एक उदाहरण घेऊः—

**यातुतापसगणां खचविलें**
**बाणसद्गुणगणीं सुखवलिं**
**भीतिशांतिजननें उभयांही—**
**आहवांत, उटजांत मुलांही ॥**

रा० प०, सर्ग २, श्लोक ९०.

ह्या श्लोकात यथासख्य अलकार आहे, त्यातील जोड्या पुढे दिल्याप्रमाणे आहेत.'—

आहवात राक्षसगणास बाणगणानीं भीतिजननें खचवीले, आणि उटजात तापसगणास सद्गुणगणानीं शातिजननें सुखवीले. आता ह्या श्लोकाचा अनुवाद पुढे दिल्याप्रमाणें करतां येईल.

त्या दोन्ही कुमारांनीं युद्धामध्ये आपल्या बाणाच्या योगानें राक्षसाच्या मनात भीति उत्पन्न करून त्याना खचविले, आणि आश्रमातील ऋषिमडळींच्या मनाला आपल्या चागल्या गुणामुळे शात करून सुख दिले.

११ यथासख्याचे आणखी एक उदाहरण घेतो.

**चुकणें भूषण आम्हां, भूषण करणें क्षमा तुम्हां, देवा!**
**अनुरागें कीं रागें, करचरणांभोज या शिरीं ठेवा ॥**

मोरोपत—नामरसायन.

येथे परस्पराशी अन्वित असलेल्या पदार्थांच्या जोड्या पुढे दिल्याप्रमाणे आहेत.:—

| | |
|---|---|
| अनुरागे | कराभोज. |
| रागे | चरणांभोज. |

आर्येचा अनुवाद पुढे दिल्याप्रमाणे होईलः—

अपराध करणे हे आमचे भूषण, आणि त्याची क्षमा करणें हें, हे भगवन्, तुम्हाला भूषण आहे आम्हाला क्षमा करून आपण प्रेमानें आमच्या मस्तकावर कमलतुल्य हात ठेवा, किंवा [ म्ह० क्षमा करावयाची नसल्यास ], कोपानें आमच्या मस्तकावर [ शिक्षा करावयासाठी ] कमलतुल्य पाय ठेवा [ दोन्ही प्रकार आम्हाला सारखेच आवडते आहेत. ]

१२ यथासख्याचे आणखी एक उदाहरणः—

**नींववी मज मातासी श्रीमत्र्यम्बकजटोद्भवा गंगा ।**
**स्मरणें, स्तवनें, स्नानें शुचि करिती विश्वचित्तवागंगा ॥**

मोरोपत—सीतारामायण.

या गीतींतील जोड्या येणेप्रमाणे आहेत:—

| | |
|---|---|
| स्मरणे | चित्त |
| स्तवने | वाक् |
| स्नाने | अग |

अनुवाद पुढे दिल्याप्रमाणे करावाः—

श्रीशकराच्या जटेपासून निघालेली गगा नदी आईप्रमाणे माझें सात्वन करते. ह्या गगा नदीचे स्मरण केल्यानें सर्व लोकाचे अतःकरण शुद्ध होते

तिचे स्तवन केल्याने वाचा शुद्ध होते, आणि तिचेमध्ये स्नान केल्याने देह शुद्ध होतो.

१३. श्लिष्ट पदाचा अनुवाद कसा करावयाचा हे दाखविण्यासाठी पुढील आर्या घेतो'—

**" रक्षावा धर्म, " असा करिसी उपदेश तरि असे मान्य ।**
**रक्षितसो धर्माते, आम्हांला धर्म ठाऊका नान्य ॥**

मोरोपत—कर्णपर्व

ह्या आर्येचा अनुवाद करून दाखवावयाचे अगोदर ही आर्या कोणत्या प्रसंगाची आहे हे सांगितले पाहिजे.

अर्जुनाशी लढताना कर्ण विरथ झाला, तेव्हा अर्जुनाने काही वेळ युद्ध बंद ठेवावे म्हणून कर्ण त्याला म्हणाला, "शहाण्या माणसाने धर्म रक्षावा " कर्णाच्या भाषणाचा मतलब हा, की शाहण्या माणसाने न्याय्य मार्ग अनुसरावा. त्यावर उत्तर देताना कृष्ण म्हणाला, " धर्म रक्षावा " असा उपदेश तू करीत आहेस, तो आम्हाला मान्य आहे. आम्ही धर्माचेच रक्षण करीत आहो. येथे " धर्माचे " ह्याचा अर्थ " धर्मराजाचे " म्हणजे " युधिष्ठिराचे " असा आहे, कर्णाला " धर्म " शब्दाचा अभिप्रेत अर्थ " न्याय्य मार्ग " असा असून कृष्णाने " युधिष्ठिर " असा त्याचा अर्थ घेऊन कर्णाचा उपदेश मान्य केला आहे. ज्या शब्दाचा एक अर्थ " न्याय्य मार्ग " असा असून " युधिष्ठिर " असा दुसराही एक अर्थ आहे, असा "धर्म" हाच एक शब्द भाषेत आहे, दुसरा नाही, म्हणून तो श्लिष्ट शब्द ज्या पद्यात आलेला आहे, त्याचा अनुवाद करताना ते दोन्ही अर्थ दिले पाहिजेत. हे कसे करावयाचे हें पुढील अनुवादावरून विद्यार्थ्याला समजून येईल

' धर्म रक्षावा, ' असा तू उपदेश करीत आहेस, तर तो उपदेश आम्हाला ग्राह्य आहे. आम्ही धर्माचे, [ न्याय्य मार्गाचे पक्षी, धर्मराजाचे ] रक्षण करीत आहो. आम्हाला दुसरा धर्म, [ धर्मराजाव्यतिरिक्त धर्म ], ठाऊक नाही.

१४. श्लेषालंकाराचे आणखी एक उदाहरण घेतो.

**ती न स्त्री, रक्षाया त्यासि निघे आत्तमुर्ति जनकाशी ।**
**परमशिव जीत नांदे म्हणुनि जिला म्हणति सुज्ञ जन 'काशी' ॥**

मोरोपत -भारत—वनपर्व.

सत्यवान वनात जावयास निघाला, तेव्हा त्याच्या पाठोपाठ त्याची पत्नी सावित्रीही निघाली, त्या प्रसगाची ही आर्या आहे.

सत्यवानाचे मागून सावित्री निघाली ती त्याची पत्नी नव्हे, तर त्याचे रक्षण करण्यासाठीं त्याच्या पित्याची मूर्तिमत आशीच [ आशीर्वादच ] निघाली. त्या आशीचे ठायीं श्रेष्ठ शकर, [ पक्षीं, उत्तम कल्याण ], राहतो [ पक्षीं राहते ] म्हणून जाणते लोक तिला " काशी " असे म्हणतात.

**टीपः**—ह्या आर्येंत ' शिव ' हा शब्द श्लिष्ट आहे, त्याचे " शकर, " आणि " कल्याण " असे दोन अर्थ होतात. पहिल्या अर्थानें " शिव " शब्द पुल्लिंगी आहे, आणि दुसऱ्या अर्थानें नपुसकलिंगी आहे. दोहोंसही लागू पडेल असे 'नांदे' हें क्रियापद कवीनें मुद्दाम योजिलें आहे.

१५. श्लेषालकाराचें दुसरं एक उदाहरण घेतो.

**चंद्रासि लागति कळा, उपराग येतो,**
**गंगेसि भंग, बहु पाणउतार होतो।**
**जें चूर्ण होय तरि मौक्तिक तें कशाला ?**
**नाहीं समान नलराजमहायशाला ॥**

रघुनाथपंडित—नलाख्यान.

चद्राच्या तेजात स्थिरपणा नसतो, [ चद्राच्या कळाचा क्षय होतो.आणि वृद्धि होते, म्हणजे त्या टिकत नाहींत ], आणि त्याची निंदा केली जाते, [ तो राहूकडून पीडिला जातो ], भागीरथीचा पराभव होऊन अपमान होतो, [ तिच्या पाण्याला चढउतार असतो, म्हणजे ते कायम नसते ]; मोत्याचे चूर्ण करतां येतें म्हणून तेंही उपयोगाचें नाहीं. साराश, नल-राजाच्या मोठ्या यशाला उपमा द्यावयाला चद्र, भागीरथी, मोतीं किंवा दुसरा कोणताही पदार्थ घेता येत नाहीं. [ चद्र, भागीरथी व मौक्तिक, हे पदार्थ शुभ्र आहेत खरे, परतु सदोष असल्याकारणाने दोषरहित अशा नलयशाला त्याची उपमा देता येत नाहीं. ]

**टीप**—वरील पद्यात उपराग, भग आणि पाणउतार हे शब्द श्लिष्ट आहेत. त्याचे दुहेरी अर्थ वरील अनुवादात कसे व्यक्त केले आहेत, हें विद्यार्थ्यांनी नीट पहावें.

१६. श्लेषालकाराचें दुसरं एक उदाहरण घेतो.—

**लोकबंधु जो होय रवी ऐसा,**
**कुवलयाला जो सुखद चंद्र जैसा।**
**सांग नोहे तो कुसुमचाप तैसा**
**निषधरायासीं तुल्यरूप कैसा ? ॥**

रघुनाथपंडित—नलाख्यान

हा नलराजा लोकबंधु, ( प्रजेचे हित करणारा, पक्षी, लोकांचीं कर्मे प्रकाश देऊन नियमित करणारा ), असल्यामुळे तो सूर्याप्रमाणे होता. पृथ्वीच्या मंडळाला, ( चंद्रविकासी कमलाला ), सुख देणारा असल्याकारणानें तो चंद्राप्रमाणे होता. परंतु पुष्पाचें धनुष्य धारण करणारा मदन, ज्याला शरीरच नाहीं तो, ( शरीरानें युक्त ) अशा नलराजाची बरोबरी कसा पावेल ?

**टीप**—वरील पद्यात ' लोकबंधु " हा सूर्य ह्या अर्थी रूढ झालेला शब्द आहे. त्याचा यौगिक अर्थ लोकास नातलगाप्रमाणें किंवा आप्ताप्रमाणे असलेला, अर्थात लोकाचे कल्याण करणारा, असा होतो " कुवलय " म्हणजे चंद्रविकासी कमल. कु—वलय असा पदच्छेद केला असता 'भूमंडळ' असा अर्थ होतो. मदनाला " अनंग " असें नांव आहे. म्हणून त्याच्याहून वरच्या पायरीचा सांङ्ग [ म्ह० अंगयुक्त ] नलराजा होता.

१७. असलेंच दुसरें एक उदाहरण घेऊं.

**रामघनमयुर म्हणे, " नित्रवालचि सुरसिकांसि केकांहो ! "**
**शंभुहि म्हणे, " न सेविति मंद म्हणुनि झुरसि काशिके ! कां हो ? "**

श्रीराम हा आहे मेघासारखा (म्ह० सुखकर) ज्याला, असा हा मयूर [मोरोपंत कवि, मोर पक्षी] म्हणतो, "अहो केकानो, [कवितानो, टाहोंनो,] तुम्ही खऱ्या रसिक लोकांना संतुष्ट कराल " [ अज्ञान लोकांनीं तुमचा अनादर केल्यास खिन्न होण्याचें कारण नाहीं ]. श्रीशंकर देखील म्हणतो, " अगे वाराणसी, मूर्ख लोक तुझे ठायीं येऊन राहात नाहींत, म्हणून तू कष्टी कां होतेस ? [ चांगले लोक तुझ्या आश्रयास राहतीलच ] ! "

**टीप**—येथें " मयूर " हा शब्द श्लिष्ट आहे. त्याचे दोन्ही अर्थ वरील अनुवादात स्पष्टच आहेत.

१८. आतां श्लेषालंकाराचें आणखी एक उदाहरण घेऊं.

**तूं मलिन, कुटिल, नीरस, जडहि, पुनर्भवपणेंहि कचसाच।**
**धरिला शिरीहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि, नाम "कच" साच॥**

मोरोपत–भारत–कचोपाख्यान

ह्या आर्येचा अनुवाद पुढे दिल्याप्रमाणे होईल.

तू काळा, ( पक्षीं, पातकी) कुरळा (पक्षी, वाकड्या मार्गाने जाणारा), शुष्क ( पक्षीं, प्रीतिरहित ), निर्जीव ( पक्षीं, मूर्ख ), असून वारवार उत्पन्न होतोस ( पक्षीं, अनेक वेळा मरून पुन्हा जिवत होतोस ). ह्या गुणांमुळे तू खरोखरी केसासारखा आहेस ! तुला मस्तकावर धारण केले तरी, ( पक्षी, तुला प्रेमाने आणि समानाने वागविले तरी ) तू आपले स्वभावसिद्ध गुण सोडीत नाहीस ! तुझे नाव " कच " असे आहे, ते योग्यच आहे !

१९. ज्या वाक्यसमूहाचा अनुवाद करावयाचा असेल, त्याचा मतलब कमी किंवा जास्ती न होऊ देतां त्यांत जी साधी, मिश्र आणि संयुक्त ह्या जातींचीं वाक्ये असतील, त्याच्या जाति बदलून एका जातीबद्दल दुसरी एकादी जात योजावी, तसेंच स्वार्थ, संकेतार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ, आणि संशयार्थ, हे अर्थ एकमेकाबद्दल योजावे, करणरूप आणि अकरणरूप हीं एकमेका_ बद्दल योजावीं, कर्तरि, कर्मणि, आणि भावे, हे तीन प्रयोग एकमेकाबद्दल योजावे, असें मागें कलम **३**, ( ७ ), ( ८ ) मध्ये आम्ही सांगि- आहे. हें कसें करावयाचें ते पुढील उदाहरणावरून विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल:—

[ १ ] " तुझ्या जन्माचे साल तुला ठाउक आहे काय ?" ह्या वाक्या- बद्दल " तू कोणच्या सालीं जन्मलास हे तुला ठाऊक आहे काय ? " असे वाक्य घालता येईल.

[ २ ] हे गृहस्थ महादेव गोविंद रानड्याप्रमाणे बोलतात=महादेव गोविंद रानडे जसे बोलत असत, तसे हे गृहस्थ बोलतात. हा गडी हमजे- खानाइतका बळकट आहे=हमजेखान जितका बळकट होता, तितका बळ- कट हा गडी आहे.

[ ३ ] आजारीपणामुळे त्याला तीन महिन्याची रजा घ्यावी लागली= तो आजारी होता म्हणून त्याला इ०

[ ४ ] निर्लज्ज मनुष्य हवे ते बोलतो=ज्याने लाज सोडली आहे तो हवे ते बोलतो.

[ ५ ] चोर माझ्या बोचक्याला हात घालतो आहे तोच मी त्याला धरलें=चोर माझ्या बोचक्याला हात घालीत असताच मी त्याला धरले.

[ ६ ] काटकसरीपणानें जो राहतो त्याला बरकत येते=काटकसरीपणानें राहणाऱ्याला बरकत येते.

[ ७ ] समाजाचे नियम पाळणें हे आपलें मुख्य कर्तव्य आहे=आपण समाजाचे नियम पाळावे हे आपलें मुख्य कर्तव्य आहे.

[ ८ ] परीक्षा पास होण्याची त्याला आशा आहे=आपण परीक्षेत पास होऊं अशी त्याला आशा आहे.

[ ९ ] त्याचा गुन्हा अद्यापि सिद्ध करण्यात आला नाहीं=तो गुन्हेगार आहे किंवा नाहीं हे अद्यापि ठरविण्यात आलें नाहीं.

[ १० ] हातामध्यें फुलाचा तुरा धारण करणारा एक माणूस मी पाहिला =ज्यानें हातात फुलाचा तुरा धारण केला होता असा एक माणूस मी पाहिला.

[ ११ ] खरं बोलणाराला शरमण्याचा प्रसंग येत नाहीं=जो खरं बोलतो त्याला इ०

[ १२ ] आम्ही राणीचा बाग पहावयासाठीं निघालो=राणीचा बाग पहावा असा उद्देश धरून आम्ही निघालों.

[ १३ ] त्याच्या संपत्तीबरोबरच त्याचा ताठा नाहींसा झाला=जेव्हा त्याची संपत्ति नाहींशी झाली तेव्हा त्याचा ताठा नाहींसा झाला.

[ १४ ] महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ?=महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

[ १५ ] लाज हा पदार्थ तुला ठाऊक आहे काय ?=लाज हा पदार्थ तुला मुळींच ठाऊक नाहीं.

[ १६ ] सहाय असिला असे तरिच शत्रुला मारवे। मोरोपत—केकावली. तरावारीला ती पेलणाराची मदत असल्याशिवाय शत्रूस मारता येतें काय ?

[ १७ ] मागेंचि तुम्ही भजता धर्माला तरि तुम्हास वांचविता ।
आता मरा, न वाचे दीसग्रहीं जो न तोय साचविता ॥
मोरोपत—कर्णपर्व.

तुम्ही पूर्वीच धर्माकडे लक्ष दिले असते तर त्याने तुम्हाला वचावले असते. परतु तुम्हीं तेव्हा तसे केले नाहीं, तर आता मरा. ज्याने पाणी सांठवून ठेविले नाही, तो पेटलेल्या घरात जिवत राहू शकेल काय ?

[ १८ ] शिरला भीम व्यूहीं जेवि अजकुळांत लाडगा शिरतो ।
दैवेंचि रक्षिले मज, कापित होताचि दाडगा शिर तो ॥
मोरोपत—भीष्मपर्व

बकऱ्याच्या कळपात जसा लाडगा शिरतो, तसा व्यूहात भीम शिरला, ( त्या प्रसगीं ) मी दैवाकडूनच रक्षिला गेलो. ( नाहीं तर ) त्या दाडग्याने माझे डोके तोडूनच टाकले असते.

२०. अनुवाद करताना जे नियम लक्षात बाळगावयाचे म्हणून मागे दिले आहेत, त्या सर्वांच्या स्पष्टीकरणार्थ आम्हीं प्रथम काहीं गद्याचे उतारे, आणि नतर काही पद्याचे उतारे घेऊन त्याचे अनुवाद करून दाखवितों.

## २१. अनंततनयाची शारदादूतिका

आधुनिक कवींचे आचरण वाईट म्हणून त्यांचीं काव्यें वाईट, व जुन्या मराठी कवींचे आचरण शुद्ध म्हणून त्यांचीं काव्ये शुद्ध, हा कोटिक्रम अगदी नवीन नाही. एक दोन अचरट लेखकानीं तो या पूर्वी केलेला आहे. व त्याचाच अनुवाद करण्याची अनततनयाला चट लागली आहे. वस्तुतः जुन्या व नव्या मराठी कवींची अशी तुलना होणे शक्य नाहीं. तुलनेला कांहींतरी समान धर्म लागत असतो. आधुनिकाचे आचरण कदाचित् टाकाऊ असलें, तरी प्राचीनाचें आचरण समजण्याला काही साधन नाहीं, बॉसवेलकृत जान्सनच्या चरित्रासारखे एकाद्या तरी जुन्या मराठी कवीचे चरित्र आज उपलब्ध आहे काय ? जुन्या मराठी कवींसबधी ज्यात इत्थभूत व विश्वसनीय माहिती भरली आहे असे एकही पुस्तक निदान माझ्या तरी पाहण्यात नाहीं. पताचें चरित्र हा भला मोटा जाडा ग्रथ तयार झाला आहे, पण खुद्द पतचरित्राने त्यांतलीं कितीशीं पृष्ठे व्यापलीं आहेत ? कविचरित्राची उणीव भरून काढण्याकरिता ह. भ प चरित्रकाराना क्वचित् कादबरीकाराचा पेशा पत्करावा लागला आहे ! महाराष्ट्र कविचरित्रांच्या पुस्तकांना बाळसें आले आहे ते त्याच्यातील लाबलचक

उतारे व सपादकीय मल्लिनाथी यानींच आलेले आहे. त्यात कविचरित्राचा बहुतेक दुष्काळच आहे! अशा स्थितीमध्ये नव्या व जुन्या मराठी कवींच्या आचरणाची तुलना करण्याचें साहस कोणता समजस व विवेकी पुरुष करणार आहे? तेव्हा नव्यांचे व जुन्याचे शील तपासून तुलना करण्याची वेडगळ उठाठेव त्याने करू नये हे बरें. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

आता वरील उताऱ्याचा अनुवाद करून दाखवितोः—

अर्वाचीन काळच्या कवींचे वर्तन चागले नसल्याकारणाने त्यानी रचिलेलीं काव्ये चागलीं नसतात, आणि प्राचीन काळच्या मराठी कवींचे वर्तन शुचिर्भूत असल्यामुळे त्याची काव्ये शुचिर्भूत झाली आहेत, ही विवेचनाची सरणी अगदी नवी आहे असें नव्हे. एका दोघा मूर्ख लेखकानीं ह्या सरणीचा वादात उपयोग केला होता, व त्याच सरणीचा अवलब करण्याची अनततनयाला चटक लागलेली आहे. खरे पाहिले असता प्राचीन काळचे मराठी कवि अर्वाचीन काळचे मराठी कवि, याची अशा प्रकाराने तुलना करता येणे शक्य नाहीं, कारण, ज्या दोन पदार्थांत तुलना करावयाची, त्याच्यांत काहीं तरी समान धर्म असावा लागतो. अर्वाचीन काळच्या कवींचे वर्तन जरी थोडेबहुत आपणाला माहीत असले, तरी प्राचीन काळच्या कवींचें वर्तन कसे होते हे जाणता येणे शक्य नाहीं. बॉसवेलने जसें जान्सन्सचे चरित्र रचिले, तसें एकाही प्राचीन कवीचे चरित्र आपणाला मिळविण्याजोगे नाही. ज्यात जुन्या मराठी कवींच्या सबधानें विस्तृत आणि भरवसा ठेवण्यालायक माहिती दिलेली आहे, असा एकही ग्रथ नाहीं, असला, तरी मला निदान तो ठाऊक नाहीं. मोरोपत कवींचें चरित्र म्हणून एक खूप लठ्ठ पुस्तक एका गृहस्थाने लिहिले आहे, परतु त्या पुस्तकाची फारच थोडीं पाने त्या कवीचे चरित्र कथन करण्याकडे योजलेलीं आहेत. मोरोपत कवीचे चरित्र जे थोडेसे ह्या पुस्तकात दिले आहे, त्यात कोठें कोठे कादबरीप्रमाणे कपोलकल्पित भाग हरिभक्तपरायण चरित्रकाराने घुसडून दिला आहे. महाराष्ट्रकविचरित्र या नावाचा आणखी एक ग्रथ आहे. तोही मला लठ्ठ ग्रथ आहे. परतु त्यात प्रत्यक्ष कवींच्या चरित्राची माहिती थोडीच असून तो ग्रथ कवींच्या काव्यातील उताऱ्यांनीं आणि मल्लिनाथावर ताण करू इच्छिणाऱ्या सपादकाच्या टीकात्मक विचारांनींच बहुतेक भरला आहे. जुन्या कवींचीं चरित्रे उपलब्ध

नसल्यामुळे नव्या आणि जुन्या मराठी कवींच्या वर्तनांची तुलना करू पाहणे, हें मोठें धाडसाचें कृत्य आहे, आणि तें कोणीही शाहाणा आणि विचारी माणूस करावयास सरसावणार नाहीं. म्हणून नव्या आणि जुन्या कवींचे वर्तन तपासून पहाणे आणि त्याच्या वर्तनांची तुलना करणे हे हास्यास्पद कृत्य * अनततनयानें करीत बसू नये.

२२. गद्याच्या अनुवादासाठीं आणखी एक उतारा घेतों.

## मेघदूत आणि शारदादूतिका.

मेघदूत काव्य अनततनयानें वाचलें आहे, असें दिसत नाहीं, आणि कदाचित् वाचलें असलें, तरी त्याला तें समजलें नाहीं, असें मोठ्या खेदाने म्हणावें लागतें. ज्याला मेघदूताचें खरें स्वरूप समजेल, त्याचा स्वतःच्या काव्याविषयींचा गर्वज्वर उतरलाच पाहिजे. पण अनततनयाची स्थिति अगदीं उलट आहे! त्याला आपली कृति मेघदूताच्या तोडीची, किंबहुना त्यावर ताण करणारी आहे, असें वाटत आहे! कविकुलगुरूनें आपल्या जगद्वंद्य काव्यात सदेश पधरा पद्यामध्यें स्पष्ट सांगितला आहे. या काव्यांत कवीच्या उज्ज्वल प्रतिभेने त्यातील पवित्र, उदात्त व रमणीय प्रसग नितात मधुर करून सोडले आहेत. कालिदासानें प्रस्तुत काव्यात कोणाची नालस्ती केली नाहीं, किंवा आपण धर्मगुरु आहों असें समजून कोणाला शीलाचा धडा शिकविण्याचा त्याने आव घातला नाहीं. त्यानें आपलें काव्य कोणाकडे अभिप्रायार्थ पाठविलें नाहीं—उलट प्रत्येक रसिक पडितानें त्या काव्यावर लुब्ध होऊन त्यास आपल्या अतःकरणांत उच्च स्थान देऊन गौरविलें आहे. असल्या काव्याशीं दूतिकेनें स्पर्धा करणें म्हणजे एकाद्या मुरकुटानें विहगराज गरुडाशींच स्पर्धा करण्याइतकें उपहासास्पद आहे!

लक्ष्मणशास्त्री लेले—टीकात्मक लेख.

वरील उताऱ्याचा अनुवाद पुढे दिल्याप्रमाणे करता येईल:—

अनततनयाने मेघदूत काव्य वाचलें असल्याचें दिसून येत नाहीं; आणि जरी कदाचित् त्याने ते वाचलें असलं, तरी त्याला ते बिलकूल समजलें नाहीं. असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. ज्या कोणाला मेघदूत

* टीपः—वरील उताऱ्यात अ हें अक्षर " अनततनय " ह्या शब्दाबद्दल टीकाकारानें घातलें आहे.

काव्याचें खरें स्वरूप कळलें आहे, त्याच्या ठायीं स्वतःच्या काव्यासबधाचा अभिमान मुळींच उरणार नाहीं. परतु अनततनयाचा प्रकार काहीं वेगळाच दिसून येतो ! त्याला असे वाटत आहे, कीं आपले काव्य मेघदूता-इतक्या थोर योग्यतेचे आहे, इतकेंच नव्हे, तर त्याच्याहून कांकणभर अधिक योग्यतेचें आहे. कविश्रेष्ठ कालिदासाने आपले जे जगास मान डोलवावयास लावणारे मेघदूत काव्य, त्यात पधरा श्लोकात निरोप स्पष्टपणे सांगितला आहे. ह्या काव्यात कालिदासानें आपल्या श्रेष्ठ बुद्धिसामर्थ्यानें शुद्ध, उन्नत आणि सुदर असे प्रसग अत्यत मनोहर करून सोडले आहेत. ह्या काव्यात कालिदासाने कोणाची निदा किंवा टवाळकी केली नाहीं, किंवा आपण धर्माचा उपदेश करणारे आहोत असे गृहीत घेऊन कोणाला उत्कृष्ट शील पढविण्याचीही हाव धरली नाहीं. शिवाय त्याने आपले काव्य कोणाही माणसाकडे अभिप्रायासाठी किंवा आश्रयासाठी पाठविले नाहीं. तथापि प्रत्येक रसिकवर्य त्या काव्यानें मोहित झाला आहे, आणि त्यानें त्याला आपल्या अंतःकरणात उच्च स्थानाचा मान दिला आहे. असल्या उच्च काव्याशी शारदादूतिकेसारख्या भिकारड्या काव्यानें बरोबरी करू पाहणे म्हणजे यःकश्चित् मुरकुटानें पक्ष्याचा राजा जो गरुड त्याच्याशी बरोबरी करावयास सरसावण्याइतकें मूर्खपणाचें होय !

२३ आशा हे समूळ खणोनी काढावी
तेव्हांची गोसावी व्हावें तेणें ॥ १ ॥
नाहीं तरी सुख असाव संसारीं,
फजीती दुसरी करू नये ॥ २ ॥
आशा मारूनीयां जयवंत व्हावें
तेव्हाचे निघावें सर्वांतूनी ॥ ३ ॥
तुका म्हणे जरी योगाची तातडी
आशेची बीबुडी करी आधीं ॥ ४ ॥

तुकाराम—स्फुट अभंग

मनुष्यानें अगोदर आशेचा पूर्णपणे उच्छेद करावा, आणि मग गोसावी व्हावें. हें साधण्याजोगे नसल्यास त्यानें खुशाल ससारात असावे, आणखी फजिती करून घेऊ नये !

आशेचा विध्वस करून विजयी व्हावें, आणि मग सर्व वस्तूचा परित्याग करावा ( ससार सोडावा ).

तुकाराम म्हणतो, जर तुम्हाला ईश्वर जोडण्याची उत्कट इच्छा असली ( किंवा योगाभ्यास करण्यास तुम्ही आतुर झाला असाल ), तर अगोदर आशेचा बीमोड करा.

२४ कोणें कोणासी रडावें । एकामागें एकी जावें ॥ १ ॥
एक वेळ गेली माता । एक वेळ गेला भ्राता ॥ २ ॥
द्रव्य, दारा, जाती पुत्र । जिवलग आणि मित्र ॥ ३ ॥
प्राणी संसारी आला । तितुका मृत्युपथें गेला ॥ ४ ॥
पूर्वज गेले देवापाशीं । तेचि वाट आपणांशी ॥ ५ ॥
रामदास म्हणे लोक । करिती गेलियाचा शोक ॥ ६ ॥

रामदास—स्फुट अभग.

कोणी कोणासाठीं रडावें ? एकामागून एक जात आहे ( मरत आहे ). एकदा आइ मरते, पुढें भाऊ मरतो, मग पैसा अडका, बायकामुलें, आणि इष्टमित्र वगैरें नाहींतशी होतात. जो जो म्हणून प्राणी जन्माला येतो तो तो मरण पावतो. आपले वाडवडील मरून गेले, तसेंच आपणही मरून जाणार ! रामदास म्हणतो, गेल्याचा शोक मात्र लोक करीत असतात !

२५ मोक्षसिंहासनाची पायरी । प्रथम नाम अयोध्यापुरी ।
ज्ञानस्वरूप जीमाझारी । राज्य करि हरिश्चंद्र ॥ १ ॥
शत्रुकरीलागीं हरी । साधुसज्जना सुधाकारी ।
बळीत्रासी या लागीं हरि- । श्चंद्र नाम तयाचें ॥ २ ॥
सत्यसत्त्वांचा शिरोमणी, । परोपकारी, परमज्ञानी ।
दुःख, दारिद्र्य, इच्छा ऋणी । पैकीं नेदि जगातें ॥ ३ ॥
धीरसत्त्वाचा महामेरू । दानी मेघ जैसा उदारू
प्रजापालनी कमलावरू । शक्रातुल्य प्रतापी ॥ ४ ॥
ऐसा राजा चक्रवर्ती । सिंहासनीं विराजमूर्ती ।
जैसा इंद्र अमरावती । शोभे तैसा शोभला ॥ ५ ॥

मुक्तेश्वर—वनपर्व.

अयोध्या नावाची नगरी ही मोक्षरूपी सिंहासनाची एक पायरीच असून तिचा निर्देश प्रथम केला जातो. ह्या नगरीमध्ये ज्ञानाची केवळ मूर्तीच असलेला ''हरिश्चंद्र'' ह्या नावाचा राजा राज्य करीत असे. शत्रुरूपी हत्तीला तो हरि-प्रमाणे ( सिंहाप्रमाणे ), आणि साधुसतांना चद्राप्रमाणे ( सुखकर ), आणि बलवताना भीति देणारा असल्याकारणाने त्याला 'हरिश्चंद्र' असे नाव होतें. सत्य-स्वभावाच्या लोकामध्ये तो अग्रगण्य होता. तो मोठा दाता आणि ज्ञानसपन्न होता. तो पीडा, दारिद्र्य, व कोणत्याही इष्ट वस्तूची वाण, हे शब्द देखील लोकांच्या कानीं पडू देत नसे ! तो धैर्य आणि सत्त्वशीलता ह्या गुणांनीं मोठ्या मेरुपर्वताप्रमाणे होता. दानधर्माच्या गुणाने तो मेघाप्रमाणें उदार होता. प्रजेचे पालन करण्याच्या गुणाने तो विष्णूप्रमाणे होता, आणि पराक्रमाने इंद्रा-सारखा होता असा सार्वभौम राजा, अमरावतींत जसा इंद्र शोभतो तसा सिंहासनावर देदीप्यमान होत्साता शोभत असे.

२६ पराग कमलातला करि सुगंधि यज्जीवन ,
अशा रुचिर मानसी प्रथम जो करि जीवन ।
द्विजेंद्र कलहंस तो वसति केंवि आतां करी
वदे मलिन पल्वली, जुळति ज्यांत भेकावलि ? ।।

लक्ष्मणशास्त्री लेले—भामिनीविलास:

कमळातील रज:कणानीं ज्याचे पाणी सुगधित झालें आहे, अशा रमणीय मानस सरोवरात ज्याने पूर्वी वसति केली, तो पक्षिश्रेष्ठ कलहस आता बेडकाच्या थव्यानी डबडबलेल्या आणि गढूळ अशा डबक्यात कसा राहील सागा बरे ?

२७ मनुष्य भवकाननीं सुखमृगार्थ धांवे जरी
पळे कपटि दूर तो; कधि न सांपडे तत्करीं ।
कशी सतत नाचवी जन जगीं सुखाशा किती ?
तृषार्त हरिणें जशीं मृगजळाकडे धांवती ॥

गोविंद वासुदेव कानिटकर—समोहलहरी.

ससाररूपी अरण्यात सुखरूपी हरणासाठीं मनुष्य धावत असतो, परतु तो लबाड हरिण त्याच्यापासून लाब लाब पळत जातो आणि त्याच्या हातीं सांपडत नाही. तान्हेने व्याकुळ झालेली हरिणे जशीं मृगजळासाठीं धावत

असतात, तशीं मनुष्ये सुख मिळविण्यासाठीं ह्या जगात धावपळ करीत असतात.

२८ **जगीं सर्वसुखी असा कोण आहे ?**
**विचारी, मना ! तूंचि शोधोनि पाहें ।**
**मना ! त्वांचि रे ! पूर्वसंचीत केलें,**
**तयासारिखें भोगणें प्राप्त झाले ॥ १ ॥**
**जिवा कर्मयोगें जगीं जन्म झाला ।**
**परि शेवटीं काळ घेवोनि गेला ।**
**महाथोर ते मृत्युपंथेंचि गेले,**
**असंख्यांत ते जन्मले आणि मेले ॥ २ ॥**
**मना ! पाहतां सत्य हे मृत्युभूमी,**
**जितां बोलती सर्वही जीव ' मी मी ' ।**
**चिरंजीव हे सर्वही मानिताती,**
**अकस्मात सोडोनियां सर्व जाती ॥ ३ ॥**
**मरे एक, त्याचा दुजा शोक वाहे,**
**अकस्मात तोहि पुढे जात आहे ।**
**पुरेना जनीं लोभ, रे ! क्षोभ होतो,**
**म्हणोनि जनीं मागुती जन्म घेतो ॥ ४ ॥**

रामदास—मनाचे श्लोक

ह्या जगामध्ये सर्व प्रकारानी सुखी असा कोण आहे ? हे मना, तू नीट विचार कर आणि शोधून पहा ! हे मना, तूच पूर्वी जे कर्म केले, त्याला अनुरूप असे भोग तुला हल्ली प्राप्त होत आहेत

जिवाला ह्या जगामध्ये पूर्वकर्मानेंच जन्म प्राप्त होतो, परंतु शेवटी त्याला काळ घेऊन जातो. मोठमोठे लोकही मृत्यु पावले ! असंख्य लोक जन्माला आले व मरण पावले !

हे मना, खरे पाहिले असता हा मृत्युलोकच होय ! जिवंत असता सर्व लोक ' मी मोठा, मी थोर ! ' असे म्हणत असतात, सर्व लोक आपण चिरंजीव आहो असें समजत असतात, परंतु ते सारे हा लोक एकाएकीं सोडून जातात !

एक मनुष्य मरतो, त्याचेबद्दल दुसरा रडतो, पुढे हा दुसराही एकाएकीं मरतो ! इच्छा पूर्ण न झाल्याकारणानें दुःख होतें, म्हणून प्रत्येक मनुष्य ह्या लोकीं पुन्हा पुन्हा जन्म घेतो !

२९. जो न गाय हरिचे महिमेला
तो असोनि जित या महि मेला।
ऐसियासि यम कोंवि न जाची !
मूर्ति इष्ट न जयास अजाची ॥ १ ॥
कीर्तनीं अजि ! पुढें बसवा हो !
नायके तरि दुजा बसवा हो !
तो बरा पशुचि यान भवाचा,
हा नराधम जसा विभवाचा ॥ २ ॥
ईश्वरें तुज दिली नरकाया,
साधनें करिती तूं नरका या , ।
भोगिशी निशिदिनीं विषयांतें,
मानिसी न मनिं तूं विष यांतें ॥ ३ ॥
कृतयुगाहुनि उत्तम हा कली,
म्हणुनि भागवतीं मुनि हाकली ।
नरतनू अति, त्यांतहि जाभली,
अजितनाम वदे तरि जी ! भली ॥ ४ ॥
गाऊनियां मधुर हें हरिनाम नाचा,
पाहों मग भ्रम कसा हरिना मनाचा ।
तत्रापि कीर्तनचि मुख्य कलौ करीतो,
होतो तया प्रगट तारक लौकरी तो ॥ ५ ॥
न गर्जती जे हरि गाढ वाचें,
ते पापरूपी नर गाढवाचे ।
न आतळावें अजि ! त्यांस वातें,
ज्यांच्या मनी वास न केशवातें ॥ ६ ॥

वामनपंडित—स्फुटश्लोक.

जो मनुष्य भगवताचे गुणवर्णन करीत नाहीं, तो जिवत असून या पृथ्वीवर

मेल्यासारखाच होय! अशा मनुष्याला यम कसा छळणार नाही? छळीलच छळील. कारण, त्याला भगवताची मूर्ति प्रिय वाटत नाहीं.

अहो! अशा मनुष्याला भगवताचे कीर्तन चाललेले असता अगदी पुढें बसवा, आणि जर त्याने त्या कीर्तनाकडे दुर्लक्ष्य केलें, तर तो दुसरा नदीबैलच होय! नंदीबैल पशु असून ह्याच्यापेक्षा श्रेष्ठ होय, कारण तो शंकरास वाहून नेतो, आणि हा नीच मनुष्य केवळ वैभवाचे, ( म्हणजे सुवर्णादिक अलंकाराचे ) ओझें वाहातो.

हे मनुष्या, भगवताने तुला मानवी देह दिला असून तू त्या देहाचा उपयोग नरक मिळावयास साधने ह्या नात्याने करतोस! तू रात्रदिवस इंद्रियसुखे भोगींत असतोस व त्यास तू विषसमान मानीत नाहीस!

कृतयुगापेक्षा कलियुग श्रेष्ठ होय असे भागवत ग्रथात ऋषींना मोठ्या कठरवाने सांगितले आहे. मानवी देह हा उत्तम होय, आणि तो मिळाला असता जर जिभेने भगवताच्या नामांचे उच्चारण केले, तरच, लोकहो! तो खरोखर धन्य!

लोकानो, भगवताचे गोड नाव उच्चारून नाचा, मग तेणेकरून तुमच्या मनाचा सदेह ( अज्ञान ) कसा नाहींसा होत नाहीं ते पाहू! तथापि ह्या कलियुगामध्ये कीर्तनच विशेषेंकरून जो कोणी करतो त्याला तारण करणारा भगवत लवकर दिसतो!

जे कोणी एकाग्र चित्ताने भगवताचे नाव मुखाने उच्चारीत नाहींत, ते पापी लोक गाढवाच्याच जातीचे होत! अहो, ज्याच्या चित्तात परमेश्वराला राहावयाला जागा मिळत नाहीं त्याना वायूनें देखील स्पर्श करू नये

३०. **दिगन्ताला गेलें करिकुल मदोन्मत निघुनी—**
**असें येई कर्णी, असति करुणापात्र करिणी!**
**दुजे सारेही ते मृग निजबळें न्यून दिसती,**
**कुठें आतां दावी प्रखरनखलीला मृगपती?**

लक्ष्मणशास्त्री लेले—भामिनीविलास

मदानें उन्मत्त झालेल्या हत्तींचे कळप स्वप लांब निघून गेले, असें आम्ही ऐकतों आहों आणि हत्तिणी ( पतींच्या विरहामुळे) दयेला पात्र झाल्या आहेत. दुसऱ्या सर्व प्राण्याच्या अगचे सामर्थ्यही लोपून गेले आहे. मग आतां पशूचा राजा जो सिंह त्याने आपल्या तीक्ष्ण नखाचा विलास कोठे दाखवावा?

## ३१. वाचकांस उद्देशून.

प्राकृतसंस्कृतमिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा ।
भवशीतभीतिभीतस्वान्ताला दाविला बरा पंथा ॥
भगवद्भक्तानुज्ञा की गाव्या सत्कथा यथामति, तें-।
स्वीकारिलें स्वहित म्यां नमुनि स्वसुरद्रुमा रमापतितें ॥
नमिला गजमुख ज्याचे सेवुनि मृदु मधुर बोल कानांहीं ।
चुंबुनि शंभु म्हणे बा ! तुजसम अम्नाय बोलका नाहीं ॥
ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेह बिंदुही फार ।
सारज्ञ असूयोजित त्यांना माझा असो नमस्कार ॥
श्रीकृष्णाचें चित्तीं चिंतावें सुचिर चारु पदकमळ ।
प्रक्षाळी हृदयींचा जें श्रीवक्ष स्थळैकपदकमळ ॥
सेवुनि संतत पाला संत तपाला यदर्थ करितात ॥
तो प्रिय या स्तवना कीं यास्तव नाकीहि तेंचि वरितात ॥
भक्तीनें मन ज्याच्या पदपद्मीं मधुप करूनियां योगी, ।
ज्याचें गातां नाम त्यजुनि तनुभ्रमहि मुक्तिपद भोगी ॥
जरि बोबडें पित्याचें मोहावे मन तथापि तोकानें ।
प्रभु साळ्याभोळ्यांची बहुवात्सल्यें कथा पितो कानें ॥

मोरोपत—स्फुट आर्या.

माझ्या कवितेत मराठी भाषा आणि संस्कृत भाषा यांचे मिश्रण झालेले असल्याकारणानं तिला कोणी गोधडी असे नांव देईल. देवो ! संसाररूपी हिंवाळ्याच्या भीतीनें ज्याचें अंतःकरण त्रस्त झाले आहे, अशा माणसाला ह्या माझ्या कवितारूपी गोधडीनें सुखाचा चांगला मार्ग दाखविला आहे !

भगवंताच्या भक्तांची अशी परवानगी आहे कीं, थोर पुरुषांच्या गोष्टी आपापल्या बुद्धीच्या सामर्थ्याप्रमाणे गाव्या. मी आपले कल्याण करून घेण्याचा हा मार्ग, भक्तजनाला कल्पवृक्षाप्रमाणे असलेल्या लक्ष्मीपति विष्णूला नमस्कार करून, अवलंबीत आहे.

हत्तीचेप्रमाणें ज्याचें मुख आहे, अशा गणपतीला मी नमस्कार करितो त्याचे कोमल आणि गोड शब्द कानांनीं ऐकून शंकर त्याचे चुंबन घेऊन म्हणतो, " हे पुत्रा, प्रत्यक्ष वेदही तुझ्याप्रमाणे कोमल आणि गोड शब्द बोलत नाहीं ! "

ज्याच्या हृदयरूपी सरोवरामध्ये गुणरूपी तेलाचा एक बिंदूही मोठा विस्तार पावतो, जे खरे जाणणारे आहेत, आणि ज्यांच्या ठायीं मत्सर नाहीं, त्याना मी नमन करितो.

श्रीकृष्णाचे सुदर चरणरूपी कमल अतःकरणामध्ये चिरकाल चिंतावे. हे चरणरूपी कमल लक्ष्मीच्या वक्षःस्थलावरील अप्रतिम अशा पदकाप्रमाणे असून अतःकरणातील पाप धुऊन टाकते.

साधुलोक नेहमीं वृक्षाचीं पानें खाऊन ज्याच्यासाठीं सदा तपश्चर्या करतात, तो भगवान् साधुलोकाच्या स्तवनाचा आवडता विषय आहे, म्हणून ते स्वर्गाला गेल्यावरही तोच स्तवनाचा मार्ग अनुसरतात !

त्या भगवताच्या चरणरूपी कमलावर श्रद्धेने आपले मन हाच भ्रमर करून आणि त्याचे नाव गाऊन ' देह तो मी आणि मी तो देह ' अशी देहासबधाची खोटी कल्पना सोडून देऊन योगी मोक्षपदाचा उपभोग घेतो

मूल जरी बोबडे असले, तरी ते बापाचे मन मोहवितें, त्याप्रमाणे साध्या भोळ्या माणसानी गायिलेली आपली कथा भगवान् मोठ्या प्रेमाने ऐकतो.

## ३२ भ्रमरान्योक्ति.

**येतां रम्य वसन्त, कोमल नव्या यन्मंजरी सेविल्या,**<br>
**गीतें मंजुल गाउनी मदभरें लीला तुवां दाविल्या ।**<br>
**दैवें तोच रसाल दीन सहसा झाला कृशत्वें, तया—**<br>
**त्यागीशी तरि षट्पदा ! तुजपरी तूं धन्य पृथ्वींत या ! ।।**

लक्ष्मणशास्त्री लेले, भामिनीविलास.

रमणीय वसत ऋतु आला असता तू ज्याच्या कोवळ्या आणि नव्या मजिऱ्या भक्षण केल्यास, आणि आनदाच्या भरात रमणीय गाणी गाऊन तू विलास केलेस, तोच आंब्याचा वृक्ष दुर्दैवाने शुष्क आणि दीन झाला आहे म्हणून तू त्याला सोडून देत आहेत तर, हे भ्रमरा, ह्या जगात तुझ्यासारखा नीच तूच ( असे म्हटले पाहिजे ) !

## ३३. इंद्राचें नलास भाषण.

**शक्र म्हणे, " वदलासि प्रथम तसें, मग असें कसें वदसी ? ।**<br>
**अचल करीच असावा व्यवहारीं शब्द, संगरीं सदसी " ।।**

मोरोपत– भारत—नलोपाख्यान.

इद्र म्हणाला, "अगोदर तू तसें बोललास, आणि आता असें बोलतोस, हें तुला योग्य आहे काय ? लढाईचे प्रसगीं उत्कृष्ट तरवार हातामध्यें स्थिर असली पाहिजे. त्याजप्रमाणे लोकाशीं कामकाजाच्या प्रसगीं एकदां बोललेली वाचा कायम ठेवली पाहिजे."

## ३४. यम आणि सावित्री.

**पुनरपि मार्गीं काढी जें धर्मरहस्य, जेवि नव पुसती,**
**ते होय वशीकरणाचि, कीं भासो दे तयासि न वपु सती ।।**
**धर्म म्हणे, " गे बाई, करिसी कां व्यर्थ या श्रमास ? तिजा-**
**वर घे, नकोचि भागों, आलीस सुदूर आश्रमा सति ! जा" ।।**
**त्यासि म्हणे सावित्री, " संपन्न असा पिता सुतनयशतें "।**
**हा लक्ष्मीसुत कवि किति लिहिल सतीचें उमासुत न यश तें ।।१।।**
**उडुपा उडुसें धर्मौदार्या लाजोनि अभ्र मुरडे हो ! ।**
**सावित्रीच्या सुयशीं न दिसे पाति म्हणुनि अभ्रमु रडे हो ! ।।**
**ऐसें शिरोनि चित्तीं घेउनि भारीहि तीन वर देवा—।**
**सोडीना सोडविल्यावांचुनियां ती सती नवरदेवा ।।**
**देव म्हणे, " तूं स्वच्छा स्वच्छायाशीच मागती. सति ! घे ।**
**वर घेउनि जा चवथा, देतों मागोनि मागतीस तिघे ! " ।।**
**व्हा सुप्रसन्न, 'वत्से! तुज हो सुतशत' असें वदा न्या ! हो ।"**
**सुयशोराशि स्वर्गीं लज्जाप्रद सुरनगा वदान्या ! हो ।।**
**भुलला धर्म द्युतिला, धृतिला मतिला तिच्या तथा स्तुतिला ।**
**न करूनि विचार मागें जावा म्हणवुनि म्हणे 'तथास्तु' तिला ।।**

वाट चालत असता सावित्रीने नव्या पुसतीप्रमाणें स्पष्ट असें जे धर्माचें गूढ तत्त्व ( वादात विवरणासाठीं ) काढिले, त्याने ( यमाच्या मनाला ) मोह पाडिला, कारण, तेणेंकरून त्या साध्वीनें त्याला ( तहान, भूक, श्रम वगैरे ) देहाच्या भावनाचा विसर पाडिला.

तेव्हां धर्म म्हणाला, "हे स्त्रिये, तू हे व्यर्थ श्रम का घेतेस ? तिसरा वर देतों, तो घे, उगीच दमू नको. फार लाब चालत आलीस, हे साध्वी, आता परत आपल्या आश्रमाकडे जा."

त्याला सावित्री म्हणाली, ' माझ्या बापाला शभर मुलगे प्राप्त होवोत!"

साध्वीचे यश हा लक्ष्मीबाईचा पुत्र ( म्ह. मी मोरोपत कवि ) किती वर्णू शकेल ? उमेचा पुत्र ( गणपति ) देखील वर्णू शकणार नाही !

चद्राला जसे नक्षत्र लाजते, तसे यमाच्या औदार्याला आकाश लाजतें. सावित्रीच्या शुभ्र यशात आपला पति ( ऐरावत ) हा दिसत नाही, म्हणून अभ्रमु रडू लागली.

टीप—यशाचा रग शुभ्र, आकाशाचा विस्तार फार मोठा, आणि ऐरावताचा रग पांढरा, ह्या माहितीची विद्यार्थ्यांस आवश्यकता आहे.

अशा रीतीने यमाचे मन वळवून आणि तीन वर सपादन करूनसुद्धा ती सावित्री आपल्या पतीला सोडवून घेतल्यावाचून त्या यमदेवाला सोडीना.

यम म्हणाला, " तू स्वच्छ असून माझ्या मागे सावलीप्रमाणे आहेस ( म्ह. येत आहेस ) तीन वर मजपासून मागून घेऊन आणखी चवथा वर मागत असलीस, तर माग मी तो देतों. तो घेऊन जा.

तेव्हा सावित्री म्हणाली, " यमराजहो, मजवर कृपा करा, 'हे कन्ये, तुला शभर पुत्र होवोत,' असें म्हणा, आणि कैलास पर्वताला ( शुभ्रपणाने )लाजविणारा असा यशाचा राशि, हे उदारशील देवहो, स्वर्गलोकाप्रत घेऊन जा."

टीप—कैलास पर्वताचा रग शुभ्र ही कल्पना विद्यार्थ्यांला ठाऊक असली पाहिजे.

यमधर्म सावित्रीच्या तेजाने, धैर्याने, बुद्धिमत्तेने आणि तिने केलेल्या प्रशसेनें भूलून गेला. तेव्हां त्याने ती परत जावी म्हणून, 'तथास्तु' असें म्हटले.

३५. येथवर आम्ही अनुवाद कसा करावा, यासबधाच्या सूचना विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं देऊन कांही पद्यसमूहाचे अनुवाद करून दाखविले ! आतां विद्यार्थ्यांना स्वतःच्या बुद्धीने अनुवाद करावयासाठीं काही उतारे देतो.

### ३६. भारतापासून घ्यावयाचा बोध.

या ग्रथापासून तुम्हास पुष्कळ बोध घेता येण्यासारखा आहे. मनुष्याने नेहमीं परमेश्वरावर विश्वास टेऊन सन्मार्गाने व नीतीने वागावे, म्हणजे त्यास परमेश्वर सहाय होतो. ही मोठी गोष्ट भारतकथेपासून शिकण्यासारखी आहे. परिस्थितीप्रमाणे जे कर्तव्य असेल ते निरलसपणे व व्यवस्थितपणें करावे; अपकाराची फेड होता होईल तो उपकारानें किंवा निदान सामोपचारानें करावी, सत्यप्रतिज्ञ असावें; गुरुजनाविषयीं आदर ठेवावा, स्त्रियांविषयीं

पूज्यता दर्शवावी, कपटाने दुसऱ्याचें धन वगैरे हरण करण्याची इच्छा करू नये, द्यूतासारखीं व्यसनें लावून घेऊं नयेत, आपले कुल, आपला धर्म, आपले राष्ट्र याचा अभिमान बाळगावा, त्यांना काळिमा लागेल असे कृत्य करू नये, आपल्या शक्तीचा व ज्ञानाचा उपयोग लोकाचे कल्याण करण्याच्या कामीं करावा, विद्याविनयसपन्न व्हावे, उदार बुद्धीने व थोरपणाने वागावे इत्यादि उत्कृष्ट उपदेश या ग्रथात भरलेला आहे.

या प्रकारचा ग्रथ आपणास लाभला आहे, हे भरतखडाचे मोठें भाग्य आहे. या पुस्तकामुळे आपण सर्व राष्ट्रांपेक्षा अधिक सपन्न आहो. कारण, राष्ट्राची किमत त्यातील अमोल ग्रथांवर अवलबून असते. जोपर्यंत महाभारत आपल्याजवळ आहे त्याचा आपण अभ्यास करीत आहो, त्यातील उपदेशाचे ग्रहण करून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत आहो, तोपर्यंत आपणास निराश होण्याचे कारण नाही. तो उत्तम उपदेश आहे, व आपला सर्व प्रकारानीं अभ्युदय करणारा आहे.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

## ३७. वामन पडितांची यथार्थदीपिका.

पडितांची चतुरस्रता, जबर निरीक्षणशक्ति, व्यवहारज्ञान, विशाल अनुभव, हींही यात बिबली आहेत. वसताच्या अमदानींत उद्यानभूमीमध्ये झाडावर शोभणाऱ्या फुलाचे घोस व त्याखालीं पसरलेला फुलाचा फेर ज्याप्रमाणे अत्यन्त मोहक वाटतो, तद्वत् यथार्थदीपिकेत इतस्ततः पसरलेले अशा प्रकारचे उत्कृष्ट रचनेचे शेकडो नमुने मनाला अगदी दंग करून टाकतात. तरी पण हें लक्ष्यात ठेविले पाहिजे, कीं दीपिका रचण्यांत पडिताचा हेतु काव्य निष्पन्न करण्याचा नव्हता तर भगवद्गीतेचा खरा खरा अर्थ प्रगट करून लोकाना ज्ञानयुक्त भक्तीचा मार्ग निभ्रात रीतीने दाखवावयाचा होता. तेव्हा हा आद्य हेतु असल्यामुळें आपल्या काव्यस्फूर्तीला पूर्ण वाव न देता अनेक वेळा त्यांना शब्दार्थावरच मल्लिनाथी करावी लागली आहे, यास त्याचा नाइलाज होता.

बाळकृष्ण अनत भिडे, बी. ए.

## ३८. अमृतरायाची कविता.

अमृतरायाची कविता वाचणारास नुसता काव्यरसपानाचा लाभ घडतो

असे नाहीं, तर त्या वेळच्या देशस्थितीचें, रीतीभातींचें व आचारविचारांचें ऐतिहासिक दृष्ट्याही ज्ञान होण्यासारखें आहे. अमृतरायाच्या काव्यांत प्रसंगविशेषीं श्रृंगार, वीर, हास्य, बीभत्स, इत्यादि रसही अंगभूत आहेत. अमृतरायाची भाषा साधी, सरस, व प्रौढ आहे. अमृतरायास हिंदी भाषा किती चांगली येत असे हे सांगावयास व त्याने तींत मराठीसारखी सरस कवनें केलीं आहेत, एवढें सांगणे पुरें आहे. अमृतरायाची भाषा सर्व काव्यांत सारखी नाहीं, कोठें गीर्वाण वाणीच्या संगतीनें प्रौढ बनलेली, कोठें हिंदीच्या सहवासानें झोकदार झालेली व कोठे साध्या रूपाने प्रकट होणारी आहे. ह्या वैचित्र्यामुळे ज्या प्रकारचा वाचक असेल, त्या प्रकारचे रूप धारण करून, ती करमणूक करणारी आहे.

जगन्नाथ रघुनाथ आजगावकर—महाराष्ट्रकविचरित्र.

## ३९. लबाडास जिकणें.

एकजण लबाड बोलणारा मोठा बहाद्दर होता. एके प्रसंगी वरील गोष्टीचीच मोठी फुशारकी वाढून तो मंडळीत सांगू लागला,—आपण बोवा आजपर्यंत कधीं खरी गोष्टच तोंडावाटे काढली नाहीं! तेव्हा एकजण उत्तर करतो, 'तर मग या खेपेस तरी आपण खरे बोललात यांत संशय नाहीं, व असे केल्याने प्रतिष्ठा मिरवायला आपल्यास एकच जागा उरली होती तीही आपण गमावून घेतलीत!''

विष्णुशास्त्री चिपळूणकर—विनोद आणि महदाख्यायिका.

## ४०. मोरोपंतांच्या कवितेचा तिरस्कार.

अलीकडे आमच्या इंग्रजी पंडिताच्या ठिकाणीं मोरोपंताच्या कवितेविषयीं विलक्षण प्रकारची अढी बसलेले दिसते. इंग्रेजी भाषेचा अभ्यास वाढला, संस्कृत व मराठी भाषेचा अभ्यास तुटला, मागल्या विचारपरंपरेची ओळख राहिली नाहीं. हिंदूसमाजांतल्या चालीरीतींची किंमत वाटेनाशी झाली. स्वधर्मश्रद्धा पार ढांसळून गेली, आपल्या आचाराविचाराविषयीं प्रकट अगर गुप्त तिरस्कार वाटू लागला—याप्रमाणे हिंदुत्वाला पारखे होत चाललेले आमचे कित्येक देशबांधव आपल्या राष्ट्रीय महापुरुषाची व राष्ट्रीय कवींची अवहेलना करण्यांत भूषण मानू लागले आहेत!

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.
'मोरोपंतांचें चरित्र.'

## ४१. कवि, काव्य आणि काव्यरति.

इंग्लडातील प्रसिद्ध ग्रंथकार डॉ० जान्सन् याने एके ठिकाणी असे म्हटले आहे की, काव्य करण्याजोगे नामी नामी विषय जगातील जुने कवि लाटून बसल्यामुळे, अर्वाचीन कवींस मनोरंजक काव्यें लिहिण्यासारखे विषयच राहिले नाहींत ! शास्त्रप्रसार काव्यरचनेस घातक आहे हें विलक्षण मत मेकॉलेनें कोठेसें ठोकून दिलें आहे ! काव्यास अलीकडे जें थोडेसें माद्य असल्यासारखें दिसतें त्याचें कारण अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे, तर अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळे काव्यवस्तु करण्याजोगे जे नवीन विषय उत्पन्न झाले आहेत, त्यांचा अर्वाचीन कवि काव्यरचनेत उपयोग न करता प्राचीन कवींच्या काव्यविषयावर फिरून फिरून लिहितात, व त्यांच्या भाषेचें अनुकरण करतात हें आहे. ज्यांनीं असें केलेलें नाहीं त्यांचीं काव्ये वाचकास प्रिय झालीं आहेत व पुढे जे असें करणार नाहींत त्यांचींही काव्ये वाचकांस प्रिय होतील याबद्दल आम्हास मुळींच संशय नाहीं.

गोपाळ गणेश आगरकर,
विविधविषयसंग्रह.

## ४२. मोरोपतांची कविता

मोरोपताच्या भाषेचा अगदीं विशेष म्हटला म्हणजे त्यांनीं यमकबद्ध काव्यरचनेकडे विशेष लक्ष पुरविलें हा होय. त्याच्या काव्यांत यमकप्राचुर्य आहे यामुळें कित्येकांची त्याजवर अतोनात भक्ति आहे, व कित्येकाचा याचसाठीं त्याजवर मोठा रोष आहे ! या परस्पर मतविरोधी पंडितामध्यें आजवर पुष्कळ वाद झाले आहेत, त्याचा येथे विचार करण्याचे कारण नाहीं मोरोपतानीं केवळ यमकांकडेच लक्ष्य पुरविलें असतें व त्यामुळें त्याच्या काव्यांत प्रसाद, ओज, रसपूर्णता, वगैरे गुण नसते तर त्याना दोष देता आला असता. रसहानि होऊ न देता जर त्यानी शब्दचमत्काराकडे विशेष लक्ष्य पुरविलें असतें तर एवढ्याच कारणासाठीं त्याच्या कवितेचा अधिक्षेप करणें कोणत्याही समंजस मनुष्यास युक्त होणार नाहीं.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,
मोरोपतांचे चरित्र.

## ४३. हास्यरस.

हास्यरसाचा परामर्ष संस्कृत साहित्यशास्त्रात घेतलेला आहे. तथापि इतर

रसाच्या मानानें पाहाता या रसास कमी महत्त्व दिलेलें आहे. संस्कृत वाङ्मयात सर्व भर बहुधा शृंगाररसावर व जुन्या मराठी वाङ्मयात सर्व भर शांतरसावर संस्कृतात काव्य आणि शृंगार यांची बहुधा समव्याप्ति आहे, असें म्हटलें तरी चालेल. नवरसाच्या अनुक्रमांत शृंगार हा प्रथमपदीं विराजमान झालेला आहे, व साहित्यशास्त्रांत दिलेला सर्व रसांचा अनुक्रम केवळ महत्त्वाचे दृष्टीनेच दिलेला आहे असें म्हणण्यास जरी सबळ आधार नाहीं, तरी पण हें जे शृंगाररसास प्रथमपद मिळालेलें आहे, तें केवळ यदृच्छेनेंच मिळालें असेल, असें नाहीं.

नरसिंह चिंतामण केळकर.
सुभाषित आणि विनोद.

## ४४. अंगदाप्रत रावणाचें भाषण.

सभेसि बैसोनि वानरा । किती जल्पसी सैरावैरा ?
नोडा नाहीं वोढावारा । दशशिरा नोळाखिशी ॥
एके माझी अंगवण । बंदीं घातले सुरगण ॥
राम बापुडें तें कोण । मजशीं रण करावया ? ॥
इंद्रचंद्रादि सकळ सुर । माझे घरचे झाले चाकर ॥
मद्भयें कांपती थरथर । अहर्निशीं राबती ॥
राम बापुडें केवळ नर । आमुचें खाजुगें ग्रास मात्र ॥
वानर जे कां वनचर । धाकेंचि संग्रामीं मरतील ॥
मुख्य भक्ष्य रामलक्ष्मण, । मर्कटें कोशिबिरी जाण ॥
एका ग्रासें कुंभकर्ण । भक्षील आपण क्षणार्धें ॥

एकनाथ, अंगदशिष्टाई

## ४५. हरिदास्याची थोरवी.

कोटि जन्म पुण्य साधन साधिलें । तेणें हाता आलें हरिदास्य
रात्रंदिवस ध्यान हरीचें भजन । काया वाचा मन भगवंतीं
ऐसीया प्रेमळा म्हणताती वेडा । संसार रोकडा बुडवीला
एकवीस कुळें जेणें उद्धरीलीं । हे तों नकळे खोली भाग्यमंदा
तुका म्हणे त्याची पायधुळी मिळे । भवभय पळे वांदेताची

तुकाराम, स्फुट अभंग.

## ४६. दारिद्र्य मित्र.

दारिद्र्य पाहुनि धरी न मनांत भीती,
दारिद्र्य दोष समजें अपुला न चित्तीं ।
दारिद्र्य उत्तम तुला करण्यास सागे ,
सन्मित्र यास समजें, न भरून रागें ॥ १ ॥
दारिद्र्य सोस मनिं धैर्य धरूनि फार,
धैर्यें प्रयत्न करुनी मग त्या निवार ।
दारिद्र्य जाय जरि सोडिशि आळसाला ,
दारिद्र्य जाय धरितां करिं उद्यमाला ॥ २॥
दारिद्र्य उद्यम करूनि समग्र टाळी
यत्नाप्रती सुफळ येइल योग्य काळीं ।
जे जे भले नर जगीं उदयास आले
होते गरीब, तरि ते न मनांत भ्याले ॥ ३ ॥

मोरो गणेश लोंढे, दृष्टान्तमाला.

## ४७.तरणोपाय.

भवसिंधु तराया एकचि उपाय, ।
ध्यावे तुझे पाय वासुदेवा ! ॥ १ ॥
गोविंद गोपाळ वाचेसी निखळ, ।
उद्धरे तात्काळ कलीमाजी ॥ २ ॥
नारायण, नारायण करी जो पारायण ।
तो उद्धरे जाण इहलोकी ॥ ३ ॥
तुटती यातना कर्माच्या भावना ।
जडजीवा उद्धरण नाम स्मरा ॥ ४ ।'
अहर्निशीं कीर्ति गाति भाविक भोळे ।
त्यांणीं तुज जिंकिलें ब्रह्मा म्हणे ॥ ५ ॥
नामा म्हणे ऐसे दाविले सुगम ।
नलगे तुझा नेम नाना कोटी ॥ ६ ॥

नामदेव, स्फुट अभग

## ४८. परमेश्वरास प्रार्थना.

अनुग्रह करीं त्वरें मजवरी जगत्पालका !
दया करुनि दिव्य दे त्वरित दृष्टि या बालका ।
न सांग बुडवील कीं जळ भवाब्धिचें घातकी !
कृपा तरि मिळे तुझी तरिच हा तरे पातकी ॥ १ ॥
दया करुनि सोडवी मजासि या विमोहांतुनी,
वनी फसलि गायशी त्वरित काढिं गर्तेतुनी ।
नितान्त शिणलो, करी नचि विलंब तारावया,
विमोहकुहरी बुडें; करिसि वेळ कां यावया ? ॥ २ ॥
भ्रमात्मक भुजंग हा विषवि फार, मारी उडी,
तुझ्याविण न मांत्रिक प्रबळ अन्य तो गारुडी ।
अहर्निश अशांतता मज पिशाचिका पीडिते, ।
अगा कुशळ मांत्रिका ! पळविं सर्व माझी भुतें ॥ ३ ॥

गोविंद वासुदेव कानिटकर, समोहलहरी

## ४९. रसिक कैसें सत्काव्य म्हणे त्याला ?

नलि नभ हें विस्तीर्ण मनोहारी,
मधें चमकुनि तारका ये बहारी !
नसे परि जरि पूर्णेंदुकला तेथे
कशी येई रम्यता सांग त्याते ! ॥ १ ॥
पुढे दिसतें कासार हे विशाल,
वृक्षराजी डोलते पवनलोल ।
मोद तेथें हो सतत वसायाचा,
नाश झाला परि जलाविण त्याचा ॥ २ ॥
अहा ! उद्यानी विकच हे कशाचे—
पुष्प झालें, आनन्द देइ साचें ।
परी नाहीं आमोद त्यास हाय !
सुगंधाविण सौंदर्य वृथा जाय ॥ ३ ॥
पहा शोभे कामिनी, काय खालीं--
नभांतूनी चंद्रिका मूर्त आली ! ।

परी सांगा की मजासि असूंवीण
तिच्या सौंदर्या विचारील कोण ! ॥ ४ ॥
तशी कविता जी शब्दचमत्कारे
सजविलीसे, तद्बाह्य रंग सारे ।
शोभताती, परि ठाव ना रसाला,
रसिक कैसें सत्काव्य म्हणे त्याला ! ॥ ५ ॥

एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

## ५०. दैवलीला.

कोणाला कारितसे दूषित । कोणाला सुयशें प्रपूरित ।
कोणाला उच्चपदस्थित । खालीं पाडिते कवणाला ॥ १ ॥
कोणा कधी देतसे सुखातें । कोणा कधी वाढवी दुःखाते
भय, चिंता आणि शोक यांतें । कधीं कोणा देतसे ॥ २ ॥
कधीं देते परस्परप्रीति । कधीं वाढवितें वैरवृत्ति ।
कधीं दारिद्र्य, कधीं संपत्ति । कर्मानुसारे देतसे ॥ ३ ॥
ऐसी दाखवी लोकस्थिति । दैव क्रीडतें स्वतंत्रगति ।
कूपघटीयंत्राची रीति । तीच येथें जाणावी ॥ ४ ॥

परशुरामतात्या गोडबोले.

## ५१. तीर्थवास.

वाराणसी क्षेत्र थोर । तेथें लोक जाती फार ॥ १ ॥
परि तेथें अधिक काय ? । ऐसें विचारोनी पाहें ॥ २ ॥
जेथें तेथें देव धोंडा । तो कां आपले गांवी सांडा ! ॥ ३ ॥
येथें लोक तेथें लोक । अवघे एकची उदक ॥ ४ ॥
देवदास म्हणे वेडें । तीर्थी धांवे अवघ्यापुढें ॥ ५ ॥
तीर्थी जाती देखावेखी। तेथें कैसी होत पाखी ! ॥ १ ॥
पाप गेलें, पुण्य जालें, । प्रत्ययासि कैसें आलें ? ॥ २ ॥
म्हणती, " जाऊं वैकुंठासी " कैसें येई प्रत्ययासी ? ॥ ३ ॥
देवदास म्हणे, हित । कैसें जाहलें स्वहित ॥ ४ ॥
दाढी डोई भादरिती । केस मागुते नीघती ॥ १ ॥

शुचिष्मंत जाला कैसा । विवेक पहाना कां ऐसा ? ॥ २ ॥
देवासाठीं तीर्था जाती, । तरि कां मागुते फिरती ! ॥३॥
देवीदास म्हणे भ्रम । ज्ञानेंविण अवघा श्रम ॥ ४ ॥

देवीदास

## ५२. भरत आणि कैकेयी.

वृत्तान्त सांगे भरतासि माय
स्वानंद जीचा त्रिजगीं न माय
भेदूनि वक्षःस्थळ शब्द तीचा
करी महाक्षोभ महामतीचा ॥ १ ॥
जाळील तीतें निजदृष्टिपातें
पाहे असा, हालविनाच पातें ॥
म्हणे अहो पापिणि ! पापरूपे !
जळो तुझें तोंड जडस्वरूपे ! ॥ २ ॥
जाळीन हे तोंडचि जाण आधीं,
मुखें जया देशि अनंत आधी ।
न माय तूं वैरिण होसि साची,
माझे मनीं भाव खरा असाची ॥ ३ ॥
केला तुवां देखत भर्तृघात,
क्षणें तिवाटा रचिल्या तिघांत ।
शत्रुघ्न मी, लक्ष्मण राम, जोडे,
राजा तिचा, तीस अनर्थ जोडे ॥ ४ ॥

वामन पंडित—भरतभाव

## ५३. अनावश्यक साहाय्य.

वृत्त उपजाति.

साहाय्य आवश्यक जों नसे तों—
सहाय्य द्याया जन शीघ्र येतो ।
परंतु साहाय्य अवश्य हावें—
असेल तेव्हां न कुणाहि फावे ! ॥ १ ॥

असेल पायावरि जो उभा तो
ललाम होऊनि जना रहातो ।
सुस्थास साहाय्य करावयास
जो तो असे सिद्ध कसोनि कास ॥ २ ॥

सुस्थास भेटे जगिं मित्रसेना,
कोणी अहो ! कृच्छ्रगता बघेना ।
जो दैवयोगें पडला तयातें
स्नेहें कुणीही उचली न हातें ॥ ३ ॥

जन त्यजी कृच्छ्रगतास तैसा,
हली त्यजी जर्णि वृषास जैसा ।
मत्संकटीं येतिल मित्र कामा
असा न विश्वास धरा रिकामा ॥ ४ ॥

आला नसे जों कठिण प्रसंग
तों मित्रता राहतसे अभंग ।
आल्यास दैवें कठिण प्रसंग
मित्रत्व पावे निमिषांत भंग ! ॥ ५ ॥

साहाय्य जो तो नर आपुलाला,
हे सत्त्व बाणो तुमच्या मनाला ।
परावरी विश्वासुनी फसाल,
गेला न येईल फिरोनि काल ! ॥ ६ ॥

त्रि वा. भिटे — जीवजागृति.

## ५४. सत्त्वरक्षण.

वृत्त भुजगप्रयात.

म्हणे सुज्ञ, " तो मात्र सत्त्वास जागे
दिलेली न जो घे कधीं मात मागें ।
कितीही जरी दुःख भोगास आलें
तरीही न जो सत्य सांडून चाले. " ॥ १ ॥

म्हणे सुज्ञ, " तो मात्र सत्त्वास जागे
विपत्कालिंही जो स्वधर्मेंच वागे ।
खलांच्या भयें जो न सन्मार्ग सोडी,
पटा घर्षणेंही न जैशी दसोडी ॥ २ ॥
जगाच्या स्तुतीला हरिश्चंद्रराय
नसे जाहला पात्र सर्वत्र काय ? ।
महा सकटीं रक्षिलें सत्त्व त्यानें,
कवी गाति अद्यापि तत्स्तोत्रगानें ॥ ३ ॥
मयूरध्वजें स्वांग कृष्णार्जुनांस
दिलें आपुलें सत्त्व रक्षावयास ।
श्रियाळें दिला पुत्र खाया द्विजाला,
दिलें सत्त्व त्यानें न जाऊं लयाला ॥ ४ ॥
स्वमांस स्वकीयें करें कापितांना
शिबीनें तिरस्कारिलें यातनांना ।
महीपाल सत्वास तो जागला हो !
जगीं कां न तत्कीर्ति अद्यापि राहो ? ॥ ५ ॥
जगीं देखतो शेंकडों नीचसार्थ
जयां वाटतो सत्त्व हा कःपदार्थ ।
सदाचार ठावाच नाहीं जयांस
तयांना मिळे नारकी नित्य वास ! ॥ ६ ॥

वि. वा भिडे—जीवजागृति.

## ५५. धन्य नर.

शोधा स्वयें सकल सत्त्व विचारयोगें,
मोठे असें म्हणति यास्तव घे न मागे, ।
सत्याविणें इतर ज्यास नसेच वर्म,
तत्त्वावबोधरत जो त्याजि तो न धर्म ॥ २ ॥
जो इंद्रियां वश नसे, मरणा न जो भी,
निंदा नसे प्रिय, तरी स्तुतिचा न लोभी, ।

मोठ्या पदास चढला पर पाहुनीयां,
हर्षें मनीं भरतसें न करी असूया;
व्याजस्तुतींहुनि असे वच दूर ज्याचें,
( जीच्या समान न मनीं पर शल्य जाचे ) ।
धर्माहुनी इतर नीति नसे जयाचि,
जो वाट सेवि नाचे राजमता नयाची, ॥ ३ ॥

छिद्रे न पारिसतो इतरां गृहींचीं,
जो आत्मसंमतपथास न सोडितोचि,
ज्याला अहंकृति शिवे नच ती स्तुतीही,
यत्नाशसाधानि न लांभ जनांस काहीं ॥ ४ ॥

जो ध्यातसे निशिदिनी पद ईश्वराचें,
निष्कामभक्तिरत मानस तें जयाचें, ।
जो नित्य कर्म विचरून दिवावसानी
मित्रासवें अनुभवी सुख काव्यगानी ॥ ५ ॥

आशा न बद्ध करितेच जया नराला,
लोकीं निराश मन दूर करी भयाला ।
आत्मप्रभु, प्रभु जरी नच भूमिकेचा !
जोडी आकिंचन जरी परमार्थ साचा, ॥ ६ ॥

त्यालाच धन्य नर सत्य सदा वदावें !
त्याचेंच आचरण निर्मल आचरावे ! ।
त्याचेंच शिक्षण वरूत समस्त लोकीं !
त्याचेंच सौख्य विलसे जगती विलोकीं ! ॥ ७ ॥

कुसुमाजालि—महाजनी.

## ५६. प्रपंच.

" वनवासें मुक्ति " अशी येऊं देऊं मनी नको लहरी, ।
झाले मुक्त खग, हरि, वृक, जंबुक, कां वनी न कोल, हरी ? ॥ १ ॥
जरि सर्वां कर्मांच्या संन्यासें करुनि म्हणसि सर्व तरे ।
व्हावेचि मुक्त राजा ! तरि हे निःशेष वृक्ष, पर्वत रे ! ॥ २ ॥

प्रभुसी काय वदो मी विद्वान् वक्ता वदे न अन्यासी ।
अवनी अवनीच्या अधिकारी क्षत्रिय नव्हेचि संन्यासी ॥ ३ ॥
जे अधन, अशक्त, अलस, नास्तिक, कल्पक, तिहीच संन्यास-।
कल्पुनियां चालविला, तैशांसाचि हा न योग्य अन्यास ॥ ४ ॥
तो धन्य पूर्वजांही जें केलें तेंचि जो करी राया ।
वेंची नृपा ! प्रजांच्या अवनी, न वनी वृथा शरीरा या ॥ ५ ॥

× × × × ×

जरि सर्वाधिक नसतें, गार्हस्थ्य सुकवि कशास या गाते ? ।
याच्या साधिति लोकीं नच, मिरवाया यशास यागा ते ॥६॥
" एकाचि करी तिघांचे एकाचेंही तिघां नव्हे कार्य,
ऐसे तोलुनि वदला धाता " म्हणतात सर्वही आर्य, ॥ ७ ॥
द्यावी अर्थिजनाला, बहु करुनि क्रतु नवे नवे, दानें ।
पाठ असोनिहि तरला, उक्त न करितां न वेन वेदानें ॥ ८ ॥

× × × × × ×

मुक्त्यर्थ ईश्वराचे, त्यागावें राज्य न, भजन कराया, ।
सर्वत्र अलिप्तत्वे होतें सन्मित्र नभ जनकराया ॥ ९ ॥
ममकार, अहंकार, त्यागुनि होसील मुक्त गेहीच, ।
भव, अपवर्ग, मम, न मम हे दोघे नांदतात देहीच ।' १० ॥
त्यांत ज्ञाते म्हणती, " जरि केवळ सोडिला अहंकार, ।
तरि होय शीघ्र सर्वव्यवहारोच्छेद हें नव्हे सार " ११ ॥
सर्वहि मुमुक्षु म्हणतो, " जे ममता, हेचि होय मम कारा ।
यास्तव आधी अंजलि जोडी सोडीच्च तोय ममकारा ॥ १२ ॥

* * * *

सर्व मनःसंकल्पित जरि नाही त्यागिलें अगा ! राया ! ।
तरि, बा बाह्यद्रव्यत्याग वृथा, त्यजिसि कां अगारा या ॥ १३॥
ज्याच्या मनांत लेशहि शेष वसे काय विषयलोभ वनी-।
बाह्यद्रव्य त्यागुनि गेला नाही, वसेचि तो भवनीं ॥ १४ ॥

—मोरोपंत, अध्याय ३ शांतिपर्व.

५७. उपवनाची सुखकरता.

वृत्त मदनसायक.

उपवनांतिल बघुनि पादप कुसुमवैभवसुंदर,
कवण दु ख न भवसमुद्भव विसरतो जगिं ह्या नर? ।
षडरिंचा छळ लवहि ह्या स्थलिं अनुभवासि न येतसे,
शममहीपति निज अकंटक विभव भोगित की बसे ॥ १ ॥
कुसुमसौरभ उपवनामधिं दरवळे अनिवारित,
विहग गायन करुनि सुस्वर सुखविती तरुसंस्थित ।
पवन तोषवि जललवान्वित, कुसुमसंगत मंथर,
मनुज ह्या स्थळिं मिळवितें मज सुख मिळविती नाचि निर्जर॥२॥
मनुज ज्या स्थळिं वसति तें मज बघवतें स्थळ न क्षण,
सुखपरायण मनुज संहरि परसुखा करूनी रण ।
प्रखर मत्सर उपजवी किति कालिं समाजिं निरंतर ! ।
वरुनि भास्वर, हृदयिं भेरसुर, खचित राक्षस हा नर ! ॥ ३ ॥
नरसमागम न सहवे मज, मम भयें मन तो भरी !
मधुर आकृति असुनि बाहिर; मम कपट घोर तदंतरी ।
विधि कशास्तव मनुज ह्यापरि घडवि हें मज नाकळे,
बघुनि दु सह मनुजवर्तन हृदयिं संतत मी जळे ॥ ४ ॥

वि वा. भिडे, जीवजागृति

५८. लेखांक ३६ पासून ५७ पर्यंत आम्ही जे गद्यपद्याचे उतारे दिले त्यांतील कठिण शब्दाचे अर्थ पुढे देतो.

३६. सामोपचाराने=सलोख्याने, मित्रत्वाच्या भावाने. द्यूत=जुगारी. अभ्युदय=भरभराट. ३७ चतुरस्रता=चतुरपणा, सर्व प्रकारच्या ज्ञानाने सपन्नता. निरीक्षणशक्ति=सर्व गोष्टी बारकाईनें पाहण्याचे सामर्थ्य. पेर=सडा, वृष्टि. निष्पन्न=उत्पन्न. निभ्रांत=सशयरहित. आद्य=पहिला, मुख्य. वाव=अवसर. मल्लिनाथी=टीका. ३८ अगभूत=गौणत्वाने. झोकदार=थाटामाटाची. ३९ बहादर=पटाईत. फुशारकी=प्रौढी. अढी=प्रतिकूळ ग्रह. तुटला=कमी झाला, किं० बद पडला. किंमत=महत्व. अवहेलना=अनादर. ४१. लादून

=बळकावून. ४२. विशेष=ठळक गुण. यमकबद्ध=यमकांनीं युक्त. प्राचुर्य= विपुलता, पुष्कळपणा. परस्परमतविरोधी=एकमेकाहून अगदीं उलट मतें प्रतिपादणारे. प्रसाद= सुबोधपणा. ओज=तेज, प्रौढपणा. अधिक्षेप=तिरस्कार. युक्त=योग्य. ४३ परामर्श घेणे=लक्ष पुरविणे, विचारात घेणे. यदृच्छेने= कर्मधर्मसंयोगाने ४४ जल्पसी=बडबडतोस. सैरावैरा=मनास येईल तसे, मूर्खपणाने. वोढावारा=प्रतिबंध, आळा. दशशिरा=रावणाला. बापुडे=बिचारे. खाजुगे=खाद्य. ४५. हाता आलें =प्राप्त झाले रोकडा=अगदीं, स्पष्टपणे. खोली =वर्म, रहस्य. भाग्यमद=दुर्दैवी माणूस. ४६. उद्यम=उद्योग. न भरून रागें =न रागावता. ४७ निखळ=न खळता, निरंतर. पारायण=अखण्ड पठण. भावना= वासना. सुगम=सुलभ उपाय. ४८. अनुग्रह=कृपाप्रसाद. कृपातरी= कृपारूप तरी म्ह० होडी विमोह=भ्रम, भ्रांति, घोटाळा. गर्ततुनीं=खड्यातून. नितान्त=अतिशय. शिणलों=श्रमलो. विमोहकुहरीं=भ्रांतिरूपी डोहात. भ्रमात्मक=भ्रमरूपी. ४९. कासार=सरोवर. वृक्षराजा=झाडाची ओळ. पवनलोल =वाऱ्याने हालणारी. मोद=आनंद. विकच=उमललेले आमोद=सुगंध. मर्त=मूर्तिमंत, प्रत्यक्ष असूविण=प्राणाशिवाय. कोण विचारील ?=कोणीही महत्व देणार नाहीं. ५०. प्रपूरित=पूर्ण सुयशें प्रपूरित=यशस्वी. वैरवृत्ति= वैरभाव. स्वतंत्रगति=स्वच्छंदाने. कूपघटी=पायरहाट. कूप=विहीर, घटी= लोटा, पोहरा ५१ देखावेखीं=ढोंगाने पाखी=शुद्धपणा, स्वच्छपणा. शुचिष्मत=शुद्ध सोवळा. ५२ महामतीचा=माहात्मा जो भरत त्याचा. पातें= पापणी. आधी=दुःख. देखत=पाहता पाहता. भर्तृघात=पतीचा म्ह. दशरथाचा घात म्ह० नाश. तीस=तिघानाहीं ५३. ललाम=आवडीचा विषय. सुस्थास= चांगल्या स्थितींत असलेल्या माणसास. मित्रसेना=मित्रांचा समुदाय, पुष्कळ मित्र. कृच्छ्रगता=अडचणींत सापडलेल्या (माणसास). हली=नांगर हाकणारा, शेतकरी. जीर्ण वृष=म्हातारा बैल. अभंग=शाबूत. ५४ दसोडी=वस्त्राची दशी. तत्स्तोत्रगानें=त्याच्या स्तुतीचीं गाणीं किं० कवनें. स्वांग= आपलें शरीर. नीचसार्थ=हलकट लोकांच्या टोळ्या. ५५ तत्त्वावबोधरत=सत्याचें ज्ञान करून घेण्यात निमग्न. असूया=मत्सर. व्याजस्तुति=खोटी स्तुती. राजमत नय= राजनीति. छिद्रें=कमीपणा, उणेपणा. आत्मसमत पथ=आपणास योग्य वाटणारा मार्ग यन्नाशसाधनि=ज्याचा नाश घडवून आणण्यांत. निष्कामभक्तिरत =अहेतुक अशी भक्ति करण्यात निमग्न. विचरणे=वरणे. दिवावसानीं—दिवस

सपत्न्याबरोबर. आत्मप्रभु=इंद्रिये स्वाधीन ठेवणारा. भूमिका=पृथ्वी. अकिंचन=गरीब. वरूत=स्वीकारोत. ५६. लहरी=कल्पना. खग=पक्षी. वृक=लांडगे. जबुग=कोल्हे.कोल=डुकर.हरी=सिंह.सन्यास=परित्याग. अवन=रक्षण अवनी=पृथ्वी.कल्पक=लबाड लोक.कल्पुनि=शोधून काढून याच्यायागा=याच्या अनुष्ठानासाठीं, म्ह० हे करण्याकरिता. तोलूनि=विचार करून, धाता=ब्रह्मदेव. अर्थिजन=भिक्षा मागणारे लोक.क्रतु=यज्ञ. वेन=एक राजा, हा दुष्ट होता, याला वेद पाठ असूनही हा तरला नाहीं, म्ह. उत्तम लोकाप्रत गेला नाहीं. अलिप्तत्वे=निष्कलंक राहण्याच्या गुणामुळें. सन्मित्र=उत्तम मित्र,म्ह० पूर्णपणे सारखे. नभ म्ह० आकाश त्याला जसा कसलाच लेप म्ह० कलंक लागू शकत नाहीं, तसा जनक राजा होता. ममकार=अमुक वस्तु माझी अशी भावना. अहंकार=मीपणा. भव=संसार.अपवर्ग=मोक्ष. त्यात=तशात, त्यातल्या त्यात. व्यवहारोच्छेद=कर्मांचा नाश.कारा=तुरंग. तोय सोडणे=परित्यागणे.मन:संकल्पित=मनाने चिंतलेले. बाह्यद्रव्यत्याग=बाहेरील वस्तु सोडून देणे.अगार=घर काय विषयलोभ=देहाची आणि भोगाची आवड.भवन=घर.५७कुसुमवैभवसुंदर=उमललेल्या फुलांमुळे रमणीय.भवसमुद्भव=संसारापासून उत्पन्न झालेले.ह्या स्थळिं=उपवनात. शममहीपति=शम हाच कोणी राजा शम=शांति. निज =आपले. अकंटक=शत्रुरहित कुसुमसौरभ=फुलाचा सुगंध. अनिवारित= कोणत्याही अडथळ्याशिवाय. विहग=पक्षी तरुसंस्थित=झाडावर बसलेले. जललवान्वित=पाण्याच्या तुशारांनीं युक्त असा म्ह० अर्थात थंडगार. कुसुमसंगत=फुलाचा स्पर्श ज्याला झाला आहे असा, म्ह०अर्थात सुगंधी. मंथर=संथ, सावकाश वाहणारा, मुजुळ. निर्जर=देव. सुखपरायण= सुखाच्या पाठीस लागलेला. कालिं=तटेबखेडे. भास्वर=चकचकीत,तेजस्वी. भेसुर=भयंकर.

समाप्त.

# मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी, इत्यादि

लेखक—विद्याधर वामन भिडे, बी. ए.

ह्या पुस्तकात मराठी भाषेतील निवडक असे **वाक्प्रचार व म्हणी.** तसेंच मराठींत योजले जाणारे संस्कृतातील **न्याय, वाक्ये, वाक्यांश,** इ० ह्याचे पूर्ण स्पष्टीकरण केलेले आहे. तसेंच ज्योतिषातील जे **पारिभाषिक शब्द** व्यवहारात योजले जातात, त्याचाही खुलासा केलेला आहे. त्याच्या समर्थनार्थ शेंकडो गद्यपद्यात्मक **अवतरणें** दिलीं आहेत, त्यामुळे ह्या पुस्तकास विशेष **मनोरंजकता** आली आहे. मराठी भाषेचा अभ्यास करू इच्छिणारास व विशेषतः **स्कूलफायनल वगैरे परीक्षांस** बसणाऱ्या उमेदवारास हे पुस्तक **अत्यंत उपयोगी** आहे. ह्या पुस्तकावर अनेक **विद्वान् लोक** व **वर्तमानपत्रकार,** ह्याचे **प्रशंसापर अभिप्राय** आले आहेत. थोडक्याच महिन्याच्या अवधींत ह्या पुस्तकाच्या शेकडो प्रती खपल्या, यावरून ह्या पुस्तकाची उपयुक्तता सहज लक्ष्यात येण्याजोगी आहे. ह्या पुस्तकाचीं पायका टाइपाची सुमारें ५०० **पानें** आहेत, त्यावरून त्याची १॥। रुपये किंमत परिमितच आहे.

**चिमुकलें रामायण**—किं० चार आणे. यात अगदीं लहान मुलास व मुलींस रामायणाची गोष्ट सुबोध व मनोरंजक वाटेल अशी सांगितली आहे.

**मोरोपंतांची मुक्तामाला**—किं० चार आणे. हे कवि मोरोपंत याचें आर्यावृत्तात रचलेलें सुंदर काव्य असून त्यात विविध शब्दालंकार व अर्थालंकार ओतप्रोत भरलेले आहेत. ह्या काव्याचा आस्वाद मराठी वाचकास घेता यावा म्हणून कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यानीं त्याचे मराठींत भाषांतर केलें त्याचे वि० वा० भिडे, बी. ए. यानीं संशोधन करून व अपपाठ होते ते शुद्ध करून आणि भरपूर टीपा देऊन तयार केले. त्याचीं ही दुसरी आवृत्ति आहे.

**मिळण्याचें ठिकाण**—चित्रशाळा प्रेस, पुणे सिटी

**V. V. Bhide's ' concise Sanskrit English Dictionary.** ' This Dictionary supplies the student with all the necessary information that he usually requires.

This Dictionary gives short definitions of all important figures of speech, technical terms of aesthetics, mathematics, astronomy, logic, philosophy, ritual ceremony, and many other branches of knowledge.

This Dictionary has three appendices.

The first appendix gives short accounts of important mythological personages. The second appendix gives the names of Sanskrit metres with their schemes and scansions. The third appendix is a map of ancient India giving the ancient names of the provinces into which India was then divided.

This Dictionary covers 1232 pages of Demi 8 vo size and it can be had at the Chitra Shala Press, Poona, for Rs. 4 only.

---

## मुलांकारितां ] पंचतंत्र [ सचित्र

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंहि ५० आहेत. इसापनीतीप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टींहि विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेज, पृष्ठसंख्या ३५०, बाईंडिंग जाड पुठ्याचें. किं. १।.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# विद्याधर वामन भिडे यांचीं काव्यें

१ **राघवीयपरीवाह**, पूर्वार्ध, सर्ग १ ते १०. ह्या पूर्वार्धात रामजन्मापासून तो पचवटींत सीतेला चोरून न्यावयाला रावण आला येथपर्यंतचा कथाभाग ग्रथित केला आहे. सस्कृतातील महाकाव्याच्या पद्धतीवर हे काव्य रचिलेले आहे. वर्णनाचा ओज, अलकार, भाषा, रचना, शुद्धता, वगैरे सबधाने हे काव्य उत्कृष्ट आहे. विष्णु मोरेश्वर महाजनी, गणेश जनार्दन आगाशे, प्रो० वैजनाथ काशीनाथ राजवाडे, वगैरे पडितानीं हे काव्य प्रशसिलेले आहे.

२ **मदारमंजरी** इ०—हा अठ्ठावीस काव्याचा सग्रह असून यावर विद्वानाचे प्रशसापर अभिप्राय आहेत.

३ **गजेंद्रमोक्ष** इ०—हा बावीस काव्याचा सग्रह आहे

४ **रथरूपक** इ०—हा एकवीस स्फुट काव्याचा सग्रह आहे.

५ **जीवजागृति** —ह्या सग्रहात सुमारे २५० विषयावर कवीचे विचार असून त्यात सुमारे १६० भिन्न भिन्न गणवृत्तात रचना केलेली आहे. प्रत्येक वृत्ताच्या नावाखालीं त्यातील गण दिले आहेत, आणि चरणात यति कोठे पडतो हेही निर्दिष्ट केले आहे, ह्यामुळे हे एक प्रकारचें वृत्तदर्पण म्हणून उपयोगीं पडण्याजोगे आहे.

६ **राघवीयपरीवाह**, उत्तरार्ध—सर्ग ११ ते २२. ह्या उत्तरार्धात सीतेच्या शोधार्थ राम निघाला येथपासून तो रामाला राज्याभिषेक झाला येथपर्यंतचा कथाभाग आला आहे.

**आनदाची मूर्ति** इ०—ह्या पदसग्रहात अनेक चालीवरचीं सुमारे ८० पदे असून तीं सामाजिक, नैतिक, वैराग्यपर, आत्मपर, बोधपर, सृष्टिवर्णनपर, तात्त्विक, अशा अनेक विषयावर आहेत, तीं सर्व सुबोध आहेत.

**टीप**—ह्या सातही पुस्तकाची प्रत्येकीं किमत बारा आणे असून तीं **चित्रशाळा प्रेस**, **पुणें**, येथे विकत मिळतील.

# विद्याधर वामन भिडे यांच्या कादंबऱ्या

१ **मुरारि अथवा शिवाजीची एक प्राथमिक मोहीम**—' महाराष्ट्र-साहित्य-सेवक-ग्रथमाले ' चें हें आठवें पुष्प असून हिंदुसघटन व मुसलमानाचे अत्याचार या चालू प्रश्नाचे प्रतिबिंब तीनशे वर्षांपूर्वीच्या या शिवकालीन कादबरींत मोठ्या चटकदार रीतीने पडलेले व रगविलेले वाचकाना दिसणार आहे. किंमत २ रु. ग. रा. साने, ८४८ सदाशिव पेठ, पुणे, याचेकडे मागणी करावी.

२ **केंजळगडाचा कबजा**—ही कादबरी २०० पृष्ठाची असून रहस्यपूर्ण आहे. किंमत १ रुपाया. भारत गौरव ग्रथमाला, मुंबई, याचेकडे मागणी करावी.

३ **पण तिसरा कोण**?—ही सुमारे ४०० पृष्ठाची अत्यत विविध रहस्यानीं परिप्लुत आणि अतिशय मनोरजक अशी कादबरी आहे. शिवाजीने जगलीजयगड आणि भैरवगड कसे जिंकून घेतले, हे ह्या कादबरींत मोठ्या चटकदार रीतीने सांगितले आहे. किं. २ रुपये. भारत गौरव ग्रथमाला, मुंबई, याचेकडे मागणी करावी

४ **गणवतगडाचा गडकरी**—ही कादबरी २७८ पानाची असून ती रहस्यपूर्ण आहे. ती शिवाजीच्या उदयकाळावरची असून तींत शिवाजीने गणवतगड कसा हस्तगत करून घेतला, हा विषय आहे. किंमत ३ रुपये. तात्या नेमिनाथ पागळ, रविवार पेठ, पुणे, याचेकडे मिळेल.

५ **कोरलईचा किल्लेदार**—ही मनोरजक आणि रहस्यपरिप्लुत कादबरी ७५० पानाची असून ती वाचावयाला हातीं घेतली असता समाप्त केल्याशिवाय सोडवत नाहीं. किंमत ४ रुपये. भारत गौरव ग्रथमाला, मुंबई, याचेकडे पुस्तकें मिळतील.

६ **शांताबाई भिडे बी. ए.**—याची रहस्यपरिप्लुत कादबरी **कौमुदी**. किंमत १ रुपया. चित्रशाळा, पुणे, येथे पुस्तकें मिळतील.

७ **चपूबाई इ०** हा अकरा मनोरजक गोष्टींचा सग्रह असून प्रत्येक गोष्ट अत्यत चटकदार आणि चित्तवेधक आहे.

८ **सौ० सरस्वतीबाई भिडे** याची सुरस कादबरी **सरोजिनी**. किंमत १ रुपया. शकर हरि मुळे, बुकसेलर, पुणे, याचेकडे मिळेल।

## कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची

# निबंधमाला.

निबंधमालेची पाने डेमी अष्टपत्री साईजची ११०० वर झालेली असून कागद ग्लेज व मोहरेदार वापरला आहे. बाईंडिंग जाड पुठ्ठ्याचें कापडी मजबूत केलेलें आहे. कि. रु. ४॥.

# रासेलस.

आजपर्यंत याच्या चार आवृत्त्या खपून आता नवीन पांचवी काढली आहे. तेव्हा पुस्तकाचे चांगुलपणाची निराळी साक्ष पटविण्याचें कारण नाहीं. कि. ॥१२.

# साक्रेटिस.

या महात्म्याचें चरित्रही कै० थोरले चिपळूणकर यांनीं लिहिलेलें असून त्याची ही १४ वी आवृत्ति आहे. यावरून तें किती लोकप्रिय आहे हे कळून येईल. कि. ॥४.

## विनोद व महदाख्यायिका.

कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर याच्या निबंधमालेच्या अकाच्या शेवटीं विनोद व महदाख्यायिका म्हणून एक सदर असे ही [illegible] वाचकास माहीत आहेच. त्या जशाच्या तशाच यांत देऊन शिवाय कै० शास्त्रीबोवांनी वृद्ध गृहस्थांच्या तोंडून ऐकलेल्या [illegible] आख्यायिका जशाच्या तशाच त्यांत घातलेल्या आहेत. कि० ॥९.

मॅनेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.